मराठी

# युवकभारती

## इयत्ता अकरावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २०.०६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# युवकभारती

## इयत्ता अकरावी



**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.**

M9D1A8

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व त्या पाठासंबंधित अध्ययन–अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९
दुसरे पुनर्मुद्रण : २०२१

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

श्री. शिवाजी तांबे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्रीमती स्वाती ताडफळे (सदस्य)
श्री. ज्योतिराम कदम (सदस्य)
श्रीमती संध्या विनय उपासनी
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

| | |
|---|---|
| श्री. हरी नारलावार | श्रीमती शीतल सामंत |
| श्री. प्रवीण खैरे | श्रीमती सुचेता नलावडे |
| श्रीमती वैदेही तारे | श्री. जगदीश भोईर |
| श्रीमती प्रांजली जोशी | डॉ. पांडुरंग कंद |
| डॉ. नंदा भोर | श्री. ललित पाटील |
| श्री. विजय राठोड | डॉ. सुजाता शेणई |
| डॉ. सुहास सदाव्रते | श्रीमती रेणू तारे |
| डॉ. विनोद राठोड | डॉ. महादेव डिसले |
| डॉ. माधुरी काळे | श्रीमती आरती देशपांडे |

**प्रकाशक**
**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

**संयोजन** : **श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी
**श्रीमती संध्या विनय उपासनी**
सहायक विशेषाधिकारी, हिंदी

**चित्रकार** : राजेंद्र गिरधारी

**मुखपृष्ठ** : विवेकानंद पाटील

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
राजेंद्र पांडलोसकर, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/1.00

**मुद्रक** : M/s. Saraswati Prakashan, Aurangabad

# भारताचे संविधान

## उद्‌देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्‌धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्‌वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुमचे इयत्ता अकरावीच्या वर्गात मन:पूर्वक स्वागत! मराठी 'युवकभारती' हे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना विशेष आनंद होत आहे.

भाषा आणि जीवन यांचा संबंध अतूट आहे. महाराष्ट्राची राजभाषा म्हणून मराठी भाषा आपल्याला अधिक जवळची आहे. तुम्हांला भाषेचे चांगले व्यावहारिक उपयोजन करता यायला हवे, यासाठी मराठी विषयाकडे 'भाषा' म्हणून पाहा. भाषिक कौशल्यांच्या दृष्टीने समृद्ध होण्यासाठी हे पाठ्यपुस्तक तुमच्यासाठी महत्त्वाचे साधन ठरणार आहे. या पाठ्यपुस्तकाची रचना पाच भागांत केली आहे. अध्ययन-अध्यापनाच्या दृष्टीने ही रचना उपयुक्त ठरेल.

जीवनातील आव्हाने पेलण्याची, प्रेरणा देण्याची ताकद साहित्यात असते. या पाठ्यपुस्तकातून तुम्हांला विविध साहित्यप्रकारांची ओळख तर होणार आहेच, शिवाय अनेक जुन्या-नव्या साहित्यिकांची लेखनशैली तुम्हांला अभ्यासता येणार आहे. यांमधून तुम्ही मराठी साहित्याची आणि भाषेची श्रीमंती अनुभवू शकाल.

साहित्यप्रकार म्हणून 'नाटक' या साहित्यप्रकाराचा थोडक्यात परिचय आणि तीन नाट्यउतारे पाठ्यपुस्तकात दिले आहेत. 'दृकश्राव्य साहित्यप्रकार' म्हणून तुम्ही याचा अभ्यास करणार आहात. या अभ्यासातून तुम्हांला छंद वा व्यवसाय म्हणून नाटकाकडे वळता येईल अथवा चांगले रसिक प्रेक्षक म्हणून तुम्ही अशा कलाकृतींचा आस्वाद घेऊ शकाल.

पुस्तकात व्याकरण घटकांची मांडणी कार्यात्मक पद्धतीने केली आहे. त्यामुळे व्याकरण शिकणे अधिक सोपे होईल. उपयोजित लेखन विभागात अंतर्भूत केलेले घटक हे कालसुसंगत असून, या घटकांच्या अध्ययनातून अनेक व्यावसायिक संधी तुमच्या दृष्टिक्षेपात येऊ शकतील.

विचारशक्ती, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता यांच्या विकासाची संधी देणाऱ्या अनेक कृती पाठ्यपुस्तकात दिल्या आहेत. त्यात तुम्हीही अनेक नव्या कृतींची भर घालू शकाल. या कृतींमुळे पाठ, कविता वा संबंधित घटकांचे तुम्हांला उत्तम प्रकारे आकलन होण्यास मदत होईल आणि भाषिक कौशल्यांचा अधिक चांगल्या प्रकारे विकास होण्यासाठी त्या उपयुक्त ठरतील. पाठ्यघटकांशी संबंधित अनेक उपयुक्त संदर्भ क्यू. आर. कोडच्या माध्यमातून तुम्हांला अभ्यासता येणार आहेत.

उच्च माध्यमिक स्तरावर इयत्ता अकरावीमध्ये कृतिपत्रिकेच्या माध्यमातून तुमचे मराठी भाषा विषयाचे मूल्यमापन होणार आहे. त्यासाठी आकलन, उपयोजन, स्वमत आणि अभिव्यक्ती यांकडे तुम्हांला अधिक लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. त्या दृष्टीने पाठांखाली दिलेल्या कृती तुम्हांला मार्गदर्शक ठरतील.

'वाचत राहा, व्यक्त व्हा, लिहिते व्हा.'

उज्ज्वल यशासाठी तुम्हां सर्वांना शुभेच्छा!



(डॉ. सुनिल मगर)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २० जून, २०१९
भारतीय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ, १९४१

# भाषाविषयक क्षमता : प्रथम भाषा मराठी

**इयत्ता अकरावीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.**

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| श्रवण | • श्राव्य माध्यमांतील चर्चा, परिसंवाद, निवेदन, जाहिरात, बातम्या, सूत्रसंचालन, रेडिओजॉकीचे कार्यक्रम इत्यादींमधील भाषिक वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्यांतील विचार समजून घेणे.<br>• सार्वजनिक ठिकाणी दिल्या जाणाऱ्या सूचनांमधील शब्दयोजना समजून त्याला योग्य प्रतिसाद देणे.<br>• औपचारिक व अनौपचारिक ठिकाणी होणारी व्याख्याने, संवाद-संभाषणे यांतील संदर्भांचा चिकित्सकपणे अर्थ लावता येणे.<br>• भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी विविध श्राव्य माध्यमांचा उदा., आकाशवाणी व ध्वनिफिती यांचा माहितीचे स्रोत म्हणून उपयोग करणे.<br>• आंतरजालावरून लिंक्स, क्यू. आर. कोड, व्हिडिओज, यू ट्यूब व प्रसारमाध्यमे, इत्यादी दृकश्राव्य माध्यमांतून अपेक्षित व अध्ययनपूरक संदर्भ विकसित करता येणे. |
| भाषण-संभाषण | • विविध साहित्यकृतींवर आधारित चर्चेत सहभागी होताना साधक-बाधक विचारांच्या मांडणीसाठी विषयानुरूप भाषा वापरता येणे.<br>• साहित्यप्रकारांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगता येणे.<br>• सूत्रसंचालन, रेडिओजॉकी या घटकांचे सादरीकरण करता येणे.<br>• विषयाला अनुसरून स्वत:चे स्वतंत्र विचार संदर्भासहित मांडता येणे.<br>• भाषण-संभाषण कौशल्याची वैशिष्ट्ये आत्मसात करून त्याचा व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने आत्मविश्वासपूर्वक वापर करता येणे. |
| वाचन | • नाटक, कथा, काव्य व अन्य साहित्यकृतींचे अभिवाचन करता येणे.<br>• संकेतस्थळावरील ई-बुक्स, ई-न्यूज आणि ई-साहित्य शोधून वाचन करता येणे.<br>• स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने मराठी भाषाविषयाशी संबंधित उपयुक्त घटकांचे अभ्यासपूर्ण वाचन करणे.<br>• पाठ व पाठाशी संबंधित मूळ साहित्यकृतीचे व संदर्भ साहित्याचे वाचन करणे.<br>• साहित्याच्या आस्वादासाठी वाचन करणे. |

| | |
|---|---|
| **लेखन** | • पाठाचा आशय व त्या पाठातील विचार यांबाबत स्वत:चे मत, स्वत:च्या भाषेत समर्पक शब्दांत लिहिणे.<br>• जे अनुभव घेतले, जे निरीक्षण केले त्यांवर केलेला विचार यांबाबत लिखित स्वरूपात अभिव्यक्त होणे.<br>• स्वत:चा ब्लॉग लिहिता येणे.<br>• अनुवाद करण्याचे तंत्र प्राप्त करणे. |
| **अध्ययन कौशल्य** | • संदर्भांसाठी कोशवाङ्मय अभ्यासता येणे.<br>• अनुभवलेल्या विविध घटनांसंदर्भात व्यापक अर्थाने अभिव्यक्त होता येणे.<br>• आंतरजालाचा वापर करून व्यवहार करता येणे.<br>• संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक ॲप्लिकेशन्सचा उत्तमरीत्या कृतियुक्त वापर करता येणे.<br>• प्रसारमाध्यमांतून समोर येणाऱ्या घटकांचे सांगोपांग आकलन करून त्याविषयी चिकित्सक मांडणी करता येणे.<br>• विविध सामाजिक अडसरांचे आकलन करून घेऊन, त्यांच्या निर्मूलनासाठी स्पष्टपणे विचारांची मांडणी करता येणे.<br>• बहुभाषा परिचय करून घेण्याची जिज्ञासा निर्माण होणे.<br>• वाङ्मयीन उपक्रमांद्वारे अभिरुची घडवणे व सहभागातून ती वृद्धिंगत करणे.<br>• तंत्रज्ञान आणि आंतरजाल यांचा योग्य वापर करून 'स्व'ला अभिव्यक्त करून विकसित करता येणे.<br>• लेखननियमांनुसार मुद्रितशोधनाचे कौशल्य प्राप्त करता येणे. |
| **भाषाभ्यास** | • भाषाभ्यास–वाक्यसंश्लेषण, काळाचे उपप्रकार, शब्दभेद, वाक्प्रचार व म्हणी, गटात न बसणारा शब्द, पारिभाषिक शब्द, इंग्रजी आणि मराठी म्हणी, काही साहित्यिकांची टोपण नावे व पूर्ण नावे, काही साहित्यिक व त्यांच्या प्रसिद्ध रचना, ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त मराठी साहित्यिक.<br>• भाषासौंदर्य– शब्दशक्ती, काव्यगुण, अर्थच्छटा<br>या सर्व संकल्पनांचे आकलन करून घेऊन स्वत:च्या भाषेत त्याचे उपयोजन कौशल्यपूर्ण रीतीने करता येणे. |

# पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगाविषयी...

मराठी युवकभारती हे इयत्ता अकरावीचे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे.

इयत्ता अकरावीसाठी मराठी भाषा विषयाची उद्दिष्टे समोर ठेवून नेमकेपणाने क्षमता विधाने निश्चित केली आहेत. आपल्या संदर्भासाठी पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीलाच ही क्षमता विधाने दिली आहेत. श्रवण, भाषण-संभाषण, वाचन, लेखन, अध्ययन कौशल्ये व भाषाभ्यास या क्षेत्रांमध्ये या क्षमता विधानांचे वर्गीकरण केले आहे. ही क्षमता विधाने चिकित्सकपणे अभ्यासावीत, पाठ्यघटकांशी आणि स्वाध्यायांमधील कृतींशी पडताळून पाहून या क्षमता कोणकोणत्या पाठ्यघटकांमधून विकसित होऊ शकतात हे विचारात घ्यावे. इयत्ता अकरावीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये या भाषाविषयक क्षमता विकसित व्हाव्यात यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्नशील राहावे अशी अपेक्षा आहे.

पाठ्यपुस्तकाची रचना पाच भागांत करण्यात आली आहे. भाग एक व दोन मध्ये गद्य-पद्य घटकांची योजना केली आहे. अध्ययन-अध्यापनाचे नियोजन करण्याच्या दृष्टीने ही योजना उपयुक्त ठरेल. मराठी भाषा आणि साहित्याला वैभवशाली परंपरा आहे. जुन्या-नव्या साहित्यिकांची लेखनशैली, त्यांतील भाषासौंदर्य, चपखल शब्दयोजना, शब्दांत लपलेला गर्भितार्थ यांचा अभ्यास करताना विद्यार्थी आनंद घेऊ शकतील. या प्रत्येक गद्य-पद्य पाठाच्या निवडीमागे प्राधान्याने भाषिक कौशल्यांच्या विकासाचा विचार केला आहे. तसेच गाभा घटक, नैतिक मूल्ये, जीवनकौशल्ये यांचा जाणीवपूर्वक विचार केला आहे.

पाठ्यपुस्तकातील भागांचा आणि पाठांचा क्रम निश्चित करताना आशयाचे स्वरूप तसेच मूल्यमापन आराखडा विचारात घेतला आहे.

गद्य पाठांमध्ये व्यक्तिचित्रणपर, वैचारिक, प्रस्तावना, चिंतनपर, विनोदी कथा, चरित्रपर असे विविध साहित्यप्रकार समाविष्ट केले आहेत. 'मामू' या पाठामधून मामूचे व्यक्तिचित्र प्रत्यक्ष डोळ्यांसमोर उभे राहते. पुस्तके वैचारिक व भावनिक सोबत कशी करतात हा विचार 'अशी पुस्तकं' या पाठामध्ये आला आहे. 'परिमळ' या पाठामधून प्रस्तावना लेखनाचा वेगळा परिपाठ आपल्यासमोर येतो. माणसा-माणसांतील संवादाचा अभाव 'माणूस बांधूया' या चिंतनपर पाठामधून अधोरेखित होतो. 'वहिनींचा सुसाट सल्ला' या कथेमधून होणारी विनोद निर्मिती आपल्या चेहऱ्यावर हास्य फुलवते. कोणत्याही सर्वोत्कृष्ट कार्यासाठी कल्पकतेची आणि परिश्रमाची किती परिसीमा गाठावी लागते याचे दर्शन 'वाङ्मयीन लेण्याचा शिल्पकार' या चरित्रपर पाठातून होते. हे सर्व पाठ भाषा आणि आशयाच्या दृष्टीने समृद्ध आणि वैविध्यपूर्ण आहेत.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे 'स्वतंत्रतेचें स्तोत्र' हे राष्ट्रभक्तीपर पद्य काव्यानंदासाठी दिलेले आहे. पद्य घटकांमध्ये निसर्गकविता, प्रेमकविता, संतकाव्य, विद्रोही कविता, स्त्रीवादी कविता असे विषयांमधील वैविध्य जपण्याचा प्रयत्न केला आहे. घनावळीशी नाते जोडणारी 'प्राणसई', निसर्गाशी एकरूप होण्याची आस बाळगणारी 'झाडांच्या मनात जाऊ' ही सहजसुंदर रचना, प्रेयसीच्या दृष्टिभेटीचे तरल वर्णन करणारी 'दवांत आलिस भल्या पहाटीं' ही प्रेमकविता, अमृताशी पैजां जिंकणाऱ्या मराठी भाषेचे महत्त्व सांगणारी संत ज्ञानेश्वरांची 'ऐसीं अक्षरें रसिकें' ही ओवीबद्ध रचना, जीवनातल्या अंधारात प्रकाशवाटा दाखवणारी 'शब्द' ही कविता आणि स्त्री स्वातंत्र्याचे टप्पे प्रतीकांच्या माध्यमांतून उलगडून दाखवणारी 'पैंजण' अशा कवितांची मालिका आपल्यासमोर उलगडत जाते.

गेयता, लयबद्धता आणि अलंकार वैभव ही या पाठ्यपुस्तकातील कवितांची काही वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे कवितांमधील काव्यानुभव मनात पोहोचतो. आशय, विचार, भावना, शब्दसौंदर्य, अर्थसौंदर्य, विचारसौंदर्य या सर्व दृष्टीने यांकडे पाहायला हवे.

पद्य घटकांत 'रसग्रहण' कृतीचा समावेश आहे. पद्य रचनेतून निर्माण होणारी स्थायीभाव जागृती व त्यांतून निर्माण होणारी रसनिर्मिती व्यक्त करणे रसग्रहणात अपेक्षित आहे. त्यासाठी त्या रचनेतील आशयसौंदर्य, विचारसौंदर्य, भावसौंदर्य उलगडून दाखवणे, त्या रचनेची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे, रचनेतील प्रतिमा व प्रतीके समजून घेऊन त्यांची दखल घेणे आवश्यक आहे. रसग्रहणासंबंधी स्वतंत्र माहिती दिली असून कवितेचे रसग्रहण करताना ती मार्गदर्शक ठरेल.

बहुतेक गद्य-पद्य पाठांमध्ये चित्रांचा समावेश केला आहे. त्यामुळे मजकुराला आकर्षकता लाभून आशय उलगडायला मदत होते.

'नाटक' हा साहित्यप्रकार पाठ्यपुस्तकात स्वतंत्रपणे अंतर्भूत केला आहे. त्याच्या अभ्यासातून या साहित्यप्रकाराकडे पाहण्याची सजग दृष्टी विकसित होणे अपेक्षित आहे. या साहित्यप्रकाराची व्याप्ती मोठी आहे. इयत्ता अकरावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा भाषिक आवाका लक्षात घेऊन, त्यांना समजेल-रुचेल अशा पद्धतीने नाटकाचा परिचय करून देण्यात आला आहे. नाटक म्हणजे काय ? नाट्य म्हणजे काय ? त्याचबरोबर संगीत नाटक, प्रायोगिक नाटक व व्यावसायिक नाटक यांविषयीची ओळख करून देण्यात आली आहे. सोबत तीन नाट्य उतारेही देण्यात आले आहेत. तीन नाट्यउताऱ्यांचे स्वरूप वेगळे आहे. आशय, भाषाशैली, काळ या दृष्टीने ते 'वेगळे' आहेत. स्वत:मधील 'अभिनेत्याला' वाव मिळावा म्हणून नटाने रचलेली 'हसवाफसवी' ही संहिता प्रेक्षकांना हसवता-हसवता अंतर्मुख करणारी आहे. या नाटकातील उतारा या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे.

'ध्यानीमनी' या नाटकातील आई व तिचे 'काल्पनिक मूल' यांच्या नात्यातील भावनिक बंध विचार करायला प्रवृत्त करणारा आहे. या नाटकाचे अनेक पदर अर्थपूर्ण आहेत. या नाट्यउताऱ्यातील आशय अगदी वेगळा विचार देणारा आहे.

दोन पिढ्यांतील अंतर अधोरेखित करणाऱ्या, इतिहास काळातील सामाजिक स्थितीचे दर्शन घडवणाऱ्या 'सुंदर मी होणार' या नाट्यउताऱ्यामधील आशय आणि संवाद यांमधून नाटकाचे स्वरूप स्पष्ट व्हायला मदत होते.

'नाटक' या साहित्यप्रकाराच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांना नाटकाशी संबंधित व्यावसायिक संधीची माहिती मिळू शकेल.

'उपयोजित मराठी' या भागात 'सूत्रसंचालन', 'मुद्रितशोधन', 'अनुवाद', 'अनुदिनी (ब्लॉग) लेखन', 'रेडिओजॉकी' या घटकांची माहिती दिली आहे. हे सर्व घटक भाषिक कौशल्यांच्या उपयोजनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेतच; शिवाय त्या त्या क्षेत्रांतील व्यावसायिक संधींची माहिती देणारे आहेत. त्यांच्या अभ्यासातून प्राप्त केलेली भाषिक कौशल्ये 'प्रकल्प' व 'सादरीकरण' आणि 'प्रात्यक्षिक' यांच्या माध्यमांतून व्यक्त करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

भाग पाचमध्ये व्याकरण घटकांची रचना कार्यात्मक पद्धतीने केली आहे. शब्दशक्ती, काव्यगुण, वाक्यसंश्लेषण, काळ, शब्दभेद या व्याकरण घटकांतून भाषिक कौशल्यांच्या विकासाला शास्त्रशुद्ध पाया मिळेल. तसेच विद्यार्थ्यांची भाषा समृद्ध होण्यास अधिक मदत होईल.

'परिशिष्टात' भाषाविकासाच्या दृष्टीने उपयुक्त 'पारिभाषिक शब्द', 'इंग्रजी आणि मराठी म्हणी', 'काही साहित्यिकांची टोपण नावे व पूर्ण नावे', 'काही साहित्यिक व त्यांच्या प्रसिद्ध रचना', 'ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त मराठी साहित्यिक' अशा सामान्यज्ञानाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या माहितीचा समावेश केला आहे.

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कृतिपत्रिकेच्या माध्यमातून होणार असल्यामुळे पाठातील प्रत्येक घटकाखाली कृतींच्या स्वरूपातील स्वाध्याय दिले आहेत. स्वाध्यायातील कृती आकलन, उपयोजन, विश्लेषण, संश्लेषण, तार्किक विचार, कार्यकारणभाव व सर्जनशीलता यांवर आधारित असून त्यांमधून भाषिक विकास, विचार-विकसन, कल्पनाशक्तीला चालना मिळण्यास व साहित्यिक जाण प्रगल्भ होण्यास मदत होणार आहे. सर्व स्वाध्यायांमधील कृतींमध्ये वैविध्य आहे; परंतु कृतींचे सर्व प्रकार प्रत्येक पाठाखाली देण्यास मर्यादा आहेत. पाठाचा आशय व भाषा विचारात घेऊन आपण योग्य त्या नावीन्यपूर्ण कृतींची भर घालावी.

पूर्वज्ञानावर आधारित व्याकरणाच्या पायाभूत स्वरूपातील कृती त्या त्या पाठाखाली देण्यात आल्या आहेत. प्रथम, द्वितीय वा तृतीय स्तरावर भाषा शिकलेल्या विद्यार्थ्यांनाही या कृती सहज सोडवता येतील अशा आहेत. यामागे विद्यार्थ्यांचे व्याकरणाचे सर्वसामान्य ज्ञान ताजे राहावे, असा हेतू आहे.

पाठ्यपुस्तकातील पहिल्या पानावर दिलेल्या क्यू. आर. कोडचा अध्यापनात अवश्य उपयोग करावा. त्यामुळे आपली आणि विद्यार्थ्यांची संदर्भ समृद्धी वाढेल.

दैनंदिन जीवनाशी सांगड घालणारे मराठी भाषा विषयाचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे, त्यांना साहित्याचा आस्वाद घेता यावा आणि या भाषाभ्यासातून 'उद्याचे वाचक-लेखक-कवी-व्यावसायिक' घडावेत यासाठी हे पाठ्यपुस्तक महत्वाचे साधन ठरेल, असा विश्वास आहे.

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठ, कविता | पृ. क्र. |
|---|---|---|
| | स्वतंत्रतेचें स्तोत्र (काव्यानंद)<br>– स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर | १ |
| १. | मामू<br>– शिवाजी सावंत | २ |
| २. | प्राणसई (कविता)<br>– इंदिरा संत | ७ |
| ३. | अशी पुस्तकं<br>– डॉ. निर्मलकुमार फडकुले | ११ |
| ४. | झाडांच्या मनात जाऊ (कविता)<br>– नलेश पाटील | १६ |
| ५. | परिमळ<br>– प्रल्हाद केशव अत्रे | १९ |
| ६. | दवांत आलिस भल्या पहाटीं (कविता)<br>– बा. सी. मर्ढेकर | २५ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठ, कविता | पृ. क्र. |
|---|---|---|
| ७. | 'माणूस' बांधूया!<br>– प्रवीण दवणे | २९ |
| ८. | ऐसीं अक्षरें रसिकें (संतकाव्य)<br>– संत ज्ञानेश्वर | ३३ |
| ९. | वहिनींचा 'सुसाट' सल्ला<br>– शोभा बोंद्रे | ३६ |
| १०. | शब्द (कविता)<br>– यशवंत मनोहर | ४४ |
| ११. | वाङ्मयीन लेण्याचा शिल्पकार<br>– सुमती देवस्थळे | ४७ |
| १२. | पैंजण (कविता)<br>– नीलम माणगावे | ५३ |
| | कवितेचे रसग्रहण | ५८ |


## भाग –३


| अ. क्र. | साहित्यप्रकार | पृ. क्र. |
|---|---|---|
| | नाटक– साहित्यप्रकार–परिचय | ६१ |
| १. | हसवाफसवी – दिलीप प्रभावळकर | ७० |
| २. | ध्यानीमनी – प्रशांत दळवी | ७५ |
| ३. | सुंदर मी होणार – पु. ल. देशपांडे | ८० |


## भाग –४


| अ. क्र. | उपयोजित मराठी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | सूत्रसंचालन | ८८ |
| २. | मुद्रितशोधन | ९३ |
| ३. | अनुवाद | १०१ |
| ४. | अनुदिनी (ब्लॉग) लेखन | १०८ |
| ५. | रेडिओजॉकी | ११४ |


## भाग –५


| अ. क्र. | व्याकरण | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | शब्दशक्ती | ११९ |
| २. | काव्यगुण | १२३ |
| ३. | वाक्यसंश्लेषण | १२६ |
| ४. | काळ | १३० |
| ५. | शब्दभेद | १३२ |
| | परिशिष्टे | १३७ |





# स्वतंत्रतेचें स्तोत्र (काव्यानंद)

**स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर** (१८८३ ते १९६६) :

कवी, कादंबरीकार, आत्मचरित्रकार, नाटककार, विचारवंत, निबंधकार. लहानपणापासूनच देशभक्ती आणि स्वातंत्र्याचा ध्यास. त्यातूनच मातृभूमीच्या सेवेची प्रतिज्ञा. 'अभिनव भारत' या संस्थेची स्थापना. 'माझी जन्मठेप' हा आत्मचरित्रात्मक ग्रंथ. वयाच्या अकराव्या वर्षी पहिले कवितालेखन. 'गोमांतक', 'कमला', 'महासागर', 'विरहोच्छ्वास' ही खंडकाव्ये; 'मृत्युपत्र', 'स्वतंत्रतेचें स्तोत्र', 'जगन्नाथाचा रथ', 'सप्तर्षी', 'तारकांस पाहून' इत्यादी कविता प्रसिद्ध. तरलता, कोमल भावना, भव्यतेची ओढ, ओज, आत्मसमर्पणाचा ध्यास, तत्त्वचिंतनात्मक वृत्ती ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये. 'भाषाशुद्धी' व 'लिपिशुद्धी' या वाङ्मयीन चळवळी. क्रांतिकारकत्व, प्रखर विज्ञाननिष्ठा, जहाल भूमिका, बुद्धिवादी विचारसरणी यांमुळे सर्वच लेखन प्रभावी. त्यांच्या साहित्यातून जाज्वल्य राष्ट्रभक्तीची भावना प्रकट होते. त्यांनी मराठीच्या साहित्यवैभवात फार मोठी भर घातली.

प्रस्तुत देशभक्तीपर रचनेत कवीने स्वातंत्र्यदेवतेचे स्तोत्र गायले आहे. स्वातंत्र्य म्हणजे राष्ट्राचे चैतन्य आहे, श्वास आहे. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी जगणे हीच देशवासीयांच्या जीवनाची सार्थकता आहे. आपली प्रत्येक कृती आणि त्या मागचा भाव हा राष्ट्रसमर्पणाचा, राष्ट्रहिताचा असावा असा संदेश कवी या कवितेतून देतात.



जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति! त्वामहं यशोयुतां वंदे ।।धृ.।।

राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति-संपदांची
स्वतंत्रते भगवति! श्रीमती राज्ञी तूं त्यांची

परवशतेच्या नभांत तूंची आकाशीं होशी
स्वतंत्रते भगवती! चांदणी चमचम लखलखशी

गालावरच्या कुसुमीं किंवा कुसुमांच्या गालीं
स्वतंत्रते भगवती! तूच जी विलसतसे लाली

तूं सूर्याचें तेज उदधिचें गांभीर्यहि तूंची
स्वतंत्रते भगवती! अन्यथा ग्रहण नष्ट तेंची

मोक्ष मुक्ति हीं तुझींच रूपें तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती! योगिजन परब्रह्म वदती

जें जें उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवती! सर्व तव सहचारी होतें

हे अधम-रक्त-रंजिते । सुजन-पूजिते । श्रीस्वतंत्रते

तुजसाठिं मरण तें जनन
तुजवीण जनन तें मरण
तुज सकल चराचर शरण

भरतभूमिला दृढालिंगना कधिं देशिल वरदे
स्वतंत्रते भगवति! त्वामहं यशोयुतां वंदे

**सावरकरांची कविता**
**(संपादक : वासुदेव गोविंद मायदेव)**

# १. मामू

**शिवाजी सावंत** (१९४० ते २००२) :

सुप्रसिद्ध कादंबरीकार. 'मृत्युंजय' ही त्यांची कादंबरी म्हणजे त्यांच्या लेखनकर्तृत्वाचे शिखर आहे. चरित्रात्मक कादंबरीलेखन हे त्यांचे आवडते लेखनक्षेत्र. 'छावा', 'युगंधर', 'लढत' या प्रसिद्ध कादंबऱ्या. 'अशी मने असे नमुने', 'मोरावळा', 'लाल माती रंगीत मने' हे व्यक्तिचित्रण संग्रह प्रसिद्ध. 'शेलका साज', 'कांचनकण' हे ललितलेखन प्रसिद्ध. भारतीय ज्ञानपीठाचा 'मूर्तिदेवी' पुरस्कार, सर्वोत्कृष्ट वाङ्मयाच्या महाराष्ट्र राज्य पुरस्काराने पाच वेळा गौरवान्वित. 'पूनमचंद भुतोडिया' हा बंगाली पुरस्कार, पुणे विद्यापीठातर्फे 'जीवनगौरव' पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित. १९९० यावर्षी साहित्याच्या नोबेल पारितोषकासाठी नामांकन.

'मामू' हा व्यक्तिचित्रणात्मक पाठ असून मामूच्या स्वभावाच्या विविध पैलूंचे वर्णन पाठात केले आहे. प्रामाणिक, देशाभिमानी, नम्र, सेवाभावी व सहृदयी असलेला 'मामू' माणुसकीचे विलोभनीय दर्शन घडवतो. समर्पक शब्दरचना, चित्रदर्शी लेखनशैली यांमुळे 'मामू' हे व्यक्तिमत्त्व परिणामकारकतेने मनाला भिडते.



'घण् घण् घण्ऽऽ!' थोराड घंटेचे टोलांवर टोल पडत राहतात. चैतन्याचे छोटे कोंब उड्या घेत वाड्याच्या प्रार्थनामंदिराकडं एकवटू लागतात. समाधानी चर्येनं मामू स्टुलावरून खाली उतरतो.

रांगा धरून उभे राहिलेले अनघड, कोवळे कंठ जोडल्या हातांनी आणि मिटल्या डोळ्यांनी भावपूर्ण सुरात प्रार्थनेतून अज्ञात शक्तीला आळवू लागतात.

मामू एका दगडी खांबाला रेलून आपली चुनेवाणाची सफेद दाढी कुरवाळत ती समूह प्रार्थना ऐकत राहतो. त्याचं मन कशात तरी गुंतून पडतं.

प्रार्थना संपते. 'जनगणमन'ची इशारत मिळते. खांबाला रेललेला मामू पाय जोडून सावधानचा पवित्रा घेऊन खडा होतो.

या शाळेचा मामू एक अवयव झालाय. गेली चाळीस वर्षे तो आपल्या अलिबाबाच्या हातानं घंटेचे टोल देत, असे चैतन्याचे कोंब नाचवत आलाय. कोल्हापूर संस्थान होतं तेव्हा राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील मामूची नेमणूक आहे. त्यानं दोन राज्यं बघितली. संस्थानाचं आणि लोकशाहीचं. कोल्हापूरकरांच्या कैक पिढ्या बघितल्या.

मामूच्या सफेद दाढीत जेवढे केस आहेत तेवढ्या त्याच्या आठवणी असतील! खूप बघितलंय आणि भोगलंय त्यानं. महाराजांचा मुक्काम पन्हाळ्यावर पडला तर मामूला भल्या पहाटे उठून साथीदारांसह चौदा मैलांची पायपीट करावी लागलीय; पण ही आठवण सांगताना कुठं वेदनेची कळ त्याच्या दाढीधारी चर्येवर तरळत नाही. उलट एका सच्च्या सेवकाला शोभेल अशी अभिमानाची झालर त्याच्या मुखड्यावर उतरते. डोळे किलकिले करत, भुवया आक्रसून त्याच्या बुढ्या देहातील उमदं मन बोलून जातं, 'सर, फाटेचं धुक्यातनं पन्हाळ्यावर चढणं लई गमतीचं. आता वाटतं पर न्हाई झेपत.'

संस्थानं विलीन झाली आणि असा इमानी चाकरवर्ग चौवाटा पांगला. त्यातच मामू या शाळेत रुजू झाला. एक शिपाई म्हणून.

डुईला अबोली रंगाचा फेटा, अंगात नेहरू शर्टावर गर्द निळं जाकीट, जाकिटाच्या खिशात चांदीच्या साखळीचं एक जुनं पॉकेट वॉच, खाली घेराची आणि घोट्याजवळ चुण्या असलेली तुमान, पायात जुनापुराणा पंपशू हा मामूचा पोशाख आहे.

शाळेत तो शिपाई आहे; पण शाळेबाहेर तो बहुरूपी आहे. कुठं फळांच्या मार्केटमध्ये एखाद्या बागवानाच्या दुकानावर घटकाभर बसून त्याचं दुकान चालव, तो हातावर ठेवेल ते अल्लाची खैर म्हणून आपलंसं कर; कुठं एखाद्या मुस्लिम अधिकाऱ्याच्या बच्चाबच्चीला उर्दूची शिकवण दे. एक ना दोन नानातऱ्हेचे उद्योग मामू करतो.

शाळेतील लोकांना तो शिपाई वाटतो. शाळेबाहेरच्या लोकांना त्याची अनेक रूपं दिसतात. मौलवी, व्यापारी, उस्ताद या सगळ्यांचा अंतर्भाव करता येईल असं साऱ्यांनी त्याला सुटसुटीत नाव देऊन टाकलंय-मामू!

दहा वर्षांपूर्वी मी या शाळेत रुजू झालो तेव्हापासून या माणसाला जवळून पारखत आलोय. गरीब माणसानं किती आणि कसं हुशार असावं याचा मामू एवढा मासला मला काही बघायला मिळालेला नाही.

मी मामूच्या घरी गृहप्रवेशाच्या कार्यक्रमाला गेलो. त्याची कर्तबगारी बघून खूप समाधान वाटलं. मामूनं केलेल्या कष्टमय चाकरीचं फळ म्हणून असेल; पण त्याची सगळीच मुलं गुणवान निघालीत. पैसा कमावतात म्हणून माज नाही. बापाचा शब्द त्यांच्या लेखी शेवटचा शब्द आहे. तो कधी खाली पडत नाही.

असंच एकदा मामूच्या घरी त्याच्या दुसऱ्या नंबरच्या मुलाचं 'शादी मुबारक' निघालं. ठरल्याप्रमाणं मामू मला आमंत्रण द्यायला आला. ''सर, पोराचं लग्न हाय. यायला पाहिजे.''

''मामू, तुमच्या पोराचं लग्न आहे तर न येऊन कसं चालेल? नक्की येईन.'' मी उत्तर दिलं.

एका मित्राला घेऊन संध्याकाळी शादीच्या मंडपात गेलो. मंडप माणसांनी भरला होता. मामूनं पुढे येत मला हाताला धरून आघाडीला नेऊन बसवलं.

त्या मंडपात आमदार होते, खासदार होते, बडे व्यापारी होते, शिक्षक, प्राध्यापक होते. हयातभर अंगावर पट्टा चढवून शिपाई म्हणून केलेल्या चाकरीचं चीज झाल्याचं समाधान त्याच्या सफेद दाढीभर पसरलं होतं. निका लागला. मामूनं जमलेल्या लोकांचे आभार मानण्यासाठी माईक हातात घेतला.

''आज माज्या मुलाच्या लग्नाला आमदारसाहेब आलेत, खासदारसाहेब आलेत, मृत्युंजयकार आलेत-माज्या गरिबाच्या...'' मामूचा कंठ दाटून आला. त्याला बोलता येईना. त्याची अनुभवानं पांढरी झालेली दाढी थरथरत राहिली. मामूनं कसेबसे आभार मानून हातातील माईक खाली ठेवला.

'धर्मापेक्षा माणूस मोठा आहे आणि माणसापेक्षा माणुसकी फार फार मोठी आहे!' असे विचार घेऊनच त्या दिवशी मी मंडपातून बाहेर पडलो.

मामूचा शेवटचा बच्चा शाबू माझ्या हाताखाली शिकला. चांगल्या गुणांनी एस. एस. सी. पास झाला. तो पास होताच मामूचं माझ्यामागं लकडं लागलं, ''सर, शाबूला कुठंतरी चिकटवा.''

''मामू, हा शेवटचा बच्चा. तुमच्यात कुणीच पदवीधर नाही. याला शिकू द्या. याला नोकरीत अडकवलात, की हा संपला. जरा नेट धरा. काही अडलं नडलं मला सांगा.'' मी मामूला दिलासा देत होतो.

बदलत्या काळाची पावलं ओळखून मामूनं निर्धार बांधला. पोराला कॉलेजात दाखल केलं.

परवा परवा मामूची बुढी आई अल्लाला प्यारी झाली. तिच्या आठवणी सांगताना मामूच्या डोळ्यांत पाणी तरळलं. 'दुनियेत सारं मिळेल सर; पण आईची माया कुणाकडनं न्हाई मिळायची', हे त्याचे बोल ऐकताना

नातवंडं असलेला मामू मला त्याच्या शाबूसारखा पोर-वयाचा वाटला. त्याची आई वारली त्या दिवशी शाळेला सुट्टी मिळाली.

हे हायस्कूल शंभर वर्षांवर जुनं आहे. इथलं रेकॉर्ड त्यामुळं अवाढव्य आहे. कुणी माजी विद्यार्थी येतो. १९२०-२२ सालातील आपल्या नावाचा दाखला मागतो. मामू ते रजिस्टर अचूक शोधून त्याचं नाव धुंडून काढतो. हाती दाखला पडलेला, बाप्या झालेला विद्यार्थी मामूचा हात हातात घेऊन म्हणतो, ''चलो मामू, चाय लेंगे.''

''कशाला? नगं आत्ताच घेतलाय. कुठं हाय आता तुम्ही?'', मामू त्याचा चहा नाकारण्याचा प्रयत्न करतो. मनात जुन्या आठवणी रेंगाळणारा विद्यार्थी त्याचा हात खेचून त्याला आग्रहानं चहाला नेतो. मग चहा पिता पिता त्याच्या वेळच्या शिक्षकांच्या आठवणींना उजाळा मिळतो. 'एम. आर. सर भारी माणूस. केवढा आब होता त्या वक्ताला हायस्कूलचा.' मामू हरवलेल्या काळाला मुठीत पकडण्याचा प्रयत्न करतो.

ही शाळा सरकारी आहे. इथं ड्रॉईंगच्या, कॉमर्सच्या सरकारी सर्टिफिकेटच्या परीक्षांचं केंद्र आहे. या परीक्षा आल्या, की बुढा मामू पाखरागत हालचाली करू लागतो. नंबर टाकणं, बाकडी हालवून बैठकीची व्यवस्था करणं, पाणी देण्यासाठी गोरगरिबांची पोरं ऑफिसात आणून दाखल करणं. पडेल ते काम मामू उत्साहानं करू लागतो.

कधी खेळताना, कधी प्रार्थनेच्या वेळेला एखादं पोरगं चक्कर येऊन कोसळतं. रिक्षा आणून, त्यात त्या पोराला घालून डॉक्टरकडं नेताना मामू त्याला आईच्या मायेने धीर देत म्हणतो, ''घाबरू नकोस. ताठ बस. काय झालं न्हाई तुला.''

सव्वीस जानेवारी, पंधरा ऑगस्ट या राष्ट्रीय दिवशी कधी कधी मामूच्या हातानं इथला राष्ट्रध्वज, दंडावर सरसरत चढतो. शाळेच्या तिसऱ्या मजल्यावरच्या माथ्यावर निकोप वाऱ्यावर फडफडत राहतो. फेट्याजवळ हाताचा पंजा भिडवून मामू राष्ट्रगीत संपेपर्यंत ध्वजाकडं मान उंचावून बघत राहतो.

माझ्याकडं कुणी बडा पाहुणा आला, की मामूकडं बघत नुसती मान डुलवली, की तिचा इशारा पकडत मामू चहाची ऑर्डर देतो. पाहुणा बसेपर्यंत चहा दाखल होतो. ''राजे, चहा केव्हा सांगितलात?'' पाहुणा आश्चर्यानं विचारतो. मी उत्तर देतो, ''ऐतिहासिक काळात वावरतो ना सध्या! नुसती इशारतीबरहुकूम कामं होतात आमची!''

एकदा मी आणि मामू शाळेच्या व्हरांड्यात बाकावर गप्पा मारत बसलो. त्या दिवशी मामू खुलला होता. संस्थानिकांच्या काळच्या, वाड्यावरच्या एक-एक अजब गमती सांगत होता. तीन तास केव्हा मागं पडले होते दोघांनाही कळलं नाही.

प्रसंगी मामू एखाद्या कार्यक्रमाच्या वेळी मुलांच्यासमोर दहा-वीस मिनिटे एखाद्या विषयावर बोलू शकतो. त्याला जसं उर्दूचं ज्ञान आहे तसंच त्याला वैद्यकाचंही ज्ञान आहे. लहानसर चण असलेल्या शिक्षकाला तो म्हणतो, ''काय पवार सर, काय ही तब्येत? पैसं काय कोन उरावर बांधून नेणार जाताना? जरा अंग धरीसारकं कायतरी खावा. मी सांगतो तुमाला. साखरेच्या पाकात तूप घालून त्यात शेरभर साफ धुतलेल्या खारका बिया काढून पंधरा दिस मुरतीला घाला. रोज सकाळी अनोशा पोटी दोन-दोन खावा. म्हयन्याभरात तुमाला कुनी वळखनार न्हाई!''

कुणाच्या पायाला लागलं तर त्यावर कुठला पाला वाटून लावावा याचा सल्ला द्यायला मामू विसरत नाही. कुणाचं पोट बिघडलं तर त्यावर कुठला काढा प्यावा याची सूचना द्यायला तो चुकत नाही.

शाळेत एखादा कार्यक्रम निघाला, की त्याची आखणी मामूच्या हातात येते. फ्लॉवरपॉटपासून टेबलक्लॉथपर्यंत सारी जुपी जोडून देऊन पुन्हा कार्यक्रमाच्या वेळी एखादा कोपरा धरून, वक्ता काय काय बोलतो हे तो नीट ध्यान देऊन ऐकतो. कार्यक्रम संपला, की मामूला विचारावं, 'कसा झाला कार्यक्रम?' वक्त्यात काही खास नसेल तर नाराजी प्रकट करण्याचीही त्याची एक ढब आहे. 'बोललं चांगलं ते, पर म्हनावी तशी रंगत न्हाई भरली.'

आणखी वर्षानंतर मामू या शाळेतून सेवानिवृत्त होणार. रोजाना दिसणारा त्याचा अबोली रंगाचा फेटा आणि सफेद दाढी आता दिसणार नाही. माणसाच्या आयुष्याला कुठं ना कुठं वळण असतं. टाळतो म्हटल्यानं ते नाही टाळता येत.

सरकारी नियमच आहे. त्याप्रमाणे मामूला घरी जावं लागणार; पण मला मात्र वाटत राहातं, की त्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्याच्या हातानं इथल्या थोराड घंटेचे

'घण् घण् घण्' असे टोल पडत राहावेत. त्या टोलांच्या तालावर चैतन्याचे अगणित कोवळे कोंब नाचत राहावेत. जोडल्या हातांनी आणि मिटल्या डोळ्यांनी, कवळिकीच्या असंख्य अनघड कंठांतून प्रार्थनेचे धीरगंभीर बोल असेच उमटत राहावेत आणि दगडी खांबाला रेलून ते प्रार्थनाबोल ऐकताना बुढा, पार बुढा झालेला मामू असा कसल्यातरी विचारात कायमचा हरवलेला बघायला मिळावा.

(लाल माती रंगीत मने)

## कृती

### (१) (अ) कोण ते लिहा.

(१) चैतन्याचे छोटे कोंब–

(२) सफेद दाढीतील केसांएवढ्या आठवणी असणारा–

(३) शाळेबाहेरचा बहुरूपी–

(४) अनघड, कोवळे कंठ–

### (आ) कृती करा.

(१) **लेखकाने विद्यार्थ्यांचे वर्णन करण्यासाठी वापरलेले शब्दसमूह** → → → →

(२) **मामूची शालाबाह्य रूपे** → → →

### (इ) खालील वाक्यांतून तुम्हांला समजलेले मामूचे गुण लिहा.

(१) मामू सावधानचा पवित्रा घेऊन खडा होतो. ...............

(२) आईच्या आठवणी सांगताना मामूच्या डोळ्यांत पाणी येते. ...............

(३) मामू त्याला आईच्या मायेने धीर देत म्हणतो, "घाबरू नकोस. ताठ बस. काय झालं न्हाई तुला." ...........

(४) माझ्याकडं कुणी बडा पाहुणा आला, की मामूकडं बघत नुसती मान डुलवली, की तिचा इशारा पकडत मामू चहाची ऑर्डर देतो. ...............

(५) मामू एखाद्या कार्यक्रमात मुलांच्यासमोर दहा–वीस मिनिटे एखाद्या विषयावर बोलू शकतो. ...........

### (ई) खालील शब्दसमूहांचा अर्थ लिहा.

(१) थोराड घंटा (२) अभिमानाची झालर

### (२) व्याकरण.

#### (अ) खालील शब्दांतील अक्षरे निवडून अर्थपूर्ण शब्द तयार करा.

(१) इशारतीबरहुकूम (२) आमदारसाहेब (३) समाधान

#### (आ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यांत उपयोग करा.

(१) चौवाटा पांगणे–

(२) कंठ दाटून येणे–

(३) हरवलेला काळ मुठीत पकडणे–

(इ) **खालील शब्दांचे दिलेल्या तक्त्यामध्ये वर्गीकरण करा.**

(१) अनुमती (४) घटकाभर (७) नानातऱ्हा (१०) अभिवाचन
(२) जुनापुराणा (५) भरदिवसा (८) गुणवान
(३) साथीदार (६) ओबडधोबड (९) अगणित

| उपसर्गघटित | प्रत्ययघटित | अभ्यस्त |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**(३) स्वमत.**

(अ) 'शाळेत तो शिपाई आहे; पण शाळेबाहेर तो बहुरूपी आहे', या मामूसंबंधी केलेल्या विधानाचा अर्थ पाठाधारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) मामूच्या संवेदनशीलतेची दोन उदाहरणे तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) मामूच्या व्यक्तित्वाचे (राहणीमान, रूप) चित्रण तुमच्या शब्दांत करा.

**(४) अभिव्यक्ती.**

(अ) 'मामू' या पाठाची भाषिक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(आ) मामूच्या स्वभावातील विविध पैलूंचे विश्लेषण करा.

(इ) 'माणसापेक्षा माणुसकी फार फार मोठी आहे!', या विधानातील आशयसौंदर्य तुमच्या शब्दांत लिहा.

**प्रकल्प.**

तुमच्या परिसरातील 'मामू' सारख्या बहुगुणी व्यक्तीचा शोध घ्या. त्याच्या व्यक्तिविशेषाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

**✻ भाषाभ्यास ✻**

- **उपसर्गघटित शब्द–** शब्दांच्या पूर्वी उपसर्ग लागून जे शब्द तयार होतात त्यांना 'उपसर्गघटित' शब्द म्हणतात. उदा., अवघड, भरधाव, अतिशय, उपसंपादक, बेडर, नापसंत.
- **प्रत्ययघटित शब्द–** शब्दाच्या किंवा धातूच्या पुढे एक किंवा अधिक प्रत्यय लागून काही शब्द तयार होतात, अशा शब्दांना 'प्रत्ययघटित' शब्द असे म्हणतात.
  उदा., दुकानदार, गुलामगिरी, खोदाई, टाकाऊ, झोपाळू, मानसिक, जडत्व, खोदाईसाठी.
- **अभ्यस्त शब्द–** द्वित्व किंवा पुनरावृत्तीने तयार झालेले शब्द म्हणजे 'अभ्यस्त' शब्द होत.
  (अ) पूर्णाभ्यस्त शब्द– एक शब्द पुन: पुन्हा येऊन एक जोडशब्द तयार होतो. उदा., लाललाल, तिळतिळ, हालहाल, फडफड इत्यादी.
  (आ) अंशाभ्यस्त शब्द– काही वेळा शब्दात त्याच शब्दाची पूर्ण पुनरावृत्ती न होता एखादे अक्षर बदलून येते. अशा शब्दास 'अंशाभ्यस्त' शब्द म्हणतात.
  उदा., आंबटचिंबट, भाजीबिजी, गोडधोड, अडलंनडलं इत्यादी.
  (इ) अनुकरणवाचक शब्द– काही शब्दांत ध्वनिवाचक शब्दांची पुनरावृत्ती साधलेली असते, त्या शब्दांना 'अनुकरणवाचक' शब्द असे म्हणतात.
  उदा., गडगड, वटवट, किरकिर इत्यादी.

# २. प्राणसई

**इंदिरा संत** (१९१४ ते २०००) :

कवयित्री, कथाकार, ललित लेखिका. लहानवयापासून वाङ्मयाचे संस्कार. उत्कट, भावपूर्ण आणि प्रतिभासंपन्न काव्यशैली. 'सहवास' हा पहिला प्रकाशित काव्यसंग्रह. 'शेला', 'मेंदी', 'मृगजळ', 'रंगबावरी', 'बाहुल्या', 'गर्भरेशीम' इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध. 'श्यामली', 'चैतू' हे कथासंग्रह व 'मृद्गंध', 'मालनगाथा' हे ललित लेखसंग्रह प्रसिद्ध. त्यांच्या 'गर्भरेशीम' या कवितासंग्रहास साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित केले आहे.

उन्हाळा संपत आलेला असला तरी त्याचा ताप अजूनही असह्य आहे. पावसाळा सुरू होण्याची प्रतीक्षा आहे. घराघरांत, शेताशेतांवर आवश्यक पूर्वतयारी झाली आहे. अशा वेळी पावसाळ्यापूर्वीच्या स्थितीचे वर्णन करताना कवयित्रीने या कवितेतून मैत्रिणीच्या नात्याने घनावळीला म्हणजे मेघमालेला केलेले आवाहन, धाडलेला निरोप भावरम्य आहे. ग्रामीण भागातील घराघरांतून केल्या जाणाऱ्या पावसाळ्यापूर्वीच्या तयारीचे वर्णन समर्पक शब्दांत कवितेत आले आहे. ही तयारी झाल्यावर पावसाची आळवणी केली आहे.

प्रस्तुत कविता अष्टाक्षरी छंदात असून दुसऱ्या व चौथ्या चरणात यमक साधलेले आहे.

**पीठ कांडते राक्षसी**
**तसें कडाडतें ऊन :**
**प्राणसई घनावळ**
**कुठे राहिली गुंतून ?**

**दिला पाखरांच्या हातीं**
**माझा सांगावा धाडून :**
**ये ग ये ग घनावळी**
**मैत्रपणा आठवून...**

**पडवळा-भोपळ्यांचीं**
**आळीं ठेविलीं भाजून,**
**हुडा मोडून घरांत**
**शेणी ठेविल्या रचून,**

**बैल झाले ठाणबंदी,**
**झाले मालक बेचैन,**
**तोंडे कोमेलीं बाळांचीं**
**झळा उन्हाच्या लागून,**

**विहिरीच्या तळीं खोल**
**दिसूं लागलें ग भिंग,**
**मन लागेना घरांत :**
**कधी येशील तू सांग ?**



ये ग दौडत धावत
आधी माझ्या शेतावर :
शेला हिरवा पांघर
मालकांच्या स्वप्नांवर,

तशी झुलत झुलत
ये ग माझिया घराशीं :
भाचे तुझे झोंबतील
तुझ्या जरीच्या घोळाशीं,

आळें वेलाचें भिजूं दे,
भर विहीर तुडुंब :
सारें घरदार माझें
भिजूं दे ग चिंब चिंब;

उभी राहून दारांत
तुझ्या संगती बोलेन :
सखा रमला शेतांत
त्याचे कौतुक सांगेन...

कां ग वाकुडेपणा हा,
कां ग अशी पाठमोरी?
ये ग ये ग प्राणसई
वाऱ्यावरून भरारी.

(समग्र इंदिरा संत)



## टीप

◆ **अष्टाक्षरी छंद–** कवितेच्या प्रत्येक चरणात आठ अक्षरे असतात त्यावेळी 'अष्टाक्षरी छंद' होतो.

उदाहरणार्थ, तशी झुलत झुलत→ आठ अक्षरे. भाचे तुझे झोंबतील→ आठ अक्षरे.

ये ग माझिया घराशीं→ आठ अक्षरे. तुझ्या जरीच्या घोळाशीं→ आठ अक्षरे.

## कृती

**(१) (अ) चौकटी पूर्ण करा.**

(१) कवयित्रीने जिला विनंती केली ती–

(२) कडाडत्या उन्हाला दिलेली उपमा–

(३) कवयित्रीच्या मैत्रिणीला सांगावा पोहोचवणारी–

(४) शेतात रमणारी व्यक्ती–

**(आ) कारणे लिहा.**

(१) बैलांचे मालक बेचैन झाले आहेत, कारण .........

(२) बाळांची तोंडे कोमेजली, कारण .........

**(इ) कृती करा.**

**कवयित्रीने प्राणसईच्या आगमनानंतर व्यक्त केलेल्या अपेक्षा**

**(२) (अ) खालील काव्यपंक्तींचा अर्थ स्पष्ट करा.**

(१) विहिरीच्या तळीं खोल दिसूं लागलें ग भिंग

(२) ये ग दौडत धावत आधी माझ्या शेतावर

(३) तशी झुलत झुलत ये ग माझिया घराशीं

**(आ) खालील तक्त्यात सुचवल्यानुसार कवितेच्या ओळी लिहा.**

| प्राणसईला कवयित्री विनंती करते त्या ओळी | प्राणसई न आल्याने कवयित्रीच्या अस्वस्थ मनाचे वर्णन करणाऱ्या ओळी | प्राणसई हीच कवयित्रीची मैत्रीण आहे हे दर्शवणाऱ्या ओळी | मालकाच्या स्वप्नपूर्तीसाठी आवाहन करणाऱ्या ओळी |
|---|---|---|---|
| | | | |

## (३) काव्यसौंदर्य.

(अ) खालील ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

(१) 'कां ग वाकुडेपणा हा,
कां ग अशी पाठमोरी ?
ये ग ये ग प्राणसई
वाऱ्यावरून भरारी'

(२) 'शेला हिरवा पांघर
मालकांच्या स्वप्नांवर'

(आ) कवयित्रीने उन्हाळ्याच्या तीव्रतेचे वर्णन करताना योजलेली प्रतीके स्पष्ट करा.

(इ) 'कवयित्री आणि प्राणसई यांच्यातील नाते जिव्हाळ्याचे आहे', स्पष्ट करा.

## (४) अभिव्यक्ती.

(अ) तुमच्या परिसरातील पावसाळ्यापूर्वीच्या स्थितीचे वर्णन करा.

(आ) पावसानंतर तुमच्या परिसरात होणाऱ्या बदलाचे वर्णन करा.

(इ) पावसानंतर कोणाकोणाला कसाकसा आनंद होतो ते लिहा.

## (५) रसग्रहण.

'प्राणसई' या कवितेचे रसग्रहण करा.

✿✿✿

✻ **शब्दसंपत्ती.**

**खालील शब्दांचे समानार्थी शब्द शोधून शब्दमनोरा पूर्ण करा.**

उदा.,

**वात**

वा | रा

अ | नि | ल

स | मी | र | ण

**समुद्र**

**विद्युत**

**तलाव**

**चंद्र**

**अंधार**

# ३. अशी पुस्तकं

**डॉ. निर्मलकुमार फडकुले** (१९३० ते २००६) :

संत साहित्याचे अभ्यासक, समीक्षक, प्रसिद्ध वक्ते. त्यांनी लिहिलेली अनेक स्वतंत्र व संपादित पुस्तके प्रसिद्ध. 'कल्लोळ अमृताचे', 'चिंतनाच्या वाटा', 'प्रिय आणि अप्रिय', 'सुखाचा परिमळ' हे साहित्य; 'संतकवी तुकाराम : एक चिंतन', 'संत चोखामेळा आणि समकालीन संतांच्या रचना', 'संतांचिया भेटी', 'संत वीणेचा झंकार', 'संत तुकारामांचा जीवनविचार' ही संत साहित्याचा अभ्यास मांडणारी पुस्तके तसेच 'समाजपरिवर्तनाची चळवळ : काल आणि आज', 'साहित्यातील प्रकाशधारा' हे लेखसंग्रह प्रसिद्ध. संतसाहित्य हा त्यांच्या विशेष आस्थेचा विषय होता. 'प्रबोधनातील पाऊलखुणा' आणि 'निवडक लोकहितवादी' या संपादित पुस्तकांतून एकोणिसाव्या शतकातील सुधारणाविषयक चळवळीसंबंधीचा त्यांचा व्यासंग प्रकट होतो. 'भैरू रतन दमाणी' साहित्य पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे.

प्रस्तुत पाठातून माणसाच्या जडणघडणीत असलेली पुस्तकांची भूमिका व्यक्त झाली आहे. पुस्तकांचे महत्त्व वर्णन करताना पुस्तक वाचनाचा व्यापक दृष्टिकोन लेखकाने व्यक्त केला आहे. जन्मभर भावनिक सोबत करणारी पुस्तके ही जगण्याची हिंमत वाढवतात आणि प्रेरणा देतात. पुस्तके ही मानवी जीवन आनंदी व अर्थपूर्ण करतात, हा विचार प्रस्तुत पाठातून व्यक्त करताना लेखकाने 'जगातील सौंदर्यपूर्ण वस्तू म्हणजे पुस्तक' हा व्यापक दृष्टिकोन मांडला आहे.



काही पुस्तकं आपल्याला झपाटून टाकतात. अंत:करणात भावनांची प्रचंड खळबळ उडवून देण्याची त्यांच्यात शक्ती असते. अशी पुस्तकं कधी विसरता येत नाहीत. दीर्घकाळ टिकणाऱ्या सुगंधाप्रमाणे ती पुस्तकं मनात दरवळत राहतात. उत्तम साहित्यकृतींचं वाचन करत राहणं यासारखं दुसरं उत्तेजक आणि आनंददायक काही असेल का? मॅकबेथ आणि किंग लियर या नाटकांतले काही संवाद इतके काव्यात्म, इतके अर्थगर्भ आणि इतके भावस्पर्शी आहेत, की प्रत्येक वाचनाच्या वेळी अधिक उत्कट अनुभूती देत राहतात. अशा वाचनाची नशा और असते. सुखाविषयीच्या माझ्या कल्पनेतून पुस्तकं वगळली तर सारं सुखच संपुष्टात आलं असं म्हणावं लागेल. जवळचे मित्र दुरावतात. ज्यांच्यावर प्रेम केलं त्यांनाही त्या प्रेमाची विस्मृती होते आणि वैराचा अग्नी ते पेटवत ठेवतात. हातात आलेला पैसा कसा आणि केव्हा नाहीसा होतो ते कळतही नाही; पण पैसा आणि माणसं यांच्याप्रमाणं पुस्तकं कधीच विश्वासघातकी असत नाहीत. त्यांना स्पर्श करण्याचा अवकाश, भावनांनी आणि विचारांनी ओसंडणारं आपलं अंत:करण ते उघडं करतात. 'माझ्या अंतरंगात त्या थोर लेखकानं साठवलेलं हे भांडार तुझंच आहे. जे आवडेल ते खुशाल घेऊन जा' असंच जणू पुस्तक आपल्याला सांगत असतं. पुस्तकांवर आत्यंतिक प्रेम करणारी माणसं मी पाहिली आहेत. आपल्या कपाटात जिवापाड जपून ठेवलेलं पुस्तक दुसऱ्याला देताना ती अगदी व्याकूळ झालेली असतात.

एकदा एका ग्रंथप्रेमी वाचकाकडून दोन दिवसांसाठी एक पुस्तक मी वाचायला आणलं होतं. ते देताना तो ग्रंथप्रेमी मला काकुळतीनं सांगत होता, ''अतिशय काळजीपूर्वक वापरा. दुसऱ्याच्या हाती देऊ नका. पुस्तकाची पानं मुडपू नका. कोणताही मजकूर पेन्सिलीनं किंवा शाईनं अधोरेखित करू नका, वरचं कव्हर काढू नका. तिसऱ्या दिवशी कटाक्षानं मला पुस्तक परत करा.'' त्या सूचना मला अपमानकारक वाटल्या नाहीत. हातात पडलेल्या कोणत्याही पुस्तकाशी निर्दय-चाळा करणारे अनेक पुस्तकशत्रू मी पाहिले आहेत. त्यांच्या हिशेबी छापलेलं एक चोपडं म्हणजे पुस्तक. त्याला कसलं महत्त्व द्यायचं? पुस्तकाचा उपयोग तरी किती? भूक लागल्यावर ते शिजवून थोडंच खाता येतं? वेडे लोक वाङ्मयात अनेक रस असतात असं म्हणतात. तहान लागल्यावर तुमच्या कालिदासाच्या 'शाकुंतलातील' रस पिणं शक्य आहे काय? फार तर एकदा वाचावं किंवा चाळावं आणि मग येईल त्या भावानं फुंकून टाकावं. ही

विचारसरणी अनेकांची असते; पण त्या पुस्तकप्रेमीनं मला ज्या अटी घातल्या होत्या त्या खरोखरच अत्यंत सयुक्तिक होत्या.

माझ्या हाती पुस्तक देताना त्यानं त्यावरून मायेनं अलगद हात फिरवला. मी त्याला म्हणालो, ''कसलीही काळजी करू नका. माझ्या घरीसुद्धा तुमच्या पुस्तकाला माहेरी आल्यासारखंच वाटेल. त्याला सासुरवास सहन करावा लागणार नाही. ते अगदी 'योग्य स्थळी' तुम्ही देत आहात.'' तो हसला. त्याचं समाधान झालं असावं. मी म्हणालो, ''एका संस्कृत सुभाषितात म्हटलं आहे, 'मूर्खहस्ते न दातव्यम् एवं वदति पुस्तकम्' मूर्खाच्या हाती मला देऊ नका, असं पुस्तकाचं म्हणणं आहे. माझ्या हाती ते देताना तुम्हांला माझ्या शहाणपणाबद्दल शंका आली नाही ना?'' आता तो खळखळून हसला आणि म्हणाला, ''अहो, दुधानं तोंड पोळल्यामुळं मी ताक फुंकून पितो आहे. काही दिवसांपूर्वी एका कवीनं माझी दोन पुस्तकं नेली. मी पंधरा दिवस वाट पाहिली. पुस्तकं मागायला गेलो तेव्हा त्यानं चक्क कानावर हात ठेवले. आपण पुस्तकं आणलीच नाहीत असं त्याचं म्हणणं आहे. आता काय करणार? पुस्तकं गिळंकृत करणं म्हणजे माझ्या दृष्टीनं भयानक प्रकार आहे. तेव्हापासून मी ठरवून टाकलं, की प्रत्यक्ष परमेश्वर आला तरी त्याला पुस्तक द्यायचं नाही. माझी पुस्तकं हीच माझी अपत्यं. वाचायला भरपूर ग्रंथ असले तर मी जन्मठेपेची शिक्षासुद्धा आनंदानं सहन करीन; पण पुस्तकं नसतील तर राजवाडासुद्धा मला स्मशानासारखा वाटेल.'' सहज माझ्या मनात विचार आला– असे निष्ठावंत वाचक आता दुर्मीळ झाले.

परवा मी बी. ए. च्या वर्गातल्या वाङ्मय विषयाच्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला, ''जी. ए. कुलकर्ण्यांचा एखादा कथासंग्रह तुम्ही वाचला आहे काय? संग्रह जाऊद्या, या लेखकाची एखादी कथा तरी तुमच्या वाचनात आली आहे काय?'' साहित्य या विषयाचे रसिक विद्यार्थी-विद्यार्थिनी माना खाली घालून बसले होते. कदाचित जी. ए. कुलकर्णी हे नावसुद्धा त्यांना फारसं परिचित नव्हतं. मी निराश झालो. एका आधुनिक श्रेष्ठ कथालेखकाचं नावही सुशिक्षितांच्या, अभ्यासकांच्या कानापर्यंत पोहोचलं नाही या कर्माला काय म्हणावं?

एक गोष्ट मात्र खरी, की उत्तम साहित्यकृती आपल्याला जन्मभर भावनिक सोबत करतात. मनाला धीर देतात. जीर्ण होत चाललेल्या जीवनशक्तीला चैतन्यानं न्हाऊ घालतात. मनातल्या अंधाराला उजेडाची स्वप्नं दाखवतात. काही दिवसांपूर्वी ऐंशी वर्षांचे एक साहित्यप्रेमी सद्गृहस्थ भेटले. मी त्यांना सहज विचारलं, ''सध्या कशाचं वाचन चाललं आहे?'' ते म्हणाले, ''गेले दोन दिवस, 'मेघदूत' वाचत होतो. नुकतंच ते संपवलं. आता टॉलस्टॉयची 'ॲना कॅरेनिना' ही कादंबरी हाती घेतली आहे.'' मी काहीशा आश्चर्यानं त्यांना म्हणालो, ''या वयात मेघदूताची रुची कशी काय वाटते?'' ते थोडेसे रागावून म्हणाले, ''रसिकतेचा आणि वयाचा संबंध जोडणं हेच अरसिकपणाचं आहे. कलात्मक आनंद देणारं श्रेष्ठ साहित्य मला म्हातारा होऊ देत नाही. गांधीजींची आत्मकथा, व्हिक्टर ह्यूगोची आणि मुन्शी प्रेमचंदाची कादंबरी, रवींद्रांची 'गीतांजली', शेक्सपिअरची नाटकं, तुकारामांचे अभंग असं विविध प्रकारचं आणि अनेक रंगाढंगांचं पण रसमय साहित्य वाचण्याचा मी जन्मभर शौक केला. नवं पुस्तक दिसलं, की ते केव्हा हस्तगत होईल अशी बेचैनी आजही मला वाटते. या पुस्तकांनी तर मला जिवंत ठेवलं आहे. शेक्सपिअरची सर्व नाटकं माझ्या संग्रहात आहेत याचा मला अभिमान वाटतो. अहो, सुंदर सुंदर पुस्तकांवरून नुसता हात फिरवणंसुद्धा केवढं सुखाचं आहे!

कधी कधी बऱ्याच दिवसांत चांगलं पुस्तक वाचायला मिळत नाही, अशा वेळी मी सुद्धा जुन्या साहित्याकडं वळतो. खरं सांगायचं तर साहित्यात जुनं आणि नवं असं काही असत नाही. केवळ काळाच्या अपेक्षेनं हे शब्द आपण योजतो. ज्ञानेश्वरांचे अभंग कोणत्या अर्थानं 'जुने' आहेत? आणि कुसुमाग्रजांची कविता कोणत्या दृष्टीनं 'नवी' आहे? आपल्या सोईसाठी आपण हे शब्द वापरतो.''

मी एके दिवशी अत्यंत विमनस्क अवस्थेत होतो. त्या दिवशी माझा एक कलावंत मित्र एका अपघातात मरण पावला होता. जगण्यासाठी त्याच्याजवळ कितीतरी सुंदर सामग्री होती. कलावंताचं जिवंत मन असलेला हा भाबडा हळवा माणूस अचानक एका मोटार अपघातात ठार झाला. सबंध दिवसभर मी अस्वस्थ होतो. रात्री कपाटातलं हेमिंग्वेचं 'द ओल्ड मॅन अँड द सी' हे छोटेखानी पुस्तक बाहेर काढलं. त्याच्यावरची धूळ झटकली आणि ते वाचायला सुरुवात केली. पुस्तकावरची धूळ ज्याप्रमाणे मी झटकली त्याप्रमाणं माझ्या मनावर साचलेली दु:खी, निराश विचारांची धूळ त्या

पुस्तकानं झटकून टाकली. पहिल्या दोन-तीन पानांतच त्या छोट्या कादंबरीनं मला खिळवून ठेवलं.

अर्नेस्ट हेमिंग्वे हा एक विलक्षण प्रतिभेचा लेखक होऊन गेला.

साहजिकच त्याची जीवनदृष्टी त्याच्या साहित्यातून प्रकट झाली आहे. 'द ओल्ड मॅन अँड द सी' ही कादंबरी याच बलदंड वृत्तीनं भारलेली आहे. एक म्हातारा कोळी देवमाशाची शिकार करण्यासाठी अथांग सागरात आपली होडी ढकलतो. त्याला सामान्य मासे नको होते. देवमाशाला जिंकण्याचे धाडसी मनसुबे मनात रचून हा काटक म्हातारा होडी वल्हवत कित्येक मैल अंतरावर गेला. पोटात अन्न नव्हतं. तहानेनं त्याला शोष पडला होता; पण मागं फिरायचं नाही हा त्याचा बाणा होता. त्याच्या थकलेल्या हाडांत अजूनही खवळलेल्या लाटांबरोबर झुंजण्याची आणि सागरावर मात करण्याची जिद्द होती. कधी न सापडलेला महाप्रचंड देवमासा आज आपण मिळवायचा या आकांक्षेनं रोमारोमांतून पेटून निघालेला हा कणखर आशावादी म्हातारा पुढेपुढेच चालला होता. देवमासा मिळण्याचे चिन्ह दिसत नव्हते. उपाशी पोट कुरकुरत होतं. थकलेले हातपाय होडी मागे घेण्याचा सल्ला देत होते; पण हटवादी मन परतायला तयार नव्हतं. तो तसाच होडी वल्हवत पुढे चालला. एकाएकी प्रचंड खळबळ झाली. म्हाताऱ्याच्या जाळ्यात तो महाकाय देवमासा सापडला होता. आपल्या बुलंद मुसंडीनं जाळं तोडून तो सहज सुटून गेला असता; पण आता म्हाताऱ्याच्या हातात वज्राचं बळ आलं. जिवाची शर्थ करून हातातल्या भाल्यानं देवमाशाला त्यानं तास-दोन तासांत झुंजून ठार केलं. ते धूड होडीला बांधून विजयोन्मादाने तो परतू लागला. आज त्याला जाळ्यात कधीच न सापडलेला आणि आपल्या शेपटीच्या तडाख्यानं मोठमोठ्या होड्या उलथून टाकणारा महाबलिष्ठ देवमासा त्याच्या पराक्रमानं सापडला होता. किनाऱ्याकडं परतताना शार्क माशांच्या टोळीनं त्या देवमाशावर हल्ले चढवले. ते त्याचे लचके तोडू लागले. त्यांच्याशीही म्हाताऱ्याला झुंजावं लागलं. तो परतला आणि उन्मादानं आरोळी ठोकून म्हणाला, ''अरे, मी देवमाशाची शिकार केली. तुम्हांला ते कधी जमलं नाही; पण आज मी तो पराक्रम केला. मी देवमासा पकडला.'' पण म्हाताऱ्याला हे समाधान फार वेळ मिळालं नाही. देवमाशाचं बहुतेक मांस शार्क माशांनी मटकावलं होतं. आता उरला होता तो त्याच्या हाडांचा प्रचंड सांगाडा. देवमासा जाळ्यात सापडूनही आणि त्याची शर्थीनं शिकार करूनही तो मिळाल्याचा आनंद उरला नव्हता. म्हातारा थोडासा हसला. पुन्हा एकदा हा प्रयत्न करायचा असं म्हणून तो निघून गेला.

बस्स! इथं कादंबरी संपली; पण यातून हेमिंग्वेला काय सांगायचं आहे? अतिबलाढ्य, क्रूर नियती आणि दुबळा महत्त्वाकांक्षी माणूस यांच्यात हजारो, लाखो वर्षांपासून कधीच न संपणारं एक सनातन व चिरंतन द्वंद्व युद्ध चालू आहे. नियती जबरदस्त असेल; पण दुबळ्या माणसातही अदम्य आकांक्षेची आणि संघर्षशीलतेची ज्वाला पेटलेली आहे. जयिष्णू वृत्तीनं तो माणूस आपल्या प्रारब्धाशी झगडत आहे. निष्ठुर नियती त्याला हुलकावण्या देत असली आणि त्याचा तेजोभंग करत असली तरी एक क्षण असा येणार आहे, की दुर्बल वाटणारा माणूस नियतीला पराभूत करून विजयाच्या सिंहासनावर निश्चित बसणार आहे, असं तर हेमिंग्वेला सुचवायचं नाही ना? ते काहीही असो; पण या छोट्या कादंबरीनं माझ्या मनातलं वैफल्य आणि उद्विग्नता पार धुऊन टाकली. मी पुन्हा ताजा टवटवीत झालो आणि मनाशी म्हणालो, जगण्या-मरण्याचा खेळ तर अखंड चाललेलाच आहे. मरणाच्या जाळ्यात आपण सापडायचं नाही. नियतीनं जाळं टाकलं तरी ते तोडून, फेकून द्यायचं आणि जीवनाच्या अथांग सागरात स्वैर संचार करायचा. हेमिंग्वेला कदाचित हीच भूमिका अभिप्रेत असेल. त्याच्या कादंबरीनं मला झपाटून टाकलं हे मात्र खरं! अशी मंत्रमुग्ध करणारी, गदागदा हलवणारी, हृदयाच्या हृदयाला कडकडून दंश करणारी, आनंदाच्या आणि उन्मादाच्या अस्मानात बेहोष भराऱ्या घ्यायला लावणारी, हसवणारी आणि रडवणारी, जीवनाचा सुगंध उधळणारी, नाना प्रकारची पुस्तकं वाचण्यात आणि त्यांच्या माध्यमातून महान लेखक कवींच्या अंतरंगाला भिडण्यात केवढा तरी आनंद सामावलेला आहे. अशी पुस्तकं जगण्याचा अर्थ सांगतात. जगण्याला एक सुवासिक स्पर्श देतात.

ललित आणि वैचारिक साहित्यातून मिळणारे अनुभव वैशिष्ट्यपूर्ण तर असतातच; पण त्यांतून काही नव्या प्रेरणा वाचकाला आवाहित करतात. जीवन कसं आहे एवढंच सांगणं हे पुस्तकाचं काम नाही. ते कसं असावं हेही समर्थपणानं सांगणारी पुस्तकं आपल्याला जगण्याची हिंमत देतात. माणुसकीचा पक्ष घेऊन उभी राहिलेली, न्यायाचा

जयजयकार करणारी, माणसाच्या पायांतले साखळदंड तोडायला दंड थोपटून उभी राहिलेली काही बंडखोर पुस्तकं मी जेव्हा वाचतो तेव्हा माणसावरचा विश्वास वाढायला लागतो. पुस्तकं वेळ घालवण्यासाठी वाचायची ही हास्यास्पद कल्पना मला चुकीची वाटते. पुस्तकं आपल्याला घडवतात. काही वेळा उद्ध्वस्तही करतात. पुस्तकं म्हणजे प्रतिभावंतांची, विचारवंतांची फुललेली स्वप्नं असतात. या स्वप्नांतूनच उद्याचं वास्तव जन्माला येत असतं. म्हणूनच जगातल्या सौंदर्यपूर्ण वस्तूंत मी तरी पुस्तकांचा समावेश करतो. अशी पुस्तकं आनंदही देतात आणि दु:खही देतात. दुसऱ्यांच्या दु:खानं दु:खी होण्यासाठी मन व्यापक आणि उदार असावं लागतं. ही किमया पुस्तकं करत आली आहेत. पुस्तकांचा अवीट सुगंध मनाच्या गाभाऱ्यात दरवळत राहिला म्हणजे जीवनाची सतार मस्त झंकारत राहते.

(जगायचं कशासाठी ?)

### टिपा

(१) शेक्सपिअर - सुप्रसिद्ध इंग्रजी कवी, नाटककार. मॅकबेथ, किंग लियर ही त्यांची प्रसिद्ध नाटके.
(२) अर्नेस्ट हेमिंग्वे- अमेरिकन साहित्यिक.
(३) व्हिक्टर ह्यूगो- फ्रेंच कवी, लेखक व नाटककार.
(४) मुन्शी प्रेमचंद- थोर हिंदी कथाकार व कादंबरीकार.
(५) लिओ टॉलस्टॉय- रशियन लेखक.

## कृती

**(१) (अ) तुलना करा.**

| 'पुस्तकरूपी' मित्र | 'मानवी' मित्र |
|---|---|
| ............................... | ............................... |
| ............................... | ............................... |
| ............................... | ............................... |
| ............................... | ............................... |

**(आ) कारणे लिहा.**

(अ) ग्रंथप्रेमीने पुस्तक देताना केलेल्या सूचना लेखकाला अपमानकारक वाटल्या नाहीत, कारण.....
(आ) 'प्रत्यक्ष परमेश्वर आला तरी त्याला पुस्तक द्यायचं नाही,' असा पुस्तकप्रेमीने निश्चय केला, कारण.....
(इ) 'रसिकतेचा आणि वयाचा संबंध जोडणं हेच अरसिकपणाचं आहे', कारण.....

**(इ) कृती करा.**

(१) **हेमिंग्वेच्या कादंबरीतून सूचित होणारे अर्थ** →
→
→
→

(२) **उत्तम साहित्यकृतीची वैशिष्ट्ये** →
→
→
→

**(२) अर्थ स्पष्ट करा.**

(अ) दुधाने तोंड पोळल्याने ताक फुंकून पिणे.

(आ) पुस्तकाला माहेरी आल्यासारखं वाटणे.

**(३) व्याकरण.**

**(अ) सूचनेनुसार सोडवा.**

(१) 'चवदार' सारखे शब्द लिहा. ............... ............... ............... ...............

(२) जसे विफलताचे → वैफल्य

तसे

(अ) सफलता → ...............

(आ) कुशलता → ...............

(इ) निपुणता → ...............

**(आ) शब्दाच्या शेवटी 'क' असलेले चार शब्द लिहा. उदा., 'उत्तेजक'**

............... ............... ............... ...............

**(इ) या शब्दगटातील विशेषणे ओळखा.**

काव्यात्म, अवस्था, साहित्यकृती, विमनस्क, प्रेरणा, संवाद, नव्या, उत्तम

| विशेषणे |
|---|
| |
| |
| |
| |

**(४) स्वमत.**

(अ) वैचारिक साहित्यातून मिळणारे वैशिष्ट्यपूर्ण अनुभव स्वभाषेत लिहा.

(आ) पुस्तकांविषयीचा लेखकाचा दृष्टिकोन तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) हेमिंग्वेचा जीवनविषयक दृष्टिकोन तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**(५) अभिव्यक्ती.**

(अ) 'उत्तम साहित्यकृती आपल्याला जन्मभर भावनिक सोबत करतात', हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.

(आ) 'निष्ठावंत वाचक आता दुर्मीळ झाले आहेत,' हे विधान स्पष्ट करा.

**प्रकल्प.**

जी. ए. कुलकर्णी, भा. द. खेर, दुर्गा भागवत, व्यंकटेश माडगूळकर या साहित्यिकांची माहिती व यासंबंधीचे संदर्भसाहित्य वाङ्मय कोशातून शोधून लिहा.

**✲ शब्दसंपत्ती**

**पुढील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**

(अ) पंधरा दिवसांनी प्रकाशित होणारे ..............

(आ) ज्याला एकही शत्रू नाही असा ..............

(इ) मंदिराचा आतील भाग ..............

(ई) गुडघ्यांपर्यंत हात लांब असणारा ..............

(उ) केलेले उपकार न जाणणारा ..............

# ४. झाडांच्या मनात जाऊ

**नलेश पाटील** (१९५४ ते २०१६) :

निसर्गकवी व चित्रकार. शब्द, नाद, लय आणि अर्थ यांची उत्तम जाण. दोन शब्दांमधील विरामाचं नेमकं भान आणि विलक्षण चित्रमयी मांडणी ही त्यांच्या कवितांची वैशिष्ट्ये. अनेक निसर्गदत्त घटकांचे तरल दर्शन त्यांच्या कवितांमधून घडते. 'हिरवं भान' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध. 'कवितेच्या गावा जावे' या लोकप्रिय काव्यगायनाच्या कार्यक्रमातील सादरीकरणात सहभाग. तरल शब्द आणि खुले स्वर यांमुळे त्यांनी गायलेली कविता ऐकणाऱ्यांच्या मनात दीर्घकाळ रेंगाळत असे.

झाडांचे हिरवे वैभव, पानाफुलांचे रंग-गंध, भिरभिरणारी फुलपाखरे, थुईथुई नाचताना हसणारे पाणी, फांद्या-फांद्यांवरील पक्षी, ऊन-सावल्यांची नक्षी या चैतन्यमय निसर्गसोहळ्याशी कवी एकरूप होऊन जातो. निसर्गातील अम्लान सौंदर्याचा आस्वाद घेता घेता आपणही त्या निसर्गाचा भाग होऊन सौंदर्यानुभूतीचे दान विश्वाला द्यावे, असे त्याला वाटत राहते.

झाडांच्या मनात जाऊ, पानांचे विचार होऊ
पोपटी स्पंदनासाठी, कोकीळ होऊनी गाऊ...

बहरात वसंतामधल्या, तो सूर सावळा ऐकत
जातील फुलेही रंगून, जन्माला अत्तर घालत
चल सुराबरोबर आपण, तो फाया कानी ठेवू...

खेळून रंगपंचमी, फुलपाखरे भिजली सारी
हा थवा असे रंगीत की पताकाच फिरणारी
हे भिरभिरणारे तोरण दाराला आणून लावू...

ही कोणाची रे करणी डोळ्यांत झऱ्याचे पाणी
हे उधाण आनंदाचे की देवाघरची गाणी
गाण्यात ऋतूच्या आपण चल खळाळून रे वाहू...


पाण्यात उतरूनी माझे, मन खडकावर बसताना
थुई थुई नाचरे पाणी, मज दिसते रे हसताना
एक रोप तुषाराचे मज, मायेने घाली न्हाऊ...

ओंजळीमध्ये मी अलगद, आकाश जरासे धरता
आकाशाने मी अवघ्या पाण्याची ओटी भरता
हातात ऊन डुचमळते नि सूर्य लागतो पोहू...

हे फांदीवरले पक्षी की हंगामांचे साक्षी
झाडांच्या पायी काढी, सावली उन्हावर नक्षी
मग तिलाच फुटले पंख, नि त्यांचे झाले काऊ...

मानवी स्पर्श ना जेथे, असतील फुले-पाखरे
रानात अशा तू मजला, ईश्वरा जरा टाक रे
मी झाड होऊनी तेथे, पसरीन आपुले बाहू...

(हिरवं भान)



## कृती

**(१) (अ) योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

**(१) पोपटी स्पंदनासाठी म्हणजे–**

(अ) पोपटी पानात जाण्यासाठी.
(आ) उत्साहाने सळसळण्यासाठी.
(इ) पानांचे विचार घेण्यासाठी.

**(२) जन्माला अत्तर घालत म्हणजे–**

(अ) दुसऱ्याला आनंद देत.
(आ) दुसऱ्याला उत्साही करत.
(इ) स्वसमर्पणातून दुसऱ्याला आनंद देत.

**(३) तो फाया कानी ठेवू म्हणजे–**

(अ) सुगंधी वृत्ती जोपासू.
(आ) अत्तराचा स्प्रे मारू.
(इ) कानात अत्तर ठेवू.

**(४) भिरभिरणारे तोरण दाराला आणून लावू म्हणजे–**

(अ) दारांना तोरणाने सजवू.
(आ) दाराला हलतेझुलते तोरण लावू.
(इ) निसर्गाच्या संगतीत स्वत:चे जीवन आनंदी करू.

**(५) मी झाड होऊन तेथे, पसरीन आपुले बाहू म्हणजे–**

(अ) निसर्गाचाच एक घटक होऊन सर्वांना भेटेन.
(आ) झाड होऊन फांद्या पसरीन.
(इ) झाड होऊन सावली देईन.

**(आ) खालील कृतींतून सूचित होणारा अर्थ कवितेच्या आधारे लिहा.**

| निसर्गातील घटकांच्या सोबतीने केलेली कृती | सूचित होणारा अर्थ |
|---|---|
| (१) कोकीळ होऊनी गाऊ... | ........................................ |
| (२) गाण्यात ऋतूच्या आपण चल खळाळून रे वाहू... | ........................................ |

**(२) (अ) खालील काव्यपंक्तींचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.**

(१) झाडांच्या मनात जाऊ, पानांचे विचार होऊ
(२) हातात ऊन डुचमळते नि सूर्य लागतो पोहू

(आ) खालील तक्ता पूर्ण करा.

| कवितेचा विषय | कवितेतून मिळणारा एकत्रित अनुभव | कवीने वापरलेली आनंदाची दोन प्रतीके | भाषिक सौंदर्यस्थळे | कवितेतून मिळणारा संदेश |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**(३) काव्यसौंदर्य.**

(अ) 'पोपटी स्पंदनासाठी, कोकीळ होऊनी गाऊ...' या काव्यपंक्तीतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा.

(आ) ऊन आणि सावली यांच्या प्रतीकांतून सूचित होणारे आशय सौंदर्य कवितेच्या आधारे लिहा.

(इ) 'डोळ्यांत झऱ्याचे पाणी' या शब्दसमूहातील भावसौंदर्य उलगडून लिहा.

**(४) अभिव्यक्ती.**

(अ) 'तुम्ही झाडांच्या मनात शिरला आहात', अशी कल्पना करून ते कल्पनाचित्र शब्दबद्ध करा.

(आ) निसर्गातील घटक व मानवी जीवन यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**(५) 'झाडांच्या मनात जाऊ' या कवितेचे रसग्रहण करा.**

**दिलेल्या शब्दांतील एकावेळी कोणतेही एक अक्षर बदलून नवीन अर्थपूर्ण शब्द तयार करा. नवीन शब्दातील पुन्हा एक अक्षर बदलून नवीन अर्थपूर्ण शब्द तयार करा. शेवटच्या टप्प्यापर्यंत कमीत कमी शब्दांत पोहोचा.**

उदा., सुंदर – घायाळ

सुंदर – आदर – आदळ – आयाळ – घायाळ

(१) डोंगर– .................................. अंबर

(२) शारदा– .................................. पुराण

(३) परात– .................................. कानात

(४) आदर– .................................. पहाट

(५) साखर– .................................. नगर

# ५. परिमळ

**प्रल्हाद केशव अत्रे : (१८९८ ते १९६९) :**

नामवंत लेखक, कवी, नाटककार, विनोदकार, चित्रपट कथालेखक, वक्ता, शिक्षणतज्ज्ञ म्हणून परिचित. त्यांच्या असामान्य कर्तृत्वाने वाङ्मय व इतर क्षेत्रांत त्यांनी मानदंड निर्माण केले. 'केशवकुमार' या टोपण नावाने त्यांनी काव्यलेखन केले. 'झेंडूची फुले' हा त्यांचा विडंबनपर कवितांचा संग्रह; 'साष्टांग नमस्कार', 'तो मी नव्हेच', 'कवडी चुंबक', 'ब्रह्मचारी', 'डॉक्टर लागू', 'मोरूची मावशी' इत्यादी त्यांनी लिहिलेली लोकप्रिय नाटके; 'अशा गोष्टी अशा गमती', 'फुले आणि मुले' इत्यादी कथासंग्रह; 'कऱ्हेचें पाणी' हे आत्मचरित्र प्रसिद्ध. सानेगुरुजींच्या 'श्यामची आई' या पुस्तकावर त्यांनी काढलेल्या चित्रपटाला राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहोळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे पहिले सुवर्णकमळ देऊन गौरवण्यात आले. १९४२ साली झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

प्रस्तुत पाठ हा आचार्य अत्रे यांनी 'बहिणाबाईंची गाणी' या काव्यसंग्रहाला लिहिलेली प्रस्तावना होय. या प्रस्तावनेतून आचार्य अत्रे यांनी बहिणाबाई चौधरी यांच्या असामान्य काव्यप्रतिभेची ओळख आपल्या ओघवत्या व भावपूर्ण शब्दांत करून दिली आहे. ग्रामीण जीवन, कृषिजीवन यांच्याशी निगडित संस्कृतीचे बहिणाबाईंच्या मनावर खोल संस्कार झाले होते. त्यामुळे त्यांची कविता ग्रामीण भावविश्वाचे व कृषिसंस्कृतीतील शेकडो तपशिलांचे सहज संदर्भ देते. माणुसकी, निसर्गाशी समरसता, श्रद्धा  आणि खेड्यातील समूहजीवन या संबंधीची जाणीव त्यांच्या कवितेतून प्रकटली आहे. त्यांच्या काव्यातील खानदेशी बोलीचा गोडवा विशेषत्वाने जाणवणारा आहे.

एखाद्या शेतात मोहरांचा हंडा अचानक सापडावा तसा बहिणाबाईंच्या काव्याचा शोध गेल्या दिवाळीत महाराष्ट्राला लागला. शास्त्राप्रमाणे वाङ्मयात शोध क्वचितच लागतात. सोळा वर्षांपूर्वी मराठी साहित्यात असाच एक मौल्यवान शोध लागला. लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे' प्रसिद्ध झाली तेव्हा. लक्ष्मीबाईंसारखाच बहिणाबाईंचा जिव्हाळा जबर आहे. त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रतिभा नुसती झिरपते आहे. असे सरस आणि सोज्वळ काव्य मराठी भाषेत फार थोडे आहे आणि मौज ही आहे, की जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल असे त्याचे तेज आहे. एका निरक्षर आणि अशिक्षित शेतकरी स्त्रीने हे सारे रचलेले आहे हा तर तोंडात बोट घालायला लावील असा चमत्कार आहे.



सुप्रसिद्ध मराठी कवी सोपानदेव चौधरी यांच्या ह्या मातोश्री. वयाच्या बहात्तराव्या वर्षी त्या मरण पावल्या. सोपानदेवांची आणि माझी वीस-बावीस वर्षांची मैत्री आहे; पण त्यांच्या माजघरात सोन्याची खाण दडलेली असेल ह्याची मला माहिती नव्हती. त्यांना स्वत:ला त्याची जाणीव असेल; पण ते पडले मुलखाचे लाजाळू. त्यांना वाटले, की खानदेशी वऱ्हाडी भाषेमधल्या आपल्या अडाणी आईच्या ओव्यांचे 'सुशिक्षित आणि सुसंस्कृत' महाराष्ट्र कौतुक करील की नाही कोणास ठाऊक! म्हणून ते इतकी वर्षे तोंडात मूग धरून बसले होते.

मागल्या दिवाळीच्या आधी एक दिवस ते असेच माझ्याकडे आले आणि एक चतकोर चोपडी हळूच उघडून त्यात उतरलेली आपल्या आईची एक कविता भीत भीत त्यांनी मला वाचून दाखवली.

**येहेरीत दोन मोटा**
**दोन्हीमधी पानी एक**
**मोट हाकलतो एक**
**जीव पोसतो कितीक?**

त्याबरोबर ती वही मी त्यांच्या हातातून खसकन् ओढून घेतली आणि अधाशासारख्या साऱ्या कविता भरभर चाळल्या. भाषेची मला कुठेच अडचण वाटली नाही. मी ओरडून सोपानदेवांना म्हणालो, ''अहो, हे बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे हा गुन्हा आहे.'' त्याच क्षणी हे काव्य प्रसिद्ध करायचे आम्ही ठरवले.

प्रतिभा हे कवीला लाभलेले निसर्गाचे देणे आहे. ते त्याच्याबरोबरच यावे लागते. यत्नाचा किंवा विद्येचा त्याच्याशी काही संबंध नाही, हे माझे आता ठाम मत झाले आहे. कोकिळ पक्ष्याने तोंड उघडले, की आपोआप संगीत वाहू लागते. प्राजक्ताची कळी उमलली, की ती सुगंधाचेच

नि:श्वास टाकू लागते. तसे जातीच्या कवीचे आहे. त्याचे हृदयच ताल धरून बसलेले असते. त्यामुळे त्याच्या जिभेवर शब्द जो येतो तो मुळी नाचतच येतो. सृष्टीतले सौंदर्य तेवढे त्याच्या डोळ्याला दिसते आणि जीवनातले संगीत त्याला ऐकू येते. डोंगराच्या कपारीआडून जसा एखादा झरा उचंबळत असतो, तसे काव्य एकसारखे त्याच्या हृदयातून उसळ्या घेत असते, असे मानल्याखेरीज जगातील अमर काव्य कसे जन्माला येते हे कोडे सुटणार नाही.

बहिणाबाई ह्यांनी तर शाळेचे कधी तोंड पाहिले नाही. त्यांना लिहिता येत नव्हते नि वाचताही येत नव्हते. 'गावातील मंदिरे ह्याच माझ्या शाळा' असे त्या म्हणत. रोजचे घरातले अन् शेतामधले काम करता करता त्यांनी गाणी रचली आणि त्यातली थोडीशी कुणीतरी टिपून ठेवली. पुष्कळशी त्यांच्याबरोबरच गेली. अशी ही एक अपढिक आणि कष्टाळू गृहिणी जात्यावर दळता दळता किंवा चूल फुंकता फुंकता 'माय भीमाई माऊली, जशी आंब्याची साऊली' किंवा 'माझ्या माहेराची वाट, माले वाटे मखमल' असले जिवंत काव्य श्वास टाकावा इतक्या सहजपणे कशी करू शकते? कुणी म्हणेल आपल्या बायकांच्या जुन्या गाण्यांत असले काव्य वाटेल तितके आढळून येते; पण तसे नाही.

बहिणाबाईंच्या प्रतिभेची जात फार निराळी आहे. धरित्रीच्या कुशीत झोपलेले बी-बियाणे कसे प्रकट होते ह्याचे त्यांनी केलेले वर्णन वाचा.

**ऊन वाऱ्याशी खेयता**
**एका एका कोंबातून**
**पर्गटले दोन पानं**
**जसे हात जोडीसन**

असली कल्पनेची भरारी कोणत्या जुन्या संगीतात आढळून येईल?

हे मनोहर चित्र जिची प्रतिभा पाहू शकते किंवा ऐन तारुण्यात सौभाग्य गमावले असताना

**लपे करमाची रेखा**
**माझ्या कुंकवाच्या खाली**
**पुशीसनी गेलं कुकू**
**रेखा उघडी पडली**

वैधव्याचे असे हृदयभेदक करुणकाव्य जिच्या मुखातून प्रकट होते तिचे कवित्व सामान्य आहे असे कोण म्हणेल? सकाळी उठून बहिणाबाई घरोट्यावर म्हणजे जात्यावर बसून दळू लागल्या, की जात्यातून तिकडे पीठ पडू लागायचे अन् इकडे ह्यांच्या ओठातून काव्य सांडू लागायचे :

**अरे, घरोटा घरोटा**
**तुझ्यातून पडे पीठी**
**तसं तसं माझं गानं**
**पोटातून येतं व्होटी**

हे त्यांचे वर्णनच मुळी त्यांनी स्वत: करून ठेवले आहे. स्वयंपाकघरात जाऊन त्या चूल पेटवायला बसल्या अन् चूल पेटता पेटेनाशी झाली आणि तिच्यातून नुसताच धूर बाहेर पडू लागला म्हणजे त्या काव्यामधेच संतापून 'चुल्हया'ला म्हणत,

**पेट पेट धुक्कयेला**
**किती घेसी माझा जीव**
**आरे इस्तवाच्या धन्या!**
**कसं आलं तुले हीव!**

पुढे चूल पेटली, तवा तापला आणि भाकरी टाकताना हाताला चटके बसू लागले म्हणजे संसाराची रहस्ये काव्यरूपाने त्यांच्या मुखावाटे प्रकट होत :

**अरे संसार संसार**
**जसा तवा चुल्हयावर**
**आधी हाताले चटके**
**तव्हा मियते भाकर**

'तानक्या सोपाना'ला हाऱ्यात निजवून आणि तो हारा डोक्यावर घेऊन बहिणाबाई शेताला निघाल्या, की काव्य आपले निघालेच त्यांच्याबरोबर. वाटेत तांबड्या फळांनी लकडलेले हिरवे वडाचे झाड दिसले, की लागले ते त्यांच्या ओठावर नाचायला :

**हिरवे हिरवे पानं**
**लाल फयं जशी चोच**
**आलं वडाच्या झाडाले**
**जसं पीक पोपटाचं!**

रस्त्याच्या कडेला कडुलिंबाच्या झाडावरच्या पिवळ्या निंबोळ्या पाहिल्या, की घेतलीच त्याने त्याच्यावर झेप :

**कडू बोलता बोलता**
**पुढे कशी नरमली**

**कडू निंबोयी शेवटी**
**पिकीसनी गोड झाली!**

समोरून पंढरीच्या दिंडीतला एखादा भाविक वारकरी दिसला, की गहिवरून केलाच त्यांनी त्याला प्रश्न :

**आरे वारकऱ्या, तुले**
**नही ऊन, वारा थंडी**
**झुगारत अवघ्याले**
**आली पंढरीची दिंडी**

शेतामध्ये कापणी चालो, मळणी चालो किंवा उफणणी चालो, काव्याने बहिणाबाईची पाठ कधी सोडली नाही. खळ्यात बैलाची पात सुरू झाली आणि मेढ्याभोवती बैल गरागरा फिरू लागला, की लागलेच ते त्या बैलाला गोंजारायला :

**पाय उचल रे बैला,**
**कर बापा आता घाई**
**चालू दे रे रगडनं**
**तुझ्या पायाची पुन्याई**

शेतकऱ्याचे जीवन म्हणजे कष्टाचे. शेतकऱ्याची हाडे अखेर शेतातच मोडावयाची अन् त्याची राख तापीमाईतच पडावयाची ह्याची बहिणाबाईंना जाणीव होती.

भोळ्या, भाविक, कष्टाळू आणि समाधानी शेतकऱ्याच्या संसाराचे करुण काव्य बाळबोध आणि जिवंत जिव्हाळ्याने बहिणाबाईंच्या ह्या गाण्यातून प्रकट झालेले आढळून येईल.

मात्र, बहिणाबाईंच्या काव्याचे एवढेच वैशिष्ट्य नाही. मानवी जीवनाकडे बघण्याचे एक स्पष्ट आणि प्रभावी तत्त्वज्ञान त्यांच्याजवळ होते. एखाद्या बुद्धिमान तत्त्वज्ञानी किंवा महाकवीची जणूकाही प्रतिभाच त्यांना प्राप्त झालेली होती. म्हणून त्यांच्या काव्याचा सर्व आविष्कार सुभाषितांचा आहे आणि त्याचा आत्मा उपरोधी विनोदाचा आहे.

मराठी वाङ्मयात अमर होतील अशी अनेक सुभाषिते जागोजाग त्यांच्या काव्यात विखुरलेली आढळतील. 'कशाला काय म्हणू नाही?' या काव्यात अशा सुभाषितांचे जणूकाही एक शेतच पिकलेले आहे, 'ज्यातून कापूस येत नाही त्याला बोंड म्हणू नये. भुकेल्या पोटी जी माणसाला निजवते तिला रात म्हणू नये, अन् दानासाठी जो आखडला जातो त्याला हात म्हणू नये. इमानाला जो विसरला त्याला नेक म्हणू नये अन् जन्मदात्याला जो भोवतो त्याला लेक म्हणू नये. जिच्यामध्ये भाव नाही तिला भक्ती म्हणू नये अन् जिच्यामध्ये चेव नाही तिला शक्ती म्हणू नये' ह्या बहिणाबाईंच्या उद्गारांत भाषेची आणि विचारांची केवढी देदीप्यमान श्रीमंती प्रकटलेली आहे!

महाकवी झाला तरी तो ह्यापेक्षा अधिक काय आणखी बोलू शकतो?

**मन पाखरू पाखरू**
**त्याची काय सांगू मात?**
**आता व्हतं भुईवर**
**गेलं गेलं आभायात**

हा भाषेचा अन् विचारांचा हृदयंगम मासला कुठे आढळून येईल काय?

मानवी जीवनाचे रहस्य शुद्ध प्रेम आहे. स्वार्थ नाही.

**नको लागू जीवा, सदा मतलबापाठी**
**हिरीताचं देनं घेनं, नही पोटासाठी**

ऊन, वारा आणि पाऊस खात पिके शेतात उभी असतात. कशासाठी? भुकेल्यांच्या पोटात आम्हांला लवकर जाऊ दे रे, असा मनामध्ये ती देवाचा धावा करत असतात. माणसांचे खोटेनाटे व्यवहार बघून तर बोरीबाभळींच्या अंगावर काटे आले तरी देखील माणसांवर उपकार करण्यासाठी त्यांच्या शेताभोवती आपल्या शरीराची त्या कुंपणे करतात! पोट कितीही भरले तरी ते शेवटी रिकामेच होणार! अन् शरीर तर कधी तरी निघूनच जाणार! मागे जे काही शिल्लक राहणार ते फक्त हृदयाचे देणेघेणे. दुसरे काही नाही. शुद्ध आणि नि:स्वार्थी प्रेमाचे यापेक्षा अधिक हृदयंगम स्तोत्र कोण लिहू शकेल?

बहिणाबाईंना सर्वांत कशाची जास्त चीड असेल तर ती माणसाच्या स्वार्थातून निर्माण झालेल्या त्याच्या कृतघ्नपणाची! त्या माणसाला संतापून म्हणतात, 'माणसा, तुला नियत नाही रे. तुझ्यापेक्षा ते गोठ्यातले जनावर बरे. गाय न् म्हैस चारा खाऊन दूध तरी देतात. तुझे एकदा पोट भरले, की तू उपकार साफ विसरून जातोस. कुत्रा आपले शेपूट इमानीपणाच्या भावनेने हालवतो. तर माणसा, तू आपली मान मतलब साधण्यासाठी डोलावतोस. केवळ लोभामुळे तू माणूस असूनही काणूस म्हणजे पशू झाला आहेस.' एवढे सांगून झाल्यानंतर बहिणाबाईंनी माणसाला तळमळून विचारले आहे :

**मानसा मानसा,**

**कधी व्हशीन मानूस!**

मानवतेलाच जणूकाही त्यांनी हे व्याकूळ हृदयाने आवाहन केले आहे! स्वार्थाचा वणवा सर्व जगभर आज पसरलेला आहे. माणसे पशू होऊन एकमेकांशी झगडत आहेत. मानवता आज रक्तबंबाळ झाली आहे. म्हणूनच 'माणसा, माणसा, कधी होशील माणूस?' हीच आर्त हाक मानवतेच्या कल्याणासाठी तळमळणाऱ्या संतमहात्म्यांच्या कारुणिक अंत:करणातून उचंबळते आहे! माणसाने माणूस कसे व्हायचे हीच प्रचंड समस्या मानवजातीपुढे आज उभी आहे. ह्या समस्येचा साक्षात्कार बहिणाबाईंसारख्या खानदेशातील एका अशिक्षित शेतकरी महिलेला व्हावा हा तिच्या प्रतिभासामर्थ्याचा केवढा पडताळा आहे!

बहिणाबाईंची चुलत सासू 'भिवराई' ही मोठी विनोदी होती. ती अनेकांच्या नकला करून लोकांना हसवी. तिचे वर्णन करता करता बहिणाबाईने विनोदाचा एक मोठा सिद्धान्त सांगून ठेवला आहे.

**नाव ठेये आवघ्यालं**

**करे सर्व्यांची नक्कल**

**हासवता हासवता**

**शिकवते रे अक्कल!**

माणसांना हसवून शहाणे करायचे हाच विनोदाचा प्रधान हेतू आहे. बहिणाबाईंच्या विनोदात नुसता उपरोध नाही. त्यात सहानुभूतीचा आणि कारुण्याचा ओलावा ओथंबलेला आहे.

रचनेच्या आणि भाषेच्या दृष्टीने बहिणाबाईंचे काव्य अत्यंत आधुनिक आहे. प्रत्येक काव्यामध्ये एक संपूर्ण घटना किंवा विचार आहे. त्याचा प्रारंभ आणि अखेर परिणामाच्या दृष्टीने नाट्यात्मक व्हावा ह्याबद्दल त्यांचा कटाक्ष आहे. शब्दांचा आणि विचारांचा फार विस्तार न करता थोडक्यामध्ये एखादी भावना जास्तीत जास्त प्रभावाने कशी व्यक्त करता येईल ह्याकडे त्यांनी विशेष लक्ष दिलेले आहे. त्या दृष्टीने मराठी भाषेवरचे त्यांचे प्रभुत्व केवळ अद्‌भुतच म्हटले पाहिजे.

रसाच्या आणि ध्वनीच्या दृष्टीने कुठेही ओढाताण किंवा विरस न होईल अशा कौशल्याने त्यांनी सोपे सोपे आणि सुंदर शब्द वापरले आहेत. त्यांच्या खानदेशी वऱ्हाडी भाषेने तर त्यांच्या काव्याची लज्जत अधिकच वाढवली आहे असे माझे मत आहे. 'अशी कशी वेडी ग माये' ह्यापेक्षा 'अशी कशी येळी माये' किंवा 'पाणी 'लौकीचं' नितळ । त्याला अमृताची गोडी' ह्यापेक्षा 'पानी लौकीचं नित्तय । त्याले अम्रीताची गोडी' ह्या भाषेत अधिक लाडकेपणा वाटतो. एखादे गोजिरवाणे बालक बोबड्या भाषेत बोलताना आपल्याला जसा आनंद होतो, तसे बहिणाबाईंचे काव्य वाचताना मनाला नि कानाला वाटते.

मराठी मनाला मोहिनी घालील आणि स्तिमित करून टाकील असा भाषेचा, विचारांचा आणि कल्पनेचा विलक्षण गोडवा त्यांच्या काव्यात शिगोशीग ओथंबलेला आहे आणि

**मानसा मानसा,**

**कधी व्हशीन मानूस!**

मानवतेला त्यांनी दिलेल्या ह्या अमर संदेशाने तर मराठी वाङ्मयात त्यांचे स्थान अढळच करून ठेवलेले आहे!

(बहिणाबाईंची गाणी–प्रस्तावना)
(संपादित)

## कृती

**(१) (अ) कृती करा.**

(१) **लेखक प्र. के. अत्रे यांच्या मते कवयित्रीचे गुणविशेष** → ____ → ____ → ____ → ____

(२) **बहिणाबाई यांच्या काव्याचे विशेष** → ____ → ____ → ____ → ____

(३)

अमरकाव्ये जन्माला येण्याची लेखकाने सांगितलेली लक्षणे →
→
→
→

(आ) खालील घटनांचे पाठाच्या आधारे परिणाम लिहा.

| घटना | परिणाम |
|---|---|
| (१) कोकिळ पक्ष्याने तोंड उघडणे. | ................................ |
| (२) प्राजक्ताची कळी उमलणे. | ................................ |
| (३) जातीच्या कवीचे हृदय ताल धरून बसलेले असणे. | ................................ |

(इ) तुलना करा.

| मुद्दे | माणूस | प्राणी |
|---|---|---|
| वर्तणूक | | |
| इमानीपणा | | |

(ई) खालील आशयाची कवितेची उदाहरणे पाठातून शोधून लिहा.

(१) शब्दांची मौज वाटेल, अशी बहिणाबाईंनी दिलेली उदाहरणे-

(२) बहिणाबाईंची प्राणिमात्रांविषयीची कृतज्ञता-

(२) व्याकरण.

(अ) प्रस्तुत पाठात दिलेल्या कवितेच्या उदाहरणांतून यमक जुळणाऱ्या शब्दांच्या पाच जोड्या शोधून लिहा.

(आ) शब्दसमूहांचा अर्थ स्पष्ट करा.

(१) बावनकशी सोने-
(२) करमाची रेखा-
(३) सोन्याची खाण-
(४) चतकोर चोपडी-

(इ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यांत उपयोग करा.

(१) तोंडात बोटे घालणे.
(२) तोंडात मूग धरून बसणे.

(ई) खालील शब्दांना उपसर्ग व प्रत्यय लावून शब्द तयार करा.

उदा., वाद-विवाद, संवाद, निर्विवाद, वादक, वादी

(अ) अर्थ-
(आ) कृपा-
(इ) धर्म-
(ई) बोध-
(उ) गुण-

**(३) स्वमत.**

(अ) 'बहिणाबाईंचे साहित्य जुन्यात चमकणारे व नव्यात झळकणारे आहे', हे लेखकाचे विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) 'बहिणाबाई शेताला निघाल्या, की काव्य आपले निघालेच त्यांच्याबरोबर.', या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ सविस्तर लिहा.

(इ) 'मानसा मानसा, कधी व्हशीन मानूस!' या उद्‌गारातून व्यक्त झालेला बहिणाबाईंचा विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**(४) अभिव्यक्ती.**

(अ) प्र. के. अत्रे यांच्या प्रस्तावना लेखनाची तुम्हांला जाणवलेली वैशिष्ट्ये लिहा.

(आ) बहिणाबाईंच्या काव्यातील भाषेची वैशिष्ट्ये लिहा.

(इ) माणसातील माणुसकीचा तुम्ही घेतलेला अनुभव शब्दबद्‌ध करा.

**प्रकल्प.**

(१) 'बहिणाबाईंची गाणी' मिळवून निवेदनासह काव्यवाचनाचा कार्यक्रम सादर करा.

(२) तुमच्या परिसरातील ओव्या/लोकगीते मिळवून संग्रह करा.

## भाषिक सौंदर्यस्थळे

तानक्या सोपान, देदीप्यमान श्रीमंती, माणूस असून काणूस झाला, कारुणिक अंत:करण, चतकोर चोपडी, कल्पनेचा गोडवा शिगोशीग ओथंबलेला– हे शब्दसमूह नीट अभ्यासा व स्वलेखनात त्यांचा योग्य वापर करून लेखन अधिक आकर्षक करा.

# ६. दवांत आलिस भल्या पहाटीं

**बा. सी. मर्ढेकर** (१९०९ ते १९५६) :

कवी, कादंबरीकार, समीक्षक, सौंदर्यमीमांसक. भावोत्कट तरीही चिंतनशील असणारी, मानवी जीवनातील तसेच वर्तमान परिस्थितीतील अंतर्विरोधाच्या जाणिवेने निर्माण झालेली अस्वस्थता व्यक्त करणारी मर्ढेकर यांची कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरली. 'नवीनता' ही संकल्पना त्यांनी समीक्षेत रुजवली आणि स्वत:च्या कवितेतून तिचा प्रत्यय वाचकांना घडवला. त्यांची कविता आविष्काराच्या दृष्टीने प्रयोगशील व क्रांतदर्शी होती. विसाव्या शतकातील भारतीय साहित्यातील एक समर्थ कवी अशी ख्याती त्यांना लाभली. 'शिशिरागम', 'कांहीं कविता', 'आणखी कांहीं कविता' हे कवितासंग्रह; 'रात्रीचा दिवस', 'तांबडी माती' व 'पाणी' या तीन कादंबऱ्या प्रसिद्ध. काव्य-कलाविषयक त्यांच्या प्रगल्भ अशा जाणिवेने मराठी कवितेचे स्वरूप अंतर्बाह्य पालटून टाकले. मराठी काव्य क्षेत्रातील केशवसुतांच्या नंतरचे महत्त्वाचे परिवर्तन मर्ढेकरांच्या कवितेने घडवले आहे. म्हणूनच त्यांना 'दुसरे केशवसुत' म्हटले जाते. 'सौंदर्य आणि साहित्य' हे समीक्षणात्मक लेखन प्रसिद्ध. त्यांचे सौंदर्यशास्त्रविषयक लेखन त्यातील मौलिक सिद्धान्तामुळे गाजले.

प्रस्तुत कविता म्हणजे प्रेयसीच्या आगमनाच्या आठवणीचे भावरम्य वर्णन आहे. पहाटेच्या संधीकाली कवीची प्रेयसीशी दृष्टिभेट झाली. ती भेट कदाचित स्वप्नातील असेल वा प्रत्यक्षातील. त्यामुळेच भेटीचे स्वरूप धूसर होते. प्रेयसी आली तेव्हा तिने पहाटेच्या आकाशात तेजाळणाऱ्या शुक्राप्रमाणे कवीच्या मनाचे आकाश उजळून टाकले. तिचे चालण्यातले सौंदर्य, चंचल नजर यामुळे कवीची वृत्ती काहीशी उल्हसित झाली; परंतु हसूनसुद्धा ती अनोळख्यासारखी वागली. यामुळे कवीच्या मनातील व्याकूळता कायमच राहिली. प्रेमातील परस्परविरोधी भावनांचे धागे गुंफून हळव्या मन:स्थितीचे चित्रण कवीने अत्यंत तरलतेने केले आहे.



**दवांत आलिस भल्या पहाटीं**
**शुक्राच्या तोऱ्यांत एकदा;**
**जवळुनि गेलिस पेरित अपुल्या**
**तरल पावलांमधली शोभा.**

**अडलिस आणिक पुढे जराशी**
**पुढे जराशी हसलिस;**
**—मागे**
**वळुनि पाहणें विसरलीस का?**
**विसरलीस का हिरवे धागे?**

**लक्ष्य कुठे अन् कुठे पिपासा,**
**सुंदरतेचा कसा इशारा;**
**डोळ्यांमधल्या डाळिंबांचा**
**सांग धरावा कैसा पारा!**

अनोळख्याने ओळख कैशी
गतजन्मींची द्यावी सांग;
कोमल ओल्या आठवणींची
एथल्याच जर बुजली रांग!

तळहाताच्या नाजुक रेषा
कुणिं वाचाव्या, कुणीं पुसाव्या;
तांबुस निर्मल नखांवरी अन्
शुभ्र चांदण्या कुणिं गोंदाव्या!

दवांत आलिस भल्या पहाटीं
अभ्रांच्या शोभेंत एकदा;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
मंद पावलांमधल्या गंधा.

(मर्ढेकरांची कविता)



## कृती

**(१) योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

**(अ) शुक्राच्या तोऱ्यात म्हणजे–**

(१) शुक्रताऱ्याच्या तेजस्वी प्रकाशात.
(२) शुक्रताऱ्याच्या आकाशी आगमनात.
(३) शुक्रताऱ्याप्रमाणे उजळणाऱ्या कविमनात.
(४) शुक्रताऱ्याच्या अहंकारीपणात.

**(आ) हिरवे धागे म्हणजे–**

(१) हिरव्या रंगाचे सूत.
(२) हिरव्या रंगाचे कापड.
(३) हिरव्या रंगाचे गवत.
(४) ताजा प्रेमभाव.

**(इ) सांग धरावा कैसा पारा! म्हणजे–**

(१) पाऱ्यासारखा निसटणारा अनुभव.
(२) हातातून निसटणारा पारा.
(३) पाऱ्यासारखा चकाकणारा.
(४) पाऱ्यासारखा पारदर्शक असलेला.

**(ई) अभ्रांच्या शोभेंत एकदा म्हणजे–**

(१) आकाशात अल्पकाळ शोभून दिसणाऱ्या ढगांप्रमाणे
(२) काळ्या मेघांप्रमाणे
(३) आकाशात गरजणाऱ्या ढगांप्रमाणे
(४) आकाशात धावणाऱ्या ढगांप्रमाणे

**(२) (अ) प्रेयसीच्या दृष्टिभेटीनंतर प्रेयसीविषयी कवीच्या मनात निर्माण झालेले प्रश्न निवडा.**

(१) प्रेयसीचे नाव काय?
(२) ती वळून पाहणे का विसरली असावी?
(३) भूतकाळातील प्रेम विसरली असल्यास आता ओळख कशी द्यावी?
(४) ती कुठे राहते?
(५) तिचे लक्ष नसताना तिचे सौंदर्य कोणता इशारा देत असावे?
(६) तिने सुंदर वस्त्र परिधान केले आहे का?
(७) तिचे डोळे कोणता इशारा देतात?
(८) तळहाताच्या नाजूक रेषांवरून प्रेमाच्या भवितव्याचे भाकीत कोणी करावे?

**(आ) खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधा.**

(१) वर्तमानातील ताज्या आठवणीच जर विरून चालल्या असतील तर अनोळखी झालेल्या गतकाळातील प्रेमाची आता ओळख तरी कशी द्यावी?

(२) तळहातावरील नाजूक रेषा तरी कुठे वाचता येतात? मग त्यावरून भविष्यकाळातील भेटीचे भाकीत तरी कसे करता येईल?

(३) विरल, सुंदर अभ्रे अरुणोदयाच्या प्रतीक्षेत असताना अशीच एकदा तू आलीस आणि जवळून जाताना आपल्या आठवणींचा गंध मनात पेरीत गेलीस.

### (३) (अ) सूचनेप्रमाणे सोडवा.

(१) 'पहाटी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

(२) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) कवीची प्रेयसी केव्हा आली?

(आ) डोळ्यांना कवीने दिलेली उपमा कोणती?

(इ) कवीला प्रेयसीची जाणवलेली पावलं कशी आहेत?

(ई) प्रेयसीच्या आठवणीसाठी कवितेत आलेली दोन विशेषणे कोणती?

(उ) 'अनोळख्याने' हा शब्द कोणासाठी वापरला आहे?

### (आ) खालील चौकटी पूर्ण करा.

| कवितेचा विषय | कवितेची मध्यवर्ती कल्पना | कवितेतील तुम्हांला आवडलेले शब्दसमूह | कवितेतील छंद |
|---|---|---|---|
| | | | |

### (४) काव्यसौंदर्य.

(अ) 'डोळ्यांमधल्या डाळिंबांचा, सांग धरावा कैसा पारा!' या काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

(आ) 'जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
मंद पावलांमधल्या गंधा.' या ओळींमधील भावसौंदर्य तुमच्या शब्दांत लिहा.

### (५) अभिव्यक्ती.

प्रस्तुत प्रेमकवितेचे तुम्हांला जाणवलेले वेगळेपण स्पष्ट करा.

### (६) रसग्रहण.

'दवांत आलिस भल्या पहाटीं' या कवितेचे रसग्रहण करा.

# ७. 'माणूस' बांधूया!



**प्रवीण दवणे (१९५९) :**

लेखक, कवी, गीतकार, पटकथालेखक व वक्ते म्हणून परिचित. 'दिलखुलास', 'थेंबातलं आभाळ', 'अत्तराचे दिवस', 'सावर रे', 'गाणारे क्षण', 'मनातल्या घरात', 'रे जीवना' हे ललित लेखसंग्रह. तसेच 'रंगमेघ','गंधखुणा', 'आर्ताचे लेणे', 'ध्यानस्थ', 'भूमीचे मार्दव' हे कवितासंग्रह प्रसिद्ध. 'प्रश्नपर्व' हा वैचारिक लेखसंग्रह प्रसिद्ध. 'दिलखुलास', 'थेंबातलं आभाळ', 'सावर रे', 'लेखनाची आनंदयात्रा', 'वय वादळ विजांचं' हे विशेष गाजलेले कार्यक्रम. सर्वोत्कृष्ट वाङ्मयाच्या महाराष्ट्र राज्य पुरस्काराने पाच वेळा सन्मानित. गदिमा प्रतिष्ठान, पुणे या संस्थेचा 'चैत्रबन' पुरस्कार, मास्टर दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठानचा 'शांता शेळके सरस्वती पुरस्कार' आणि अन्य अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

प्रस्तुत पाठ 'प्रश्नपर्व' या वैचारिक लेखसंग्रहातील आहे. संवाद हा माणूसपणाचा धर्म आहे. संवादाबरोबरच आज आवश्यक आहे तो मने एकमेकांना सुसंवादाने जोडण्याचा ध्यास! मोबाइल, इंटरनेटच्या जमान्यातील आजच्या पिढीचा प्रत्यक्ष संवाद तुटत चालल्याची खंत या पाठात व्यक्त झाली आहे. केवळ यंत्रसंवादापेक्षा प्रत्यक्ष माणूस बांधणाऱ्या हृदयसंवादाचा आग्रह धरणारा हा पाठ वर्तमान स्थितीत अंतर्मुख करणारा आहे.

न बोलताही संवाद होणारा संवेदनशील काळ मागं पडून आता खूप बोलूनही काळीज न ओलावणारा काळ आला आहे. कारणं अनेक आहेत; पण मला जाणवणारं मुख्य कारण म्हणजे- 'माणूस मिथ्या सोनं सत्य' हे तत्त्वज्ञान आरपार बिंबवलं गेलं आहे. 'पैसा मिळवला की माणूस सुखी होतो', हा निष्कर्ष गरिबीतून येऊ शकतो; पण गरिबी दूर करताना दुसरेच एक आंतरिक दारिद्र्य निर्माण होऊ नये, याची दक्षता 'मार्केटिंग'च्या भरात घेतली गेली नाही. यांतून संवाद-सुसंवाद, प्रेम, माया, वात्सल्य काय मिळणार? भावनेवर का जगता येणार? असे प्रश्न विचारणारा एक वर्ग जगात निर्माण झाला. या वर्गाच्या हातात प्रसारमाध्यमं होती, उद्योगधंदे होते. सूत्रधाराने बाहुल्यांना खेळवावं त्याप्रमाणे ह्या मंडळींनी गेल्या पंचवीस वर्षांत साऱ्या जगाचं एका भव्य 'मॉल'मध्ये रूपांतर केलं, जिथे पैसा बोलतो, मन मात्र मुकं राहतं.

एकदा पैशानेच जगता येतं-पैशासाठीच जगायचं असतं, हाच जगण्याचा उद्देश झाला, की मग शिक्षण पैशासाठीच होतं. सजणं, धजणं, प्रेम, कलानिर्मिती, श्रद्धा, भक्ती, मंदिरं यांचीही दुकानं होतात, मग दुकानातली भाषा खरेदी-विक्रीचीच असते. तिथे 'संवाद' नसतो. असतो तो खरेदी-विक्रीचा व्यवहार.

हीच दुकानाची लागण बाहेरून आत सरकली, बघता बघता घरंही अबोल झाली. वडील-आई यांच्या स्पर्शातून जाणवणारं वात्सल्याचं ऊबदार घर आर्थिक हव्यासाच्या बुलडोझरखाली भुईसपाट झालं न् तिथं बांधला गेला नात्याचा एक चकचकीत काचमहाल! इथे माणूस 'दिसत' होता; पण 'जाणवत' नव्हता. ओठ हलत होते; पण साद पोहोचत नव्हती. ज्या पिढीनं उत्कट नात्यांचे दुथडी भरलेले काठ अनुभवले, ती पिढी काठावरच फेकली गेली. डोळ्यांत खिन्न अश्रू अन् काळजात क्रंदन घेऊन फक्त बघत राहिली. हे काय घडतंय? माणसं असं का वागताहेत? शिक्षणाचं असं काय होतंय? वृत्तपत्रं समाजाला कुठं नेत आहेत? कोसळत कोसळत अजून सारी पडझड कुठपर्यंत खाली जाणार आहे? याचा पोखरणारा भुंगा घेऊन सत्तर-पंचाहत्तरीची मनं कातर होत राहिली. अर्थात, त्यांना काय वाटतंय, याकडे लक्ष द्यायला दुकानरूप जगाला-पैशानंच सुख खरेदी करायला निघालेल्या घराला वेळच कुठं होता? तरुण चाकं धावत होती, म्हातारे पाय काठावर थरथरत उभेच होते-पैलतीराची नाव येईल म्हणून...

संवादाचं 'मूल्य' तुडवणाऱ्या या काळात, संवेदनांचे निरोप समारंभ साजरे होऊ लागले. घर, शाळा, मंदिरं ही समाजाची आशास्थानं होती; पण या काळात घर म्हणजे चार घटकांचा निवारा, पुन्हा पोटार्थी आकाशात उडून उडून थकून भागल्यावर टेकायला एक लॉज, एवढंच काय ते घर उरलं. वडील सहा-आठ महिने दौऱ्यावर. घरात आले, की सारखे फोनवर. आई कामावर. घरी आली, की सिरियल बघण्यात मग्न! मुलं पळताहेत-या क्लासमधून त्या क्लासमध्ये प्रश्नपत्रिकांचे गठ्ठे सोडवत. संवाद कुठला, 'फी भरायला पैसे हवेत', 'हॉटेलमध्ये जाऊया', 'पुष्कळ दिवसांत चायनीज खाल्लेलं नाही', 'गधड्या, इतके पैसे ओतलेत तरीही एटीनाईनच पर्सेंट?', 'न्यूयॉर्कची सीडी आणायचीए' हे किंवा या चेहऱ्याची वाक्यं! ह्याला संवाद

म्हणता येत नाही, 'आत्म्याची साद असते, तोच संवाद! ती नसेल तर तो गोंगाटच!'

कृत्रिम पाऊस पाडण्याचा आटापिटा करावा, तशा प्रकारे काहीशी अगतिक झालेली माणसं कुठं ई-मेल, कुठं चॅटिंग, कुठं एसएमएस, कुठं फोनवरून बिनचेहऱ्याने बडबडत राहतात. बोटांनी बटणांचा खेळ म्हणजे संवाद नव्हे! त्याची सोबत होत नाही! साथ लाभत नाही! एक भरून उरलेलं एकाकीपण! रात्रीचा घट्ट दगड पहाटेपर्यंत न्यायचा बस्स... सकाळ झाली, की पाय पाठीला लावून पोटासाठी पळपळ पळायचं. कुठं पळतोय भान नाही. सतत चिंता... उद्या-उद्या-उद्याची! आज गेला खड्ड्यात. उद्या येत नाही. खड्डा खोल होत जातो. ही 'आज'ची भीषण स्थिती आहे. संगणकाच्या बोटांनी आय. टी. ची कळ ऐटीत फिरवत भारताची अमेरिका करणारे आपणच. अन् पुन्हा अमेरिकेवर टीका करणारे आपणच. लौकिक प्रगती करणाऱ्या विज्ञानाचं कोडकौतुक करताना अलौकिक, चिरंतन आनंद देणाऱ्या या मातीच्या वारशाचं तेज लोपून कुठलं सुख मिळणार? मिळणार नाहीच, हेच त्रिवार सत्य आहे. मग 'खरं सुख' ते कोणतं हेही कळण्यापासून आपण इतके दूर जाऊ, की 'विनाश हाच विकास' हा नव्या जगाचा मंत्र होईल. आता निव्वळ यंत्रसंवाद करून चालणार नाही, गरज आहे ती चिंतनाची. कुठं भरकटत निघालो आहोत हे कळण्यासाठी धावताना अंमळ थांबण्याची गरज आहे. जाणण्याची गरज आहे, आपल्याला संवादशून्य एकाकीपण नको आहे हे खरे आहे; पण आपणही कुणाला तरी संवाद न करता एकाकी पाडलं आहे, यामुळे अस्वस्थ होण्याची गरज आहे.

संवाद नको होतो तोही स्वार्थासाठी आणि आता तो हवा आहे, तोही स्वार्थासाठीच. ही लबाडी कायम ठेवली, तर पुन्हा आणखी एक 'संवाद हवाय' ह्या स्वार्थाचा मॉल उभा राहील इतकंच.

संवादाची इतकी गरज माणसाला का आहे, याचा शोध ह्या निमित्तानं घ्यायला हवा. 'मन' हे प्रत्येक प्राण्याला आहेच; पण मनात सुखदु:खाची कंपनं निर्माण होऊन, त्यातून नवनिर्मिती करण्याचं अनोखं दान फक्त मनुष्य प्राण्यालाच आहे. म्हणूनच मेंदूतून प्रकटणाऱ्या अनेक नैसर्गिक प्रेरणांपैकी एक नवनिर्मितीची प्रेरणा; जी विचार करायला लावते, भूतकाळाशी धागा जोडते, भविष्याचं स्वप्नं रंगवते, निजलेली ऊर्जा जागवून वर्तमान सुसह्य होण्यासाठी नवनव्या प्रयोगात गुंतते.

माणूसपणाचं पोषण होण्यासाठी हवाय संवाद! संवाद हा माणूसपणाचा पायाभूत धर्म आहे. आज ह्या धर्मावर धर्मसंकट आल्यानं, माणसं माणसासारखी वागत नाहीत, असं दिसतं. त्यांना अधिक अधिक हव्यासाचा, कुठे थांबायचं हे न कळण्याचा एकाकी पथच जीवनपथ वाटत आहे.

नव्या जगाची जीवनशैली माणूसपणाशी जवळीक साधत नाही. ती त्याच्या नैसर्गिक विकासाच्या आड पदोपदी येत असल्याने, पुढचे प्रश्न मनाच्या संबंधीच अधिक असणार आहेत आणि ते धनाने सोडवता येणार नाहीत. पुढे तर हे सोडवणारे तरी वेगळे उरतील का, ही सुद्धा शंका येते. इतकी मनोरुग्णता वाढण्याच्या आतच समंजस पालकांनी झडझडून जागं व्हायला हवं आहे. लेखक, कलावंत, नेतृत्व, माध्यमं यांनी व्यक्तिगत अहंकार अन् केवळ आर्थिक मिळकतीची व्यावसायिकता सुवर्णमध्यावर आणून 'मनजागरण' करण्याची गरज आहे. हे करण्यासाठी कुणीतरी निमंत्रण देईल याची वाट पाहण्याइतकाही वेळ आता नाही. कविश्रेष्ठ केशवसुतांच्या शब्दांतील-

उठा उठा बांधा कमरा
मारा किंवा लढत मरा
सत्त्वाचा उदयोऽस्तु करा!

हे वरील आवाहन प्रत्येकाने जाणलं पाहिजे. इमारती बांधणं, जागा, म्युझियम बांधणं पुरं झालं!

चला 'माणूस' बांधूया!
अंतरीच्या उमाळ्याने-
संवादातील जिव्हाळ्याने!

(प्रश्नपर्व)

**(१) (अ) कृती करा.**

(१) नवनिर्मितीच्या प्रेरणेची कार्ये → → → →

(२) बदलत्या जीवनशैलीत घराघरांतून कानांवर पडणारी वाक्ये → → → →

(३) 'पैशानेच जगता येते,' हा जीवनाचा उद्देश असला, की मानवी व्यवहाराचे होणारे स्वरूप → → → →

**(आ) परिणाम लिहा.**

(१) कुटुंबांचा आर्थिक हव्यास वाढला.
(२) माणसा-माणसांतील संवाद हरवला.
(३) माणसं बिनचेहऱ्यानं बडबडत राहिली.
(४) नव्या जगाची जीवनशैली नैसर्गिक विकासाच्या आड पदोपदी आली.

**(इ) पाठाच्या आधारे कारणे लिहा.**

(१) सत्तरपंचाहत्तरीची मनं कातर झाली, कारण ......
(२) यंत्रसंवाद करून चालणार नाही, कारण ......

**(२) पाठात आलेल्या खालील शब्दसमूहांचा अर्थ स्पष्ट करा.**

(अ) आंतरिक दारिद्र्य
(आ) वात्सल्याचं ऊबदार घर
(इ) धावणारी तरुण चाकं, थरथरणारे म्हातारे पाय
(ई) संवेदनांचे निरोप समारंभ

**(३) व्याकरण**

**(अ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यांत उपयोग करा.**

(१) मन कातर होणे. (२) काळजात क्रंदन होणे.

**(आ) 'संवेदनशून्य' शब्दांसारखे नकारार्थी भावदर्शक चार शब्द लिहा.**

............... ............... ............... ...............

**(इ) अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहून अर्थबदल न करता वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) <u>नव्या</u> जगाची जीवनशैली माणूसपणाशी जवळीक साधत नाही.
(२) माणसा-माणसांत <u>संवाद</u> हवा.
(३) मनुष्य हा <u>प्रेमाच्या</u> आधारावर जगू शकतो.

### (४) स्वमत.

(अ) 'पैसा हे साधन आहे, साध्य नव्हे', हे विधान पाठाधारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) 'मानवी जीवनात संवादाचे महत्त्व' याविषयी तुमचे मत स्पष्ट करा.

### (५) अभिव्यक्ती.

(अ) 'नव्या जगाची जीवनशैली माणूसपणाशी जवळीक साधत नाही', लेखकाच्या या मताशी तुम्ही सहमत आहात की असहमत, ते सकारण स्पष्ट करा.

(आ) 'इथे माणूस 'दिसत' होता; पण 'जाणवत' नव्हता. ओठ हालत होते; पण साद पोहोचत नव्हती', या विधानांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

(इ) संवादाचा अभाव असलेल्या मानवी जीवनाचे भाकीत तुमच्या शब्दांत व्यक्त करा.

### प्रकल्प.

लेखकाने पाठात व्यक्त केलेल्या संवादाचे बदलते स्वरूप समजून घेऊन, तुमच्या परिसरातील भिन्न-भिन्न आर्थिक, शैक्षणिक स्तरांतील किमान पाच कुटुंबांचे सर्वेक्षण करा. नोंदीसाठी मुद्दे ठरवा. त्यानुसार नोंदी करा. तुमच्या अहवालाबाबत तुमच्या मित्रांशी चर्चा करा. त्यानुसार तुमच्या प्रकल्प अहवालात सुधारणा करून तो वर्गात वाचून दाखवा.

---

✲ **शब्दसंपत्ती**

**गटात न बसणारा शब्द शोधा.**

(अ) तो, मी, पी, हा ☐

(आ) खाणे, पिणे, शहाणे, जाणे ☐

(इ) तापी, कृष्णा, नदी, यमुना ☐

(ई) त्याला, तुला, मला, माणसाला ☐

(उ) आनंदी, दु:खी, सौंदर्य, आळशी ☐

# ८. ऐसीं अक्षरें रसिकें

**संत ज्ञानेश्वर** (१२७५ ते १२९६) :

श्रेष्ठ संत. प्रज्ञावंत तत्त्वज्ञ. अलौकिक प्रतिभावंत कवी. सर्व जगाला सन्मार्गाचा संदेश देणारे संतकवी. तत्त्वज्ञान, आत्मविचार, साक्षात्कार, काव्यसौंदर्य, कल्पनावैभव आणि रसाळपणा या दृष्टीने त्यांनी लिहिलेला अजोड ग्रंथ म्हणजे 'ज्ञानेश्वरी' होय. 'अमृतानुभव', 'चांगदेवपासष्टी', 'अभंगगाथा' हे त्यांचे ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. तत्त्वज्ञान, भक्ती आणि काव्य यांचा अपूर्व संगम संत ज्ञानेश्वरांच्या रचनांमध्ये आढळतो. संत ज्ञानेश्वरांच्या लेखनातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विलोभनीय दर्शन घडते. विनयशील वृत्ती, अतुलनीय गुरुभक्ती, असीम करुणा, मातृहृदयी वात्सल्य, अजोड रसिकता असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू दिसून येतात.

प्रस्तुत ओव्यांतून मराठी भाषेविषयीचा अभिमान व्यक्त झाला आहे. अमृतापेक्षाही गोड असलेल्या मराठी भाषेविषयीची गौरवाची भावना आणि आपल्या शब्दसामर्थ्यावर असणारा सार्थ विश्वास व्यक्त करताना संत ज्ञानेश्वर म्हणतात, ''माझ्या मराठीतून अमृताशीही पैज जिंकणारी अशी रसाळ अक्षरे मी निर्माण करीन.'' रसाळ बोलीत निर्माण केलेल्या या ओव्या म्हणजे मोठी मेजवानी आहे. या ओव्यांमध्ये रसाळ बोलांना दिलेली सूर्याची उपमाही विशेष परिणामकारक आहे.

**माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंके ।**
**ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥१॥**
**जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे ।**
**वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥२॥**
**ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होति जिभा ।**
**बोलें इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां ॥३॥**
**सहजें शब्दु तरी विषो श्रवणाचा । परि रसना म्हणे हा रसु आमुचा ।**
**घ्राणासि भावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल ॥४॥**
**नवल बोलतीये रेखेची वाहणी । देखतां डोळ्यांही पुरों लागे धणी ।**
**ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे ॥ ५॥**
**जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनचि धांवे बाहिरें ।**
**बोलु भुजाही आविष्करें । आलिंगावया ॥६॥**

**ऐशीं इंद्रियें आपुलालिया भावीं । झोंबती परि तो सरिसेपणेंचि बुझावी ।**
**जैसा एकला जग चेववी । सहस्रकरु ॥७॥**
**तैसें शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण ।**
**पाहातयां भावज्ञां फावती गुण । चिंतामणीचे ॥८॥**
**हें असोतु या बोलांचीं ताटें भलीं । वरी कैवल्यरसें वोगरिलीं ।**
**ही प्रतिपत्ति मियां केली । निष्कामासी ॥९॥**
**आतां आत्मप्रभा नीच नवी । तेचि करूनि ठाणदिवी ।**
**जो इंद्रियांतें चोरूनि जेवी । तयासीचि फावे ॥१०॥**
**येथ श्रवणाचेनि पांगें- । वीण श्रोतयां होआवें लागे ।**
**हे मनाचेनि निजांगें । भोगिजे गा ॥११॥**



**(श्रीज्ञानेश्वरी, ६ वा अध्याय, ओवी क्र.१४ ते २४, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रत)**

## कृती

**(१) (अ) कृती करा.**

संत ज्ञानेश्वरांच्या भाषेची वैशिष्ट्ये →
→
→
→

**(आ) रसाळ बोलांचा विविध इंद्रियांवर होणारा परिणाम लक्षात घेऊन तक्ता पूर्ण करा.**

| इंद्रिये | परिणाम |
|---|---|
| (१) कान | ................................................ |
| (२) जीभ | ................................................ |
| (३) नाक | ................................................ |
| (४) डोळे | ................................................ |
| **इंद्रियेतर–** | ................................................ |
| (१) मन | ................................................ |
| (२) भुजा | ................................................ |

**(इ) 'रसाळ बोल' आणि 'सूर्य' यांच्या कार्याच्या माध्यमातून खालील तक्ता पूर्ण करा.**

| रसाळ बोलांचे कार्य | सूर्याचे कार्य |
|---|---|
| (१) ......................... | (१) ......................... |
| (२) ......................... | (२) ......................... |

**(२) अर्थ स्पष्ट करा.**

(अ) माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंके ।

(आ) वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ।।

**(३) चौकटी पूर्ण करा.**

(अ) रसाळ बोलाला या रचनेत दिलेली उपमा [ ]

(आ) रसाळ बोलांचा इंद्रियांवर होणारा परिणाम [ ]

(इ) सर्व जगाला जागवणारा [ ]

### (४) काव्यसौंदर्य.

**खालील ओव्यांतील भावसौंदर्य स्पष्ट करा.**

(अ) ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होति जिभा ।
बोलें इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां ।।३।।

(आ) तैसें शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण ।
पाहातयां भावज्ञां फावती गुण । चिंतामणीचे ।।८।।

### (५) अभिव्यक्ती.

'मराठी भाषेची थोरवी' तुमच्या शब्दांत लिहा.

### (६) 'ऐसीं अक्षरें रसिकें' या रचनेचा भावार्थ तुमच्या शब्दांत लिहा.

## ❊ भावार्थलेखन ❊

'भावार्थलेखन' म्हणजे कवितेचे केवळ अर्थलेखन करणे नसून कवितेतील मध्यवर्ती कल्पना स्पष्ट व थोडक्या शब्दांत मांडणे होय. केवळ सरळ अर्थ किंवा शब्दश: अर्थ म्हणजे भावार्थ नव्हे. मूळ कवितेत अपेक्षित असणारा शब्दांच्या पलीकडचा अर्थ, तात्पर्यार्थ सांगणे म्हणजे भावार्थ होय. मूळ कवितेत आलेला विचार, भाव, कल्पना भावार्थलेखनात दुर्लक्षित व्हायला नको. कवितेतील मूळ विचारांचे प्रधान व गौण भाव सोप्या भाषेत आणि संक्षिप्त स्वरूपात मांडणे म्हणजे 'भावार्थलेखन' होय. भावार्थलेखनासाठी दिलेली कविता आकलनपूर्वक वाचून मुख्य मुद्दे टिपून ठेवावेत. त्यातील व्यक्त झालेल्या विचारांना, कल्पनांना, भावनांना संक्षिप्त आणि सोप्या भाषेत लिहिण्याची प्रक्रिया भावार्थलेखनात मोडते.

**भावार्थलेखनासाठी मुद्‌दे–**

(१) काव्यरचनेच्या मध्यवर्ती कल्पनेचे सूत्र विचारात घेऊन विवेचन करणे.
(२) काव्यरचनेतील दिलेल्या भागाचा तात्पर्यार्थ सांगणे.
(३) मध्यवर्ती कल्पनेच्या स्पष्टीकरणार्थ वापरलेली प्रतिमा, प्रतीके इत्यादी उलगडून दाखवणे.
(४) मूळ विषयाला पुढे नेणारा आशय (उदाहरणे, कल्पना इत्यादी.) स्पष्ट करणे.
(५) विविध अर्थच्छटा, अर्थालंकार यांचे सौंदर्य स्पष्ट करणे.

# ९. वहिनींचा 'सुसाट' सल्ला

**शोभा बोंद्रे** (१९४६) :

कथाकार, कादंबरीकार, सूत्रसंचालक म्हणून प्रसिद्ध. मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांत वैशिष्ट्यपूर्ण लेखन. माहेर, जत्रा, स्त्री, किर्लोस्कर इत्यादी नामवंत मासिकांमधून विपुल लेखन. 'मुंबईचा अन्नदाता', 'नॉट ओन्ली पोटेल्स', 'एक मुठ्ठी आसमान', 'सहावं महाभूत आणि मी', 'एका फांदीवरची पाखरं' ही पुस्तके विशेष प्रसिद्ध. त्यांच्या लेखनातून वेगवेगळ्या क्षेत्रांतील माणसांच्या यशोगाथा वेधकपणे उलगडत जातात. माणसातल्या 'माणूसपणाची' उत्तुंग झेप, त्या मागची तपश्चर्या यांचे दर्शन त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांतून घडते. 'आभाळमाया', 'ऊनपाऊस', 'अर्धांगिनी', 'मानसी' इत्यादी दूरचित्रवाणीवरील प्रसिद्ध मालिकांसाठी त्यांनी संवादलेखन केले आहे. 'सातासमुद्रापार' या त्यांच्या कादंबरीला सर्वोत्कृष्ट कादंबरीचा महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला आहे.

वहिनींचा 'सुसाट' सल्ला ही विनोदी अंगाने लिहिलेली एक हलकीफुलकी कथा आहे. काही उलट-सुलट घटना, माणसांच्या वागण्यातील विरोधाभास आणि गमतीशीर व्यक्तिचित्रणे यांमुळे कथा रंगतदार झाली आहे. स्त्रीला समाजात मानाचे स्थान आणि समान हक्क मिळायला हवा; तसेच तिने स्वत:ला सिद्ध करून स्वत:चे महत्त्व समाजाला पटवून द्यायला हवे, हा संदेश या कथेतून अधोरेखित झाला आहे.




उषावहिनींनी एकशेबावन्नाव्यांदा आरशात पाहिलं. वळून-वळून सर्व कोन साधून पाहिलं. चार पावलं भराभरा मागे जाऊन, चार पावलं भराभरा पुढे येऊन स्वत:ला पाहिलं. आरशातल्या स्वत:च्या प्रतिबिंबावर त्या फारशा खूश नव्हत्या. ब्युटी पार्लरमधून आलेल्या वनिताने आपल्या कौशल्याची कमाल केली होती; पण तरीही वय फारसं लपत नव्हतं. टीव्हीची गाडी चारला येणार होती. उषावहिनींनी घड्याळाकडे पाहिलं. अजून तब्बल साडेसहा मिनिटं बाकी आहेत. 'काय मेलं हळूहळू चालतं हे घड्याळ!' त्या पुटपुटल्या.

आज त्यांच्या आयुष्यातला एक महत्वाचा टप्पा. 'वहिनींच्या सल्ल्या'चा शेवटचा कार्यक्रम. तोही थेट प्रक्षेपणाचा. मुंबईला दूरदर्शन सुरू झालं, त्यानंतर आजतागायत चालू असलेला एकमेव असा सर्वांत लोकप्रिय कार्यक्रम 'वहिनींचा सल्ला'. वयोमानानुसार निवृत्त व्हावेच लागणार, म्हणूनच केवळ कार्यक्रम संपत होता. उषावहिनींना अठ्ठावन्न वर्षं पूर्ण होत होती, तर कार्यक्रमाने विशी गाठली होती. आजचा हा शेवटचा आणि खास महत्वाचा कार्यक्रम दूरदर्शनच्या स्टुडिओमधून काढून शिवाजी मंदिरमध्ये ठेवला होता. समाजातल्या अनेक मान्यवर व्यक्ती आज निमंत्रित होत्या. उषावहिनींचा सत्कार होणार होता.

उषावहिनींनी एकशेचौपन्नाव्यांदा घड्याळाकडे पाहिलं. तीन वाजून चौपन्न मिनिटं, वीस सेकंद. एक नि:श्वास टाकून त्यांनी डोळे मिटले. गेल्या वीस वर्षांतल्या किती कडूगोड आठवणी! कडू चव घरातल्या आठवणींची. गोड आठवणी दूरदर्शनच्या संदर्भातल्या. कौतुक, नावलौकिक, यश सर्व मिळालं, ते घराबाहेर.

जगातल्या, म्हणजे महाराष्ट्रात जेवढं जग सामावलेलं आहे त्यातल्या हजारो व्यक्तींना वहिनींनी सल्ले दिले होते. 'जोडा, जुळवा, जमवून घ्या'. ह्या वीस वर्षांत त्यांनी हंडाभर फेविकॉल, दोन-चार मैल लांबीच्या चिकटपट्ट्या, शंभर एक किलो डिंक आणि पाच-सात बरण्या च्युइंग गम वापरलं असेल. 'आला प्रॉब्लेम समोर, की लाव त्याला चिकटपट्टी' हेच तर होतं, त्यांच्या कार्यक्रमाच्या यशस्वितेचं रहस्य.

उषावहिनींनी एक दीर्घ सुस्कारा सोडला.

...हंऽऽ! वीस वर्षांत उभारलेल्या ह्या रंगीबेरंगी पोकळ बुडबुड्यांचा आजचा अंतिम दिवस.

घड्याळातल्या कक्कूने बाहेर डोकं काढून चारदा 'कूकूक' केलं आणि त्याच क्षणाला दारावरची बेल वाजली. उषावहिनींनी पटकन उठून दार उघडलं. दारातल्या कडक युनिफॉर्मवाल्या शोफरने लवून अभिवादन केलं. ''मॅडम, चलता ना?''

उषावहिनींनी मान हलवून, ''हो हो, येते'' म्हटलं. तेवढ्यात तो खाली उतरलादेखील. दार उघडंच होतं. उषावहिनी पर्स घ्यायला आत गेल्या. शेवटची नजर टाकून त्यांनी पर्समध्ये सर्व गोष्टी आहेत ना ते पाहिलं. रुमाल नव्हता. त्या वैतागल्या. दांडीवर दोन-तीन रुमाल वाळत होते. त्यांनी हात उंचावला. मग उडी मारली. मग उंच टाचांच्या चपलांसकट त्या स्टुलावर चढल्या. हात उंचावून त्यांनी झटकन दांडीवरचा रुमाल खेचला. रुमाल हातात आला; पण पुढच्याच क्षणाला तोल जाऊन त्या स्टुलासकट भुईसपाट झाल्या. त्यांच्या डोळ्यांसमोर काजवे चमकले आणि पायांतून जीवघेणी कळ आली.

दारावरची बेल परत एकदा वाजली आणि 'उषा, तयार आहेस ना?' असा पुकारा करत त्यांची धाकटी बहीण निशा गडबडीने आत आली. उषावहिनींनी तोंडाने 'हो, हो' असं म्हटलं, असं त्यांना वाटलं; पण प्रत्यक्षात त्यांच्या तोंडून शब्दच उमटत नव्हता आणि प्रयत्न केला तरी शरीर पायांवर उभं राहायला तयार नव्हतं.

त्यांची अवस्था पाहून निशाने किंकाळीच फोडली, ''अगंबाई, उषा, अशी कशी पडलीस तू?''

''अगं दांडीवरचे कपडे, रुमाल काढत होते. तेव्हा पडले.''

निशाने तेवढ्यात त्यांना प्यायला ग्लासभर पाणी आणलं होतं. मग ममतेने त्यांना पाणी प्यायला लावलं.

''जाऊ दे ना! कशी पडलीस ते महत्त्वाचं नाही, आता पुढे काय करायचं, ते महत्त्वाचं!''

उषावहिनी डोळे पुसून म्हणाल्या, ''उठव मला. साडेचार वाजता शिवाजी मंदिरमध्ये पोहोचायला हवंय.''

निशा त्यांना हळूवारपणे उठवायला लागली; पण प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही उषावहिनींना हलताच येईना. निशाने पाहिलं, त्यांचा डावा पाय गुडघ्यापासून वाकडाच झाला होता. निशाने सर्व सूत्रं आपल्या हातात घेतली. प्रथम तिने एका नामवंत अस्थिव्यंगतज्ज्ञ डॉक्टरांना फोन केला. डॉक्टरांनी 'ताबडतोब पेशंटला हॉस्पिटलमध्ये घेऊन या' असं सांगितलं. निशाने गॅलरीतून ड्रायव्हरला वर बोलावून घेतलं. ड्रायव्हर वर आला.

''काय सामान न्यायचंय ताई?''

निशाने उषावहिनींकडे बोट दाखवलं.

ड्रायव्हर चुकचुकला, ''अर्रर्र! अशा कशा पडल्या तुम्ही वहिनी?''

निशा गंभीरपणे म्हणाली, ''दांडीवरचे कपडे काढत होती...''

ड्रायव्हर आणि निशा दोघांनी उचलून उषावहिनींना गाडीत नेऊन बसवलं. ड्रायव्हरने गाडी सुरू केली आणि विचारलं, ''कुठे जायचं?'' उषावहिनी पुटपुटत होत्या, ''शिवाजी मंदिर!''

निशाने त्यांना गप्प करून म्हटलं, ''बडवे हॉस्पिटल!''

डॉ. बडव्यांनी तपासणीनंतर निर्णय दिला, ''ताबडतोब ॲनस्थेशिया देऊन बोन सेट करायला हवं. त्यानंतर प्लास्टर घालून घरी पाठवीन.''

उषावहिनी क्षीणपणे म्हणाल्या, ''शिवाजी मंदिर! मला शिवाजी मंदिरमध्ये अर्ध्या तासात पोहोचायला हवं हो! सहा वाजता प्रोग्रॅम सुरू होणार.''

डॉक्टर म्हणाले, ''कार्यक्रमात तुम्ही नुसत्या किंकाळ्या फोडल्यात तर ते चालेल का तुमच्या प्रेक्षकांना? पाहुण्यांना?'' उषावहिनींच्या डोक्यात पायाचा नव्हे तर

कार्यक्रमाचाच विषय! डोळे पुसत त्या म्हणाल्या, ''निशा, अगं नाटकातलं एखादं पात्र आलं नाही तर बॅक स्टेजचासुद्धा कोणीतरी ती भूमिका आयत्या वेळी करून वेळ मारून नेतो; पण माझी वहिनींची भूमिका कोण करेल गं?'' वाक्य संपलं आणि त्यांचे डोळे लकाकले. निशाचा दंड धरून त्या म्हणाल्या, ''तू करणार. निशा, आज तू वहिनींची भूमिका करणार. तूच करू शकतेस.''

निशाने जोरजोरात मान हलवली, ''अगं, काहीतरीच काय बोलतेस? मी कधी माईकवरून तोंड उघडलं, तर ते फक्त भांडण्यासाठी उघडते. कामगार युनियनची कार्यकर्ती म्हणून मला मॅनेजमेंटला धमक्या देता येतात. कामगारांच्या मागण्या मांडताना आवाज चढवता येतो. तुझ्यासारखे गोडगोड सल्ले मला नाही देता येणार. हे मला नाही जमायचं.''

मग उषावहिनी उत्साहाने म्हणाल्या, ''जमेल, जमेल, जमवायचं. वागणं नंतर! पण दिसणं तर तुझं आणि माझं अगदी सारखंच आहे ना? जुळ्या नसलो तरी पाच वर्षांच्या अंतराने जुळं व्हाव्या तशाच आपण दिसतो. फरक किंचित, तोही वयाचाच! बाकी रंगरूप, बांधा, आवाज सर्व गोष्टी एकसारख्याच! माझं ऐक गं, माझी राणी ती! मी तुझी पंधरा मिनिटांत तयारी करून देते. तू फक्त हे कागद हातात ठेव. भाग घेणाऱ्यांचे प्रश्न ठरलेले आहेत, उत्तरं त्या कागदावर आहेत. फक्त घरी जा आणि एक छान साडी नेस. प्लीज, निशा, वहिनींची लाज आता तुझ्याच हातात आहे.''

शिवाजी मंदिरच्या मागच्या पार्किंग स्पेसमध्ये गाडी थांबली. उषावहिनींच्या रूपात निशा खाली उतरली मात्र, स्टेजकडे जाणाऱ्या जिन्यावरून लोकांची धावपळ उडाली. त्याच्यातच, 'वहिनी, सेट लाईट, माईक ओ. के. करता?', 'वहिनी, मेकअपला बसा', 'वहिनी, भाग घेणाऱ्या सर्व बायका आल्यात, बर्का!' असा चारी बाजूंनी कल्लोळ उसळला.

निशाने चेहऱ्यावर प्रौढपणा आणण्याचा प्रयत्न केला आणि उषावहिनींच्या भूमिकेत स्वत:ला सराईतपणे झोकून दिलं. सुदैवाने उषाबरोबर ती दोन-तीन वेळा टीव्ही सेंटरवर रेकॉर्डिंग पाहायला गेलेली होती. त्यामुळे उषाच्या सहकाऱ्यांशी तिची चांगली ओळख होती. अर्थात तेव्हा ती उषावहिनींची बहीण होती. आज मात्र उषावहिनींच्या थाटात तिने भराभर सूत्रं हलवायला सुरुवात केली.

निवेदिका वर्षाने माईक हातात घेतला,

''रसिकहो! 'वहिनींचा सल्ला' ह्या कार्यक्रमाचा आजचा शेवटचा प्रयोग. ह्या वेळी प्रथमच हा कार्यक्रम दूरदर्शन केंद्राच्या बाहेर शिवाजी मंदिर ह्या लोकप्रिय नाट्यगृहात साजरा होतो आहे. आणखीही एक प्रयोग आज आम्ही प्रथमच करत आहोत. ह्या कार्यक्रमाच्या शेवटची दहा मिनिटं प्रेक्षकांना वहिनींशी फोनवरून थेट संपर्क साधता येईल. तर 'मैत्रिणींना वहिनींचा सल्ला!' हा आजचा शेवटचा कार्यक्रम.''

निवेदिकेचं शेवटचं वाक्य संपलं आणि उषावहिनींनी रंगमंचावर प्रवेश केला. प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून त्यांचं स्वागत केलं; पण त्या वेळी महिला प्रेक्षकांत अपेक्षाभंगाची एक जोरकस लाट पसरली. 'वहिनींचा सल्ला' दरवेळी आवर्जून पाहिला जायचा, त्याचं एक प्रमुख कारण उषावहिनींनी नेसलेली साडी! वीस वर्षांमधल्या प्रत्येक कार्यक्रमानंतर उषावहिनींच्या साडीवर चर्चा व्हायची आणि अगदी तश्शीच साडी खरेदी करायला बायकांच्या शोधयात्रा निघायच्या. आजचा शेवटचा कार्यक्रम! म्हणजे उषावहिनी नक्कीच अशी साडी नेसतील, की बायकांनी जन्मभर लक्षात ठेवावी! तर आज उलटाच प्रकार!

उषावहिनी त्याच; पण तरीही त्या त्याच नसाव्यात असा काहीतरी व्यक्तित्वातला बदल! साडी तर अगदीच साधीशी, सर्वसाधारण काठापदराची, मळखाऊ रंगाची सुती! कोणीतरी कुजबुजली, ''शी, ही कसली साडी?''

उषावहिनींनी एक स्मितहास्य केलं आणि थोड्याशा प्रास्ताविकानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रथम एका तरतरीत आधुनिक स्त्रीने आपली समस्या सांगितली.

''मी एक नोकरी करणारी स्त्री. माझं नाव सुचरिता नवरे. माझी समस्या ही आहे, की घरातली कामं फक्त मला दिसतात, ह्यांना दिसत नाहीत. म्हणजे मी ती केली नाहीत तर ते त्यांना बरोब्बर दिसतं; पण 'स्वत: करा' असं मी सांगितलं तर ते एकदम आंधळे होतात.''

असली उषावहिनींनी दिलेला कागद नकली उषावहिनींनी डोळ्यांखालून घातला होता.

'...संसाररथाची दोन चाकं म्हणजे नवरा आणि बायको. एक चाक थोडंसं कुचकामी असेल तर दुसऱ्या चाकाने आपल्यावर जास्त भार घ्यावा...' उषाताईंचा सल्ला त्यांनी चुरगाळून टाकला.

माईक हातात घेऊन त्या खणखणीत आवाजात म्हणाल्या, ''नवरेबाई, सॉरी. तुम्ही नाव बदलू शकत नाही; पण संसाररथ नीट चालायला हवा असेल तर दोन्ही चाकांची सारखीच शक्ती वापरात असायला हवी. ह्यासाठी मी तुम्हांला हे एक नेत्रांजन देते. त्याचं नाव आहे 'असहकार' अंजन. हे नवऱ्याच्या नव्हे, तुमच्या स्वत:च्या डोळ्यांत घाला. म्हणजे तुमच्या डोळ्यांतला लखलखाट वाढेल. उदाहरणार्थ, तुमच्या आणि मुलांच्यापुरतंच जेवण करा आणि जेवूनही घ्या. तुमच्या कपड्यांना इस्त्री करा. नवऱ्याच्या चुरगळलेल्या कपड्यांचा ढीग त्याच्याच डोक्यावर रचून ठेवा. तुमच्या वस्तू आवरा. त्याचं पेन, पाकीट, रुमाल शोधून जागच्या जागी ठेवण्याची तसदी घेऊ नका.

लक्षात ठेवा, तुम्हीही दहा वर्षं नोकरी करता आहात. तुम्हांला आयतं ताट एकदा तरी मिळालं? तुमच्या साडीला इस्त्री करून नवऱ्याने तुमच्या हातात ठेवली? तुमच्या कानातल्याचं हरवलेलं मळसूत्र शोधण्यासाठी तो एकदा तरी वाकला? जर ह्या प्रश्नांची उत्तरं नकारार्थी असली तर हे अंजन वापरण्यावाचून तुम्हांला पर्याय नाही. फार नको, केवळ चार दिवस हे 'असहकार' अंजन वापरा आणि पाचव्या दिवशी नवऱ्याला निरोप द्या, की संध्याकाळी दूरदर्शनवरच्या वहिनी माझ्याबरोबर घरी येणार आहेत. आम्ही दोघी जरा कामाचं बोलणार आहोत, तरी चहा आणि खाणं आपण सांभाळावं. तरच माझ्या असहकार व्रताची आज सांगता होईल. नाहीतर हे व्रत मी वर्षभर पाळणार आहे. नव्या मनूच्या ह्या नव्या व्रताचा वसा घेणार असं नुसतं म्हणा, मग पाहा काय चमत्कार होतो ते!''

प्रेक्षकांत क्षणभर अवघडलेली शांतता. विजेच्या कडकडाटाने दिपल्यासारखीच सर्वांची अवस्था. मग मात्र प्रथम एका बाईने टाळी वाजवली. पाठोपाठ उरलेल्या स्त्रियांनी आणि शेवटी नाइलाजाने का होईना पुरुषांनीही टाळ्यांचा कडकडाट केला.

स्टेजवर आता एक मध्यमवयीन साधीसुधी स्त्री उठून बोलायला लागली, ''मी निलंजना बॅनर्जी. गृहिणी आहे. पण स्वत:ला कमी समजणारी, मान खाली घालणारी, घरातल्या पैशांवर आपलाही हक्क आहे असं न वाटणारी, सर्वसाधारण गृहिणी नाही. आमच्या घरात गृहिणीला मानाचं स्थान आहे. माझ्या कामाचं महत्त्व घरच्यांना पटवून देण्यात मी यशस्वी झाले आहे. गृहिणी म्हणून घरकामाची शंभर टक्के जबाबदारी मी उचलते, तरीही हल्लीच्या काळात बराचसा फावला वेळ मिळतो. ह्या वेळामध्ये मी एका सेवाभावी स्त्री संस्थेत काम करायला जाते. विनावेतन काम, केवळ माझ्या स्वत:च्या समाधानासाठी. माझे पती आणि मुलं माझ्या ह्या कामाचाही आदर करतात. तर वहिनी, माझ्या कुटुंबीयांच्या संदर्भात माझी कुठलीच समस्या नाही. माझी समस्या आहे ती पावसाविषयी!''

स्टेजवरच्या वहिनींचे डोळे बारीक झाले. त्या पटकन म्हणाल्या, ''निलंजनाबाई, आपला काहीतरी गैरसमज झालेला दिसतो. माझी ताडपत्रीची एजन्सी नाही. माझा आणि वॉटरप्रूफिंगचा काही संबंध नाही. मी माणसांना दु:खप्रूफ किंवा दु:खमुक्त होण्यासाठी मदत करते.''

निलंजनाबाई रागावण्याऐवजी हसायलाच लागल्या, ''अहो वहिनी, माझ्या पावसासाठी तुम्हीच रेनकोट पुरवू शकाल, अशी माझी खात्री आहे. कारण माझ्याकडे पाऊस पडतो तो पाहुण्यांचा!''

प्रेक्षकांत हसण्याची लाट पसरली.

निलंजनाबाई म्हणाल्या, ''मी एक आतिथ्यशील स्त्री आहे, ह्याचा मला आनंद आणि अभिमान वाटायचा; पण गेल्या काही वर्षांत मी हळूहळू संसारातला काही वेळ स्वत:साठी खर्च करायला लागले. मग मला पाहुण्यांचा त्रास व्हायला लागला. इतकंच नाही तर गेली काही वर्षं पाहुण्यांच्या पावसाचं प्रमाण विलक्षण वाढलं आहे. मी कारण शोधलं ते भयंकर अस्वस्थ करणारं आहे. मुंबईतल्या बहुतेक स्त्रिया ह्या नोकरी करतात, त्यामुळे पाहुण्यांची पंचाईत होते. त्यांची सरबराई करायला यजमानाच्या घरात हक्काची बाई नसते. मग पाहुणे असं घर शोधतात, की जिथे घरची बाई कामावर जात नाही. आमच्या नात्यातले किंवा मैत्रीतले पाहुणेही हाच विचार करत असणार. परिणाम काय? तर इतर घरांत नोकरीवाली बाई हे वॉटरप्रूफिंग केलेलं असल्यामुळे आमच्या घरी पाहुण्यांचा जोरदार मारा!

थोडी भीड, थोडा संकोच, थोडीशी परंपरा आणि पाहुण्यांच्या प्रेमाचा पोकळ फुगा ह्यामुळे मी हा पाऊस झेलत राहिले; पण हा पाऊस अडला जाईल, असा डबल ॲक्शन रेनकोट मला कोणी देईल का?''

वहिनींनी मान डोलावली.

''रेनकोटबिनकोटची गरज नाही. तुम्हांला एक साधा उपाय सांगते. उलटी छत्री!''

''उलटी छत्री?''

''हो, हो. उलटी छत्री! पाहुण्यांचा पाऊस पडायला लागला, की डोक्यावर उलटी छत्री धरायची. सगळे पाहुणे छत्रीत गोळा होतील. मग छत्री उलटीच बंद करायची आणि जुहूला जाऊन समुद्रार्पण करायची. एकदा का तुमच्याकडे उलटी छत्री आहे, अशी वार्ता पसरली, की पाहुणे तुमच्याकडे यायचे बंद होतील. बरोबर?''

''बरोबर! पण म्हणजे मी नक्की काय करायचं?''

''थोडी भीड, थोडा संकोच, थोडी परंपरा गुंडाळून ठेवायची. पाहुण्यांना येणारा प्रेमाचा पोकळ पुळका ओळखायला शिकायचं. तुमची सोय-गैरसोय न पाहता पाहुणे आले आहेत. तुम्ही त्यांची सोय-गैरसोय बघायचं कारण नाही. तुमचं वेळापत्रक तुम्हीच सांभाळायचं. तुमच्या कामाचं महत्त्व घरातल्यांना पटलं आहे ना? तसंच पाहुण्यांनाही पटवून द्यायचं.

लक्षात ठेवा, माणूस स्वार्थीच असतो. माणूस स्वत:साठीच जगतो. मग स्त्रीनेच दुसऱ्यासाठी का जगावं?''

सभागृहात टाचणी पडेल अशी शांतता पसरली. हे आज काहीतरी अघटितच घडत होतं. वहिनींना दूरदर्शनवरती अनेकांनी अनेक वेळा पाहिलं होतं. शांत, सौम्य व्यक्तिमत्त्व आणि समतोल सल्ले. नेहमी जोडा, जुळवून घ्या आणि दुसऱ्याच्या दृष्टिकोनातून बघायला शिका, अशा तऱ्हेच्या सूचना.

आज मात्र वहिनींचा कायापालट झालेला 'स्वत:च्या मनाचा कौल घ्या, स्वत:ला स्वत:च महत्त्व दिलं पाहिजे, आत्मसन्मान जपा' असे भारतीय रूढी-परंपरेला आव्हान देणारे हे सडेतोड विचार! धक्कादायक वाटले तरीही हे विचार मनाला भिडणारे आणि पटणारेही होते.

एका प्रदीर्घ पॉझनंतर कोणीतरी एकीने टाळ्या वाजवल्या आणि बाकीच्यांनीही टाळ्या वाजवून आपलं सहमत दर्शवलं.

प्रश्नोत्तरं चालूच होती. एखादं थरारनाट्य पाहावं, अनुभवावं तसे प्रेक्षक खुर्चीला खिळले होते. श्वास रोधून आणि वृत्ती एकाग्र करून ते कार्यक्रमाचा आस्वाद घेत होते.

सासू आणि सुनेची एकत्र नांदण्याची समस्या, वरिष्ठ पदावर काम करणाऱ्या स्त्रीला पुरुष सहकाऱ्यांचा किंवा हाताखाली काम करणाऱ्या पुरुषांचा आलेला धक्कादायक अनुभव, महाविद्यालयीन तरुणीची रस्त्यात किंवा महाविद्यालयाच्या आवारातही पुरुषांनी केलेली छेडछाड, नवऱ्याच्या दारूच्या व्यसनामुळे संसाराची झालेली वाताहत अशा अनेक समस्या होत्या. वहिनींनी ह्या समस्या सोडवण्यासाठी सांगितलेले मार्ग, 'कीड मुळापासून उपटून काढली पाहिजे, तरच झाड जगेल' हे तत्त्वज्ञान पाळणारे होते.

रंगमंचावर मध्यभागी ठेवलेला टेलिफोन घणघणू लागला. पहिल्या दूरस्थ प्रेक्षकाने संपर्क साधलेला होता.

''अभिनंदन!''

वहिनींनी हसून मान डोलावली. टेलिफोन खाली ठेवला, तोच परत वाजला. वाजतच राहिला.

''अभिनंदन!''

''सुपर्ब!''

''ग्रेट!''

''मान लिया!''

टेलिफोनवरचं संभाषण प्रेक्षकांनाही ऐकण्याची सोय केलेली होती. सर्व टेलिफोन अभिनंदनाचेच होते.

वहिनी म्हणाल्या, ''टेलिफोनचा वापर अभिनंदनासाठी नव्हता, तर दूरवरच्या प्रेक्षकांना आयत्या वेळी सहभाग घेता यावा म्हणून होता.''

परत टेलिफोन वाजला. वहिनींनी सस्मित मुद्रेने तो उचलला.

''बाई, आपण बरं बोललात आणि नको इतकं खरंही बोललात. पण आपण कोण आहात? मी पोलीस इन्स्पेक्टर मांडके बोलतो आहे. आपल्या ड्रायव्हरने नुकतीच इथे येऊन तक्रार नोंदवली आहे, की शिवाजी मंदिरमध्ये बोलत आहेत त्या उषावहिनी नाहीतच! कृपया, आपण आहात तिथेच थांबावं. मी चौकशी करायला येतो आहे.''

आता मात्र कडेलोट झाला. एक साधंसुधं कौटुंबिक नाटक बघायला यावं आणि एका रहस्यमय नाटकात स्वत:च भाग घेतल्यासारखं गुंतत जावं, तशी प्रत्येकाची अवस्था! 'आता काय होणार?' ह्या प्रश्नाने उत्सुकतेचं शिखर गाठलं.

निशाने माईक हातात घेतला.

''उपस्थित आणि इथे अनुपस्थित; पण आपापल्या घरी बसून टीव्हीच्या पडद्यावर कार्यक्रम पाहणाऱ्या सर्व मित्रमैत्रिणींनो! मी निशा वागळे. आपल्या सर्वांच्या आवडत्या उषावहिनींची मी धाकटी बहीण! कार्यक्रमाला तयार होऊन बसलेल्या उषावहिनींना अचानक एक अपघात झाला. दांडीवरचा रुमाल काढताना त्या खाली पडल्या आणि पाय फ्रॅक्चर झाला. त्यांची जागा मी भरून काढावी हा त्यांचाच आग्रह. आजच्या समारंभाचं महत्त्व ध्यानात घेऊन मी त्यांची भूमिका वठवण्याचा प्रयत्न केला.

पण प्रामाणिकपणे सांगायचं तर हे नाटक मी चोख केलं नाही. वहिनींनी ठरवलेली उत्तरं माझ्या बुद्धीला पटणारी नव्हती. तेव्हा माझ्या सर्व मैत्रिणींसमोर मी कबूल करते, आज प्रश्न तुमचे असले तरी उत्तरं-सल्ले हे माझे होते, निशा वागळेचे. ह्यामुळे कोणाला काही लाभ झाला तर आनंदच आहे. नाहीतर एक नाटक इतकीच किंमत आजच्या ह्या कार्यक्रमाला द्या. माझ्यामुळे कोणाला मनस्ताप झाला असेल तर माफ करा. आपल्या सर्वांशी संवाद साधण्याची ही संधी मला दिल्याबद्दल धन्यवाद!''

प्रेक्षक अजूनही स्तब्ध, पुतळ्यांसारखे आसनाला खिळलेले. तेवढ्यात फोन वाजला. निशाने फोन उचलला.

''हॅलो, मी उषावहिनी बोलते आहे. निशा, मन:पूर्वक अभिनंदन! मी लोकांना वर्षानुवर्षे औषध म्हणून साखरेच्या गोळ्या देत आले. तू मात्र आज लोकांना कडू क्विनाईनचा डोस देण्याचं धाडस केलंस. हे कोणीतरी करायलाच हवं होतं. आज तुझं बोलणं ऐकताना वाटलं, उषावहिनींनी तुझा सल्ला घ्यायला हवा होता. फार पूर्वीच! स्वत:साठी आणि लोकांना काय सल्ले द्यावेत ह्यासाठीही! असो! ह्यापुढे का होईना मी तुझ्याकडे हक्काने सल्ला मागू शकते, ही किती सुखाची गोष्ट! नाही का हो, निशावहिनी?''

टाळ्या, आश्चर्याचे उद्‌गार, आरडाओरडा ह्या गोंधळातच मखमली पडदा खाली आला. 'वहिनींच्या सल्ल्या'चं नाटक संपलं होतं. कायमचं!

(एका फांदीवरची पाखरं)

## कृती

### (१) (अ) कृती करा.

निशाताईंच्या सल्ल्याचा आस्वाद घेणाऱ्या प्रेक्षकांची अवस्था →
→
→
→

### (आ) कारणे लिहा.

(१) उषाताईंचा हा कार्यक्रम शेवटचा होता, कारण...
(२) निशाने चेहऱ्यावर प्रौढपणा आणण्याचा प्रयत्न केला, कारण...
(३) महिला प्रेक्षकांत अपेक्षाभंगाची एक जोरकस लाट आली, कारण...
(४) मुंबईत आलेल्या पाहुण्यांची पंचाईत होते, कारण...

### (इ) वैशिष्ट्ये लिहा.

(१) दूरदर्शनवरील 'वहिनींचा सल्ला' हा कार्यक्रम.
(२) 'शिवाजी मंदिर' येथील 'वहिनींचा सल्ला' हा कार्यक्रम.

(ई) फरक स्पष्ट करून तक्ता पूर्ण करा.

| उषावहिनींचा सल्ला | निशावहिनींचा सल्ला |
|---|---|
| | |
| | |
| | |

(२) पाठातील खालील वाक्यांचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

(१) रंगीबेरंगी पोकळ बुडबुड्यांचा आजचा अंतिम दिवस.

(२) मी माणसांना दु:खप्रूफ किंवा दु:खमुक्त होण्यासाठी मदत करते.

(३) इतर घरांत नोकरीवाली बाई हे वॉटरप्रूफींग केलेलं असल्यामुळे आमच्या घरी पाहुण्यांचा जोरदार मारा!

(४) 'कीड मुळापासून उपटून काढली पाहिजे, तरच झाड जगेल'.

(३) व्याकरण.

(अ) विशेष्य-विशेषणांच्या जोड्या पाठाधारे जुळवा.

कडूगोड, थेट, अभूतपूर्व, जीवघेणी, अंजन, कळ, फावला, प्रक्षेपण, असहकार, आठवणी, पोकळ, कार्यक्रम, वेळ, पुळका

| विशेष्य | विशेषणे |
|---|---|
| | |

(आ) केवल वाक्ये, मिश्र वाक्ये आणि संयुक्त वाक्ये यांची पाठातील प्रत्येकी दोन-दोन उदाहरणे शोधून लिहा.

(इ) खालील विरामचिन्हांची नावे कंसातील यादीतून शोधून लिहा.

(अपूर्णविराम, संयोगचिन्ह, अर्धविराम, अपसरणचिन्ह, लोपचिन्ह)

| विरामचिन्हे | नावे |
|---|---|
| ; | |
| ......... | |
| — | |
| : | |
| - | |

(ई) खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यांत उपयोग करा.

(अ) काजवे चमकणे-

(आ) डोळे लकाकणे-

(इ) कायापालट होणे-

(ई) कडेलोट होणे-

(उ) खालील शब्दांचे वर्गीकरण करा.

वळूनवळून, रेनकोटबिनकोट, पुटपुट, अभिवाचन, सामाजिक

| उपसर्गघटित शब्द | प्रत्ययघटित शब्द | पूर्णाभ्यस्त शब्द | अंशाभ्यस्त शब्द | अनुकरणवाचक शब्द |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(४) स्वमत.

(अ) वहिनींचा सल्ला 'सुसाट' वाटण्याची तुम्हांला समजलेली कारणे लिहा.

(आ) 'पाहुण्यांचा पाऊस' यासंबंधी कथेत आलेला विनोद तुम्हांला आवडला का, ते सकारण स्पष्ट करा.

(इ) सल्ला मागण्यासाठी मांडलेल्या समस्यांविषयी तुमचे मत लिहा.

(ई) खऱ्या उषावहिनींनी आपल्या 'बहिणीच्या कामाला दिलेल्या पसंतीविषयी' तुमच्या प्रतिक्रिया लिहा.

(५) अभिव्यक्ती.

(अ) वहिनींचा 'सुसाट' सल्ला ही कथा तुम्हांला का आवडते ते सकारण लिहा.

(आ) 'स्त्रीने स्वत:च्या आत्मसन्मानाला जपले पाहिजे', याविषयीचे तुमचे विचार लिहा.

प्रकल्प.

प्रसारमाध्यमांतून सतत दाखवल्या जाणाऱ्या जाहिराती व मालिका यांविषयी समवयस्कांशी चर्चा करा व त्यासंबंधी अहवाल तयार करा.

* शब्दसंपत्ती

**खालील वाक्यांचा अभ्यास करा. 'कर' या शब्दाची योग्य अर्थच्छटा कंसातील पर्यायातून निवडा. ती वाक्यांसमोर कंसांत लिहा.**

[टॅक्स, कृत्य, हात, करणे (क्रियापद)]

(अ) दाम करी काम वेड्या. ( )

(आ) कर भरणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. ( )

(इ) कर हा करी धरिला शुभांगी ( )

(ई) कर नाही त्याला डर कशाला? ( )

# १०. शब्द

**यशवंत मनोहर (१९४३) :**

कवी, समीक्षक. सकस जीवनानुभव आणि प्रत्ययकारी प्रतिमांनी समृद्‌ध अशी ओजस्वी शब्दकळा यांमुळे यशवंत मनोहर यांची कविता शोषणाचा तीव्र निषेध करते व उपरोधाचा आश्रय घेत प्रस्थापित समाजाच्या मूल्यव्यवस्थेवर घणाघाती प्रहार करते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून घेतलेल्या प्रेरणेतून आक्रमक शैलीने समाजवास्तवावर प्रखर भाष्य करणारे कवी, विचारवंत व समीक्षक म्हणून यशवंत मनोहर यांचे स्थान महत्त्वाचे आहे. 'उत्थानगुंफा', 'काव्यभीमायन', 'मूर्तिभंजन', 'जीवनायन', 'प्रतीक्षायन', 'अग्नीचा आदिबंध', 'स्वप्नसंहिता', 'युगमुद्रा', 'बाबासाहेब' इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्‌ध. 'दलित साहित्य : सिद्‌धांत आणि स्वरूप', 'स्वाद आणि चिकित्सा', 'समाज आणि साहित्य समीक्षा', 'नवे साहित्यशास्त्र', 'परिवर्तनवादी जीवनमूल्ये आणि वाङ्‌मयीन मूल्ये' इत्यादी समीक्षात्मक पुस्तके. 'रमाई', 'मी यशोधरा' इत्यादी कादंबऱ्या प्रकाशित. 'स्वप्नसंहिता' या कवितासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषदेचा 'कवी कुसुमाग्रज पुरस्कार' इत्यादी अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

कवीला भोवतालच्या जगात विषमतांचे जाळे आढळते. एकीकडे पैशाची श्रीमंती आणि दुसरीकडे मनाचा कंगालपणा, तोंडात मूल्ये आणि वागण्यात संधिसाधुपणा, अंधारनिष्ठ आयुष्य आणि उजेडाचे मुखवटे अशा अंतर्विरोधांनी कवीच्या जीवाचा भडका उडतो. या प्रश्नांच्या गर्दीत जगण्याचा आधार मिळण्यासाठी कवी 'शब्दांचा' आधार घेतात. त्यांची कविता सर्व दिशांनी झेपावणाऱ्या नकारांशी भांडणारी ठरते. कवी म्हणून जगलेले, भोगलेले त्यांच्या कवितेतून प्रकटते.

आकान्ताने हाका घातल्या माझ्या
तेव्हा तेव्हा शब्दच धावून आले,
माझ्या निरुत्तर निखाऱ्यांना
माउलीने घ्यावे तसे पोटाशी घेतले.

डोळ्यांपुढे अंधारून आले तेव्हा
शब्दांच्याच उजेडाने हात दिला,
एखादी आठवण आग घेऊन धावली
तेव्हाही शब्दांनीच हल्ला झेलला...

चिडून चिडून सांडत होते ऊन
तेव्हाही शब्दांनीच सावली धरली,
दिवसाही दाटायचा अंधार तेव्हा
शब्दांनीच हातात बिजली दिली.

जगू न देणारे काही विसरायचे होते
तेव्हाही शब्दांनीच तोल सावरला,
मरणाच्या धारेत सापडलो तेव्हा
शब्दांनीच माझ्याकडे किनारा सरकवला.



काहीही नव्हते हाती, वाटे स्वत:चीच भीती
तेव्हाही शब्दांनीच पाठीवर हात ठेवला,
कधी वाऱ्याने टाळले, कधी निवाऱ्यांनी टाळले
तेव्हाही शब्दांनीच उरात आश्रय दिला.

मी भिकारी : मी शब्दांना काय देऊ ?
मी कर्जदार : शब्दांचा कसा उतराई होऊ ?
मी शब्दांत शिरलो आणि स्वत:ला वाचविले :
जहर मी प्यालो आणि शब्दांनी ते पचविले.

(स्वप्नसंहिता)

## कृती

**(१) कृती करा.**

**कवीच्या जीवनातील 'शब्दांची' भूमिका**

**(२) योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

**(अ) बिकट संकटांना कवीने म्हटले–**

(१) पोटाशी घेणारे शब्द.
(२) निरुत्तर निखारे.
(३) धावून आलेले शब्द.

**(आ) शब्दांचा उजेड म्हणजे–**

(१) शब्दांचे मार्गदर्शन.
(२) शब्दांची मदत.
(३) शब्दांचा हल्ला.

**(इ) चिडून सांडणारे ऊन म्हणजे–**

(१) कठीण प्रसंग.
(२) झाडाची सावली.
(३) तापदायक प्रसंग.

**(३) (अ) खालील काव्यपंक्तींतून व्यक्त होणारा अर्थ लिहा.**

(१) 'दिवसाही दाटायचा अंधार तेव्हा, शब्दांनीच हातात बिजली दिली.'
(२) 'मरणाच्या धारेत सापडलो तेव्हा, शब्दांनीच माझ्याकडे किनारा सरकवला.'

**(आ) सूचनेप्रमाणे सोडवा.**

(अ) 'आश्रय' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

(आ) 'शब्द' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

(इ) 'शब्दांनी मला खूप दिले; पण मी शब्दांना काहीच देऊ शकत नाही किंबहुना शब्दांच्या उपकाराची फेड करू शकत नाही', या अर्थाच्या ओळी शोधून लिहा.

**(४) काव्यसौंदर्य.**

(अ) 'एखादी आठवण आग घेऊन धावली, तेव्हाही शब्दांनीच हल्ला झेलला....' या काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्वभाषेत लिहा.

(आ) 'मी शब्दांत शिरलो आणि स्वत:ला वाचवले : जहर मी प्यालो आणि शब्दांनी ते पचवले.' या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

**(५) अभिव्यक्ती.**

(अ) आयुष्यात आलेले नकार कवीने कोणत्या शब्दांत व्यक्त केले आहेत, ते लिहा.

(आ) 'शब्द म्हणजेच कवीचे सामर्थ्य', हे विधान स्पष्ट करा.

(इ) 'मानवी जीवनातील शब्दांचे अनन्यसाधारण महत्त्व' तुमच्या शब्दांत लिहा.


**(६) 'शब्द' या कवितेचे रसग्रहण करा.**

# ११. वाङ्मयीन लेण्याचा शिल्पकार

**सुमती देवस्थळे** (१९२७ ते १९८२) :

सुप्रसिद्ध लेखिका. चरित्रकार. 'टॉलस्टॉय एक माणूस', 'मॅक्झिम गॉर्की', 'डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर', 'एक विचारवंत' (कार्ल मार्क्ससंबंधी), 'छाया आणि ज्योती' ही चरित्रे त्यांनी लिहिली. चरित्रलेखनाला आवश्यक असणारे परिश्रम, विषयासंबंधीचा जिव्हाळा, समरसता आणि प्रवाही शैली या वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या लेखनाला आगळेपण प्राप्त झाले आहे. टॉलस्टॉय आणि श्वाइट्झर यांच्यासंबंधी मराठीत एवढे मार्मिक लेखन पहिल्यांदा प्रसिद्ध करण्याचे श्रेयही त्यांना मिळाले आहे.

सत्य, शांती, त्याग, सेवा या मूल्यांचे उपासक असणारे थोर तत्त्वचिंतक, शिक्षणशास्त्रज्ञ आणि प्रतिभासंपन्न साहित्यिक लिओ निकोल्विच टॉलस्टॉय हे विश्वशांतीचे मार्गदर्शक होते. सत्याग्रह व असहकार या शांततामय प्रतिकाराचे तत्त्वज्ञान त्यांनी मांडले. 'टॉलस्टॉय एक माणूस' या पुस्तकातून निवडलेल्या या चरित्रपर पाठात टॉलस्टॉय यांच्या लेखक म्हणून झालेल्या जडणघडणीचे आणि 'वॉर ॲण्ड पिस' या महान कादंबरीच्या निर्मितीप्रक्रियेचे प्रत्ययकारी चित्रण आले आहे. या कादंबरी लेखनासाठी टॉलस्टॉय यांनी परिपूर्ण अभ्यास केला. कादंबरी दर्जेदार होण्यासाठी पुन: पुन्हा लेखन केले. त्यामुळे 'वॉर ॲण्ड पिस' हे जागतिक साहित्यातील वाङ्मयीन लेणे ठरले. मानवी जीवनातील जटील प्रश्न युद्धाने सुटत नाहीत तर ते शांती आणि प्रेमाच्या मार्गाने सुटतात हे टॉलस्टॉय यांनी या कादंबरीत सांगितले आहे.



जेमतेम दोन वर्षांचा मातृविहीन लिओ यास्नाया पोल्यानामधील प्रशस्त घरात वाढत होता. आत्याने आईची जागा इतकी मन:पूर्वक भरून काढली होती, की आपल्या जीवनात काही न्यून असल्याचे लिओला कधी जाणवलेच नाही. त्याची आई जरी त्याला मुळीच आठवत नसली तरी अगदी तान्हेपणीच्या दोन आठवणी त्याने आवर्जून लिहून ठेवल्या आहेत.

अगदी पहिली आठवण अशी, की आपणास दुपट्यात घट्ट गुंडाळून ठेवले आहे. आपल्याला हातपाय हलवण्याचा मोकळेपणा हवा आहे. तो मिळत नाही. म्हणून आपण खूप जोरजोराने रडत आहोत. भोवती मोठी माणसे उभी आहेत; पण त्यांना बाळाची व्यथा समजू शकत नाही. आपण मात्र रडतोच आहोत! इतक्या तान्हेपणाची आठवण आजवर कोणीही निवेदन केलेली नाही.

दुसरी आठवण अधिक बोलकी असून टॉलस्टॉयच्या तरल संवेदनांची सूचक आहे. ''मी अंघोळीसाठी एका टबमध्ये बसलो आहे. एका नवीन सुगंधी साबणाने दाई माझे अंग चोळत आहे. तो सुगंध सर्व पाण्यात मिसळलेला आहे. सुगंधाच्या नावीन्याची जाणीव मला उत्तेजित करते. प्रथमच मला माझ्या चिमुकल्या देहाचे अस्तित्व जाणवते अन् आवडतेही. मऊ काळाभोर लाकडी टब, बाह्या मागे दुमडलेला दाईचा हात, पाण्याच्या कढत वाफा, चिमुकल्या हातांनी पाण्याशी खेळताना होणारा आवाज, टबाच्या ओल्या कडांवरून माझे चिमुकले हात फिरवत असताना झालेली पृष्ठभागाच्या गुळगुळीतपणाची जाणीव, हे सारे सारे आठवते मला!''

किती अर्थपूर्ण आहे ही आठवण! लिओच्या ज्ञानेंद्रियांची तीव्रता नि:संशय लक्षणीय आहे. लिओला दाईचे मोकळे हात दिसतात, सुगंधी द्रव्याचा वास येतो, पाण्याची उष्णता जाणवते, पाण्याशी खेळताना पाण्याचा आवाज ऐकू येतो, टबच्या आतील मऊ स्पर्श कळतो, आणि या सर्व संवेदनांची संकलित जाणीव आनंददायी वाटते. लिओच्या प्रत्येक ज्ञानेंद्रियाची संवेदना लहानपणापासूनच किती तल्लख होती ते या लहानशा आठवणीवरून स्पष्ट होते.

निरनिराळ्या संकल्पनांशी खेळत बसण्याची व त्यांचे दृक्प्रत्यय मनाने अनुभवण्याची लिओची शक्ती अमर्याद होती. त्याचे कोवळे वय लक्षात घेता, ती शक्ती विलक्षण होती असेच म्हटले पाहिजे.

लिओची बौद्धिक वाढ अगदी झपाट्याने होत होती. एकाच गोष्टीचा निरनिराळ्या दृष्टिकोनांतून विचार करण्याची क्षमता उत्पन्न होत होती.

इतक्या बालपणी अमूर्तासंबंधी विचार करण्याची त्याची प्रवृत्ती केवळ चकित करणारी होती. हीच प्रवृत्ती मोठेपणी भूमिती श्रेणीने वाढत गेली. प्रत्येक घटनेच्या हेतूचा विचार करणे, सतत आत्मशोधन करणे, स्वत:च्या विचारांचे अंत:स्रोत ओळखण्याचा प्रयत्न करणे यांचा त्याला जणू छंदच जडला होता. त्याच्या मनाची पाटी कोरी किंवा निर्विकार अशी कधीही राहू शकली नाही. विचारांची गुंतागुंत नसली तर लिओला अगदी चुकल्याचुकल्यासारखे वाटे. एकदा तो स्वत:शीच म्हणाला, 'मी आता कसला विचार करतो आहे बरं? हो! मी कसला विचार करतोय या प्रश्नाचा मी विचार करतोय.' त्याच्या मनात सतत विचारांची पिंजण चालू असे. साध्या घटनांच्यासुद्‌धा असंख्य प्रतिमा त्याच्या मन:पटलावर एकदम दृश्यमान होत. अगदी शोभादर्शकाप्रमाणे! लिओ स्वत:च्या मनाचे पृथक्करण करी-चिंतन करी. आपल्या मनाच्या प्रगतीचा (आणि परागतीचा) संपूर्ण आलेख त्याने टिपून ठेवायला सुरुवात केली. दररोज दैनंदिनी लिहिण्याचा परिपाठ ठेवला. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे मूलस्रोत समजून घेण्यास या दैनंदिन्या खूपच उपयुक्त आहेत. दैनंदिनी लिहून ठेवण्याची कल्पना आत्मनिरीक्षणाच्या व आत्मपरीक्षणाच्या आवश्यकतेतून स्फुरली. या वयापासूनच आपण इतरांसारखे सामान्य जीवन जगण्यासाठी जन्माला आलेलो नाही ही त्याची खात्री होती. त्याचा आपल्या सुप्तशक्तींवर विश्वास होता. त्या शक्तींचा वेध घेण्यासाठी दैनंदिनी लिहिणे त्याला अत्यंत अगत्याचे वाटत होते.

टॉलस्टॉयला वाचनाची आवड जबरदस्त होती. त्याचा वाचनाचा वेग उत्तम होता. टॉलस्टॉयने भरपूर वाचन व मनन केले. पुष्किन, टर्जिनिव्ह, डिकन्स, व्हॉल्टेअर, रूसो इत्यादी ग्रंथकारांचा मन:पूर्वक अभ्यास केला. त्यामुळे अभिजात साहित्याची आवड संस्कारित झाली.

लेखनवाचनाच्या बाबतीतही खूप चिकित्सा सुरू होती. सपाटून वाचन सुरू होते. ललित साहित्य, तात्त्विक साहित्य, राजकारण, इतिहास... बडेबडे ग्रंथराज सेवेस हजर होते. यास्नायाहून सारखी पुस्तके मागवत होता तो. सारे काही त्याला अगदी आदर्शातले आदर्श असे हवे होते. प्रत्येक वाचलेल्या पुस्तकावर निसटता तरी अभिप्राय नोंदला जात होता. अधलेमधले, सामान्य, सुवर्णमध्य गाठणारे असे काही एक त्याला आवडत नव्हते. तडजोड नको होती. शुद्‌ध आदर्शाचा अट्टहास होता.

युरोपच्या प्रवासात असताना निसर्गसुंदर परिसरात तो अगदी वेडावून गेला होता. 'बाहेरचे सौंदर्य माझ्या डोळ्यांतून अंतरात्म्यात ओतले जाते... माझ्या अंतरंगात आनंद भरलेला आहे. मला जगायचे आहे-मला चिरंजीव व्हायचे आहे!' हा निरागस आनंद मनात गोड हुरहुर निर्माण करत होता.

निसर्गसौंदर्यातून निसर्गसान्निध्याची ओढ निर्माण झाली. मग या धरतीच्या लेकराने मातीशी मसलत करायला सुरुवात केली. कापणी, लावणी, खुरपणी, निंदणी इत्यादी सर्व कामांत तो रस घेऊ लागला. गवत झपाझप काढण्याचे काम त्याच्या खास आवडीचे होते. शेतीचे काम म्हणजे नवनिर्मिती! हा नवनिर्मितीचा आनंद तो अगदी दमछाक होईपर्यंत अनुभवत असे. कामाशी इतका समरस होऊन जाई, की स्वत:चा विसर पडे. हात अगदी यंत्रासारखे झपाट्याने चालू राहत. तो जणू नुसता साक्षित्वाने खुरप्यावर वाकलेला असे. निढळाच्या घामावर वाऱ्याच्या झुळकी आल्या म्हणजे तो गारवा विलक्षण सुखद वाटे, त्याला कशाची सर येणार? सपाटून काम केले, की अगदी कृतार्थ भावनेने, सुखासमाधानाने तो शेतकऱ्यांबरोबर न्याहारी करायला बसे. त्यांच्याशी भरपूर गप्पा, अगदी घरगुती गप्पा करी.

अशा प्रकारे कालक्रमणा सुरू असताना दिवसेंदिवस सक्तीच्या एकाकीपणापायी टॉलस्टॉयच्या मनात एक प्रकारची अवघड अस्वस्थता निर्माण झाली होती. अंगभर फुलांनी डवरलेली झाडे पाहिली, निसर्गाच्या अजोड कलाकृती पाहिल्या, की त्याला आपले एकाकीपण फारच बोचत राही. सर्व भावभावनांशी खऱ्या अर्थाने समरस होणारी सहचरी मिळते की नाही या शंकेने त्याच्या मनाचा नुसता छळ मांडला होता. या शंकेला एक दिवस पूर्णविराम मिळाला.

गृहस्थाश्रमात प्रवेश करताच विलक्षण सुखाच्या वर्षावात टॉलस्टॉय चिंब भिजून गेला. त्याची पत्नी सोन्या म्हणजे केवळ आनंदाची मूस!

लग्नानंतरची १५-१६ वर्षे टॉलस्टॉयचा जीवनप्रवाह फारशी वाकणे-वळणे न घेता अनिरुद्‌धपणे वाहत राहिला. गृहस्थाश्रमात त्याने चांगले रमून जावे अशी सर्व दृष्टींनी अनुकूल व समृद्‌ध परिस्थिती होती. याच काळात 'युद्‌ध आणि शांती' व 'ॲना कॅरेनिना' या सुप्रसिद्‌ध कादंबऱ्या लिहिल्या गेल्या.

१८६३ च्या अखेरीस 'युद्ध आणि शांती' या कादंबरीच्या लेखनास सुरुवात झाली. प्रत्यक्ष लेखनास पुरी सहा वर्षे लागली. असंख्य व्यक्तिरेखा, अनेक लहान मोठ्या घटनांचा भव्य विस्तार, नेपोलियनची रशियावर स्वारी, युद्धातील चित्तथरारक प्रसंग, तत्कालीन खानदानी रशियन लोकांचे कौटुंबिक जीवन, सामान्य लोकांचे वैयक्तिक जीवन, लष्करी कारवाया, नृत्ये, मेजवान्या, शिकारी इत्यादी असंख्य घटनांच्या तपशिलाने हे भव्य वाङ्मयीन शिल्प आकार घेऊ लागले. साहित्यक्षेत्रात ही कादंबरी म्हणजे 'न भूतो न भविष्यति!' अशा स्वरूपाचे कैलास लेणे आहे. ''मानवी जीवनाचे संपूर्ण चित्रण, तत्कालीन रशियाचे प्रत्ययकारी वर्णन, तत्कालीन ऐतिहासिक महत्त्वाच्या घटना व मानवी संघर्ष यांचा संपूर्ण आलेख, आनंद-उदात्तता-यातना-अवमान- महत्त्वाकांक्षा इत्यादी नानाविध मानवी भावतरंगांचे जिवंत प्रत्ययकारी चित्रण म्हणजे 'युद्ध आणि शांती' ही कादंबरी'', हा स्ट्रॅकॉव्हसारख्या तज्ज्ञ टीकाकाराचा अभिप्राय म्हणजे या कादंबरीच्या शिफारशीचा एक ताम्रपटच!

मोहरीएवढ्या बिजापासून प्रचंड अश्वत्थ वृक्ष उभा राहावा तशी ही कादंबरी वाढत गेली. मूळचा आराखडा तीन वेळा बदलला. नावसुद्‌धा अर्थातच तीन वेळा बदलले. कित्येक व्यक्तिरेखांना मूळच्या आराखड्यात स्थान नव्हते. नंतर प्रवेश मिळाला. जे चित्रित करण्याचे प्रारंभी ठरवले होते, त्याहून कितीतरी वेगळी, कितीतरी श्रेष्ठ, उदात्त अशी कलाकृती हळूहळू तयार होत गेली. कादंबरीच्या उत्क्रांतीच्या पायऱ्यासुद्‌धा पाहण्यासारख्या आहेत. त्यांतून टॉलस्टॉयची लोकोत्तर कल्पनाशक्ती, संवेदनशीलता, अभ्यासू वृत्ती आणि घटनांचा नेमका वेध घेणारी अंतर्भेदी प्रतिभा दिसून येते.

या कादंबरीत आलेली निसर्गवर्णने कादंबरीच्या पोतात इतकी एकरूप झालेली आहेत, की त्यांना वेगळे-तुटक असे अस्तित्व नाही. निसर्गवर्णने मुख्यत: व्यक्तिचित्रणाच्या पार्श्वभूमीवर येतात, त्यामुळे ती बांडगूळवजा वाटत नाहीत. उलट कादंबरीचा तो एक अविभाज्य घटक ठरतो. लढायांचे किंवा इतर घटनांचे वर्णनही त्यामुळे कादंबरीतील व्यक्तींवर जो परिणाम साधला असेल, ते सांगण्याच्या संदर्भात येते. त्यामुळे सर्व प्रसंगांना एक प्रकारचा जिवंतपणा, अपरिहार्यता आलेली आहे. वेगवेगळ्या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या ऐतिहासिक संदर्भांत व्यक्तिमनाचा ठाव घेण्यात टॉलस्टॉयने जी मानवी उकल करून दाखवली आहे ती केवळ विस्मयावह म्हटली पाहिजे.

या कादंबरीच्या लिखाणासाठी टॉलस्टॉयने जी मेहनत घेतली, जे अभ्यासाचे डोंगर पेलले, ते पाहून मनुष्य अक्षरश: अवाक् होतो. अगणित संदर्भ ग्रंथांचा त्याने सतत अभ्यास चालवला होता. ज्या जमिनीत कथाबीज पेरायचे तिची खूप कसून नांगरणी चालली होती. अधिकृत इतिहास, रशियन व फ्रेंच इतिहासकारांनी लिहिलेला, त्या कालखंडाचा परामर्श घेताना एकाच घटनेतून दोन विरुद्ध पक्षांचे लोक कसा काय अर्थ काढतात त्याचे सबंध अन्वयार्थ त्याने समजावून घेतले. नेपोलियनविषयी प्रसिद्ध झालेले अपरंपार लिखाण, हे सारे काही त्याने अक्षरश: घुसळून काढले. १८६३ ते १८६९ या सहा वर्षांत मनाने तो नेपोलियनच्या काळातच जगत होता, असे म्हटल्यास हरकत नाही.

युद्धाच्या वर्णनात संपूर्ण प्रत्ययकारिता आणण्यासाठी त्याने बोरोडिनोच्या युद्धभूमीस प्रत्यक्ष भेट दिली. अवतीभोवती राहणाऱ्या वयस्कर लोकांच्या अनौपचारिक मनमोकळ्या मुलाखती घेतल्या. एकंदर युद्धाचा रशियातील सामान्य लोकांच्या जीवनप्रवाहावर काय परिणाम झाला ते समजावून घेतले. ते युद्ध पाहिलेला एक माणूस वेड्याच्या इस्पितळात होता. त्याचे वेड काही विशिष्ट बाबतीत असून बाकी तो ठीक होता. हे कळल्याबरोबर वेड्याच्या इस्पितळात जाऊन त्या वेड्या म्हाताऱ्याचे युद्धविषयक स्मृतिकण वेचण्यासाठी टॉलस्टॉयने कमी केले नाही. मिळेल तेथून मिळेल तितकी माहिती तो आपल्या स्मृतिमंजुषेत साठवून ठेवत होता. एकंदर या प्रवासामुळे खूपच प्रत्ययकारी तपशील मिळाला.

टॉलस्टॉयच्या भोवती तपशिलांचा अक्षरश: महासागर हेलावत होता. त्याचे समुद्रमंथन करून मानवी जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा अमृतकुंभ काढणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. त्याच्या जोडीला आधीच्या भागांचे भागश: प्रकाशन सुरू होते. एवढ्या प्रचंड कादंबरीचे परिष्करण करण्यात तो सतत कार्यमग्न होता. या संदर्भात त्याने आपल्या कविमित्रास कळवले, ''साहित्यनिर्मिती म्हणजे

एक प्रकारची प्रसूतीच असते.'' एखाद्या वेळी मनाजोगते लिखाण झाले, की त्याला अगदी कृतकृत्य वाटे. अभ्यासिकेच्या बाहेर येऊन तो म्हणे, 'आज माझ्या अस्तित्वाचा एक अंश शाईच्या समुद्रात टाकून आलो आहे बरं!'

कल्पनासृष्टीमुळे उलगडलेला ऐतिहासिक काळ लवकरच बारीकसारीक तपशिलांसह जिवंत होऊ लागला. कादंबरीतली पात्रे जणू देहधारण करून त्याच्याशी बातचीत करू लागली. प्रत्यक्षात वावरणाऱ्या व्यक्तीपेक्षा कल्पनासृष्टीतली पात्रे त्याला अधिक जवळची वाटू लागली. चोवीस तास ती मानसचित्रे त्याच्या सान्निध्यात वावरत-शब्दरूपाने अभिव्यक्त होण्याचा अट्टहास धरत. निर्मितीची प्रक्रिया शक्य तेवढ्या वेगाने सुरू होती; पण मूळच्या अति चोखंदळपणापायी रचलेला पुष्कळसा आकृतिबंध विस्कटून जात होता. धड काही जमत नव्हते. कादंबरीची सुरुवात कशी करावी हा यक्षप्रश्न सुटता सुटेना! बारा-पंधरा वेळा सुरुवात केली अन् दूर सारली. त्याला काही पसंत पडत नव्हते. मनातल्या व्यक्तींना तर शब्दरूपाने अभिव्यक्त होण्याची निकड! मनावर फार ताण पडत होता. सुरुवातीला सूर जुळला तरी नंतरचा भाग सलग लिहिला गेला नाही. नेमक्या आराखड्याच्या अभावी किंवा बदलत्या आराखड्यांमुळे म्हणा हवे तर-लेखनाची हमालीसुद्धा खूप वाढली. इतके परिष्करण की त्याला खरोखर उपमा नाही! शब्दसंहती, परिच्छेद रचना, पात्रयोजना, कथानकाची गुंफण, ऐतिहासिक नेमके संदर्भ-सारेकाही अगदी नेटके-बरोबर जमायला हवे होते.

रोज दिवसभर लिहिलेला भाग संध्याकाळी तो सोन्याच्या टेबलावर आणून ठेवी. रात्री सोन्याचे काम सुरू व्हायचे. टॉलस्टॉयने लिहिलेल्या भागाची सुवाच्य नक्कल उतरवून काढणे हे तिचे काम. ते ती अत्यंत मन:पूर्वक करी. ती आपण लिहिलेले टॉलस्टॉयच्या टेबलावर नीट रचून ठेवी आणि मग झोपी जाई.

सोन्याने लिहून काढलेली प्रकरणे सकाळी तो नजरेखाली घालत असे. त्यात पुनश्च असंख्य फरक करी. सारे कागद पुनश्च खाणाखुणा, वाक्यखंड, रेघा इत्यादी तपशिलाने चिताडले जात. मग ते दुखावलेले घायाळ कागद संध्याकाळी नव्या सोबत्यांसह पुनश्च सोन्याच्या टेबलावर स्थानापन्न होत असत. मग रात्री तिचा उद्योग सुरू व्हायचा. अशा रीतीने सोन्याने ती २००० पृष्ठांची कादंबरी जवळजवळ सात वेळा लिहून काढली.

टॉलस्टॉय काही इतिहास लिहीत नव्हता. कादंबरी हे त्याचे माध्यम. ऐतिहासिक घटनांच्या पार्श्वभूमीवर मानवी जीवनदर्शन हा कादंबरीचा खरा विषय. या कादंबरीत सुमारे ५०० हून अधिक व्यक्तिरेखा रंगवल्या आहेत. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रत्येकाला वेगवेगळे, स्वयंपूर्ण, सुस्पष्ट व्यक्तिमत्त्व आहे. व्यक्तींनाच काय-कुत्र्याला सुद्धा स्पष्ट व्यक्तिमत्त्व आहे. केवळ व्यक्तिचित्रणांकडे पाहिले तरीसुद्धा या कादंबरीने फार मोठे यश साध्य केले आहे. त्या दृष्टीने टॉलस्टॉय हा पहिल्या दर्जाचा कलावंत ठरतो.

१८६९ च्या डिसेंबरअखेरी टॉलस्टॉयने 'युद्ध आणि शांती' ही प्रचंड कादंबरी पूर्ण केली. ही अवाढव्य कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर टॉलस्टॉयला कृतकृत्य वाटले. खूप हलकेहलके वाटले. विलक्षण मानसिक ताण पडला होता. फारच थोड्या लोकांना कादंबरीची झेप समजली होती. टर्जिनिव्हसारख्या मुरलेल्या साहित्यिकालासुद्धा कादंबरीचे स्वारस्य समजण्यास वेळ लागला होता; पण जेव्हा संपूर्ण पुस्तक वाचले तेव्हा मात्र तो खूश झाला. त्याने नमूद केले, की ''रशियन भाषा जिवंत असेपर्यंत ही कादंबरी वाचली जाईल.''

**(टॉलस्टॉय एक माणूस)**

**टिपा-**

(१) यास्नाया पोल्याना- टॉलस्टॉयचे जन्मस्थान.
(२) पुष्किन- आधुनिक रशियन साहित्याचा जनक.
(३) टर्जिनिव्ह- रशियन कादंबरीकार.
(४) व्हॉल्टेअर- फ्रेंच लेखक, तत्त्वज्ञ व विचारवंत.
(५) चार्ल डिकन्स- ब्रिटिश कादंबरीकार.
(६) नेपोलियन- फ्रान्सचा सम्राट, असामान्य योद्धा, सेनानी व प्रशासक.
(७) रूसो- फ्रेंच तत्त्वज्ञ, फ्रेंच राज्यक्रांतीचा वैचारिक जनक.

## कृती

**(१) खालील कृती पूर्ण करा.**

**(अ) टॉलस्टॉयच्या ज्ञानेंद्रियांच्या तल्लख संवेदनेची पाठातील उदाहरणे देऊन खालील तक्ता पूर्ण करा.**

| ज्ञानेंद्रिये | संवेदनांची उदाहरणे |
|---|---|
| (१) डोळे | .................................. |
| (२) कान | .................................. |
| (३) नाक | .................................. |
| (४) त्वचा | .................................. |

**(आ) आकृत्या पूर्ण करा.**

(१) **टॉलस्टॉयची दैनंदिनी लेखनाची प्रयोजने**

(२) **लिओ टॉलस्टॉयची कोवळ्या वयातील विलक्षण शक्ती**

(३) **टॉलस्टॉयने वाचलेले लेखक**

(४) **'युद्ध आणि शांती' या कादंबरीसाठी तपशील गोळा करण्याची साधने**

**(इ) सूचनेप्रमाणे सोडवा.**

(१) खालील शब्दांसाठी पाठात आलेल्या उपमा लिहा.

(अ) मन:पटलावरील प्रतिमा ☐

(आ) 'युद्ध आणि शांती' ही कादंबरी ☐

(२) 'कादंबरी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**(२) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.**

(अ) मनाची कोरी पाटी.

(आ) लोकोत्तर कल्पनाशक्ती.

(इ) तपशिलांचा महासागर.

**(३) व्याकरण.**

**(अ) तक्ता पूर्ण करा.**

अर्थपूर्ण, अमर्याद, वाङ्मयीन, कलाकृती, शिल्प, आठवण, अजोड, शक्ती

| विशेषणे | विशेष्ये |
| --- | --- |
| | |

**(आ) खालील शब्दसमूहांचा वाक्यांत उपयोग करा.**

(१) न्यून असणे-

(२) मातीशी मसलत करणे-

(३) अवाक् होणे-

(४) अभ्यासाचे डोंगर पेलणे-

**(४) स्वमत.**

(अ) टॉलस्टॉयच्या तरल संवेदनेची सूचक आठवण तुमच्या शब्दांत वर्णन करा.

(आ) 'युद्ध आणि शांती' ही कादंबरी लिहिण्यासाठी टॉलस्टॉयने केलेल्या अभ्यासाचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) स्वत:चे लेखन परिपूर्ण होण्यासाठी टॉलस्टॉयने केलेले परिश्रम तुमच्या शब्दांत लिहा.

**(५) अभिव्यक्ती.**

(अ) 'टॉलस्टॉय पहिल्या दर्जाचा कलावंत ठरतो,' या विधानाची यथार्थता पटवून द्या.

(आ) 'ज्या जमिनीत कथाबीज पेरायचे तिची खूप कसून नांगरणी चालली होती', या विधानाचा अर्थ स्पष्ट करा.

**प्रकल्प.**

संगणकावर उपलब्ध असणाऱ्या 'गुगल ॲप'चा वापर करून लिओ टॉलस्टॉय यांच्याविषयी अधिक माहिती मिळवून संपादित करा.

# १२. पैंजण

**नीलम माणगावे** (१९५४) :

कवयित्री, लेखिका, संपादक व बालसाहित्यिक म्हणून परिचित. 'स्त्रीवादी जाणीव' हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य. 'बाई' म्हणून जगण्याची आस, खंत, चीड, उत्साह-आनंद तसेच असोशी, वेदना, कल्लोळ यांचा एक उत्स्फूर्त स्वरमेळ त्यांच्या कवितांमध्ये निनादत राहतो. त्यांच्या साहित्यातून विविध प्रतिमांच्या माध्यमांतून स्त्रीची जागृतावस्था व्यक्त होते. कवितेची बोली सहजसुंदर व प्रवाही आहे. अनुभवांचा सच्चेपणा आणि अनलंकृत भाषाशैली ही त्यांच्या कवितेची शक्तिस्थाने आहेत. 'गुलदस्ता', 'शतकाच्या उंबरठ्यावर', 'जाग' हे कवितासंग्रह. 'तीच माती तेच आकाश', 'शांते तू जिंकलीस', 'निर्भया लढते आहे' हे कथासंग्रह. 'डायरी', 'जिद्द' या कादंबऱ्या, ललित लेखन व बालसाहित्य प्रसिद्ध. 'महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार' या व अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

प्राचीन काळापासून सामाजिक आणि कौटुंबिक बंधनांचे अडथळे पार करत स्त्री प्रगतीच्या वाटेवर टप्प्याटप्प्याने पुढे जात आहे. तिचा हा संघर्षमय प्रवास प्रतीकांच्या माध्यमातून चित्रित करताना कवयित्रीने स्त्रीच्या आत्मविकासाचा दृढनिर्धार या कवितेतून व्यक्त केला आहे.

या कवितेची रचना मुक्तछंदात केलेली आहे.

दोन दोन किलो वजनाचे पैंजण घालून
माझी आजी
स्वयंपाकघरातून माजघरात
माजघरातून स्वयंपाकघरात
एखाद्या सम्राज्ञी सारखी
ठुमकत फिरायची!
ओझ्याने तिचे पाय भरून यायचे
दुखायचे, खुपायचे
घोटे काळे ठिक्कर पडायचे
कधी जखम व्हायची, चिघळायची, रक्त वहायचं
पण नादाच्या भूलभुलैय्यातुन बाहेर न पडता
पैंजणाखाली फडके बांधून
जखमांना ऊब देऊन ती राज करायची!



माझ्या आईने पैंजण सोडून
नाजूक, हलक्या, तोरड्या घालायला सुरुवात केली
ना पाय दुखणं, ना खुपणं, ना चिघळणं
आपल्याच तोऱ्यात ती
स्वयंपाकघर, माजघर, सोपा, अंगण, माडी, गच्ची
सगळीकडे मनमुराद फिरायची
अधनं मधनं का होईना, तोरड्या टोचायच्या.
साडीचे काठ फाटायचे, दोरे लोंबायचे
पण सारे दुर्लक्षून
ती राजराणीसारखी भिरभिरायची!

मी तर ...
अडकणं, बोचणं, चिघळणं, फाटणं
काहीच नको म्हणून
पैंजणाबरोबर तोरड्यांनाही हद्दपार करून सोडलं
हलक्याशा चपला, बूट, सँडल घालता, घालता
घरच नव्हे तर अंगणही ओलांडून
मी बाहेर पाऊल टाकलं
पण कधी कधी माझ्याही नकळत
चपला घसरतात, सँडल बोचतात, बूट चावतात
पण मिळणाऱ्या स्वातंत्र्यासाठी
मी सारे सहन करते.

आता मात्र माझी मुलगी म्हणते
आई पैंजण नको, तोरड्या नको
चप्पल, बूट, सँडल नको
ते पकडणं नको घसरणं नको
काही काही काहीच नको
अगं पायाखालचे काटे मोडण्यासारखे
पायच होऊ देत आता... घट्ट, मजबूत, पोलादी
पुढल्या का होईना शतकाआधी!

(जाग)



## कृती

**(१) योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

**(अ) आजी जखमांना ऊब देऊन राज करायची! म्हणजे–**

(१) आजी जखमांना औषधपाणी करून काम करायची.
(२) रूढींचा त्रास सहन करत स्वयंपाकघरापुरती वावरायची.
(३) जखमारूपी संकटांना सहन करून आनंदात राहायची.

**(आ) सारे दुर्लक्षून ती राजराणीसारखी भिरभिरायची! म्हणजे–**

(१) राजाच्या राणीसारखा सन्मान तिला मिळायचा.
(२) राजाच्या राणीचा तोरा मिरवायची.
(३) रूढींच्या मर्यादेत राहून घरापुरत्या निर्णयात सहभागी होण्यात धन्यता मानायची.

**(इ) मिळणाऱ्या स्वातंत्र्यासाठी मी सारे सहन करते. म्हणजे–**

(१) घराबाहेर पडण्याच्या स्वातंत्र्यासाठी कौटुंबिक, सामाजिक बंधने सहन करते.
(२) स्वातंत्र्य मिळाले म्हणून इतर दुःखं सहन करते.
(३) ऐच्छिक वेषभूषेसाठी सारे सहन करते.

(ई) **पायच होऊ देत आता... घट्ट, मजबूत, पोलादी पुढल्या का होईना शतकाआधी! म्हणजे–**

(१) पुढचे शतक येण्यापूर्वी स्वयंपूर्ण आणि समर्थ बनू दे.
(२) पुढल्या शतकाआधी पाय जमिनीवर राहू दे.
(३) पुढल्या शतकाआधी काटे कमकुवत होऊ दे.

### (२) (अ) खालील ओळींतील संकल्पना स्पष्ट करा.

(१) नादाच्या भुलभुलैय्यातून बाहेर न पडणे.
(२) पण सारे दुर्लक्षून राजराणीसारखे भिरभिरणे.
(३) मिळणाऱ्या स्वातंत्र्यासाठी सारे सहन करणे.

**(आ) खालील तक्ता पूर्ण करा.**

| व्यक्ती | घरातील किंवा घराबाहेरील क्षेत्र | ध्वनित होणारा अर्थ |
|---|---|---|
| माझी आजी | | |
| माझी आई | | |
| मी | | |
| माझी मुलगी | | |

**(इ) खालील तक्ता पूर्ण करा.**

| कवितेचा विषय | कवितेतील प्रतीके | कवितेचा रचनाप्रकार | कवितेची मध्यवर्ती कल्पना | कवितेची भाषाशैली |
|---|---|---|---|---|
| | | | | |

### (३) काव्यसौंदर्य.

(अ) 'चपला घसरतात, सँडल बोचतात, बूट चावतात
पण मिळणाऱ्या स्वातंत्र्यासाठी
मी सारे सहन करते,' या ओळींतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

(आ) 'अगं पायाखालचे काटे मोडण्यासारखे
पायच होऊ देत आता... घट्ट, मजबूत, पोलादी', या ओळींतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा.

(इ) आजीच्या आणि आईच्या कौटुंबिक वातावरणात झालेला फरक कोणकोणत्या प्रतीकांतून वर्णन केला आहे ते स्पष्ट करा.

### (४) अभिव्यक्ती.

(अ) कवितेत वर्णन केलेली आजी व आजची आजी यांच्यात कालपरत्वे झालेला बदल स्वभाषेत स्पष्ट करा.
(आ) स्त्रीच्या भविष्यकालीन प्रगत रूपांविषयी तुमच्या कल्पना स्पष्ट करा.

### (४) रसग्रहण.

'पैंजण' या कवितेचे रसग्रहण करा.

### प्रकल्प.

स्त्रियांच्या प्रगतीसंदर्भातील विविध घटनांचे अर्थपूर्ण कोलाज तयार करा.

* म्हणींचा शोध घ्या. (तिरपा, आडवा, वरून खाली किंवा खालून वर)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श | ब | ळी | तो | का | न | पि | ळी | पा |
| र | क्ती | वी | अ | न्य | ता | शा | म | ल |
| या | ची | पे | च | ल | ती | स | गो | थ्या |
| री | का | थी | क्षा | मा | ग | त | द | घ |
| यु | न | प | थे | यु | नि | स | य | ड्या |
| ठो | द | ते | रा | म | क्ती | रा | ग | व |
| आ | ति | का | सा | य | पी | श्रे | ता | र |
| अ | झ | प | घे | ली | त | ड | ष्ठ | पा |
| ली | दि | व्या | खा | ली | अं | धा | र | णी |

(१) ...................................

(२) ...................................

(३) ...................................

(४) ...................................

(५) ...................................

## * लोकसाहित्य व लोकसंस्कृती *

मराठीत सखोल आणि व्यापक भूमिकेतून लोकसाहित्याचा अभ्यास करणारे डॉ. रा. चिं. ढेरे आणि पंडित कृष्णदेव उपाध्याय यांच्या मते लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृती होय. अभ्यासकांच्या मते संस्कृतीतील कथा, गीतादी सर्व शाब्दवाङ्मय व सर्व शब्देतर साहित्य या सर्वांचा समग्र पद्धतीने केलेला अभ्यास म्हणजे लोकसाहित्याचा अभ्यास. स्वाभाविकच या लोकसाहित्याच्या अभ्यासाचा व्याप फार मोठा आहे. विशिष्ट समाजाच्या लोकसाहित्याचा (लोकसंस्कृतीचा) अभ्यास करण्यासाठी त्या समूहाचा इतिहास, त्याच्या भूप्रदेशाचा भूगोल, समाजशास्त्र, मानवशास्त्र, पुरातत्वशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र, मानसशास्त्र, दैवतकथाशास्त्र आणि अर्थशास्त्र या सर्व शास्त्रांच्या अभ्यासाचे सहकार्य घेतल्याशिवाय या अभ्यासाला पूर्णत्व येत नाही. म्हणूनच लोकसाहित्याचा अभ्यास ही एक बहुस्पर्शी (मल्टिडिसप्लीनरी स्टडी ॲप्रोच) अभ्यास पद्धती आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी आणखी एक महत्त्वपूर्ण बाब म्हणजे क्षेत्रीय कार्य (Field Work) ही आहे.

लोकसाहित्यातील शाब्दसाहित्यात (लोकवाङ्मय) लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे, अहाणे, वाक्प्रचार इत्यादी प्रकार मोडतात. त्याचप्रमाणे लोकपुराणे, जातिपुराणे, न्यायनिवाड्याच्या पारंपरिक सनदा त्यातच मोडतात. शब्देतर साहित्यातील कृतिप्रधान साहित्यात लोकनृत्य, लोकसंगीत, लोकवाद्ये, लोकनाट्य, हस्तकलात चित्र, शिल्प, अन्य हस्तकला व रांगोळी मोडते. याशिवाय लोकक्रीडा, लोकज्योतिष, लोकवैद्यक, लोकाचारातील विधिविधाने, तोडगे, व्रताचार मोडतात. भावप्रधान साहित्यामध्ये लोकभ्रम, लोकरूढी, चालीरीती, लोकनीती, लोकश्रद्धा मोडतात. लोकसाहित्याचा अभ्यास हा केवळ भूतकाळातील संस्कृतीचा अभ्यास नसून मानवी संस्कृतीच्या आरंभापासून माणसाने अबोधपणे जतन केलेल्या जिवंत सांस्कृतिक जीवनाचा तो शोध आहे. म्हणूनच वर्तमान हा भूतकाळाने घडवलेला असतो आणि त्याचे भविष्य हे भूत-वर्तमानाच्या आधाराने उभे राहिलेले असते, याची समृद्ध जाण लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यासातून येऊ शकते. भारतीय लोकसाहित्याला समृद्ध अशी वैविध्यपूर्ण परंपरा आहे. भारतातल्या प्रमुख भाषांमधल्या लोकसाहित्यात लोकसंस्कृतीचे काही समान घटक आढळतात. सर्व भाषांमधल्या लोकसाहित्यात व्यक्तिजीवनातल्या विविध टप्प्यांवर, विधिसंस्कार प्रसंगांची गीते, श्रमपरिहारार्थ गायली जाणारी रंजनपरगीते, सण उत्सवांशी निगडित विधिगीते व ऋतुगीते हे विविध प्रकार विपुल प्रमाणात आढळतात. लोकसाहित्य आणि लोकाचार हे लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे प्राथमिक आणि प्रमुख साधन आहे; परंतु लोकसाहित्येतर वाङ्मयीन साहित्यातून लोकसंस्कृतीच्या प्रदीर्घ प्रवाहाचे समग्र दर्शन घेता येते.

**(मराठी विश्वकोश खंड १५ मधून साभार)**

## अपठित गद्य-नमुना
## पाण्याच्या पृष्ठभागावर शेती

हिरव्यागार शेतांनी विनटलेली भूमी पाहून मन कसे हरखून जाते! लोकसंख्या भरमसाट वाढू लागली. भूमीवरही फार मोठा भार पडू लागला. शेतीचे क्षेत्र अपुरे वाटू लागले. त्यामुळे शास्त्रज्ञांनी एका विलक्षण संशोधनाची कास धरली. ते संशोधन म्हणजे पाण्याच्या पृष्ठभागावर शेती करण्याचे! पाण्याच्या पृष्ठभागावर शेती... केवढी आश्चर्यजनक कल्पना! ह्या कल्पनेला मूर्त स्वरूप आले आहे. शास्त्रीय परिभाषेत ह्या संशोधनाला 'हायड्रोपोनिक्स!' असे म्हणतात. या अभिनव संशोधनाने 'देता किती घेशील दो करांनी' असेच जणू आवाहन केले आहे. 'हायड्रोपोनिक्स' हा ग्रीक भाषेतील शब्द आहे. या शब्दाचा अर्थ आहे पाण्याचे कार्य. जमिनीवरच केवळ लागवड करता येते असे नाही तर पाण्याच्या पृष्ठभागाचाही लागवडीसाठी भूमीसारखा उपयोग होऊ शकतो; नव्हे पाण्याच्या पृष्ठभागावरील शेती ही फारच स्वस्त अन् अत्यंत फलदायी सुद्धा आहे. ही आश्चर्यकारक कल्पना प्रायोगिक दृष्टीने यशस्वी करण्याचे श्रेय कॅलिफोर्निया विश्वविद्यालयातील शास्त्रज्ञ डॉ. गेरीक यांना द्यावे लागेल. त्यांनीच या प्रयोगाला 'हायड्रोपोनिक्स' असे नाव दिले.

डॉ. गेरीक यांनी १९२९ मध्ये पहिला प्रयोग केला. पाण्याच्या पृष्ठभागावर टोमॅटोची लागवड केली. या प्रयोगात टोमॅटोची रोपे इतकी उंच वाढली, की टोमॅटो तोडण्यासाठी शिडीचा वापर करावा लागला. हायड्रोपोनिक्स हे एक शास्त्र आहे. पाण्यामधून ऑक्सिजन व कार्बन डायऑक्साइड भरपूर प्रमाणात वनस्पतींना मिळू शकतात; परंतु रसायनद्रव्ये व आधार या दोन गोष्टींसाठी हेतुपूर्वक योजना करावी लागते. वनस्पतींच्या वाढीसाठी वास्तविक मातीची फारशी आवश्यकता नसते. वनस्पतींना विविध रसायने पुरवणे व आधार देणे ही कामे माती करते. हा मातीचा महत्त्वाचा कार्यभाग! वनस्पतींना कृत्रिम रीतीने रसायनद्रव्ये व आधार दिला तर वनस्पतींची वाढ फार चांगली होऊ शकते. यालाच 'हायड्रोपोनिक्स' असे म्हणतात.

पाण्याच्या पृष्ठभागावर शेती करायची म्हटली तर क्षेत्रही फारच थोडे लागते; भूमीपेक्षा एक चतुर्थांश क्षेत्रात हायड्रोपोनिक्स पद्धतीने आठपट अधिक उत्पन्न येते व खर्च आणि श्रमही अत्यल्प लागतात. या पद्धतीने शेती करण्यापासून अनेक लाभ आहेत. ज्या भागातील शेती नापीक, ओसाड आहे त्या भागात ही अभिनव शेती केवढी उपयुक्त आहे! थोड्या परिश्रमात व थोड्या खर्चात उत्पन्न कसे प्रचंड मिळते हे त्याची नमुना आकडेवारीच सांगते. जसे-जमिनीवरील एक एकर शेतीत १३ क्विंटल तांदूळ पिकतो तर पाण्याच्या पृष्ठभागावरील एक एकरात १४३ क्विंटल तांदूळ पिकतो!

भारतात कलकत्ता (कोलकाता), मुंबई, लखनौ व दक्षिण भारतात काही केंद्रांत हायड्रोपोनिक्सचे प्रयोग सुरू आहेत. लखनौच्या राष्ट्रीय उद्यानात हायड्रोपोनिक्सचा एक स्वतंत्र विभागच आहे.

पाण्याच्या पृष्ठभागावरील शेतीचे हे विलक्षण संशोधन कृषि क्षेत्रात महत्त्वाची क्रांती घडवून आणील यात शंकाच नाही.

**संदर्भ- किमया विज्ञानाची**
सुधाकर भालेराव

## कवितेचे रसग्रहण

एखादी कविता ऐकल्यानंतर किंवा वाचल्यानंतर मन एका अनामिक आनंदाने भरून जावे, कधी डोळा पाणी यावे, कधी रसाविष्कारात चिंब ओले व्हावे म्हणजे काव्याचा आस्वाद सुरू झाला असे समजावे. कविता वाचताच कधी शब्दांतला ताल रुणझुणायला लागतो, तर कधी कवितेतले शब्द बोलायला लागतात. असं का होतं? तर काव्याचा आस्वाद ही आपली प्रत्येकाची मानसिक भूक असते. जात्यावर गाणे म्हणणारी स्त्री, अंगाई गाणारी आई, हार्मोनियमवर गीत वाजवणारा वादक, काम करता-करता रेडिओवर गाणी ऐकणारा रसिक श्रोता हे आपापल्या आवडीनुसार गाण्याचा, कवितेचा आस्वाद घेत असतात. हा आस्वाद, ही रसिकता चिकित्सक, चोखंदळ असतेच असे नाही. कवितेचा आस्वाद चिकित्सकपणे, चोखंदळपणे, सौंदर्यपूर्ण दृष्टीने घेता यावा, यासाठी 'रसग्रहण' प्रक्रियेचा अभ्यास करावा लागतो.

कवितेतील विचार, भावना, अनुभूती, शब्दयोजना, लय, वृत्त, अलंकार, रस, प्रतिमा, प्रतीके आणि कल्पनाविलास इत्यादी घटकांच्या मांडणीचा आणि त्यामधील सौंदर्याचा आस्वाद घेऊन तो व्यक्त करणे म्हणजे 'रसग्रहण' होय. कवितेत उपरोक्त घटक कमी-जास्त प्रमाणात आढळतात. कधी कधी काही घटक नसतातही. त्यामुळे रसग्रहणाच्या लेखनाचे विशिष्ट नियम सांगता येत नसले तरी रसग्रहणलेखनाचेही एक शास्त्र विकसित झालेले आहे; परंतु तसे तेही काटेकोर नाही. त्यामुळे या शास्त्रालाही कलात्मकतेची जोड आवश्यक ठरते.

काव्यात रसाची महती अनन्यसाधारण आहे. काव्यवाचनाने आणि काव्याभ्यासाने रसिकांच्या मनातील विविध भावनांच्या तारा छेडल्या जातात. उत्कटता वाढीस लागते. तिचे पर्यवसान 'रस' निर्मितीत होते. रसनिर्मिती ही भावनेच्या परिपोषावर अवलंबून असते. मानवी अंत:करण म्हणजे भाव-भावनांचा जणू समुद्रच. ज्या भावना स्थायी, मूलभूत असतात त्यांचा परिपोष झाल्याने रसनिष्पत्ती होते. शृंगार, वीर, करुण, हास्य, भयानक, रौद्र, बीभत्स, अद्‌भुत, शांत असे नऊ रस मानले आहेत. शब्दयोजना, काव्यानुभव, छंद, लय, आघात, प्रतिमा, प्रतीके इत्यादी घटकांतून रसनिर्मिती होते.

वरील विवेचनावरून काव्याची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

### * काव्याची वैशिष्ट्ये

(१) कवितेत भाषा हे माध्यम असते. अनुभवाची कलात्मक अभिव्यक्ती हा प्रमुख हेतू असतो.

(२) कवितेत अर्थाच्या विविध छटा व्यक्त करणारी आणि सौंदर्यनिर्मिती करणारी शब्दयोजना असते.

(३) कवितेमध्ये रचनाकौशल्याला महत्त्वाचे स्थान असते. छंद, वृत्त यांच्या आधारे वा मुक्तछंदात कविता केली जाते.

(४) तिच्या रचनापद्‌धतीमुळे श्रवणसुभगता आणि स्मरणसुलभता ही गुणवैशिष्ट्ये साधली जातात.

(५) कवितेचे लेखन हे छंद, वृत्त यानुसार असल्यामुळे काही वेळा व्याकरणाचे नियम त्यामध्ये गौण ठरतात.

(६) कवितेत कमीत कमी शब्दांत मोठ्यात मोठा आशय व्यक्त झालेला असतो. (अल्पाक्षरत्व)

(७) शब्दांना नेहमीचा वा नेहमीपेक्षा वेगळा अर्थ प्राप्त करून देणाऱ्या अभिधा, लक्षणा आणि व्यंजना या शब्दशक्तींचा वापर प्रकर्षाने कवितेत असतो.

काही कवितेत विशिष्ट पद्धतीने शब्दरचना केलेली असते. काही कवितांची रचना 'मात्रांनी' सजलेली असते. अशा नाद, लय, वृत्त, छंद, अलंकार इत्यादी घटकांमुळे कवितेची रचना वैशिष्ट्यपूर्ण ठरते. कवितेत आशयानुरूप लय असते. कवितेतील शब्दांना अर्थपूर्ण नाद असतो. या साऱ्या घटकांमुळे कविता हृदयापर्यंत पोहोचते. त्यांतील शब्दच्छटा, अर्थच्छटा यांमुळे कवितेचा गर्भितार्थ मनाला भिडतो आणि रसनिर्मिती होते.

### ❋ अलंकार, प्रतिमा व प्रतीके

अलंकारांमुळे कवितेला सौंदर्य प्राप्त होते. कवितेतील शब्दांवर, त्यांतील अक्षरांवरील चमत्कृतींवर जे अलंकार आधारलेले असतात त्यांना शब्दालंकार म्हणतात. यमक, अनुप्रास, श्लेष हे शब्दालंकार आहेत. काव्यामध्ये शब्दांच्या अर्थामुळे जेव्हा चमत्कृती उत्पन्न होते, तेव्हा ते अर्थालंकार म्हणून ओळखले जातात. उपमा, रूपक, चेतनगुणोक्ती हे व असे अनेक अर्थालंकार आहेत. कवितेचे रसग्रहण करताना यासंबंधीची उकल महत्त्वाची ठरते.

अलंकारांइतकेच कवितेतील 'प्रतिमा' व 'प्रतीके' हे घटक महत्त्वाचे असतात. 'प्रतिमा' ही काव्याचा एक भाग असते. दोन किंवा अधिक वस्तूंमधील साम्य किंवा वेगळेपण 'प्रतिमेच्या' माध्यमातून दाखवले जाते; तसेच कवितेतील 'प्रतीकांतूनही' वेगवेगळे अर्थ सूचित होतात. हेच खरे तर 'कविता' या साहित्यप्रकाराचे वैशिष्ट्य असते.

### ❋ पाठ्यपुस्तकातील कवितांविषयी

पाठ्यपुस्तकात वीररसात ओथंबलेली काव्यरचना 'काव्यानंदासाठी' दिलेली आहे. विलक्षण गेयता असलेल्या 'स्वतंत्रतेचें स्तोत्र' या रचनेने पुस्तकाच्या गद्य-पद्य घटकाची सुरुवात होत आहे. 'प्राणसई' ही छंदोबद्ध कविता अष्टाक्षरी छंदातील असून यमक अलंकाराचा प्रत्यय देणारी आहे. 'झाडांच्या मनात जाऊ' ही गेय कविताही यमक अलंकाराने सजली आहे. 'दवांत आलिस भल्या पहाटीं' ही मुक्तछंदातील प्रेमकविता! प्रतिमांचा चपखलपणे केलेला वापर हे या कवितेचे वैशिष्ट्य! 'ऐंसी अक्षरे रसिकें' ही संत ज्ञानेश्वरांची ओवीबद्ध रचना आहे. 'शब्द' ही कविता चेतनगुणोक्ती अलंकाराचे दर्शन घडवणारी आहे. ही रचना मुक्तछंदातील असून सामाजिक विषमतेवर बोट ठेवणारी आहे. 'पैंजण' ही स्त्रीवादी कविताही मुक्तछंदात असून प्रतीकांचा सूचक उपयोग या कवितेत केलेला आहे.

घंटेला दिलेल्या टोल्याने जशा अनेक ध्वनिलहरी निर्माण होतात, तशा काव्यातील शब्दांच्या उच्चाराने विविध भावनांचे तरंग वाचकांच्या मनात आंदोलित होतात. हे तरंग रसनिर्मितीस पोषक ठरतात.

### ❋ रसग्रहण करताना हे लक्षात ठेवा.

वरील सर्व मुद्द्यांचा अभ्यास केल्यानंतर कवितेचे घटक तुमच्या लक्षात येतीलच. दिलेले मुद्दे लक्षात घेऊन तुम्ही कविता बारकाईने वाचा. कवितेची चाल मधुर असेल, तिच्यातील भावना अंत:करणाला भिडणाऱ्या असतील, तिच्यातील कल्पना चमत्कृतीपूर्ण असतील, कवितेचा भाषिक आकार लहान, रचना सोपी; पण अर्थपूर्ण असेल आणि शब्दांत नादमाधुर्य असेल तर ती कविता थेट हृदयापर्यंत पोहोचते.

रसग्रहण करताना वरील मुद्द्यांसोबत कवितेतील काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घ्याव्यात. कवितेत भावनांची उत्कटता, कल्पनाविलास, विचारसौंदर्य आणि प्रसाद, माधुर्य, ओज हे गुण असतात. कवितेची मध्यवर्ती कल्पना एखाद्या विषयाभोवती गुंफलेली असते. उदा., निसर्गवर्णन, शब्दचित्र, व्यक्तिचित्र, विडंबन, विनोद, उपदेश इत्यादी. कवितेची मध्यवर्ती कल्पना थोडक्यात विशद करून कवितेतील भावना, कल्पना, विचार, सूचकता, नादमाधुर्य, चाल, अलंकार, काव्यगुण, काव्यशक्ती, कवितेचा वाङ्मयप्रकार (आशयानुसार), कवितेचा

रचनाप्रकार, कवितेतील सूचकता, प्रतिमा आणि प्रतीके यांपैकी जे जे गुण आढळतात त्या सगळ्यांची नोंद घेणे किंबहुना वरील गुणांच्या अनुषंगाने कवितेचा सूक्ष्म अभ्यास म्हणजे कवितेचे रसग्रहण होय. सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे कवितेतील ओळी तुम्हांला का आवडतात याचे कारण आणि त्या ओळींचा तुमच्या मनावर झालेला परिणाम सांगणे महत्त्वाचे ठरते. म्हणूनच कवितेचे सौंदर्यदर्शन घेणे म्हणजेच 'रसग्रहण' होय.

खाली दिलेल्या पाच मुद्द्यांना अनुसरून रसग्रहण करावे.

(१) कवितेचा विषय आणि कवितेची मध्यवर्ती कल्पना.

(२) कवितेतील प्रतिमा, प्रतीके, अर्थालंकार, आंतरिक लय, अर्थाचे सौंदर्य.

(३) कवितेतून सूचित होणारे काव्यगुण, शब्दशक्ती, भाषाशैली–
(संवादात्मक/निवेदनात्मक/चित्रदर्शी असल्यास).

(४) कवितेतील शब्दालंकार, नाद, बाह्य लय, छंद, वृत्त इत्यादी.

(५) कवितेतून मिळणारा संदेश, मूल्ये आणि कविता आवडण्याचे कारण.

कवीला कवितेत काय सांगायचे आहे अन् त्याने ते कसे सांगितले आहे; याचे विद्यार्थ्यांनी स्वत:च्या संवेदनशील मनाने विचारपूर्वक केलेले विवेचन म्हणजेच 'रसग्रहण' करणे होय.

## नाटक–साहित्यप्रकार–परिचय

'नाटक' या साहित्यप्रकाराचा परिचय व्हावा, या हेतूने प्रस्तुत माहितीचा अभ्यास करावा. दृकश्राव्य साहित्यप्रकार म्हणून 'नाटक' या साहित्यप्रकाराचे वेगळेपण आहे. संगीत नाटक, प्रायोगिक नाटक व व्यावसायिक नाटक या प्रकारांचे स्वरूप व वैशिष्ट्ये या भागामध्ये नमूद केली असून, नाटकाशी संबंधित असणारे घटक व त्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या माहितीतून नाट्यक्षेत्रातील व्यवसायाची नवी क्षितिजे तुम्हांला समजू शकतील व भाषिक अंगाने तुम्ही 'नाटक' या साहित्यप्रकाराचा आस्वाद घेऊ शकाल.

**'नाट्यभिन्नरूचेर्जनस्य बहुध्यापेकं समाराधनम्!' – इति महाकवी कालिदास**

महाकवी कालिदासाने म्हटल्याप्रमाणे, 'भिन्न भिन्न रुची असणाऱ्या लोकांचे एकाच वेळी समाधान करणारा, नाटक हा एक श्रेष्ठ वाङ्मयप्रकार आहे.' ललित साहित्याच्या प्रकारांमध्ये 'नाटक' हा लोकप्रिय साहित्यप्रकार आहे.

आपण जे ऐकले, पाहिले ते दुसऱ्याला सांगावे ही माणसाची सहज प्रवृत्ती आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वत:ला आलेला अनुभव, आनंद, दु:ख हे सगळे सांगावेसे वाटते. त्यांतूनच साहित्याची निर्मिती होते.

'नाटक' या साहित्यप्रकाराच्या माध्यमातून प्रेक्षकांशी जिवंत संवाद घडत असतो. लोकसंवाद आणि लोकरंजन या नाटकाच्या महत्त्वाच्या बाजू असतात. तथापि लेखकाचा प्रतिपाद्य विषय लोकांपर्यंत पोहोचवणे हा त्यातील महत्त्वाचा भाग असतो.

मराठी साहित्यातील 'नाटक' या साहित्यप्रकाराचा विचार केला तर त्यांतून बदलत गेलेल्या समाजाचे चित्रण झालेले दिसते. कोणत्याही समाजातील चालीरीती कालपरत्वे बदलल्या असल्या तरी माणसाचा स्वभाव, मानवी भावभावना या गेली अनेक वर्षे कायम राहिलेल्या आहेत. या मानवी भावभावना, स्वभाव यांतील विविध छटांचे दर्शन नाटकांतून घडते. त्याचबरोबर समाजाचेही वास्तव चित्रण नाटकांतून होत असते. समाजातील बदल नाटकाच्या माध्यमातून मांडण्याची परंपरा फार प्राचीन आहे. नाटक हा समाजाचे यथायोग्य दर्शन घडवणारा प्रयोगक्षम साहित्यप्रकार आहे. म्हणून आपण नाटक या साहित्यप्रकाराचा परिचय करून घेणार आहोत.

### नाट्य म्हणजे...

नाट्य हा नाटकाचा प्राण आहे. एखाद्या प्रसंगामध्ये जेव्हा कल्पनेपलीकडील बदल आकस्मिकरीत्या घडतो, तेव्हा नाट्य निर्माण होते. हा बदल आश्चर्यकारक असतो, खळबळजनक असतो. त्यामुळे वाचकाला, प्रेक्षकाला अनपेक्षित धक्का बसतो. कधी तो सुखद असतो तर कधी दु:खद असतो. निसर्गात आणि मानवी जीवनात असे 'नाट्य' पाहायला मिळते. त्याचेच प्रतिबिंब नाटकात दिसून येते.

### नाटक म्हणजे...

लेखकाने लिहिलेले नाटक हे कलाकारांनी सादर करायचे असते. चित्र किंवा शिल्प हे घडताच दिसू लागते; पण नाटक हे प्रत्येक वेळी करून दाखवावे लागते. नाटक हे दृकश्राव्य असल्याने ते लिहिणारे, त्याचा प्रयोग करणारे, प्रत्यक्ष अभिनय करणारे, तंत्रज्ञ आणि तो प्रयोग पाहणारे अशा सगळ्यांच्या समन्वयावर आणि सहकार्यावर नाटकाच्या प्रयोगाची सफलता अवलंबून असते. नाटक हा कथा, कादंबरी, कविता याप्रमाणे एक साहित्यप्रकार आहे. यामध्ये अभिनेता किंवा अभिनेत्री अभिनय करत असतात. लेखकाने लिहिलेले संवाद अभिनेत्यांमार्फत प्रेक्षकांपर्यंत पोहोचवले जातात. मुळात नाटक हा 'दृकश्राव्य' साहित्यप्रकार आहे. ते ऐकता, पाहता व वाचता येते. नाट्यवाचनातून अन्य साहित्यप्रकारांप्रमाणे आपल्याला नाटकाचा आनंद घेता येतो. नाटक रंगमंचावर सादर करता येते.

भारतात प्राचीन काळापासून नाट्यकला अस्तित्वात होती. भरतमुनी यांना 'भारतीय नाट्यकलेचे जनक' असे म्हणतात. नाटकाविषयी सखोल माहिती करून देणारा 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यांच्या मते, 'नाटक हे मानवी जीवनातील निरनिराळ्या अवस्थांचे, घटनांचे, प्रसंगांचे, त्यांतील वेगवेगळ्या भाव-भावनांचे, वृत्ती-प्रवृत्तींचे व लोकव्यवहारांचे अनुकरण करणारे चित्रण आहे.'

'मानवी जीवनात अवतीभोवती घडणाऱ्या अनेक नाट्यमय प्रसंगांतून, घटनांमधून, जाणवणाऱ्या माणसामाणसांतील गुण-अवगुणांमधून त्यांच्यातील भावनांची आंदोलने, वास्तवाधारित परंतु काल्पनिक कथानकात

गुंफून, ते उत्तम संवादलेखनातून, दिग्दर्शकाच्या मार्गदर्शनाखाली, कलाकारांच्या अभिनयाद्‌वारे, तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रंगमंचावर प्रेक्षकांसमोर सादर करणे म्हणजे 'नाटक' होय.'

नाटक पाहणे म्हणजे फक्त
औट घटकेची करमणूक नाही.
कधी हसवणारा, सुखावणारा,
कधी रडवणारा, दुखावणारा,
कधी अंगावर धावणारा,
कधी सारं मन सोलवटणारा,
कधी बेभान करणारा,
कधी आपल्याच मनाचा तळ धुंडाळणारा,
असा हा नाटकाचा खेळ.

नाटक हा लेखक, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ यांच्या साहाय्याने रंगभूमीवर सादर होणारा आणि त्याचप्रमाणे नाट्यगृहात समूहाने एकत्रितरीत्या आस्वाद घेता येईल असा कलाप्रकार आहे. नाटक हे जीवनाचे चित्र असते आणि ते कलाकारांच्या माध्यमातून सादर केले जाते. डोळ्यांनी पाहायचे आणि कानांनी ऐकायचे म्हणून ही दृकश्राव्य कला आहे. नाटक हे सांघिक कार्य आहे.

**※ नाट्यसंहितेचे स्वरूप–** नाटकात महत्त्वाची असते ती संहिता! नाट्यसंहिता जितकी परिपूर्ण, दर्जेदार तितकेच नाटकाचे यश खात्रीलायक. शब्द आणि कथानक जितके सशक्त, तितके नाटक उंचीवर जाणार, हे निश्चित! एक कथाबीज घेऊन नाटककार त्याभोवती घटना व पात्र यांची गुंफण करतो. कथानकात नाटककार वैशिष्ट्यपूर्ण रचना करून नाटक रंगतदार करतो. यासाठी कथानक दमदार असावे लागते. समाजातील विविध स्तरांतील लोकांना जिव्हाळ्याचे वाटणारे विषय नाटककार मांडतो. सामाजिक स्थितीचे यथार्थ आणि रसपूर्ण दर्शन घडवणे हे नाटकाचे ध्येय असते. अशा स्थितीचे दर्शन घडवताना माणसांच्या मनोव्यापारांची दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. पात्रांच्या मनोव्यापाराच्या दर्शनासाठी नाटकातील स्वगताचा परिणामकारकपणे वापर केला जातो. त्यामुळे नाटकातील कथानकाला साजेशी पात्ररचना नाटककाराला करावी लागते. नाटकातील पात्रांचे असे शाब्दिक चित्रण करणे, की ज्यामुळे नाटकाचा तोल सांभाळला जाईल, ही जबाबदारीही नाटककाराला पार पाडावी लागते. कथानकातील आशयात संघर्षाशिवाय रंगत येत नाही. परस्परविरोधी स्वभावांतून, कृतींतून, भाव-भावनांच्या तणावातून संघर्ष निर्माण होऊ शकतो. भूमिकांच्या परस्पर नात्यातील संघर्ष, भूमिका व परिस्थिती यांतील संघर्ष यांमुळे नाटक परिणामकारकपणे वठते.

नाटकातील सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे संवाद! खटकेबाज, चुरचुरीत, नर्मविनोदी संवाद नाटकाची रंगत वाढवतात. नाट्यविषयाला साजेसे संवाद नाट्यकृतीतील आशय योग्य पद्‌धतीने प्रेक्षकांपर्यंत पोहोचवतात. संवादफेकीमुळे नाटकाचा बाज प्रेक्षकांना कळतो. संवाद, रंगसूचना व स्वगत या त्रयींनी नाट्यसंहिता तयार होते. कथानकातील प्रसंगबदल, दृश्यबदल, बदललेला काळ इत्यादी संबंधीची सूचना नाटककार कंसातील रंगसूचनांमधून देतो. त्यामुळे कथानकाचे अस्पष्ट दुवे जोडले जाऊन संदर्भ स्पष्ट होतात आणि कथानकाचा प्रवाह सहजतेने पुढे जात राहतो. आशयाला साजेशी भाषाशैली संपूर्ण नाट्यकृतीला उठाव देते. त्यांतील भाषिक सौंदर्य एकूण नाटकाला एक उंची देते.

**※ नाटक या साहित्यप्रकाराचे वेगळेपण–** मानवाने मनोरंजनासाठी, आत्मिक समाधानासाठी ललितकलांचे विश्व निर्माण केले. ज्या समाजात 'नाटक' हा साहित्यप्रकार उदयास आला, त्या समाजात राहणाऱ्या लोकांच्या भावभावना नाटकातून प्रकट झाल्या. त्यामुळे 'नाटक' हा साहित्यप्रकार 'विषयांच्या' दृष्टीने समृद्‌ध होत गेला.

ज्ञान आणि मनोरंजन यांबरोबरच प्रेक्षक स्वत:च्या अनुभवांचे नाटकात घडणाऱ्या प्रसंगांशी नाते जोडत असतो. त्यामुळे त्याला ते आपले वाटते.

कथा, कादंबरी, नाटक या सर्वच साहित्यप्रकारांत समाजाची समकालीन चित्रे रेखाटण्याचे सामर्थ्य असते; परंतु कथा, कादंबरी, कविता यांपेक्षा नाटक हा साहित्यप्रकार निराळा आहे. बाकीचे साहित्यप्रकार हे वाचकनिष्ठ आहेत. नाटक हा समूहाचा आविष्कार असतो. नाटकामध्ये संगीत, नृत्य, वक्तृत्व, अभिनय, नेपथ्य, काव्य, चित्रकला अशा बहुतेक सर्व कलांचा समावेश होतो. कथा आणि कादंबऱ्यांमध्ये फक्त लेखक आणि वाचक हे दोन घटक असतात. पण नाटकामध्ये मात्र लेखकाचे शब्द नट संवादांच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत असतो.

विष्णुदास भावे यांनी लिहिलेले 'सीतास्वयंवर' हे आधुनिक मराठी नाटकांतील कालमानदृष्ट्या पहिले नाटक! एक सरळ पौराणिक गोष्ट सांगणारे हे नाटक १८४३ सालचे! त्याचप्रमाणे १८५५ साली महात्मा फुले यांनी लिहिलेली 'तृतीय रत्न' ही लिखित स्वरूपातील पहिली नाट्यसंहिता होय. त्यापूर्वी लळीत, गोंधळ, कीर्तन, पोवाडे, दशावतार, तमाशे अशा अनेक कला महाराष्ट्रात नांदत होत्या, ज्या नाटक या साहित्यप्रकाराच्या उदयास पूरक ठरल्या.

### संगीत नाटक

अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या 'संगीत शाकुंतल' व 'संगीत सौभद्र' या नाटकांद्‌वारे 'संगीत नाटक' कलात्मक पातळीपर्यंत पोहोचले. भाषासौष्ठव, पात्र हाताळणी, नाट्यमयता आणि नाट्यतंत्र, सहजसोपे स्वाभाविक संवाद अशा सगळ्या बाबतीत या नाटकांनी एक मापदंड तयार केला. त्यातही सर्वात अधिक महत्त्वाचा होता तो त्यातला संगीताचा वापर!

### संगीत नाटकाचे स्वरूप व वैशिष्ट्ये

(१) मनोरंजनातून सामाजिक प्रश्नांवर 'बोट' ठेवले जाते.
(२) रसिक प्रेक्षकांना डोळ्यांसमोर ठेवून संगीत नाटकाची रचना केलेली असते.
(३) संवाद तुलनेने कमी असतात.
(४) अभिनय आणि संगीत यांतून रसिकांना खिळवून ठेवण्याची क्षमता असते.
(५) संगीत नाटकात शास्त्रीय संगीताचा भारदस्तपणा सांभाळणाऱ्या गाण्यांचा अंतर्भाव असतो.
(६) वैविध्यपूर्ण गाणी हे संगीत नाटकाचे वैशिष्ट्य असते.
(७) पदे ही आशयाला धरून व कथानकाला गती देणारी असतात.
(८) लोकगायकी व ख्यालगायकी यांचा उत्तम संयोग साधणारे संगीत हे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असते.
(९) गायकाला साथ-संगत करणाऱ्या कलावंतांचाही यांत मोठा वाटा असतो.
(१०) आजही मराठी नाटकांच्या इतिहासातील एक वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणून 'संगीत नाटक' राष्ट्रीय पातळीवर ओळखले जाते.

१९११ सालच्या सुमारास कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी लिहिलेले 'संगीत मानापमान' हे नाटक खूप लोकप्रिय ठरले. बालगंधर्व यांच्या विनंतीवरून गोविंदराव टेंबे यांनी 'संगीत मानापमान' या नाटकाला संगीत दिले व ते प्रचंड लोकप्रिय झाले. यांतून संगीत नाटकात 'संगीत-दिग्दर्शक' ही संकल्पना उदयाला आली. संगीत नाटकांमुळे ख्यालगायकीची लोकप्रियता वाढली. त्या काळातील 'किर्लोस्कर नाटक मंडळी', 'बळवंत नाटक मंडळी', 'बालगंधर्व नाटक मंडळी' या व अशा अनेक नाटक मंडळींनी 'संगीत नाटक' समृद्‌ध केले.

> बालगंधर्व, दीनानाथ मंगेशकर, भार्गवराम आचरेकर, जितेंद्र अभिषेकी व शौनक अभिषेकी, वसंतराव देशपांडे, जयराम शिलेदार व जयमाला शिलेदार, आनंद भाटे, राहुल देशपांडे, महेश काळे या व अशा अनेक नट-गायकांनी संगीत नाटकांची परंपरा जपली.

नाटक रंगभूमीवर सादर होण्याच्या अगदी प्रारंभीच्या काळात अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांसारखे सामाजिक अडसर होते. तत्कालीन सामाजिक वातावरण पोषक नसल्यामुळे नाटकात काम करण्यासाठी स्त्रिया तयार नसत. नाटकातील स्त्री व्यक्तिरेखा या पुरुष पात्राद्वारे साकारल्या जात असत. तसेच त्याकाळात नाट्य कलावंतांना म्हणावी तशी प्रतिष्ठा नव्हती. अशा परिस्थितीत बालगंधर्वांनी साकारलेल्या स्त्री व्यक्तिरेखा मात्र आजही अजरामर ठरल्या आहेत.

आजच्या काळात करमणुकीचे विविध पर्याय उपलब्ध असतानाही नाटक 'जिवंत' राहिले आहे. त्याच्या सादरीकरण-स्वरूपात काळानुसार बदल होत गेले. 'रात्र-रात्र' चालणारी संगीत नाटके आणि त्या नाटकाशी तादात्म्य पावणारे प्रेक्षक हे चित्र आता बदलले असले तरी नाट्यरसिकांची संख्या आजही लक्षणीय आहे.

### प्रायोगिक नाटक

जागतिकीकरणाच्या रेट्यात काळ बदलला. प्रसारमाध्यमांचा पगडा वाढला. फुरसतीचा वेळ कमी झाला. करमणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध झाले. आर्थिकदृष्ट्या या नाटकांचे प्रयोग करणे तुलनेने खर्चिक झाले. त्याचे तिकिटाचे दरही सर्वसामान्य लोकांना परवडेनासे झाले. या व यांसारख्या अनेक कारणांमुळे संगीत नाटक मागे पडत गेले व प्रायोगिक आणि व्यावसायिक नाटकांची सुरुवात झाली.

प्रायोगिक नाटकाचा मुख्य हेतू नाटकाचा विषय आणि सादरीकरण यात प्रयोग करणे हा असतो. प्रायोगिक नाटकेही व्यावसायिकरीत्या केली जाऊ शकतात. मनाशी काही हेतू धरून आशयात व अभिव्यक्तीत जाणीवपूर्वक प्रयोग करत राहणे प्रायोगिक नाटकात अपेक्षित असते. नाट्यवाङ्मयात १९६० नंतर प्रायोगिकता आली असे मानले जाते.

### प्रायोगिक नाटकाचे स्वरूप व वैशिष्ट्ये

(१) नाटकाची विशिष्ट चौकट मोडण्याचा प्रयत्न प्रायोगिक नाटकात केला जातो.
(२) आकृतिबंधात नावीन्य असते.
(३) आशय/अभिव्यक्तीत स्वातंत्र्य घेतले जाते.
(४) स्थळ, काळ, रचना, नेपथ्य, अभिनय, तंत्र यांत जाणीवपूर्वक बदल घडवलेला असतो.
(५) नाट्यबीज, नाट्यविषय, आशय व रचना तसेच नाट्यप्रयोग, नेपथ्य यांमध्ये पारंपरिक नाटकापेक्षा काहीसे वेगळेपण प्रायोगिक नाटकात जाणवते.
(६) प्रायोगिक नाटकात प्रतीकात्मकता, अपरिचित सूचकता यांचा खुबीने वापर केलेला आढळून येतो.
(७) भाषिक प्रयोग केले जातात. घटना सहज व नैसर्गिक राखण्याचा प्रयत्न केला जातो.
(८) या नाटकांमधील संवादाची भाषा बरेचदा बोलीभाषेसारखी असते.
(९) प्रायोगिक नाटकात आशयानुरूप येणाऱ्या प्रसंगांवर भर दिलेला असतो.
(१०) प्रायोगिक नाटकात 'आपल्याला वाटणारे आपल्या पद्धतीने' मांडायचे धाडस असते.

'रिंगणनाट्य' (लेखक व दिग्दर्शक- अतुल पेठे, राजू इनामदार) हे प्रायोगिक नाटकाचे अलीकडच्या काळातील ठळक उदाहरण देता येईल.

### व्यावसायिक नाटक

एकोणिसाव्या शतकात मराठी रंगभूमी लोकाश्रयावर उभी राहिली. काही अपवाद वगळता अन्य भारतीय भाषांमध्ये व्यावसायिक रंगभूमी नाही. व्यावसायिक मराठी रंगभूमीला शतकाहून अधिक काळची परंपरा आहे. लोकरंजन व लोकप्रबोधन या दोन्ही स्तरांवर मराठी रंगभूमी 'नाटक' या साहित्यप्रकाराच्या माध्यमातून प्रगल्भ होत आहे.

केवळ व्यावसायिक हेतूने लिहिले जाते व तोच हेतू समोर ठेवून त्याचा नाट्यप्रयोग केला जातो. प्रेक्षकांना आवडेल 'ते' व 'तसे' देण्याचा प्रयत्न व्यावसायिक नाटकांतून केला जातो. समाजातील ज्वलंत समस्या घेऊन, वेगवेगळे विषय हाताळून अनेक व्यावसायिक नाटकांची निर्मिती झाली.

**व्यावसायिक नाटकाचे स्वरूप व वैशिष्ट्ये**

(१) व्यावसायिक नाटकाच्या माध्यमातून सामाजिक समस्या मांडल्या जातात.

(२) व्यावसायिक नाटकांचे स्वरूप मुख्यत: बोधपर व मनोरंजनपर असते.

(३) गंभीर विषयावरील नाटक पाहतानासुद्धा प्रेक्षकांच्या मनावरचा ताण कमी व्हावा याची काळजी व्यावसायिक रंगभूमी घेते.

(४) नाटक आणि प्रेक्षक यांच्यात एक नाते निर्माण होते.

(५) व्यावसायिक नाटकांचा भर कौटुंबिक, सामाजिक, पौराणिक आणि ऐतिहासिक अशा विषयांवर असतो.

(६) प्रेक्षकांच्या अभिरूचीनुसार व्यावसायिक नाटकाची मांडणी केलेली असते.

(७) विनोद, उपहास, श्लेष, शाब्दिक कोट्या याद्‍वारे प्रेक्षकांचे मनोरंजन होईल असे संवाद व्यावसायिक नाटकात असतात.

(८) व्यावसायिक नाटकाच्या निर्मितीमागे बोध, रंजन, प्रेक्षकानुनय या प्रेरणांबरोबरच प्राधान्याने व्यावसायिक हेतू असतात.

'ऑल दि बेस्ट' (लेखक व दिग्दर्शक- देवेंद्र पेम) या नाटकात गंभीर विषयाची मांडणी विनोदी अंगाने केल्यामुळे व्यावसायिकदृष्ट्या हे नाटक यशस्वी ठरले.

विष्णुदास भावे यांनी १८४३ साली 'सीतास्वयंवर' नाटकाचा प्रयोग केला. मराठीतील श्रेष्ठ संगीत नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी या नाट्यपरंपरेला गती दिली. कालपरिवर्तनाला सामोरे जात ती परंपरा अखंडपणे चालू राहिली. मराठीतील काही प्रमुख नाटककार व त्यांच्या काही नाट्यकृतींची नावे खालीलप्रमाणे आहेत.

गोविंद बल्लाळ देवल (संगीत शारदा, संगीत संशयकल्लोळ)

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर (वीरतनय, मूकनायक)

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर (कीचकवध, भाऊबंदकी)

राम गणेश गडकरी (प्रेमसंन्यास, भावबंधन, एकच प्याला)

वि. दा. सावरकर- (संगीत सन्यस्त खड्ग, संगीत उत्तरक्रिया)

प्र. के. अत्रे (साष्टांग नमस्कार, मोरूची मावशी)

वसंत कानेटकर- (रायगडाला जेव्हा जाग येते, इथे ओशाळला मृत्यू)

वि. वा. शिरवाडकर- (नटसम्राट, वीज म्हणाली धरतीला)

पु. ल. देशपांडे- (सुंदर मी होणार, ती फुलराणी)

विजय तेंडुलकर- (घाशीराम कोतवाल, सखाराम बाईंडर)

दत्ता भगत- (वाटा पळवाटा, खेळिया)

प्रेमानंद गज्वी- (किरवंत, छावणी)

जयवंत दळवी- (महासागर, बॅरिस्टर)

इरावती कर्णिक- (गाशा, बाळकडू)

मनस्विनी लता रवींद्र- (अमर फोटो स्टुडिओ, अलविदा)

इत्यादी, इत्यादी ........

## नाट्यप्रयोग-सांघिक कलाविष्कार

नाट्यप्रयोग आशयाच्या व प्रयोगाच्या दृष्टीने 'देखणा' होण्यासाठी अनेकांचे एकत्रित प्रयत्न महत्त्वाचे ठरतात. कलावंतांचा अभिनय, नेपथ्य, संगीत, प्रकाश योजना दृश्य स्वरूपात जाणवते; पण लेखक आणि पडद्यामागचे कलाकार या बाबी यांचेही योगदान लक्षणीय असते.

❊ **दिग्दर्शक–** नाट्यप्रयोगात दिग्दर्शकाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. नाटकाचा तंत्राच्या बाजूने व कलात्मक बाजूने दोन्ही पातळींवर दिग्दर्शकाने केलेला एकात्मिक विचार महत्त्वाचा ठरतो. नृत्य, अभिनय, संगीत, चित्र इत्यादी कलांचीही पुरेशी माहिती दिग्दर्शकास असणे आवश्यक असते. नाटकाच्या सादरीकरणाचा सर्वांगीण विचार केल्यानंतर संहितेवर तशा नोंदी करणे, तंत्रज्ञ–कलावंत यांना तशी कल्पना देणे हे दिग्दर्शकाचे काम असते.

❊ **नेपथ्यकार–** नाटकाच्या कथानकाला साहाय्यभूत ठरेल अशी रंगमंचावरील वातावरणनिर्मिती म्हणजे नेपथ्य! हे नेपथ्य करणारा तो नेपथ्यकार! नाटकातील स्थळ, काळ, कथानक यादृष्टीने आवश्यक असणाऱ्या वस्तूंची मांडणी नेपथ्यकार करतात. दृश्यांना, संवादांना अनुकूल अशी रचनाही नेपथ्यकार करतात. दृश्यांना योग्य असे पडदे, कथानकातील स्थळकाळाला सुसंगत ठरतील अशा वस्तू, नटांचा कपडेपट, विग्ज, झालरी, प्रकाश योजना व पोषक संगीत इत्यादी सर्व घटकांचा समावेश नेपथ्यात असतो.

❊ **प्रकाश योजना–** रंगभूमीवर प्रकाश योजनेसाठी निरनिराळी साधने वापरली जातात. स्पॉटस्, फ्लडलाइटस्, फूटलाइटस् या सर्वच प्रकारच्या दिव्यांचा प्रकाश कमी–अधिक करण्यासाठी जे विद्युत उपकरण वापरले जाते त्यास 'डीमर' म्हणतात. डीमरच्या मदतीने रंगभूमीवर संपूर्ण काळोख करता येतो. प्रवेशबदलाची सूचना या प्रकाश योजनेतून मिळू शकते.

❊ **पार्श्वसंगीत–** नाटकातील पार्श्वसंगीत हे कथानकातील प्रसंगानुरूप, पात्रांच्या मन:स्थितीला अनुसरून, नाटकाला गती देण्यासाठी, वातावरणनिर्मितीसाठी वापरले जाते. 'लेकुरे उदंड जाहली', 'एका लग्नाची दुसरी गोष्ट' अशा काही नाटकांतील पार्श्वसंगीत लक्षणीय ठरले आहे.

❊ **रंगभूषा–** खूप अंतरावर बसणाऱ्या प्रेक्षकांना नटांचा चेहरा व्यवस्थित दिसतोच असे नाही. नटांच्या चेहऱ्यावरील अभिनय नीट दिसावा यासाठी नाटकात रंगभूषेला महत्त्व आहे. नाटकातील व्यक्तिरेखेचे वय, स्वभाव, लकबी इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन नाटकाच्या एकात्म परिणामासाठी नटाचे शरीर व चेहरा रंगवणे म्हणजे रंगभूषा होय. नाट्यप्रयोगाच्या सादरीकरणात रंगभूषेबरोबरच वेशभूषा व केशभूषा या घटकांना विशेष महत्त्व आहे.

❊ **अभिनय–** नाटककाराने नाटकात निर्माण केलेल्या काल्पनिक व्यक्तिरेखा नाट्यकलावंत आपल्या संवादातून, शब्दफेकीतून, आवाजातील चढ–उतारातून, हावभावातून म्हणजेच आपल्या अभिनयातून जिवंत करतात.

❊ **समारोप**

'नाटक' या साहित्यप्रकाराचे स्वरूप व त्याचा इतिहास यांची व्याप्ती खूप मोठी आहे. या टप्प्यावर या साहित्यप्रकाराची तोंडओळख व्हावी हा प्रमुख हेतू आहे.

'नाटक' जेव्हा आपण फक्त 'प्रेक्षक' या नात्याने बघतो तेव्हा 'नाटकामागील' यंत्रणांची जाणीव आपल्याला होतेच, असे नाही. आपण फक्त नाट्यप्रयोगाचा आस्वाद घेतो. एक 'दृकश्राव्य साहित्यप्रकार' म्हणून 'नाटक' या घटकाचा अभ्यास केल्यावर आपण अधिक समजपूर्वक, विविधांगी दृष्टिकोनांतून अधिक सजगपणे नाट्यप्रयोगाचा आस्वाद आणि आनंद घेऊ शकू.

**(१) योग्य पर्याय निवडा.**

**(अ) ........... हे प्रयोगक्षम साहित्यप्रकार आहेत.**

(१) नाटक, कथा
(२) नाटक, एकांकिका
(३) नाटक, काव्य
(४) नाटक, ललित

**(आ) नाटकाची लोकसंपर्क ही महत्त्वाची बाजू आहे कारण···**

(१) अभिनय करणारा उपस्थित असतो.
(२) नाटकामुळे प्रेक्षकांशी जिवंत संपर्क घडतो.
(३) नाटकाची जाहिरात होते.
(४) नाटकाची संहिता वाचता येते.

**(इ) नाटक ही दृकश्राव्य कला आहे कारण···**

(१) खूप पात्रे त्यात सहभागी असतात.
(२) डोळ्यांनी पाहून कानांनी ऐकता येते.
(३) दिग्दर्शक, कथालेखक, नेपथ्यकार असतो.
(४) नृत्य, नाट्य, संगीत यांचा आविष्कार असतो.

**(२) चुकीचे विधान शोधा.**

**(अ)** (१) अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी नाट्यपरंपरेला गती दिली.
(२) विष्णुदास भावे यांनी १८४३ साली 'सीतास्वयंवर' नाटकाचा प्रयोग केला.
(३) रसिक प्रेक्षकांना डोळ्यांसमोर ठेवून संगीत नाटकाची रचना केलेली नसते.
(४) संगीत नाटकातील पदे ही आशयाला धरून कथानकाला गती देणारी असतात.

**(आ)** (१) नाटकाचा प्रयोग म्हणजे औटघटकेची करमणूक.
(२) नाटकाचा प्रयोग म्हणजे अंतर्मुख करणारा.
(३) नाटकाचा प्रयोग म्हणजे मनाचा तळ धुंडाळणारा.
(४) नाटकाचा प्रयोग म्हणजे सारं मन सोलवटणारा.

**(इ)** (१) परस्परविरोधी स्वभावांतून संघर्ष निर्माण होतो.
(२) नाटकाच्या कथानकातील आशयाला संघर्षाशिवाय रंगत येते.
(३) भूमिकांच्या नात्यात परस्पर संघर्ष दाखवता येतो.
(४) भूमिका व परिस्थिती यांतील संघर्षामुळे नाटक परिणामकारक ठरते.

**(ई)** (१) नाटकात संहिता महत्त्वाची असते.
(२) नाट्यसंहिता परिपूर्ण असावी.
(३) नाट्यसंहिता दर्जेदार असावी.
(४) नाटकात संहितेला फारसे महत्त्व नसते.

### (३) (अ) फरक स्पष्ट करा.

(१)

| प्रायोगिक नाटक | व्यावसायिक नाटक |
|---|---|
| | |
| | |
| | |

(२)

| नाटक | इतर साहित्यप्रकार |
|---|---|
| | |
| | |

### (आ) खालील कृती करा.

(१) मराठी रंगभूमी प्रगल्भ होण्याचे दोन स्तर

(२) नाटक या साहित्यप्रकाराच्या उदयास पूरक ठरणाऱ्या कला

(३) नाट्यकलेची वैशिष्ट्ये

(४) नाटकातील संवादाची वैशिष्ट्ये

### (इ) खालील घटना/कृती यांचा परिणाम लिहा.

| घटना/कृती | परिणाम |
|---|---|
| (१) एखाद्या प्रसंगात कल्पनेपलीकडील बदल आकस्मिकरीत्या होतो. | |
| (२) नाट्यसंहितेचे परिपूर्ण व दर्जेदार लेखन | |
| (३) नाटकात संघर्ष असला तर | |

### (४) स्वमत.

(अ) 'नाटक म्हणजे सांघिक कलाविष्कार आहे', या विधानासंबंधी तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.

(आ) तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(१) नाटकाचे नेपथ्य

(२) नाटकातील प्रकाशयोजनेचे महत्त्व

(३) नाटकातील संवाद

(४) नाटक अनेक कलांचा संगम

(५) प्रारंभीच्या काळातील नाटकातील स्त्री व्यक्तिरेखा

(इ) 'नाटक हा समाजाचे यथायोग्य दर्शन घडवणारा प्रयोगक्षम साहित्यप्रकार आहे', या विधानाचा अर्थ स्पष्ट करा.

(ई) संगीत नाटकाचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(उ) नाट्यसंहिता लिहिण्यासाठी आवश्यक अशा पूर्वतयारीच्या घटकांसंबंधी तुमचे मत स्पष्ट करा.

(ऊ) व्यावसायिक नाटकाचे स्वरूप व वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**(५) अभिव्यक्ती.**

(अ) 'नाटक हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मय प्रकारांपेक्षा वेगळा आहे', हे विधान स्पष्ट करा.

(आ) विद्यार्थ्याला मिळालेल्या शालान्त परीक्षेतील उज्ज्वल यशाबाबत विद्यार्थी-शिक्षक-पालक यांच्यातील संवाद लिहा.

# १. हसवाफसवी

**दिलीप प्रभावळकर (१९४४) :**

मराठी व हिंदी चित्रपट अभिनेते, लेखक. 'झपाटलेला', 'चौकट राजा', 'एक डाव भुताचा' या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका लोकप्रिय. 'अवतीभवती', 'कागदी बाण', 'गुगली', 'चूकभूल द्यावी घ्यावी', 'बोक्या सातबंडे' (भाग १ ते ३), 'हसवाफसवी' हे लेखन प्रसिद्‌ध. 'बोक्या सातबंडे' या पुस्तक मालिकेसाठी 'बालसाहित्य पुरस्कार', संगीत नाटक अकादमीचा राष्ट्रीय पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

'हसवाफसवी' ही दिलीप प्रभावळकर यांनी लिहिलेली नाट्यसंहिता आहे. हा एक आगळावेगळा, निखळ आणि निर्भेळ करमणुकीचा नाट्यप्रयोग आहे. हे नाटक वाचताना, त्याचा नाट्यप्रयोग बघताना प्रेक्षक हसतात व गंभीर आणि अंतर्मुखही होतात.

नाटकात, एकेकाळचे गायक-नट असलेले कृष्णराव हेरंबकर यांच्या सत्काराचा प्रसंग आहे. ते आपल्या कोकणातल्या गावाहून सपत्नीक येणार आहेत-यायला निघाले आहेत-येत आहेत-आले आहेत, असा टप्प्याटप्प्याने हा प्रवास आहे. या कार्यक्रमाचे धांदरट संयोजक वाघमारे, त्यांची स्मार्ट साहाय्यक मोनिका, चिमणराव, प्रिन्स, नाना आणि दीप्ती अशी पात्ररचना मूळ नाटकात आहे. अफलातून कल्पना, विसंगती, संवाद व शाब्दिक कोट्या यांमुळे नाटकातील प्रसंग रंगतदार झाले आहेत. या नाटकाच्या प्रयोगांना नाट्यरसिकांची दाद मिळाली आहे.

या नाटकातील उतारा खाली दिलेला आहे. संपूर्ण नाटक मिळवून अवश्य वाचा व संधी मिळाल्यास नाट्यप्रयोग जरूर पाहा.

**मोनिका** : (घाईघाईत येऊन उभी राहते.) रसिक हो, जुन्या बालगोविंद नाटक मंडळीतले ज्येष्ठ नट कृष्णराव हेरंबकर यांचा सरकारतर्फे उद्या मानपत्र देऊन सत्कार होणार आहे; पण त्यापूर्वी होणाऱ्या आजच्या या घरगुती समारंभाला येण्याची विनंती आम्ही त्यांना केली आणि आमच्या विनंतीला मान देऊन अंबुर्डी गावाहून आपल्या पत्नीसह आजच इथे यायची तसदी त्यांनी घेतली. त्यांचा आपण शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करूया आणि त्यांच्याशी थोडी बातचीत करूया. (कृष्णराव येतात. सोबत वाघमारे. संजय फोटो काढण्यासाठी येतो. कृष्णराव फोटोच्या फ्लॅशलाइटने दचकतात. तो निघून जातो. वाघमारे श्रीफळ देतात. कृष्णराव श्रीफळ घेऊन कानाशी हलवून बघतात. शाल पांघरताना घोळ, कृष्णराव गुरफटले जातात. एकदाची शाल पांघरली जाते.)

**कृष्णराव** : थैली देणार होतात आणि येण्या-जाण्याचा खर्चसुद्‌धा करतो म्हणाला होतात. उद्या सरकारी सोहळा आहे तिथं मला प्रवासभत्ता देईन म्हणाले होते; पण तो मिळेपर्यंत मी कोण जाणे कुठं असेन... तुम्हीच द्या. मला नकोय... माझ्या पत्नीकडे द्या... ती तिथं बसलीय... आमच्या अंबुर्डीहून कुंदनपूरला टांग्यानं आलो. तिथून एस. टी. नं पुण्याला. पुण्याहून ट्रेननं मुंबईला... कर्जत आणि ठाणामार्गे, (वाघमारे हळूच आत सटकतात.) हे चाललेत कुठे पळून? सांगतोय कोणाला? कोणी आहे का इथं कमिटीपैकी?

**मोनिका** : हो हो, मी आहे.

**कृष्णराव** : एकूण दोनशे पंचावन्न रुपये साठ पैसे झाले खर्च.

**मोनिका** : बरं, आम्ही देऊ तुम्हांला...

**कृष्णराव** : तुझं नाव काय मुली?

**मोनिका** : मोनिका.

**कृष्णराव** : तर बरं का मनुका-

**मोनिका** : मोनिका.

**कृष्णराव** : दोन्हींचा अर्थ तोच. ते तेवढे पैसे लवकर देऊन टाकायला सांग. (संजय फोटो काढण्यासाठी येतो. कॅमेऱ्याकडे बघायला सांगतो.) आल्यापासून काय चालवलंय काय? डावीकडे बघा उजवीकडे बघा... (तो फोटो काढतो. फ्लॅशच्या प्रकाशामुळे कृष्णराव चिडतात.) मारीन त्याला. (तो पळतो.) अहो विचारत नाही, सांगत नाही. येऊन आपला लाइट

मारतो डोळ्यांवर म्हणजे काय? मला सहन होत नाही. माझं ऑपरेशन झालंय ना मोतीबिंदूचं. मला डॉक्टरांनी सांगितलंय, प्रखर उजेडाकडे बघू नका म्हणून. याची काय पद्धत झाली का मला सांगा! मला पाहुणा म्हणून बोलवता आणि आल्यापासून माझा छळ करता? एक थोतरीत लावून देईन त्याच्या सांगतो. लाइट मारतो गधडा.

**मोनिका** : नाही... पुन्हा नाही येणार. कृष्णराव, आपण मध्येच कुठे उतरलात? आम्ही वाट पाहत होतो आपली.

**कृष्णराव** : काय करणार? गाडीमध्ये माझा एक चाहता भेटला. आधी तुम्ही कोण, आम्ही कोण असं सगळं बोलणं झाल्यावर, मी कृष्णराव हेरंबकर आहे असं कळल्याबरोबर त्याला हर्षवायू झाला. माझ्या पाया पडला तो. लोटांगण घातलंन... भर ट्रेनमध्ये. ट्रेनमध्ये जागा कुठे असते? बसायला जागा नसते. हा आडवा झाला. त्याचे पाय लागले दोन गुजराती बायकांना. त्यांच्या हातातलं फरसाण, पापडी सांडलं खाली... ओरडल्या त्या, नाकातोंडात मसाल्याचं फरसाण गेल्यावर...

**मोनिका** : तुम्हांला चमत्कारिक झालं असेल नाही?

**कृष्णराव** : नाही. कुठल्याही कलाकाराला त्याचा चाहता भेटल्यावर किती आनंद होतो म्हणून सांगू! तो मला काय म्हणे, तुम्ही माझ्या कर्जतच्या घरी चला. पायधूळ झाडा. त्याशिवाय मी तुमचे पाय सोडणार नाही. घट्ट धरून ठेवले माझे पाय. आमची ही मला म्हणाली, अहो हो म्हणा, हो म्हणा. तो पायाला धरून गदागदा, गदागदा हलवत होता. आमच्या हिला भीती-मी खाली पडेन आणि कंबरेचं हाड मोडेल म्हणून...

**मोनिका** : ही म्हणजे जबरदस्तीच झाली, नाही?

**कृष्णराव** : प्रेमाची जबरदस्ती. तो मला म्हणाला माझ्याकडे जुनी डॉज गाडी आहे. मी तुम्हांला सोडतो वेळेवर मुंबईला, पण तुम्ही चला कर्जतला. म्हटलं बाबा मी येतो. तू अगोदर माझे पाय सोड. त्यानं बरं का, वडिलांच्या मांडीवर बसून माझी नाटकं पाहिली होती हो. कधी वडिलांच्या, कधी आईच्या, कधी मानलेल्या मावशीच्या, कधी स्वयंपाकीणकाकूच्या; पण नेहमी मांडीवर बसून... असते एकेकाला आवड, आपण काय करणार! तर तो मला आणि आमच्या हिला घेऊन गेला कर्जतच्या बंगल्यावर आणि दोघांना ओवाळलंन. निघताना भेट म्हणून बंगल्याच्या बागेत लावलेली कोथिंबीर दिली. एकवीस जुड्या.

**मोनिका** : एकवीस जुड्या कोथिंबीर? आहे कुठे ती?

**कृष्णराव** : मी त्या कोंबड्यांच्या गाडीत बसून आलो ना, त्या डांबीस कोंबड्यांनी खाल्लंन सगळं चोची मारून मारून...

**मोनिका** : तुम्ही तयार कसे झालात कोंबड्यांच्या गाडीत बसायला?

**कृष्णराव** : काय करणार? माझ्या चाहत्याची ती जुनी डॉज गाडी वाटेत बंद पडली. एक-एक टायर पंक्चर होत गेलं. ड्रायव्हरला कळलंच नाही. त्याला वाटलं, रस्ते खराब म्हणून गाडी तिरकी चाललीये. पंक्चर झाल्याचं त्याला कळलंच नाही. शेवटी चारही टायर्स फ्लॅट झाले, तेव्हा मी खाली उतरलो. शेतातल्या घरामध्ये गेलो. आमच्याबरोबर कोण होता तो बाळू का काळू.

**मोनिका** : बाळू...

**कृष्णराव** : हां, त्यानं मग रस्त्यावर अंगठा की करंगळी दाखवून गाडी थांबवली.

**मोनिका** : त्रास नाही ना झाला कोंबड्यांबरोबर प्रवास करताना?

**कृष्णराव** : नाही कसा झाला? नाकातोंडामध्ये पिसं गेली ना कोंबड्यांची! कानाकडे कलकलाट चालला होता कोंबड्यांचा. डोकं उठलं माझं. आमची ही मात्र खूश होती. प्रवासभर गप्पा मारत होती. कोंबड्यांबरोबर.

**मोनिका** : कोंबड्यांबरोबर गप्पा?

**कृष्णराव** : तिला सवय आहे. गावाला बोलते–पशुपक्ष्यांशी. कावळे, चिमण्या, कुत्री, मांजरं, गाई, म्हशी यांच्याशी संवाद चालतात. तशा तिच्या गप्पा चालल्या होत्या. अरे माझ्या बाबा... तो अपघात होईपर्यंत.

**मोनिका** : नशीब चांगलं म्हणून सहीसलामत वाचलात तुम्ही अपघातातून.

**कृष्णराव** : देवाची कृपा आणि तुमच्या सगळ्यांच्या प्रेमाचं पुण्य माझ्या गाठीशी आहे, म्हणून आम्ही दोघं वाचलो. कोंबड्या मात्र बऱ्याच मेल्या. म्हणजे, नाहीतरी नंतर मारणार होते त्यांना... तासभर आधी मेल्या.

**मोनिका** : कृष्णराव, खूप आनंद झाला आपण इथे आलात म्हणून. पत्नींना स्टेजवर नाही आणलंत?

**कृष्णराव** : नको, तिला सवय नाही. लोकांसमोर घाबरी होते ती. शिवाय प्रखर दिव्यांचीसुद्धा भीती वाटते तिला. तिला कंदिलाची सवय गावाला... आमची गोष्ट वेगळी आहे. आम्ही नट मंडळी. आम्हांला कुठल्याही दिव्याचं काही वाटत नाही. तो मघाचा फोटोचा दिवा मात्र सहन होत नाही. तो फाजील कार्टा इथे आला तर त्याला कानपटीन सांगतो.

**मोनिका** : पुन्हा नाही येणार तो. कृष्णराव, आम्ही काही आपल्या भूमिका पाहिलेल्या नाहीत. आपल्या भूमिकांविषयी सांगा ना आम्हांला.

**कृष्णराव** : (हातातली काठी माईक समजून) सांगतो हं. भूमिका तशा मी खूप केल्यात. हॅलो हॅलो (चूक लक्षात येते. काठी बाजूला करून) गडकऱ्यांच्या, खाडिलकरांच्या, देवलांच्या नाटकात. पण माझी विशेष गाजलेली भूमिका म्हणजे–कृष्णाची.

**मोनिका** : सौभद्र मधली...

**कृष्णराव** : हो. सौभद्र नाटकातला कृष्ण. अहो, त्यावरून मला कृष्णराव नाव पडलं. गोपाळ गणेश आगरकरांनी दिलं. म्हणजे टिळकांनी नारायण राजहंसाला बालगंधर्व नाव दिल्याचं आगरकरांना कळलं. दोघांमध्ये मतभेद होते. ताबडतोब आगरकरांनी मला कृष्णराव नाव देऊन टाकलं. टिळकांना कळायच्या आत. 'सुधारक' पत्रामध्ये अग्रलेख लिहिला. लोकहो याला कृष्णराव म्हणा. माझं मूळचं नाव विठू.

**मोनिका** : सौभद्रचे किती प्रयोग केलेत?

**कृष्णराव** : इथे हिशेब कोणी ठेवलाय? लोकांचं रंजन करणं हा मुख्य हेतू. लोक अगदी मश्गूल होऊन जायचे पहाटेपर्यंत. एकेका गाण्याला सहा–सहा वेळा वन्समोअर घेत असे मी. रुक्मिणीची भूमिका करणारा आमचा पांडू शिवलीकर, एकदा एका पायावर तर एकदा दुसऱ्या पायावर असा ताटकळत उभा... टोचायचा मला मागून. पुरे, पुरे, किती गातोस. किती गातोस म्हणून. (हसतात.)

**मोनिका** : आता सध्या काय करता?

**कृष्णराव** : ह्या वयात दुसरं काय करणार? आत्मचरित्र लिहितोय!

**मोनिका** : नाव दिलंत?

**कृष्णराव** : हो दिलं ना. आत्मचरित्राचं नाव–एक झाड दोन कावळे.

**मोनिका** : प्रकृती कशी आहे?

**कृष्णराव** : कुणाची, कावळ्यांची?

**मोनिका** : नाही, आपली.

**कृष्णराव** : उत्तम आहे. ह्या वयातसुद्धा ठणठणीत प्रकृती आहे माझी. आमच्या हिला विचारा. काय गं? आं? मी तुम्हांला सांगतो, मी पथ्य पाळतो म्हणजे, फक्त एक वेळ जेवतो... सकाळचा. दोन किंवा तीन फुलके. एक मूद भात.

**मोनिका** : आपल्या भूमिकांविषयी जरा–

**कृष्णराव** : ... आणि डाळ असते... मसूर किंवा तूर... भाजी... फळभाजी किंवा पालेभाजी करायला सांगतो.

**मोनिका** : आपली कृष्णाची भूमिका–

**कृष्णराव** : ... छोटी वाटी दही असतं.

**मोनिका** : ते असू दे... आम्हांला ऐकायला आवडेल आपल्या भूमिका–

**कृष्णराव** : ... संध्याकाळी नाचणीचं सत्त्व. रात्री झोपताना ताक किंवा पेज... ताकामध्ये हिंग टाकून घेतो आणि एक फळ मात्र रोज नेमानं खातो. फळ म्हणजे अगदी फणस किंवा कलिंगड नाही खात... केळं, अंजीर, लहान चिक्कू... काहीच मिळालं नाही, तर बोर किंवा करवंद खातो पण फळ खातोच.

**मोनिका** : वा छान...

**कृष्णराव** : मी चालतो मात्र खूप. तुम्हांला सांगतो, चालण्यासारखा दुसरा व्यायाम नाही. कधी–मधी हीसुद्‌धा येते बरोबर (समोर पाहून बायकोला) बैस. बैस. ती खुणा करतेय. पुरे पुरे म्हणून... मी स्वत:च्या आहाराबद्‌दल आणि दिनक्रमाबद्‌दल बोलतो ना, सगळीकडे बडबड करतो म्हणते–ते आवडत नाही तिला... मी बसलोय दाद द्यायला... तरुण मंडळींना कळायला हवं प्रकृतीचं रहस्य. काय मनुका ?

**मोनिका** : मोनिका...

**कृष्णराव** : दोन्हींचा अर्थ तोच. तर प्रकृतीचं रहस्य म्हणजे माफक आहार आणि चालणं. चालत राहणं. मी तुम्हांला सांगतो, अजूनसुद्‌धा. या वयात माझ्या अंगात इतका उस्सा–उस्ताह–उस्स्तह–काय झालंय, दात काढल्यामुळे फाफलायला होतंय. इतका. उ... उत्सा–उत्साह अंगात आहे, की अजून करू शकेन कृष्णाचं काम. हिंमत आहे... माझं पेटंट पद म्हणून दाखवू शकेन... प्रिये पहा.

**मोनिका** : म्हणा ना...

**कृष्णराव** : आं ?

**मोनिका** : म्हणून दाखवा ना...

**कृष्णराव** : अरे देवा, उगाच बोललो! नको नको पूर्वीसारखं होणार नाही. मस्करी केली... (ती आग्रह करते.) तुम्ही मंडळी आग्रह करता; मग आमच्यासारख्या म्हाताऱ्या कलाकाराला आपली कला दाखवायचा मोह आवरता येत नाही. बरं म्हणतो. सांभाळून घ्या. मंडळी गोड मानून घ्या. एकेकाळच्या वैभवाचे आता भग्नावशेष उरलेत... तुमच्याकडे पेटी तबला आहे का ?

**मोनिका** : हो, आहे ना, आहे. जरा त्यांना साथ द्या ना.

**कृष्णराव** : (आत बघून) माझी काळी एक आहे. पूर्वी काळी दोन होती... आता काळी एक... आवाज गेला, की काळी शून्य. कोण आहे पेटीला ?

**(आतून आवाज)** : पेटीला मी आहे गोविंदा.

**कृष्णराव** : कोण गोविंदा ?

**(आतून)** : गोविंदा पटवर्धन.

**कृष्णराव** : अरे कोण गोविंदा का ? किती मोठा झालास!

**(आतून)** : तुम्ही मला खांद्यावर खेळवलंय.

**कृष्णराव** : हो खेळवलंय... अरे केस पिकले की तुझे! याला एवढासा पाहिला होता हाफ चड्‌डीत. आणि तबल्याला कोण आहे ?

**(आतून)** : तबल्याला आपला शेखर आहे, खांबेटे.

**कृष्णराव** : छान! तरुण तरुण मंडळी पुढे येतायत. तुझ्या बोटांत जादू आहे बरं गोविंदा. गोविंदा सांभाळून घे रे. शब्दही सांभाळ आणि सूरही.

**(आतून)** : आणि ताल शेखरला सांभाळायला सांगतो.

**कृष्णराव** : म्हातारा कलाकार गातोय खूप दिवसांनी... (संगीत चालू होतं. कृष्णराव गाऊ लागतात.) प्रिये पहा... रात्रीचा समय सरूनि, येत उष:काल हा ।। प्रिये।।

## कृती

**(१) (अ) कृष्णराव हेरंबकर यांच्या मुंबईपर्यंतच्या प्रवासाचा ओघतक्ता तयार करा.**

कृष्णराव अंबुर्डी गावाहून निघाले.

↓

................................

↓

................................

↓

पुण्याहून कर्जतपर्यंत आले.

↓

................................

**(आ) कारणे लिहा.**

(१) फ्लॅशच्या प्रकाशाने कृष्णराव चिडतात कारण...

(२) कृष्णराव कोंबड्यांच्या गाडीत बसायला तयार झाले कारण...

**(२) थोडक्यात वर्णन करा.**

(अ) कृष्णराव यांच्या सत्काराचे स्वरूप.

(आ) कृष्णराव यांनी कर्जतपर्यंत केलेला प्रवास.

**(३) थोडक्यात लिहा.**

(अ) मुंबईला जात असलेल्या आगगाडीतील प्रसंग.

(आ) कृष्णराव यांच्या चाहत्याची प्रेमाची जबरदस्ती.

**(४) स्वमत.**

(अ) प्रस्तुत नाट्यउताऱ्यावरून कृष्णरावांचे व्यक्तिचित्र रेखाटा.

(आ) 'कंसातील मजकूर नाट्यउतारा समजण्यासाठी उपयुक्त ठरतो', तुमचे मत लिहा.

(इ) प्रस्तुत नाट्यउताऱ्यातील दिलीप प्रभावळकर यांच्या शाब्दिक विनोद निर्मितीची दोन वैशिष्ट्ये लिहा.

**(५) अभिव्यक्ती.**

(अ) मोनिका व कृष्णराव यांच्यातील संवादाची तुम्हांला समजलेली वैशिष्ट्ये लिहा.

(आ) कृष्णरावांच्या संवादातून स्पष्ट झालेली त्यांच्या पत्नीची स्वभाववैशिष्ट्ये लिहा.

(इ) 'पायधूळ झाडा. त्याशिवाय मी तुमचे पाय सोडणार नाही', या वाक्यांतील लक्ष्यार्थ स्पष्ट करा.

## २. ध्यानीमनी

**प्रशांत दळवी** (१९६१) :

प्रसिद्ध नाटककार व चित्रपट-कथालेखक. 'चारचौघी', 'ध्यानीमनी', 'चाहूल', 'सेलिब्रेशन', 'गेट वेल सून' ही नाटके आणि खिडक्या हा कथासंग्रह प्रकाशित. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा 'बालगंधर्व पुरस्कार', 'जयवंत दळवी पुरस्कार', 'दगड का माती' या प्रायोगिक नाटकाच्या नाट्यलेखनासाठी 'नाट्यदर्पण पुरस्कार' अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

'ध्यानीमनी' हे अगदी वेगळ्या समस्येचे चित्रण करणारे व्यावसायिक रंगभूमीवरील एक दर्जेदार नाटक आहे. ठिकठिकाणी आढळणाऱ्या व सर्वांचे लक्ष असूनही एरवी दुर्लक्षित असलेल्या अपत्यहीनतेच्या समस्येचा घेतलेला कलात्मक आणि मानसशास्त्रीय वेध हे या नाटकाचे बलस्थान आहे.

अपत्यहीन स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन, त्यामधून त्या स्त्रीच्या मनात उठणारी भावनिक आंदोलने, त्यातून तिच्या संसारात उभे राहणारे मानसिक वादळ, त्यामध्ये तिचा पती सदाचे असणारे तटस्थ सहकार्य आणि मोहितबाबतची वस्तुस्थिती पटवून देण्याचा डॉ. समीरचा प्रयत्न हा या नाटकाचा विषय आहे.

सदानंद-शालन आणि समीर-अपर्णा हे पती-पत्नी ही या नाटकातील प्रमुख पात्रे आहेत.

'मोहित' या काल्पनिक मुलाच्या रूपाने आपल्या जीवनात मातृत्वाचे रंग भरणारी शालू आणि काल्पनिक जग कोणते व वास्तव कोणते या विचाराने गोंधळलेला सदा या दोघांच्या मनातील घालमेल या नाटकात नाट्यरूपाने प्रकट होते. विषयाशी एकरूप झालेल्या सहजसुलभ संवादशैलीमुळे नाटक तीव्रतेने प्रेक्षकांच्या; वाचकांच्या मनाला भिडते.

एका बाजूला मूल नसल्यामुळे नात्यात आलेला कोरडेपणा तर दुसऱ्या बाजूला कल्पनाविश्वातील मुलाबरोबर रमताना येणारा भावनिक ओलावा यांमुळे मनाची पकड घेत नाटकाचे कथानक गतिमान होते.

सदाचा घुमेपणा व शालूने गाठलेले अति उत्साहीपणाचे टोक, यातून निर्माण झालेल्या मनोविकृतीचे वास्तव चित्रण नाटकातून घडते.

निपुत्रिक स्त्रीकडे बघण्याचा दूषित दृष्टिकोन, 'मूल असल्याशिवाय आयुष्याची परिपूर्ती नाही', अशी खुळी सामाजिक समजूत येथे दिसून येते. अशा सामाजिक दडपणांतून, हतबलतेतून मनोविकृती निर्माण होतात का? असा प्रश्न पडतो. नाटकातून सूचित होणारा हा विचार त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण बाजूंसह परिपक्वतेने निकोपतेकडे वळावा, हा या नाटकाचा उद्देश आहे.

आपल्या मुलाला घडवण्यासाठी आई कशी खपते, त्याला चांगला माणूस म्हणून घडवण्यासाठी ती किती प्रयत्नशील असते, याचे अप्रत्यक्षपणे दर्शन या नाटकातून घडते.

शालूच्या अबोध मनातील अमूर्त घालमेल नाटककाराने कलात्मकरीत्या शब्दबद्ध केली आहे. दररोजच्या जीवनव्यवहाराच्या चैतन्यस्पर्शाने नाटकातील संवाद जिवंत कसे होतात? मानवी मनातील अगम्य गुंते नाटककार किती सहजतेने उलगडून दाखवतात? छोट्या-मोठ्या नाट्यमय प्रसंगांतून नाटक उत्कर्षबिंदूपर्यंत कसे पोहोचते? हे सगळे समजून घ्यायचे असेल तर मुळातून पूर्ण नाटक वाचा. जमले तर प्रयोगही पाहा.

प्रस्तुत उताऱ्यातील काल्पनिक मुलाबद्दलचा शालूचा वात्सल्यस्रोत आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण करणारा आहे. या नाटकातील काही भाग खाली दिलेला आहे.

**समीर** : वहिनी, थांबा हो! घाई कसली? आम्हांला सगळं समजलंय वहिनी. आम्ही रात्री बघितलंय वहिनी. तुम्ही एकट्याच खुर्चीशी...

(सदानंद आणि शालन चपापून एकमेकांकडे बघतात.)

वहिनी, नसलेल्या मोहितचा असा ध्यास घेणं बरं नाही. मोहित नावाचं कुणीही या घरात नसताना त्याला असं ध्यानी, मनी, स्वप्नी तुम्ही जगवू पाहाताय; पण हे किती दिवस करणार तुम्ही? वहिनी, सदाभाऊ, हा खेळ तुम्हांला महागात पडेल. अहो, या जगात लाखो जोडप्यांना मूल होऊ शकत नाही; पण म्हणून ते अशी काल्पनिक शरीरं नाही वाढवत. हा कसला भयानक खेळ तुम्ही जगताय? हे सगळं कशासाठी? माझ्याशी, वहिनी, माझ्याशी तुम्ही सायकॉलॉजीच्या गप्पा मारत होता आणि तुमचीच एक केस झालीय हे कधी लक्षातच आलं नाही तुमच्या. तुम्ही एवढ्या

हुशार आहात. प्रेमळ आहात. सुशिक्षित आहात. तुम्ही स्वत:ला समजावून घेतलं पाहिजे. समजावून सांगितलं पाहिजे. मोहित अस्तित्वात नाही. या घरात मोहित नावाच्या मुलानं कधी जन्मच घेतला नव्हता ही वस्तुस्थिती तुम्ही फेस करायला पाहिजे. एखाद्या गोंडस बाळाला दत्तक घ्या! त्याला मोहित म्हणा!

**शालू** : गप्प बस! नालायक माणसा, गप्प बस. तू काय बोलतोयस याचं थोडंतरी भान आहे तुला? शुद्धीत आहेस का तू? अरे, तू डॉक्टर झालास म्हणजे तुझ्याकडे फक्त असलेल्या माणसावर उपचार करायचा अधिकार आहे. असलेलं माणूस नसलेलं ठरवायचा कोणी अधिकार दिला तुला? तू स्वत:ला काय समजतोस? माझ्या या... या पोटातून बाहेर आलेल्या मुलाचा जन्म नाकारणारा तू कोण रे पोरा! मी, मी कळा सोसल्यात, नऊ महिने ओझं वाहिलंय त्याचं. मी त्याची शी-शू पुसलीय. न्हाऊ-माखू घातलंय. त्याची टाळू भरून शांत जोजवल्यावर त्याला हसताना पाहण्यासाठी पाठीला कळ लागेपर्यंत जागी राहिलेय.

**समीर** : वहिनी ऐका माझं!

**शालू** : अरे चल. कुठला कोण भामटा तू. माझ्या मोहितला नाकारतोय? त्याचं अस्तित्व नाकारतोय? तो म्हणे जन्मलाच नाही! मुलाच्या आईला मुलाच्या जन्माचा पुरावा मागतोय? तू जन्मलास याला पुरावा काय रे पोरा? आहे का तुझ्याकडे काही पुरावा?

**समीर** : वहिनी, कमाल आहे तुमची! हा मी तुमच्यासमोर उभा आहे, हाच नाही का पुरावा?

**शालू** : तू इथं उभा आहेस?

**समीर** : म्हणजे?

**शालू** : तू इथं उभा नाहीच आहेस.

**समीर** : मी मला स्वत:ला बघू शकतोय.

**शालू** : अरे, मग माझा मोहितही स्वत:ला बघू शकतो.

**समीर** : पण तो मला दिसत नाही.

**शालू** : पण तो मला दिसतो.

**समीर** : काय लावलंय तुम्ही हे?

**शालू** : तू काय लावलं आहेस हे? अरे विद्वान माणसा, एखाद्याचं असणं नसणं म्हणजे शेवटी काय रे? दुसऱ्याला ते जाणवणंच नं? तू आहेस कारण अपर्णा म्हणते तू आहेस. तू आहेस कारण सदा म्हणतो, मी म्हणते तू आहेस. उद्या या क्षणी आम्ही तिघेही तू नाहीस असं म्हणालो तर तुझ्या असण्याला काय अर्थ आहे समीर? तसंच या घरात, या आमच्या दोघांच्या विश्वात आम्ही दोघेही म्हणतोय आम्हांला मोहित नावाचा मुलगा आहे, म्हणजे तो असायलाच हवा नाही का? अरे, या घरातल्या जगातले आम्ही दोघे म्हणजे शंभर टक्के लोकसंख्या जेव्हा म्हणतेय, की मोहित आहे या घरात, या जगात, या पृथ्वीच्या पाठीवर मोहित आहे, तर तो असणारच. तो आहेच. तू ही आहेस. कारण अपर्णा तुला हाक मारते, तुझी आई तुला मायेनं जवळ घेते. तुझे पेशंट्स तुला डॉक्टर म्हणून आपली दु:खं सांगतात. उद्या तुझं बाळ तुला बाबा म्हणेल. तू आहेस कारण तुझे कपडे आहेत. तुझे बूट आहेत. तुझी पुस्तकं आहेत. तुझ्या डायरीवर तुझं नाव आहे. तुझा कोणता तरी वाढदिवस आहे. तुझं घड्याळ आहे. तुझं पेन आहे. आमच्याही घरात एकदा नीट बघ. ही बघ रॅकेट. हे, हे मोहितचे कपडे. वाढत्या उंचीबरोबर आखूड होतायत. हा त्याचा शर्ट. ही पँट. हा टॉवेल. बनियन. हे हे, हे त्याचे बूट. त्याच्या आजोबांनी दिलेत त्याला. आजोबांनी म्हणजे माझ्या वडिलांनी. यांचे वडील कसले देतायत? हे त्याचे मोजे. मी काल रात्री एकटीनंच धुतलेत. बघा अजून ओले आहेत. बघा. बघा. बघ गं अपर्णा. खात्री करून घे. या कपड्यांचा गंध बघा. गंध आहे त्याला मोहितच्या शरीराचा. त्याच्या घामाचा. खेळून दमूनभागून घरी येतो तेव्हा

तांबूस पडलेल्या चेहऱ्यावरून घामाच्या या अशा वेड्यावाकड्या धारा लागलेल्या असतात नुसत्या. चिकचिकीत झालेले कुरळे केस आणि डोळ्यांच्या पापण्यांवर चमकताहेत असंख्य धुळीचे कण. पाय तर बघवतच नाही बाई. ढोपरापर्यंत हे अस्से धुळीनं माखलेले. गुडघ्यावर तर एखादी हमखास ओली जखम. त्याशिवाय तर घरी यायचंच नाही हा जणू नियम. हा त्याच्या शाळेचा डबा. नाही, नाही आज रिकामा आहे त्यावर जाऊ नका. एरवी कणकीच्या शिऱ्यावर साजूक तुपाचा तवंग असतो अंथरलेला. माझ्या हातचे चपातीचे लाडू तर त्याचे मित्र मेले चेंडू पळवावेत तसे पळवतात. मी म्हणते पळवेनात. मोहितचे मित्र ते. त्यांनी काढलेली ही चित्रं. या वह्यांवर बघा त्याचं नाव आहे. अक्षराला हसू नका. या बाबतीत कार्ट अगदी बापाच्या वळणावर गेलंय. दोघांच्याही अक्षराचा मेला वळणाशी काही संबंध नाही. ही त्याची पुस्तकं. लहानपणीची खेळणी. हा घोडा. ज्यावर बसून तो लहानपणी झुलायचा. ही बघा टेबलटेनिसची बॅट. हा बॉल. हा तर तुम्हीच आणलाय. तुम्ही चांगली सुशिक्षित माणसं आहात नं डॉक्टर? तुम्ही काय मूर्ख आहात, अशी नसलेल्या माणसाला गिफ्ट आणायला? नाही तुम्ही कसले मूर्ख? मूर्ख मोहितला नाही म्हणणारे. आंधळे सगळे. तुम्हांला मोहित बघायचाय नं? बघा हं डॉ. समीर करंदीकर, जरा माझ्या नजरेनं बघा. लक्षात ठेवा. तुम्ही आहात कारण मी म्हणते म्हणून. ये रे मोहित ये. ये. ये. लाजू नको. लाजतोय तो. तुम्हांला लाजतोय बघा कसा. नाही, नाही. घाबरू नकोस वेड्या. हे इंजेक्शन देणारे डॉक्टर नाहीत. हे शहाण्या माणसांना वेडं करणारे डॉक्टर आहेत. तू शहाणा आहेस का? नाही नं? मग ये बाहेर. डॉक्टर रागावू नका हं. थोडा विनोद केला. इंजेक्शनला घाबरतो. शाळेत मेडिकल टेस्ट असली, की नेहमी घरी पळून येतो. मग मी आमच्या फॅमिली डॉक्टरांना दाखवते. काही बिघडत नाही नं? हा बघा आला. आलास? चल डॉक्टरकाकांच्या पाया पड. (ती अशाप्रकारे मोहितला हवेत वाकवते की क्षणभर तो खरेच पाया पडतोय असे भासून समीर पटकन मागे सरकतो. क्षणभर चपापतो आणि ओशाळतो.) फसलात नं? मोहित घरी आहे कुठं? तो ट्रेकिंगला नाही का गेला? हे, हे असंच फसवलो जातो आपण आणि मग खरं काय नि खोटं काय हेच कळत नाही. तुमचंही असंच झालंय डॉक्टर. म्हणून तुम्हांला असलेलं, नाही आहे असं वाटायला लागलंय. हे अस्संच होतं. दिवसाला दिवस आणि रात्रीला रात्र का म्हणायची हेच कळेनासं होतं. उजेडातलं खरं की अंधारातलं खरं मानायचं हेच समजेनासं होतं. त्या दिवशी लाईट आल्यावर उजेडात काहीतरी पाहिल्याचं म्हणालास ना समीर. त्या उजेडात जे तुला दिसलं त्यापेक्षा अंधारातलं खरं नव्हतं कशावरून? तो उजेडच खोटा होता. अंधार होता खरा. मोहितला तू बघितलंयस. तुला माहीत आहे. मूल म्हणजे हा घरभर अस्ताव्यस्त पसरलेला गोड पसारा. 'अ फाइनली डिसऑर्गनाईज्ड होम.' एक गोंडस गोंधळच घरभर असा मांडलेला. खबरदार हा माझा पसारा माझ्यापासून हिसकावून घ्याल तर! जळून राख होईल मोहितला नाही म्हणणाऱ्या प्रत्येक जिवाची! बेचिराख होतील सगळे– (सदानंद पुढे होऊन शालनला एक भडकावतो. शालन उद्ध्वस्त झाल्यागत आपल्या खोलीत जाते.)

**सदा** : समीर सॉरी. पण मला वाटतं तू हे प्रयत्न आता सोडून द्यावेस. मला माहितीये तू शालूकडे सध्या एक पेशंट म्हणून बघतोस. शालूच कशाला; पण मी, मी सुद्धा तुझ्या दृष्टीनं एक आजारी माणूसच झालोय. गुन्हा लपवणाराही गुन्हेगारच ठरतो नं? आजारी माणसाच्या आजाराला गोंजारणाराही आजारी माणूसच ना? तर हो! आहोत आम्ही आजारी. रुग्ण. वेडे. निसर्गनियमांना लाथा घालणारे पशू.

**समीर** : असं काहीही नाहीए. मला फक्त–

**सदा** : पण तू माझ्या बायकोला शहाणी करून तरी काय शिकवणारेस समीर? तिनं उजेडाकडे पाहताना घट्ट मिटून घेतलेल्या पापण्या तू ओरबाडून उघडून तरी तिला काय दाखवणार आहेस? तिनं घेतलेल्या झोपेच्या सोंगातून तिला जागं करून तिला पुढं कसं जगवणार आहेस? अरे पोरा, गेली चौदा वर्षं माझ्यापुढे हेच प्रश्न थयथया नाचताहेत. तिला बरं करून माझ्या आयुष्याचं काही बरं होणार आहे का? तिला हवा होता आमच्या रक्ताचा, हाडामासाचा एक गोळा. कसाही चालला असता रे तिला. तोळामासा. फक्त नवे डोळे जन्माला घालायचे होते तिला. पिढ्यान्‌पिढ्या बघणारे. शिकलेली आहे ती. हुशार आहे. होमसायन्समध्ये चाइल्ड सायकॉलॉजी घोटून घेतली तिनं आणि घर रिकामंच राहिलं. ऊरच रिकामं होतं त्याला ती काय करणार. मी कधीच घालूनपाडून बोललो नाही. घरचे बोलायचे तर घर सोडलं. मित्र बोलायचे, मित्र तोडले. आजूबाजूचे बोलायचे तर वस्ती सोडली आणि इथं दूर ही क्वार्टर कवटाळली. सरांसारख्या देवमाणसाचं दर्शन घेणं टाळू लागलो. घुमा, एकाकी बनत गेलो. आधी आधी हिला खूप समजावलं. म्हटलं, बाई, काही फरक पडत नाही मूल नसलं तर. आपण दत्तक घेऊ एवढीच आवड असली तर; पण तिला धुगधुगती आशा होती. शेजारीपाजारी हिची बाळाला नजर लागेल म्हणून बारशाला बोलवीनात. तेव्हा ही पिसाळल्यागत घरी येरझाऱ्या घालायची. बाळाच्या इच्छेच्या जोरदार कळेनं कळवळून निघाली. नंतर घरी आली ती आमच्या मोहित बाळाला घेऊनच. सुरुवातीला तिच्या हवेतल्या गप्पा ऐकून त्या धक्क्यातून दोन दिवस घराचं तोंड पाहिलं नाही. नंतर पुन्हा घरी परतलो तर शालू उपाशी राहिली होती समीर. आणि रडत होती ती, ती उपाशी राहिल्यामुळे मोहितला दूध मिळालं नाही म्हणून. 'तुम्हांला काही बापाचं काळीज आहे की नाही', म्हणाली. एका नव्या जबाबदारीच्या ओझ्यानं वाकलो. काळीज लकाकलं. माझा मोहित मलूल होऊन जणू आईच्या मांडीवर पडला होता. झाकलेल्या ताटातले घास मी शालूला भरवले. तिचे डोळे चकाकले. मांडीवरच्या त्या नसलेल्या पोराला तिनं पदराखाली घेतलं आणि माझ्याकडून पुन्हा मोहितला असं अंतर पडू देणार नाही अशी शपथ घातली. तेव्हापासून तिच्या पदराआड खूप जावळवालं एक बाळ लपलंय असं जे वाटलं ते वाटतंच राहिलं. माझ्या शालूचा चेहराही बाळंतपणाच्या कळा सोसून आता मोकळा तुकतुकीत झाल्यागत वाटला. बरं वाटलं. मोहितला वाढवायचं अशी गाठ मीही मनाशी कुठंतरी मारली. आपलं अस्तित्व म्हणजे काही स्वयंभू वगैरे नसतं रे. ते दुसऱ्यांच्या नजरेतल्या प्रकाशानंच प्रकाशमय होत असतं आणि... शेवटी आपण एकमेकांच्या इच्छेसाठीच तर जगायचं असतं नाही का समीर? आणि इच्छेला शरीर असायलाच हवं का?

**समीर** : एक माणूस म्हणून मला तुमच्या भावना समजतायत; पण डॉक्टर म्हणून नाही.

**सदा** : केवळ डॉक्टर म्हणून समीर, तू नाहीच आमचा प्रश्न समजून घेऊ शकणार. अरे, हिशेब अगदी साधा आहे. तुझ्याकडे एक गोष्ट आहे. ती माझ्याकडे नाही. ही नैसर्गिक विषमता तुझ्या वैद्यकीय मार्गानं दूर होऊ शकत नाही. सामाजिक विषमतेसारखं त्याचं रस्त्यावर प्रदर्शन मांडता येत नाही. आर्थिक विषमतेसारखं धोरणांना दोषी ठरवता येत नाही. म्हणून आम्ही रडत भेकत, कण्हत कुंथत, कोरडं आयुष्य जगण्यापेक्षा हा मार्ग निवडलाय रे. सोपा. अगदी सोपा. केवळ मानण्याचा मार्ग. जे 'नाही' ते 'आहे' असं समजण्याचा. जे मानलेलं 'आहे' ते आहेच असं समजून जगण्याचा. जगण्याला जे

दुसऱ्यासाठीही जगण्याचं जीवनसत्त्व हवं ते कल्पनेतून शोधण्याचा. मोहित आमचं जीवनसत्त्व आहे समीर. ते तुझ्या वैद्यकीय उपचारांनी बाहेर उपसून तू आम्हांला अशक्त करू नकोस. मोहित गेला तर आम्ही पांढरे फटक पडू रे, सगळी उष्णताच बाहेर पडून उरतील फक्त दोन, बर्फाचे ठिसूळ पांढरे गोळे. नको आमच्या नादी लागूस. जा बाबा आमच्या घरातून. आमच्या जगातून म्हण हवं तर. निघ आता. आता नाही पुन्हा स्वच्छ मनानं आपण नजरा देऊ शकणार एकमेकांना. निघा तुम्ही आता.

## कृती

**(१) खालील कृती करा.**

(अ) **शालूवहिनीची स्वभाववैशिष्ट्ये**

(आ) **सदाची स्वभाववैशिष्ट्ये**

(इ) **शालूवहिनीनी वर्णन केलेली डॉ. समीरची वैशिष्ट्ये**

**(२) स्पष्ट करा.**

(अ) शालूवहिनींचे पुत्रप्रेम.

(आ) सदा व शालूवहिनींच्या जगण्याचे जीवनसत्त्व म्हणजे मोहित.

**(३) उताऱ्यातील संवादामधील खालील विधानांचा अर्थ स्पष्ट करा.**

(अ) नव्या जबाबदारीच्या ओझ्यानं वाकलो.

(आ) इच्छेला शरीर असायलाच हवं का?

**(४) स्वमत.**

(अ) तुमच्या मते शालूचे वागणे योग्य वा अयोग्य ते सकारण स्पष्ट करा.

(आ) 'शालूवहिनीचे पुत्रप्रेम नैसर्गिक आहे', या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

(इ) शालूवहिनीच्या स्वगतातून मोहितच्या कपड्यांबाबत आलेले विवेचन स्पष्ट करा.

**(५) अभिव्यक्ती.**

(अ) शालूला सदाने साथ का दिली असावी ते स्पष्ट करा.

(आ) 'प्रत्येकाचीच आई शालूसारखीच पुत्रप्रेमाची भुकेलेली असते' या विधानाची सत्यता पटवून द्या.

(इ) नाट्यउताऱ्याच्या शेवटाबाबत तुमचे विचार लिहा.

# ३. सुंदर मी होणार

**पु. ल. देशपांडे** (१९१९ ते २०००) :

थोर मराठी साहित्यिक. विनोदी लेखक, नाटककार, प्रवासवर्णनकार, चतुरस्र कलावंत. सूक्ष्म निरीक्षण, मार्मिक आणि निर्मळ विनोद, तरल कल्पनाशक्ती आणि भाषेचा कल्पक व चमत्कृतिपूर्ण उपयोग करण्याचे कौशल्य हे त्यांचे लेखनविशेष. 'तुका म्हणे आता', 'तुझे आहे तुजपाशी', 'अंमलदार', 'सुंदर मी होणार', 'ती फुलराणी' इत्यादी स्वतंत्र आणि रूपांतरित नाटके; 'सदू आणि दादू', 'विठ्ठल तो आला आला', इत्यादी एकांकिका संग्रह; 'खोगीरभरती', 'असा मी असामी', 'खिल्ली', 'बटाट्याची चाळ', 'हसवणूक' इत्यादी विनोदी लेखसंग्रह; 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'जावे त्यांच्या देशा' इत्यादी प्रवासवर्णने; 'व्यक्ती आणि वल्ली', 'गणगोत', 'मैत्र' इत्यादी व्यक्तिचित्रणात्मक पुस्तके अशी त्यांची विपुल ग्रंथसंपदा आहे. त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेला आहे. भारत सरकारने 'पद्मभूषण' या पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे.

'सुंदर मी होणार' या नाट्यलेखनास ब्राऊनिंग पती-पत्नींचा चरित्रग्रंथ, व्हर्जीनिया वूल्फने लिहिलेले 'फ्लश' हे पुस्तक आणि 'बॅरेट्स ऑफ विंपोल स्ट्रीट' हे नाटक, या लेखनाचा आधार मिळाला आहे. असे असले तरी या नाटकातील महाराज, दिदी, संजय व इतर पात्रांना त्यांचा स्वत:चा 'बाज' आहे. याचा उल्लेख पु. ल. देशपांडे यांनी नाटकाच्या सुरुवातीस विनम्रपणे केला आहे.

खालसा झालेल्या संस्थानच्या संस्थानिक-महाराजांची बेबी, दिदी, राजेंद्र व प्रताप ही मुले आणि त्यांच्या कुटुंबाचे 'डॉक्टर' अशी पात्रयोजना प्रस्तुत नाट्यउताऱ्यात आली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या देशात अनेक संस्थाने होती. ही संस्थाने खालसा केली. संस्थाने खालसा झाली तरी काही संस्थानिकांच्या मनोवृत्तीत फरक पडला नाही. 'सत्ताधीश' म्हणून असलेला त्यांचा तोरा कमी झाला नाही. त्यामुळे राजा व त्यांचे कुटुंबीय, राजा व प्रजा यांच्यातील दरी कायम राहिली. परिणाम असा झाला, की संस्थानिक व कुटुंबीय यांच्यामध्ये मानसिक दुरावा निर्माण झाला. त्यांच्यामध्ये संघर्ष होऊ लागले. त्यांच्यातील संघर्ष प्रस्तुत नाट्यउताऱ्यात दर्शवला आहे. नंदनवाडीच्या महाराजांच्या राजवाड्यात घडलेल्या घटना, प्रसंग आणि संवाद यांतून हा संघर्ष प्रकट झाला आहे. राजवाड्यात घडलेले नाट्य अतिशय मार्मिकपणे उलगडले आहे. हे नाट्य अधिक चांगले समजण्यासाठी पूर्ण नाटक अवश्य वाचावे.

**बेबी** : हेमलतादेवी — तुमचं पत्र —

**दिदी** : माझं —

**बेबी** : हो! पण... (अक्षर पाहत) पपांचं दिसतंय —

**राजेंद्र** : दऱ्या टाळी डॉक्टर — मुक्काम लांबला —

**दिदी** : (पत्र वाचू लागते — तिचा चेहरा एकदम उतरतो. थकल्यासारखी नेहमीच्या खुर्चीवर येऊन बसते.)

**बेबी** : दिदी, काय झालं ग? (दिदी तिला पत्र देते.)

**प्रताप** : दिदी, वाच ना पत्र —

**डॉक्टर** : मी रजा घेऊ का?

**दिदी** : नाही — बसा डॉक्टर —

**बेबी** : "अनेक आशीर्वाद, आम्ही ज्या कामासाठी मुंबईला आलो ते काम झाले आहे. गेले काही दिवस तुझ्या प्रकृतीत सुधारणा झाल्यासारखे वाटत होते. प्रकृती अधिक झपाट्याने सुधारली पाहिजे. मुंबईत काही डॉक्टरांशी आम्ही चर्चा केली. त्यांनी लंडनला जाण्याचा सल्ला दिला आहे. तेथे अधिक चांगले उपचार होतील. पुढल्या महिन्यात आपण सर्वजण इंग्लंडला जाण्यासाठी निघत आहो. कमीत कमी दोन वर्षे तरी तिथे राहावे लागेल, असे डॉक्टरांचे मत आहे. आम्हांला आता कुठेही राहिले तरी सारखेच आहे. प्रताप, राजेंद्र आणि बेबी यांनाही प्रवासाची आवड आहेच. त्यांना ही आनंदाची बातमी सांगावी." — (भयंकर चिडून चोळामोळा करून पत्र फेकते.) आनंदाची बातमी! मी साफ सांगते दिदी, मी इंग्लंडला जाणार नाही — आणि माझं ऐकायचं असेल तर तूदेखील जाऊ नकोस — प्रताप आणि राजूला जाऊ दे —

**राजेंद्र** : का म्हणून?

**बेबी** : का म्हणून? पपांच्या पांगुळगाड्याशिवाय

कोलमडून पडाल तुम्ही.

**प्रताप** : कशावरून ?

**बेबी** : इतके दिवस ह्या वाड्यात गपचूप राहिलात त्यावरून सांगते मी — वास्तविक बंडाचं निशाण उभं करायला हवं होतं ते तुम्ही.

**राजेंद्र** : करू.

**बेबी** : केव्हा ? म्हातारपणी ? तुझ्या जागी मी असते तर केव्हाच धडा शिकवला असता पपांना —

**प्रताप** : मग सध्या चालवलं आहेस ते काय आहे असं म्हणणं आहे तुझं ? पपांना जवळजवळ रोज एक नवा धडा देत असतेस तू —

**राजेंद्र** : वास्तविक पपांनी तुला शिकवणीचे पैसे द्यायला हवेत —

**बेबी** : हे एकदा पपांच्या पुढे बोल ना —

**राजेंद्र** : बोलेन —

**बेबी** : केव्हा ?

**राजेंद्र** : ऐकशील तू —

**बेबी** : त्या दिवशी भाऊबीज नसली तरी ओवाळीन मी तुला —

**राजेंद्र** : आणि मी देखील हक्काच्या कमाईची ओवाळणी घालीन तुला —

**डॉक्टर** : कशी फटाके उडवल्यासारखी बोलताहेत पाहा दिदीराजे — दिदीराजे कसल्या विचारात पडला आहात तुम्ही —

**दिदी** : कसल्याही नाही डॉक्टर ?

**डॉक्टर** : दिदी, एवढं काय मनाला लावून घेता ?

**दिदी** : डॉक्टर, तुम्ही विचारता हे ? —

**डॉक्टर** : हो, मीच विचारतो ! दिदी, आयुष्यात खरा निर्णय घ्यायचा प्रसंग एखाद्याच वेळी येत असतो — त्या वेळी तो नीट घेता आला नाही तर सारं आयुष्य ब्रेक तुटलेल्या गाडीसारखं शेवटी कुठल्या तरी खड्ड्यात जाऊन पडतं ? — (काही क्षण स्तब्धता.)

**बेबी** : डॉक्टर — तुम्ही कसल्या तरी विचारात पडल्यासारखे दिसताय आता — बाकी ह्या वाड्यात विचार करणारी मंडळी फार झाली आहेत — छे, असल्या विचारी मंडळींत मला तर गुदमरल्यासारखं होतं —

**डॉक्टर** : बेबीराजे, तुम्हांला मागे मी एकदा स्वित्झर्लंडमधल्या एका नर्सची गोष्ट सांगितली होती —

**बेबी** : एकदा का ? पुष्कळ वेळा सांगितली होती — मादमाझेल् फ्लाविया ! मी तिच्या डोळ्यांत बोटं घातली होती — ती तुमच्याकडे मोसिये मोसिये करत धावत आली होती —

**डॉक्टर** : आणि मग मी तिची समजूत काढली होती — मी तिची समजूत कशी काढली हे ऐकायचं होतं नाही का तुम्हांला ? तुम्ही झाला आहात आता तितकी मोठी ! फ्लाविया...हं माफ करा हं दिदी — मी बसतो जरा —

**दिदी** : बसा ना डॉक्टर — तुम्हांला आम्ही किती वेळा सांगितलं, की दरबारी रीतिरिवाज दरवाजाबाहेर गेले या वाड्यातून —

**डॉक्टर** : थँक्यू — दिदी, मी निर्णयाबद्दल सांगत होतो, नाही का ? ही फ्लाविया मोठी वेडी होती — अगदी वेडी — माझ्याशी लग्न करायचं होतं तिला !

**दिदी** : डॉक्टर !

**डॉक्टर** : आणि मग काय ?... तुम्हांला आज आलं ना, असंच एक पत्र मला आलं.

**दिदी** : कुणाचं ?

**डॉक्टर** : तुमच्या पपांचं ! महाराजांच्या परिवारात मी एकटाच का होतो ? कुणीतरी महाराजांपर्यंत ही वर्दी पोहोचवली आणि महाराजांनी बंदी केली —

**बेबी** : का पण ?... आणि डॉक्टर, तुम्ही का ऐकलंत महाराजांचं ?

**डॉक्टर** : रागावू नका बेबीराजे ! मी महाराजांचं ऐकलं नाही — हॉस्पिटलमध्ये रुग्णशय्येवर मृत्यूचं आव्हान स्वीकारीत पडलेल्या तुमच्या ममींचं ऐकलं — महाराजांनी पत्रात दोनच ओळी लिहिल्या होत्या — नोकरीवरून जा आणि लग्न करा. आमचं लग्न ठरल्याचं सांगून मी ममींचा निरोप घ्यायला गेलो. माझ्याकडे ममींनी पाहिलं आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहायला लागले — त्यांच्या क्षीण हातांना ते

पुसण्याचीदेखील शक्ती नव्हती. ममी म्हणाल्या — डॉक्टर, तुम्ही गेलात तर माझ्या पोरांना आई कुठली? फ्लावियाचा म्हातारा बाप आनंदानं रडला होता — तुमची आई असहायतेने रडत होती. मी ती असहाय आसवं पुसायचं ठरवलं आणि पुन्हा फ्लावियाला भेटलो. तो कसा ठाऊक आहे? — तुम्हांला घेऊन —

**बेबी** : मला!

**डॉक्टर** : होय, तुम्हांला! एवढ्या एवढ्याशा होता तुम्ही. एका प्रॅममध्ये घालून तुम्हांला फ्लावियाच्या घरी घेऊन गेलो — तुमच्या हातात फुलांचा एक गुच्छ दिला होता — गुच्छासकट तुम्हांला उचलून मी आत नेलं तेव्हा फ्लाविया म्हणाली होती — हे दोन गुच्छ कशाला आणलेत? तुमच्या हातून तो गुच्छ मी फ्लावियाला दिला आणि सांगितलं — फ्लाविया, मला हिची आणि हिच्या भावंडांची आई होऊन राहायचं आहे. फ्लाविया संगमरवरी पुतळ्यासारखी एका जागी खिळून उभी होती — आतून फ्लावियाचा बाप व्हायलिनवर कसले तरी विलक्षण करुण स्वर काढत होता — दॅट्स् ऑल, दॅट्स् ऑल —

**बेबी** : लग्न या गोष्टीचा पपांना इतका का तिटकारा —

**दिदी** : थांब बेबी — पण डॉक्टर, मला एका प्रश्नाचं उत्तर द्याल? (डॉक्टर नुसत्या मानेनं हो म्हणतात.)

**दिदी** : ममीच्या डोळ्यांतले असहाय अश्रू पुसण्याचा तुम्ही निर्णय घेतलात त्याचं दु:ख होतंय तुम्हांला? — पश्चात्ताप होतोय?

**डॉक्टर** : एक क्षणभरदेखील झाला नाही — सारं आयुष्य मी तृप्तीत, समाधानात काढलं. महाराजांनी अनेक वेळा अपमान केला माझा — अनेक आपत्ती आल्या — गेल्या. मी अगदी कोरा राहिलो. दिदी, तुमच्या ममींनी मला आयुष्यात केवढं मोठं प्रयोजन दिलं! — आपण कशासाठी जगतो आहोत याचं उत्तर देण्याचं भाग्य फार थोड्या लोकांच्या वाट्याला येतं! दिदी, मी पुरुष असून आई होण्याचं भाग्य मला लाभलं — तुमची आई म्हणून जगलो मी! तुमच्या चिमण्या विश्वातली सुखदु:खं तुम्ही तुमच्या पपांशी बोलला नाही कधी — माझ्याशी बोललात! प्रतापराजे, राजूभय्या, बेबी यांची मला काळजी वाटत नव्हती — मला काळजी वाटत होती ती तुमची — पण त्यातून देखील मी आता मुक्त झालो. आता खरं सांगू? मला माझी काळजी वाटायला लागली आहे. पाखरांसारखी — भरभर भरभर हा पिंजरा सोडून तुम्ही सर्वजण जाणार आहात — मग मात्र माझ्या आयुष्याला काही प्रयोजन उरणार नाही. डॉक्टर! कशासाठी जगता आहात तुम्ही, असं जर कोणी विचारलं — तर त्या प्रश्नाचं उत्तर राहिलं नाही आता माझ्याकडे —

**दिदी** : प्रताप, राजू, बेबी जातील — पण मी कुठे जाणार डॉक्टर?

**डॉक्टर** : तुम्हीही जाल दिदी — गेलं पाहिजे तुम्हांला, गेलं पाहिजे, गेलं पाहिजे — (आवेगानं — मागल्या बाजूचा पडदा बाजूला करतात — तिथे महाराज उभे असतात. सर्वांना आश्चर्य वाटतं.)

**महाराज** : फारच अचानक आलो मी नाही? सगळ्यांनाच धक्का बसलेला दिसतोय — डॉक्टर, कुणाला जायला सांगताहात? (डॉक्टर स्तब्ध) बोलत का नाही डॉक्टर? (मागाहून नोकर फळे घेऊन येतो — त्याला नुसत्या इशाऱ्याने ती टेबलावर ठेव असे सांगतात. तो ठेवून जातो.)

**डॉक्टर** : बोलण्यासारखं काही राहिलं नाही आता —

**महाराज** : ठीक आहे. आपल्या सेवेचीही काही आवश्यकता राहिली नाही.

**डॉक्टर** : हे मीच आपल्याला सांगणार होतो युवर हायनेस्!

**महाराज** : अस्सं! राजीनामा देऊन निघाल्याचा मोठेपणा हवा आहे तुम्हांला? संध्याकाळपर्यंत लिहून आणा.

**बेबी** : पपा — काय करता...

**महाराज** : (तिला मध्येच थांबवून) माझ्या वागण्याची चिकित्सा तुमच्याकडून व्हायला नको आहे मला — माझं पत्र मिळालं? —

**बेबी** : (चोळामोळा करून टाकलेल्या पत्राकडे पाहत) हो! (महाराजांचं लक्ष जातं — )

**महाराज** : (पत्राची अवस्था पाहात) अस्सं!

**बेबी** : पण पपा...

**महाराज** : तुमचं काय मत आहे ते ह्या पत्राच्या अवस्थेवरून कळलं मला —

**बेबी** : पण मला तुम्हांला कांही सांगायचं आहे.

**महाराज** : इंग्लंडच्या बोटीत पंधरा दिवस एकत्रच राहायचंय आपल्याला तेव्हा सांगा —

**बेबी** : इंग्लंडच्या बोटीत —

**महाराज** : ऐकलंय मी ते वाक्य! पुढे बोला —

**बेबी** : मला पुढं काहीही बोलायचं नाही —

**महाराज** : ठीक आहे! — मग माझं ऐका — त्या माणसाशी मी लग्न करू देणार नाही तुला —

**बेबी** : तो प्रश्न आता तुमच्या इच्छेचा राहिला नाही. माझं त्याच्याशी लग्न झालं —

**महाराज** : केव्हा?

**बेबी** : ज्या दिवशी त्याची आणि माझी पहिली भेट झाली तेव्हा.

**महाराज** : त्याला लग्न म्हणत नाहीत बेबी —

**दिदी** : पपा, काय बोलता हे?

**बेबी** : आणि दिदी, ह्यांच्यावर तू मला प्रेम करायला सांगतेस? प्रेम हा शब्द कशाशी खातात हे ज्याला ठाऊक नाही त्याच्यावर मला प्रेम करायला सांगतेस?

**महाराज** : मला तुमच्या प्रेमाची आवश्यकता नाही बेबी —

**बेबी** : तुम्हांला कोणाच्याच प्रेमाची आवश्यकता नाही पपा — तुम्हांला आवश्यकता आहे फक्त अमर्याद सत्तेची! ज्या डॉक्टरांनी पोटच्या पोरांसारखं संगोपन केलं आमचं, त्यांच्या सेवेचं तुम्ही काय चीज केलंत, तेही पाहिलं आम्ही आत्ताच! बाभूळ झाडालादेखील फुले येतात — पण पपा, तुम्ही दुसऱ्यांच्या आयुष्यात काटे काटे पसरण्याखेरीज काही केलं नाही. दिदी, चल, चल माझ्याबरोबर. माझ्या झोपडीत तुला निवारा आहे. बंडाचे आईबाप गाईघोड्यांवरदेखील पोटच्या पोरांसारखं प्रेम करतात — आपल्या हातांनी भाकर खाऊ घालतील तुला —

**महाराज** : बेबी — कोंडून ठेवीन तुला —

**बेबी** : मग आजपर्यंत काय केलंत तुम्ही —

**महाराज** : बेबी, त्या मोतद्दाराच्या मुलाशी तुला लग्न करता येणार नाही —

**बेबी** : अनोळखी माणसाच्या मताला मला नाही मान द्यावासा वाटत —

**महाराज** : अनोळखी —

**बेबी** : अनोळखी नाहीतर काय? — तुम्ही आपल्या मुलांशी कधी ओळख करून घेतली आहे? कधी मायेनं जवळ घेतल्याचं आठवतं तुम्हांला? — कधी पाठीवरून प्रेमाचा — शाबासकीचा हात फिरलाय तुमचा? पगारी नोकर-चाकरांनी वाढवलं आम्हांला — कुठं, कधी, केव्हा मिळालंय आम्हांला प्रेम? राजाची पोरं — पण प्रेमाची भीक मागत हिंडलो आम्ही — ज्यांनी घातली त्यांच्या मागून गेलो म्हणून इतका वैताग करायचं काय कारण?

**दिदी** : बेबी — (तिला मिठी मारते.)

**महाराज** : दिदी — मुकाट्यानं जाऊ दे तिला — असली मुलगी नको आहे मला घरात —

**बेबी** : पपा!! हे शब्द पुन्हा ऐकून घेणार नाही मी! (रागाने तिचे ओठ थरथरू लागतात — डोळ्यांतून अश्रू वाहू लागतात.) दिदी, चालले मी. बंडा मुंबईहून आला, की थाटानं लग्न करणार आहोत आम्ही... येशील ना लग्नाला माझ्या... अग, देव करतो की नाही ते सगळं बऱ्यासाठी करतो — आता तुला चालता येतं — उगीच नाही — तिथपर्यंत आलं पाहिजे तुला — माझ्या लग्नात दिदी...तूच...तूच... माझी आई... (तिला कडकडून भेटते — अत्यंत तुच्छतेने आपल्या बापाकडे पाहते — आणि निघून जाते.)

**दिदी** : पपा — काय होतंय हो हे?

**महाराज** : लग्न!!

**दिदी** : जा—जा पपा—बेबीला परत बोलावून आणा. आपण लग्न लावून देऊ बेबीचं—साऱ्या नंदनवाडीला आमंत्रण देऊ आपण—ह्या वाड्याची पंधराही दालनं गजबजून जाऊ देत माणसांनी—राजा आणि प्रजा ह्यातलं शेवटलं अंतर तुटून जाऊ दे पपा—

**महाराज** : दिदी—बेबी गेली हे चांगलं झालं!

**दिदी** : मुलींना कधी ना कधी तरी माहेर सोडायचंच असतं पपा, पण हे असं नव्हे. माझ्यासारखी आयुष्यभर माहेरीच राहण्यासाठी जन्माला आलेली कमनशिबी मुलगी एखादीच—

**महाराज** : तुलाही सोडून जायचंय हे घर?

**दिदी** : नाही पपा, मला कसं सोडून जाता येईल?

**महाराज** : दिदी, तुला कल्पना येणार नाही, पण तुझ्याइतकं मला जगात दुसरं काही प्रिय नाही—आयुष्यभर तुझी चिंता केली मी...

**दिदी** : मला ठाऊक आहे पपा—पण पपा, बेबीनं तुमचा काय अपराध केला आहे? फुलपाखरासारखी बेबी!

**महाराज** : स्वस्थ विश्रांती घे दिदी—फार ताण पडलाय तुला आज—(खिडक्यांचे व दारांचे पडदे ओढून बंद करतात.) दिदी—आयुष्यात मी कुणापुढंही तोंड पसरून विनंती केली नाही—कुणाच्याही रागालोभाची पर्वा केली नाही—जगातली कुठलीही आपत्ती सहन करीन मी—पण दिदी, तू माझा तिटकारा करू नकोस—

**दिदी** : पपा, मला फक्त आश्चर्य वाटतं, की तुमचं हे अंत:करण इतरांच्या वाट्याला का येऊ नये?

**महाराज** : ते विचारू नकोस मला दिदी—विश्रांती घे—

**दिदी** : मला हे कळलंच पाहिजे पपा—मला हे समजूच शकत नाही—चार मुलांतल्या एकीवर माया आणि बाकीची डोळ्यांसमोर देखील नकोत—हे काय आहे—समजूच शकत नाही मला—समजूच शकत नाही—

**महाराज** : ठीक आहे—ऐक तर. कधी तरी हे तुला समजायलाच पाहिजे होतं दिदी; पण एक वचन दे—

**दिदी** : कोणतं?

**महाराज** : हे समजल्यावर तू माझा तिटकारा करणार नाहीस ना? वचन दे—

**दिदी** : ते समजल्याशिवाय मी वचन कसं देऊ? राजू—प्रताप—बेबी—काय असा अपराध केलाय त्यांनी तुमचा?

**महाराज** : माझा सर्वांनीच अपराध केलाय—तू देखील—

**दिदी** : मी?

**महाराज** : हो तू—बेबीच्या लग्नाला तू पाठिंबा दिलास—

**दिदी** : हो—आणि अजूनही मला त्यात काही चूक वाटत नाही—पण बेबीवरचा तुमचा राग आजचाच नाही—तिच्यावर तुम्ही कधीच प्रेम केलं नाही.

**महाराज** : तुझ्याखेरीज मी कोणावरही प्रेम केलं नाही—

**दिदी** : असं कसं शक्य आहे? ममीवर नव्हतं का तुमचं प्रेम!—

**महाराज** : तुझा जन्म होण्यापूर्वी होतं—त्यानंतर मला कधीच तिच्याबद्दल प्रेम वाटलं नाही—

**दिदी** : पण असं प्रेम नष्ट कसं होऊ शकेल?

**महाराज** : माझ्या आयुष्यात हे घडलं—

**दिदी** : पण ममीचं तरी तुमच्यावर प्रेम होतं ना—

**महाराज** : ती फक्त मला भीत होती—

**दिदी** : पण तरी सुद्धा तुमचं एकमेकांवर प्रेम होतं ना—होतं, होतं म्हणा पपा—

**महाराज** : नव्हतं, कधीही नव्हतं—

**दिदी** : पण प्रेमाशिवाय तुम्ही एकत्र राहिलात कसे?—नाही पपा—मला सहन होत नाही हे—एकदा म्हणा—पुन्हा आठवून पाहा—असं कसं शक्य आहे?

**महाराज** : दिदी—

**दिदी** : दूर व्हा—दूर व्हा पपा—(ममीच्या फोटोकडे पाहात) ममी—का—का राहिलीस ग तू ह्या वाड्यात? भीती!—पपा, आयुष्यभर ही भीती उराशी बाळगत राहिली ममी, म्हणून आजारी पडली—तिला औषध हवं होतं ते भीतीवरचं—तिला हजारो रुपयांची औषधं दिलीत तुम्ही; पण एका क्षणाचं प्रेम दिलं असतं—तर आमची ममी नसती सोडून गेली

आम्हांला — ह्या वाड्याला लाथ मारून का नाही बाहेर निघून गेली ममी! का — का घाबरली — कशाला घाबरली? — असल्या प्रेमशून्य माणसाची पत्नी म्हणून का स्वत:ची विटंबना करत राहिली?

**महाराज** : माझं ऐक दिदी —

**दिदी** : काय ऐकायचं तुमचं? तुमची घृणा यायला लागली आहे मला. तुमचा हा राजवाडा — हे वातावरण — अपवित्र, अमंगल वाटायला लागलंय मला! मी दारिद्र्यात राहीन पपा; पण अपवित्र वातावरणात राहणार नाही —

**महाराज** : कुठे चाललीस —

**दिदी** : वाट फुटेल तिथे —

**महाराज** : म्हणजे त्या उनाड इसमाकडे — दिदी, तुझ्यापासून खोटेपणाची अपेक्षा केली नव्हती मी —

**दिदी** : काय खोटेपणा केला मी?

**महाराज** : तू म्हणाली होतीस, की त्याच्याबद्दल केवळ एक कलावंत म्हणून तुला आदर आहे — पण तुझं प्रेम आहे त्याच्यावर —

**दिदी** : होय! पण मला त्याच्या आयुष्याचा नाश करायचा नव्हता — संसार उभा करण्याचं सामर्थ्य माझ्या दुबळ्या शरीरात आहे असं वाटत नव्हतं मला — आणि त्याहीपेक्षा, पपा, तुमच्यासाठी हे घर सोडायचं नव्हतं मला — बेबी गेली — उद्या प्रताप, राजूही जातील — मग तुम्ही एकटे एकटे राहाल. ममीचे अश्रू डॉक्टरांनी पुसले आणि ते आजन्म अविवाहित राहिले — तुमचे अश्रू पुसत मी तुमची मुलगी म्हणून नव्हे पपा, पण तुमची आई म्हणून राहणार होते; पण तुम्हांला कधीच समजू शकलं नसतं ते! पपा, प्रकाशाच्या लेकरांना ह्या अंधारकोठडीत त्यानं जन्माला घातलं — त्यांना प्रकाशाकडेच गेलं पाहिजे — थेंबभर पाण्याला देखील शेवटी विशाल समुद्राचीच ओढ असते पपा — माझ्यासारखी दुबळी मुलगी सुद्धा — त्याच विशाल जीवनाकडे निघाली आहे — जीवनाच्या त्या प्रकाशात न्हाऊन आता मला सुंदर व्हायचं आहे! जाते मी पपा. संजय माझ्या उत्तराची वाट पाहत असतील —

**महाराज** : कुठे?

**दिदी** : पृथ्वीच्या पाठीवर जिथे असतील तिथून त्यांना शोधून मी काढीन. तितकं सामर्थ्य आलंय माझ्या पायात — आता संपूर्ण संपूर्ण बरं वाटतं मला — गुड् बाय् पपा — (जाते.)

**महाराज** : सुभानराव... (अत्यंत अस्वस्थपणे खोलीत फेऱ्या घालू लागतात; सुभानराव ए. डी. च्या वेशात येतात.) हे सहन होत नाही मला —

**सुभानराव** : काय युवर हायनेस?

**महाराज** : हा प्रकाश!... ओढून घ्या सगळे पडदे!... (सुभानराव खिडक्या-दारांचे पडदे ओढू लागतात.. खोलीत काळोख होऊ लागतो... महाराज दिदीच्या खुर्चीत बसतात...)

## कृती

**(१) खालील कृती करा.**

(अ) **दिदीचे गुणविशेष**

(आ) **महाराजांची स्वभाववैशिष्ट्ये**

(इ) महाराजांनी पाठवलेल्या पत्रावर खालील पात्रांच्या प्रतिक्रिया लिहा.

| पात्र | प्रतिक्रिया |
|---|---|
| राजेंद्र | |
| बेबी | |

(ई) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

(१) पपांचा पांगुळगाडा.

(२) मुलांचे चिमणे विश्व.

(३) ब्रेक तुटलेल्या गाडीसारखं आयुष्य.

**(२) थोडक्यात स्पष्ट करा.**

(अ) 'जीवनाच्या त्या प्रकाशात न्हाऊन आता मला सुंदर व्हायचं आहे!', या दिदीच्या विधानाचा अर्थ.

(आ) महाराज आणि बेबी यांच्या विचारातील संघर्ष.

(इ) नाट्यउताऱ्यातील 'डॉक्टर' या पात्राची भूमिका.

**(३) स्वमत.**

(अ) तुम्हांला समजलेली 'ममी' ही भूमिका नाट्यउताऱ्याच्या आधारे स्पष्ट करा.

(आ) रंगसूचना कथानकातील दुवे कसे जोडतात ते स्पष्ट करा.

**(४) अभिव्यक्ती.**

(अ) राजवाडा आणि नंदनवाडी यांच्यातील अंतर दूर होण्यासाठी त्या काळाचा विचार करून उपाय सूचवा.

(आ) नाट्यउताऱ्याद्वारे तुम्हांला समजलेला 'सुंदर' या शब्दाचा अर्थ स्पष्ट करा.

(इ) प्रस्तुत नाट्यउताऱ्यावरून पु. ल. देशपांडे यांच्या संवादलेखनाची वैशिष्ट्ये लिहा.

# उपयोजित मराठी

आपले सर्व जीवन भाषेने व्यापलेले आहे. भाषा जीवन व्यवहारात आहे, साहित्यात आहे, संवाद-संभाषणात आहे, दृकश्राव्य माध्यमात आहे. विषयानुसार, क्षेत्रानुसार भाषेच्या अभिव्यक्तीचे स्वरूप बदलते. त्यामुळे भाषेच्या आविष्काराची विविध रूपे आपणांस पाहायला मिळतात. समाज जसजसा विकसित होत आहे, तसतशी भाषेच्या उपयोजनाची क्षेत्रे व्यापक आणि विविधांगी होत आहेत, व्यवसायाच्या नवनव्या संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे भाषेच्या अभ्यासाला आणि उपयुक्ततेला वेगवेगळे आयाम प्राप्त होत आहेत.

श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन ही भाषेची मूलभूत कौशल्ये. शिक्षणाच्या प्राथमिक व माध्यमिक स्तरावर ही भाषिक कौशल्ये प्राप्त करण्याच्या अनेक संधी तुम्हांला मिळाल्या आहेत. पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय, कृती, प्रकल्प, उपक्रम इत्यादींच्या माध्यमांतून तुम्ही विविध स्तरांवर व्यक्त होत आहात आणि भाषिक कौशल्ये आत्मसात करत आहात.

आपण जो अनुभव घेतो, जो विचार करतो तो मौखिक अथवा लिखित स्वरूपात व्यक्त करता येणे हे एक वेगळे कौशल्य आहे. मूलभूत भाषिक कौशल्यांच्या संपादनातूनच उत्स्फूर्तपणे व सहजपणे लेखनप्रक्रियेची सुरुवात होते; संवाद-संभाषण, निवेदन कौशल्ये विकसित होतात. या दृष्टिकोनातून उपयोजित मराठी विभागातील घटकांकडे पाहा. त्यामुळे हे घटक तुमच्या दैनंदिन जीवनाशी जोडले जातील.

या वर्षी ‘उपयोजित मराठी’ या भागात आपण पाच घटकांचा अभ्यास करणार आहोत. ‘सूत्रसंचालन’ या घटकाचे महत्त्व तुम्ही जाणता. आज सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक अशा विविध क्षेत्रांमध्ये अनेक कार्यक्रम साजरे होत असतात. हे कार्यक्रम नेटक्या पद्धतीने साजरे होण्यासाठी सूत्रसंचालकाची भूमिका महत्त्वाची असते. सूत्रसंचालक होण्यासाठी आवश्यक असे मार्गदर्शन या घटकातून तुम्हांला होणार आहे.

लेखननियमांनुसार लेखन अर्थात लिखित मजकुराच्या व्याकरणशुद्धतेबरोबर आशयाचे अचूक संपादनही महत्त्वाचे ठरते. यादृष्टीने ‘मुद्रितशोधन’ या घटकाचा समावेश ‘उपयोजित मराठी’ या भागात केला आहे.

जागतिकीकरणामुळे, वाढत्या संपर्क माध्यमांमुळे अन्य भाषिकांशी संपर्क येतो. त्यांच्या भाषा या परस्परांवर लक्षणीय परिणाम करत असतात. बहुभाषिक जीवनामुळे अनुवाद, भाषांतर, रूपांतर या प्रक्रियांचे महत्त्व लक्षात घेऊन ‘अनुवाद’ हा घटक येथे अंतर्भूत केला आहे.

आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या जगात अनुदिनी (ब्लॉग) लेखन हे सर्वपरिचित असे सामाजिक माध्यम झाले आहे. या अनुदिनी (ब्लॉग) लेखनाविषयी आवश्यक ती माहिती या पाठ्यपुस्तकामार्फत आपल्यापर्यंत पोहोचणार आहे.

‘रेडिओजॉकी’ ही संकल्पना आपल्यासाठी तशी नवी नाही. या व्यवसायाला सामाजिकदृष्ट्या विशिष्ट वलय आहे. या कलेविषयी मूलभूत माहिती ‘रेडिओजॉकी’ या घटकात दिली आहे.

हे सर्व घटक भाषिक अंगाने महत्त्वपूर्ण आहेत. शिवाय या माध्यमांतून अनेक व्यावसायिक संधींची माहिती आपल्याला होणार आहे. हे घटक छंद स्वरूपात अथवा व्यवसाय स्वरुपात तुम्हांला प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडणारे आहेत.

आपण प्राप्त केलेली भाषिक कौशल्ये व्यक्त करण्याची संधी प्रकल्प, सादरीकरण व प्रात्यक्षिक यांच्या माध्यमांतूनही आपल्याला मिळणार आहे.

भाषिक कौशल्यांचा उपयोग व्यावहारिक जीवनात करता येणे हेच तर भाषेचे उपयोजन!



# १. सूत्रसंचालन

## प्रास्ताविक

आज सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, सांगीतिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये विविध स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. हे कार्यक्रम सुनियोजितपणे आणि नीटनेटक्या पद्धतीने संपन्न होण्यात सूत्रसंचालकाची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. चांगल्या सूत्रसंचालनामुळे कार्यक्रम देखणा आणि बहारदार होतो.

प्रत्येक कार्यक्रमाचे स्वरूप आणि कालावधी निश्चित असतो. त्याचे प्रतिबिंब आपणास कार्यक्रमपत्रिकेत पाहायला मिळते. 'कार्यक्रमपत्रिकेतील नियोजनानुसार प्रारंभ करून प्रत्येक टप्प्यावर क्रमबद्ध पद्धतीने निवेदन करत कार्यक्रमाची यशस्वी सांगता करणे म्हणजे **सूत्रसंचालन** होय.' 'कार्यक्रमाची मूळ संकल्पना नजरेसमोर ठेवून तो कार्यक्रम एका सूत्रात बांधत कार्यक्रमाचे शिस्तबद्ध संचालन करतो तो **सूत्रसंचालक** होय.' कार्यक्रमातील सर्व प्रसंगांना कौशल्याने एकत्र बांधून कार्यक्रम नावाचे चित्र देखणे, अभिरुचीसंपन्न आणि परिणामकारक करण्याचे काम सूत्रसंचालक करतो.

कोणत्याही कार्यक्रमात महत्त्वाचे असतात ते अतिथी, वक्ते, कलावंत आणि श्रोते. तिथे सूत्रसंचालकाची भूमिका दुय्यम असते; परंतु कार्यक्रमाचा आशय नेमकेपणाने पोहोचवणारी शैली, कार्यक्रमातील भागांची गुंफण करण्याचे कौशल्य आणि निवेदनातील परिणामकारकता यांमुळे वक्ते, अतिथी आणि गायक यांच्याइतकाच लक्षात राहतो तो सूत्रसंचालक. त्यामुळे सूत्रसंचालक हा केवळ दोन भागामधील दुवा नसतो, तर एका भागातून दुसऱ्या भागाकडे जाताना सर्व कार्यक्रम चैतन्यमय करणारा सूत्रधार असतो. 'कार्यक्रम सुंदर, नेटका आणि अप्रतिम झाला' ही अप्रत्यक्षपणे सूत्रसंचालनाला मिळालेली दादच असते.

## स्वरूप

सूत्रसंचालन ही जशी एक कला आहे तसेच ते एक शास्त्रसुद्धा आहे.

कार्यक्रमाच्या तपशिलांचा अभ्यास, नियोजन, क्रमनिश्चिती, शिष्टाचार पालन, औपचारिकता निभावणे, सभाशास्त्राचे ज्ञान, श्रोत्यांच्या मानसशास्त्राची जाण, वक्त्यांच्या/कलावंतांच्या सादरीकरणाचे नेमके समीक्षण, रसग्रहण इत्यादी दृष्टीने सूत्रसंचालन हे शास्त्र आहे.

नेटके आणि परिणामकारक निवेदन, आवाजाच्या आरोह-अवरोहाने शब्दांतून विचार-भाव-भावनांचे प्रकटीकरण करून अपेक्षित परिणाम साधणे, कार्यक्रमातील तुटकपणा जोडत त्यामध्ये रंग भरणे, कार्यक्रमात स्वत: न गुंतता श्रोत्यांना रंगवून कार्यक्रमाला गती देणे या दृष्टीने सूत्रसंचालन ही एक कला आहे.

केवळ व्यक्तींचा नामोल्लेख, पुढील कार्यक्रमाचे निवेदन म्हणजे सूत्रसंचालन नसते. अतिथी, कलावंत आणि वक्ते यांच्या नेमक्या परिचयाबरोबर कार्यक्रमाचा तपशील खुबीने सांगत पुढील निवेदनाच्या अल्प प्रस्तावनेमधून श्रोत्यांची जिज्ञासा वाढवून वक्त्याला, कलावंताला सादरीकरणासाठी प्रेरणा देऊन प्रोत्साहित करण्याचे काम सूत्रसंचालक करतो.

## सूत्रसंचालनाची क्षेत्रे

जिथे जिथे श्रोत्यांसमोर एखादा कार्यक्रम साजरा केला जातो तिथे तिथे सूत्रसंचालकाची भूमिका महत्त्वाची असते. पूर्वीच्या काळी सभा-संमेलने आणि साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमांपुरती मर्यादित असणारी सूत्रसंचालनाची व्याप्ती आता बैठका, मेळावे, परिसंवाद, चर्चासत्रे, पारितोषक वितरण समारंभ तसेच विवाहसोहळे, वाढदिवस इत्यादींपर्यंत पोहोचलेली दिसून येते. सूत्रसंचालनाची प्रमुख क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत-

| क्षेत्रे | |
|---|---|
| सामाजिक | क्रीडा |
| साहित्यिक | आरोग्य |
| सांस्कृतिक | धार्मिक |
| शैक्षणिक | व्यावसायिक |
| राजकीय | कौटुंबिक |
| कला | आकाशवाणी आणि दूरचित्रवाणी |
| शासकीय | संगीतविषयक |

| कार्यक्रम | |
|---|---|
| संगीत महोत्सव | गौरव समारंभ |
| व्याख्यानमाला | मेळावे |
| संमेलने | स्पर्धा |
| परिसंवाद | जयंती, स्मृतिदिन |
| चर्चासत्रे | उद्‌घाटन समारंभ |
| कार्यशाळा | निरोप समारंभ |
| काव्यमैफील | वाढदिवस |
| वर्धापनदिन | विवाह सोहळे |

## सूत्रसंचालन : एक वलयांकित व्यवसाय

कार्यक्रमांचे स्वरूप, त्यामधील विविधता, त्यांची संख्या आणि दूरचित्रवाहिन्यांवरील कार्यक्रमांची रेलचेल यांमुळे सूत्रसंचालनाला अतिशय महत्त्व प्राप्त होत आहे. त्यामुळे सूत्रसंचालन आता केवळ हौस वा छंद न राहता व्यवसाय होतोय. काही व्यक्तींनी पूर्णवेळ सूत्रसंचालक म्हणून काम करत सूत्रसंचालनाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे. काहीजण नोकरी-व्यवसाय सांभाळून उत्तमप्रकारे सूत्रसंचालन करत आहेत. काही अभिनेते आणि अभिनेत्री उत्कृष्ट सूत्रसंचालक म्हणून वेगळा ठसा उमटवत आहेत. त्यामुळे अनेक युवक-युवतींना हे क्षेत्र खुणावत आहे.

## सूत्रसंचालक होण्यासाठी पूर्वतयारी

वाचन, श्रवण-निरीक्षण, चिंतन आणि निवेदनाचा सराव यांमधून उत्तम सूत्रसंचालक होता येते.

* **वाचन-** सूत्रसंचालकाने खूप वाचायला हवे. त्याचे वाचन चौफेर हवे. कथा-कादंबरी-नाटक-काव्य-चरित्रे-आत्मचरित्रे यांबरोबरच दैनंदिन वृत्तपत्रे व त्यांच्या पुरवण्या, दिवाळी अंक इत्यादींचे वाचन करायला हवे. वाचन करताना आशयाबरोबर भाषाशैलीकडे लक्ष दिले तर त्यातून सूत्रसंचालकाची चांगली तयारी होते. सूत्रसंचालनाच्या क्षेत्रांची व्याप्ती मोठी आहे. त्यामुळे साहित्यिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, सांगीतिक, कला-क्रीडाविषयक, ऐतिहासिक अशा विविध विषयांसंबंधीचे वाचन सूत्रसंचालनासाठी अतिशय उपयुक्त ठरते. वाचन करताना महत्त्वाच्या घटना, प्रसंग, अवतरणे, सुवचने, किस्से, काव्यपंक्ती आणि आवश्यक ते संदर्भ यांची टिपणे करून ठेवावीत. वृत्तपत्र वाचनातून आपले विविध क्षेत्रांशी संबंधित सामान्यज्ञान अद्ययावत राहते.

मराठीबरोबर हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषेतील अवतरणे, काव्यपंक्ती, शेरोशायरी यांचाही संग्रह करावा आणि गरजेनुसार त्यांचा समर्पकपणे वापर करावा.

वाचनाचे दोन भाग पडतात. एक म्हणजे सातत्याने करायचे विविध विषयांसंबंधीचे वाचन आणि दुसरे म्हणजे त्या-त्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने करायचे वाचन. वाचनाचे दोन्ही प्रकार परस्परांशी पूरक आहेत. वाचनाबरोबर आपले चिंतन सुरू असते. त्यामधून नवनवे सूचत राहते, ते टिपून ठेवले तर योग्य ठिकाणी वापरता येते आणि त्यामुळे सूत्रसंचालन पुस्तकी होत नाही.

*** श्रवण आणि निरीक्षण–** सूत्रसंचालकाने व्याख्याने, मुलाखती आणि विविध कार्यक्रमांमधील सूत्रसंचालन चिकित्सकपणे पाहावे, ऐकावे. त्या कार्यक्रमाची शक्तिस्थळे, त्रुटी यांचा अभ्यास करावा. त्यामधून आपली शक्तिस्थळे बळकट करावीत. त्रुटी दूर कराव्यात. दुसऱ्यांच्या चांगल्या गोष्टींतून जसे शिकता येते तसेच त्यांच्या चुकांमधूनही शिकता येते. सूत्रसंचालकांसाठी हा अभ्यासच असतो. आता दूरचित्रवाणीवर, आकाशवाणीवर कार्यक्रमांची रेलचेल असते. ते पाहावेत, ऐकावेत. नामवंत सूत्रसंचालक, निवेदक यांच्या श्रवण आणि निरीक्षणातून शब्दफेक, देहबोली, सभाधीटपणा, सहजता, उत्स्फूर्तता, निवेदन कौशल्य, प्रसंगावधान, संवादशैली इत्यादी अनेक कौशल्ये शिकता येतात. यू-ट्यूबवरही अनेक कार्यक्रम उपलब्ध असतात. ते पुन: पुन्हा पाहता-ऐकता येतात. स्वत:ची निवेदनशैली घडवण्यासाठी त्यांचा फायदा होतो.

*** आवाजाची जोपासना–** सूत्रसंचालकाचा अभ्यास आणि व्यासंग पोहोचतो तो त्याच्या आवाजाच्या माध्यमातून! त्यासाठी सूत्रसंचालकाला आवाज 'तयार' करावा लागतो, 'घडवावा' लागतो आणि त्याची जोपासना करावी लागते. प्रकट वाचन, कविता वाचन, अभिवाचन, पठण यांमधून उच्चारस्पष्टता, उच्चारशुद्धता, निवेदनातील आरोह-अवरोह यांचा सराव करावा. आवाजाची गती, लय ही श्वासावर अवलंबून असते. त्यासाठी योग आणि प्राणायाम उपयुक्त ठरतात. आता आवाज विकसनाचे आणि जोपासण्याचे शास्त्र विकसित झाले आहे. त्यासंबंधी अधिक माहिती घेऊन आवाजासंबंधी योग्य ती दक्षता घ्यावी, आवश्यक ती पथ्ये पाळावीत.

*** ध्वनिवर्धकाच्या वापराचा सराव–** ध्वनिवर्धकाचा वापर ही बाब तांत्रिक वाटत असली तरी निवेदनाची परिणामकारकता ध्वनिवर्धकाच्या वापरावर अवलंबून असते. कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार आवाजाची पातळी आणि ध्वनिवर्धकाचे अंतर या बाबींचा अंदाज घेऊन सराव करावा. खुले व्यासपीठ वा बंदिस्त सभागृह यात आवाजाचे स्वरूप बदलते हे लक्षात घ्यावे. अशा स्वरूपाचा अभ्यास आणि सराव यांमुळे सूत्रसंचालक आत्मविश्वासाने कार्यक्रमाला सामोरा जातो. त्याच्यातील आत्मविश्वास हेच त्याच्या यशाचे गमक असते.

## सूत्रसंचालन करण्यापूर्वी

एखाद्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यापूर्वी खालीलप्रमाणे पूर्वतयारी करणे अपेक्षित आहे.

(१) कार्यक्रमाचा विषय, स्थळ, तारीख, वेळ, अध्यक्ष, अतिथी, वक्ते, कलावंत, श्रोतृवर्ग इत्यादींबाबत तपशिलाने माहिती घ्यावी.

(२) कार्यक्रमपत्रिका समजून घ्यावी.

(३) कार्यक्रमाचे स्थळ अपरिचित असल्यास तेथे प्रत्यक्ष जाऊन ते नजरेखालून घालावे.

(४) अपेक्षित प्रेक्षक/श्रोतृवर्ग यांचा वयोगट, स्तर, अभिरुची, इत्यादी बाबी विचारात घ्याव्यात.

(५) कार्यक्रमाच्या विषयाला अनुसरून अपेक्षित संदर्भ मिळवण्यासाठी वाचन करावे.

(६) निवेदनाची संहिता तयार करावी. त्यामध्ये आवश्यक संदर्भ, सुवचने, अवतरणे, काव्यपंक्ती यांची नोंद करावी; परंतु त्यांचा अतिरेक नसावा. त्यामध्ये नावीन्य असावे.

(७) कार्यक्रमामधील संभाव्य अडचणींचा अगोदरच अंदाज घ्यावा. त्यामुळे ऐनवेळी येणारा ताण टळू शकतो आणि परिस्थिती सहजतेने हाताळता येते.

## प्रत्यक्ष सूत्रसंचालन करताना

**हे करावे**

(१) कार्यक्रमाच्या आरंभी उपस्थित श्रोत्यांना नमस्कार करावा, स्वत:चा थोडक्यात परिचय देऊन त्यांचे स्वागत करावे.

(२) मंचावरील उपस्थित मान्यवरांचा पदानुसार, समाजातील स्थानानुसार योग्य क्रमाने, योग्यप्रकारे आदरपूर्वक उल्लेख करावा.

(३) मंचावरील उपस्थितांच्या कार्याचाही आदरपूर्वक उल्लेख करावा.

(४) पूर्ण झालेल्या कार्यक्रमाच्या भागांबाबत साररूपाने सकारात्मक अभिप्राय व्यक्त करून कार्यक्रमाला गती द्यावी.

(५) निवेदन सहज, उत्स्फूर्त असावे. उच्चार स्पष्ट असावेत. अपेक्षित विचार, भाव-भावना योग्यप्रकारे पोहोचण्यासाठी आवाजातील योग्य आरोह-अवरोहासह निवेदन करावे. श्रोत्यांकडे पाहून आत्मविश्वासपूर्वक निवेदन करावे. निवेदन शैली संवादी असावी.

(६) भाषाशैली सहज, सोपी, प्रवाही, प्रासादिक आणि मनाला भिडणारी असावी.

(७) प्रसंगावधान, हजरजबाबीपणा आणि समयसूचकता यांमुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी होतात, हे ध्यानी घ्यावे.

(८) श्रोत्यांमधील जाणकार, तज्ज्ञ यांचा आदरपूर्वक उल्लेख करावा.

(९) नजरचुकीने एखादी त्रुटी, उणीव राहिल्यास तत्परतेने दिलगिरी व्यक्त करावी.

(१०) सूत्रसंचालन करताना कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार भाषाशैलीत बदल करावा. (उदा., गौरव समारंभ, शोकसभा)

(११) कार्यक्रम संपल्यानंतर आत्मपरीक्षण करून पुढील कार्यक्रमात त्यानुसार आवश्यक ते बदल करावेत.

**हे टाळावे**

(१) निवेदन करताना अनावश्यक कृती, हालचाली टाळाव्यात.

(२) बोलण्याची गती एकदम कमी वा जास्त असू नये. आवाजाची पातळीसुद्‌धा एकदम कमी वा जास्त असू नये.

(३) निवेदन वाचून दाखवू नये.

(४) निवेदनात अवतरणे, काव्यपंक्ती यांचा अतिरेक टाळावा. तसेच त्यांचा पुन: पुन्हा वापर टाळावा.

(५) निवेदन पाल्हाळीक होऊ नये याची दक्षता घ्यावी.

(६) निवेदकाने स्वत:बद्‌दल बोलणे टाळावे.

(७) वक्त्यांच्या बोलण्यातील आशयाची उगीचच पुनरावृत्ती करू नये. दोन वक्त्यांची, कलावंतांची तुलना करू नये.

## कार्यक्रमपत्रिका नमुने

| १<br>वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप | २<br>प्रकाशन समारंभ | ३<br>गौरव समारंभ |
|---|---|---|
| (१) पूर्वकथन (शिष्टाचारासह)<br>(२) दीपप्रज्वलन<br>(३) स्वागतगीत<br>(४) पाहुण्यांचा परिचय व पाहुण्यांचे स्वागत<br>(५) प्रास्ताविक<br>(६) अहवालवाचन<br>(७) पारितोषक वितरण<br>(८) अतिथींचे मनोगत<br>(९) अध्यक्षांचे मनोगत<br>(१०) आभारप्रदर्शन | (१) पूर्वकथन (शिष्टाचारासह)<br>(२) दीपप्रज्वलन<br>(३) पाहुण्यांचा परिचय व पाहुण्यांचे स्वागत<br>(४) प्रास्ताविक (प्रकाशकाचे मनोगत)<br>(५) लेखकाचे मनोगत<br>(६) पुस्तक प्रकाशन<br>(७) पुस्तकावरील भाष्य<br>(८) अध्यक्षीय भाषण<br>(९) आभारप्रदर्शन | (१) पूर्वकथन (शिष्टाचारासह)<br>(२) दीपप्रज्वलन<br>(३) पाहुण्यांचा परिचय व पाहुण्यांचे स्वागत<br>(४) प्रास्ताविक<br>(५) सत्कारमूर्तीचा परिचय<br>(६) सत्कारमूर्तीचा सत्कार<br>(७) पाहुण्यांचे मनोगत<br>(८) सत्काराला सत्कारमूर्तीचे उत्तर<br>(९) प्रमुख पाहुण्यांचे मनोगत<br>(१०) अध्यक्षीय भाषण<br>(११) आभारप्रदर्शन |

वाचन, निरीक्षण, चिंतन, सराव आणि अनुभवातून सूत्रसंचालक घडत असतो. त्यासाठी चिकाटीबरोबर सकारात्मक आणि स्वीकारशील वृत्ती उपयुक्त ठरते.

## कृती

**✲ खालील कृती करा.**

(१) उत्तम सूत्रसंचालनासाठी आवश्यक असलेली कौशल्ये स्पष्ट करा.

(२) 'वसुंधरा दिनानिमित्त' होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेची कार्यक्रमपत्रिका तयार करा.

(३) 'सूत्रसंचालकाच्या दृष्टीने कार्यक्रम पत्रिकेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे', हे विधान स्पष्ट करा.

(४) 'सूत्रसंचालकाने व्यवस्थित पूर्वतयारी केली तरच सूत्रसंचालन उत्तम होऊ शकते', या विधानाची सत्यता पटवून द्या.

**प्रकल्प.**

कनिष्ठ महाविद्यालयात संपन्न होणाऱ्या कविकट्ट्यासाठी सूत्रसंचालनाची संहिता तयार करून सादरीकरण करा.

# २. मुद्रितशोधन

## प्रास्ताविक

मराठी भाषेत लेखन करताना महत्त्वाचा घटक म्हणजे लिखित मजकुराची शुद्धता सांभाळणे. लिखित मजकुराच्या व्याकरणशुद्धतेबरोबर आशयाचे अचूक संपादनही तितकेच महत्त्वाचे असते. कोणत्याही मजकुराच्या आशयशुद्धतेची व अचूकतेची जबाबदारी लेखकाची असली तरी व्याकरणदृष्ट्या लेखन निर्दोष करणे आवश्यक असते. यातून मुद्रितशोधनाची गरज स्पष्ट होते.

हस्तलिखित मजकुरापेक्षा छपाईतील मजकूर वाचकांच्या मनावर चांगला परिणाम करतो. मुद्रणकलेमध्ये काळानुसार बदल होत गेले; परंतु आजही छापील मजकुरावरील विश्वास कायम आहे आणि तंत्रज्ञानाच्या युगातही मुद्रितशोधनास महत्त्व आहे.

वृत्तपत्रे, साप्ताहिके, नियतकालिके, ग्रंथ, पुस्तके, हस्तपुस्तिका, दिवाळी अंक, लहान-मोठी पत्रके, संस्थांचे अहवाल, शुभेच्छापत्रे यांसारख्या अनेक प्रकारांत मुद्रित साहित्याची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होत आहे व त्यात उत्तरोत्तर वाढच होणार आहे. मुद्रित साहित्याची मोठ्या प्रमाणावर होणारी वाढ हे समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील सजगतेचे आणि प्रगतीचे लक्षण आहे. ही वाढ जितकी मोठी तितकी मुद्रितशोधकांची आवश्यकता अधिक असते, म्हणून मुद्रितशोधनाचे स्वरूप समजावून घेणे गरजेचे आहे.

## स्वरूप

**मुद्रितशोधन** → लेखकांकडून प्रमाण लेखनात अनवधानाने राहिलेल्या त्रुटी दूर करून लेखन निर्दोष करणे म्हणजे 'मुद्रितशोधन' (Proof Reading) होय.

**मुद्रितशोधक** → व्याकरणाच्या परिपूर्ण अभ्यासाने जाणीवपूर्वक लक्ष देऊन लेखनातील त्रुटी काळजीपूर्वक दूर करण्याचे काम करणारी व्यक्ती म्हणजे 'मुद्रितशोधक' (Proof Reader) होय.

वृत्तपत्रे, साप्ताहिके, नियतकालिके, ग्रंथ, पुस्तके, हस्तपुस्तिका, दिवाळी अंक, जाहिराती, लहान-मोठी पत्रके, संस्थांचे अहवाल, शुभेच्छापत्रे इत्यादी प्रकारांतील कोणत्याही मजकुराचे अंतिम मुद्रण होण्यापूर्वी मुद्रिते बारकाईने वाचून त्यातील त्रुटी दूर करणे व मजकूर वाचनीय आणि निर्दोष करणे म्हणजे '**मुद्रितशोधन**' होय. आपण लिहिलेला किंवा दुसऱ्याने लिहिलेला मजकूर पुन्हा वाचून पाहणे आणि तो वाचताना व्याकरण, संदर्भ, वाक्यरचना आणि लेखननियमांनुसार लेखन या घटकांचा जाणीवपूर्वक विचार करणे म्हणजे '**मुद्रितशोधन**' होय. लेखकाला प्रत्येक वेळी प्रमाण लेखनाचे परिपूर्ण ज्ञान असेलच असे नाही. त्यामुळे काही त्रुटी राहू शकतात किंवा लिहिण्याच्या ओघात अनवधानाने काही लिहायचे राहून जाते वा पुनरुक्तीही होऊ शकते. अशावेळी मुद्रितशोधन फार गरजेचे असते.

मुद्रितशोधक मुद्रितशोधनातून व्यावसायिकदृष्ट्या सक्षम आणि प्रभावी कार्य करू शकतो. स्थानिक ते जागतिक पातळीवर लिखित मजकुराची नितांत आवश्यकता असल्याने मुद्रितशोधनाची व्याप्तीही मोठी आहे.

## मुद्रितशोधकाचे महत्त्व

भाषा आणि समाज यांचे अनन्यसाधारण नाते असते. एखाद्या राष्ट्राची भाषा विकसित झाली, की राष्ट्र विकसित होते. त्या राष्ट्राची साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक व इतर सर्वार्थाने प्रगती होऊ लागते. भाषा बोलणाऱ्यांची, लिहिणाऱ्यांची आणि वाचणाऱ्यांची संख्याही वाढत जाते. ही भाषा जितक्या दर्जेदारपणे वाचकांसमोर येईल, त्या प्रमाणात समाजाची दिशा ठरू लागते. मुद्रितशोधकाची जबाबदारी ही आहे, की त्याने त्या भाषेचे जतन योग्य पद्धतीने केले पाहिजे.

साहित्यनिर्मिती व्यवहारात लेखकाबरोबरच टंकलेखक, मुद्रितशोधक, मुद्रक व प्रकाशक हे अत्यंत महत्त्वाचे घटक काम करत असतात. त्यांची तज्ज्ञता, त्या क्षेत्रातील अधिकार, सौंदर्यदृष्टी, निष्ठा या बाबी ग्रंथाला उच्च निर्मितीक्षमता प्राप्त करून देत असतात. या क्षेत्रात लेखकानंतर मजकुराचे वारंवार वाचन करणारा जर कोणी असेल तर तो मुद्रितशोधक असतो. तो ग्रंथाला परिपूर्ण व वाचनीय करण्याचे काम करत असतो. तो लेखक व मुद्रक यांतील दुवा असतो. भाषेचा रक्षणकर्ता, प्रकाशकांचा मित्र आणि वाचकांचा प्रतिनिधी अशा विविध नात्याने तो बांधला गेलेला असतो.

मुद्रितशोधन ही एक कला आहे, तसेच ते एक शास्त्रही आहे. मुद्रितशोधन एक व्यवसाय आहे. उत्तम मुद्रितशोधक आपल्या अभ्यासाने, साधनेने या व्यवसायाला उत्तम दर्जा प्राप्त करून देऊ शकतो.

उत्तम निष्ठावंत मुद्रितशोधक हा केवळ 'वाचाल तर वाचाल' यावर नव्हे तर 'शुद्‌ध वाचाल तर वाचाल व भाषेलाही वाचवाल' याला अधिक महत्त्वाचे मानतो.

## मुद्रितशोधकाची भूमिका

मुद्रितशोधकाला भाषेची उत्तम जाण असणे महत्त्वाचे आहे. ही जाण येण्यासाठी भाषेच्या अभ्यासाबरोबरच स्वयंअध्ययन, सूक्ष्म वाचन, व्याकरणाची जाण, लेखन, चिंतन यांतून त्याने स्वत:ला प्रगल्भ करणे गरजेचे असते. विविध विषयांतील व साहित्यप्रकारांतील वाचनामुळे त्याच्यापाशी अनेक संदर्भ गोळा होतात. ते लक्षात ठेवणे व मुद्रितशोधन करताना त्यांचा योग्य ठिकाणी वापर करणे आवश्यक आहे. (कोणत्याही विषयावरचा मजकूर मुद्रितशोधनासाठी समोर येऊ शकतो.) मुद्रितशोधकाची भूमिका ही फक्त प्रमाणभाषेनुसार लेखन तपासणे इतकी मर्यादित नसते. वाक्ये अर्थपूर्ण, बिनचूक आहेत का? संदर्भ योग्य व अचूक आहेत का? वाचताना वाचकांचा रसभंग होत नाही ना, शब्दांची पुनरावृत्ती किंवा अर्थाची द्‌विरुक्ती झाली नाही ना, याची काळजी मुद्रितशोधकाने घेतली पाहिजे. पुस्तकाच्या पानांवरचे पृष्ठ क्रमांक, नकाशे, तक्ते, चित्रे, अनुक्रमणिका व पृष्ठ क्रमांक यांचा संबंध, मजकुराची सलगता या गोष्टींकडेही मुद्रितशोधकाचे लक्ष हवे. जर एखाद्या मजकुराबाबत शंका निर्माण झाली अथवा त्रुटी जाणवल्या तर त्याही निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी मुद्रितशोधकाने स्वीकारली पाहिजे. एकदा मजकूर तपासला म्हणजे मुद्रितशोधकाची जबाबदारी संपली असे होत नाही, तर तिसऱ्यांदाही तो मजकूर नजरेखालून घालण्याची त्याची तयारी असली पाहिजे. लेखकाचा मजकूर अधिक सर्वांगसुंदर करण्याची व तो वाचकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी ही मुद्रितशोधकाची असते.

मुद्रितशोधकाला मुद्रणविषयक ज्ञान व दृष्टी आवश्यक असते. अभ्यासूवृत्ती, कामावरची निष्ठा, अनेक विषयांतील रुची आणि भाषेची समज ही चांगल्या मुद्रितशोधकाची वैशिष्ट्ये आहेत. कामाचा प्रदीर्घ अनुभव त्याला अधिकाधिक परिपूर्ण करत असतो. चांगला मुद्रितशोधक होणे ही एकप्रकारे तपश्चर्याच असते. निरंतर वाचनाने तो

प्रगल्भ होत जातो, त्याचा परिणाम म्हणून तो लेखकाबरोबर संवाद साधून मूळ मजकुरात संदर्भांची भरही घालू शकतो. जसे एखादे चांगले पुस्तक त्या लेखकाची व प्रकाशकाची ओळख बनते, तसे मुद्रितशोधकानेही स्वत:ची ओळख निर्माण करायला हवी. चांगला, जाणकार मुद्रितशोधक पुस्तकाचे संपादन, सूची, शब्दांकन, लेखन, भाषांतर, अनुवाद अशी सर्जनशील कामे करून आपली क्षमता विकसित करू शकतो.

छापून आलेला मजकूर हा लेखननियमांनुसार असणार, हे वाचकांनी जणू गृहीत धरलेले असते. लेखन करताना तो त्यातील शब्दांचे अनुकरण करत असतो किंवा तेच संदर्भ प्रमाण मानत असतो. मूळ संदर्भ अथवा लेखननियमांपर्यंत जाण्याची तो तयारी दर्शवत नाही आणि म्हणूनच मुद्रितशोधकाची जबाबदारी वाढत असते. उदा., 'पर्यावरण दिन' हा शब्द जर मुद्रण करताना 'पर्यावरण दीन' असा आला आणि मुद्रितशोधकाच्याही नजरेतून तो सुटला तर 'पर्यावरण दिन' किती 'दीनवाणा' होईल याची कल्पना केलेली बरी!

## मुद्रितशोधनासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये

(१) मुद्रितशोधकाला भाषेची उत्तम जाण असणे महत्त्वाचे आहे.

(२) मुद्रितशोधकाची भूमिका केवळ प्रमाणभाषेनुसार व्याकरणशुद्धता तपासणे इतकीच मर्यादित नसते, तर लिहिलेला मजकूर हा अर्थपूर्ण आणि बिनचूक आहे का? संदर्भ अचूक व योग्य आहेत का? हे तपासणे व त्याची जाण असणेही महत्त्वाचे आहे.

(३) मुद्रितशोधकाला मुद्रणविषयक तंत्र, परिपूर्ण ज्ञान व दृष्टी आवश्यक असते.

(४) आपले ज्ञान अद्ययावत ठेवणे गरजेचे असते.

(५) कामावरील निष्ठा, अनेक विषयांसह समोर आलेल्या मजकुरात रुची व जाण असणे आवश्यक आहे.

(६) कामाचा प्रदीर्घ अनुभव मुद्रितशोधकाला अधिकाधिक परिपूर्ण आणि प्रगल्भ करत असतो.

(७) सक्षम मुद्रितशोधक होण्यासाठी चिकाटी, अभ्यासातील सातत्य व सराव आवश्यक असतो.

(८) प्रतिभावंत लेखक व सजग प्रकाशक यांच्याप्रमाणे जाणकार मुद्रितशोधकही तपश्चर्येने आपली ओळख निर्माण करू शकतो.

(९) ग्रंथाच्या विषयानुसार त्या त्या विषयांचे सर्वसाधारण ज्ञान, भाषेचे चांगले ज्ञान आवश्यक असते.

(१०) अनेक विषयांची आवड व समज असणे आवश्यक असते.

## मुद्रितशोधकाची साधनसामग्री

- ज्या भाषेतील मुद्रिते तपासायची आहेत त्यांचे शब्दकोश.
- इंग्रजी, हिंदी शब्दकोश.
- व्याकरणविषयक पुस्तके.
- संदर्भ ग्रंथ.
- मुद्रितशोधन खुणांचा तक्ता.

- शैली पुस्तिका (काही संस्था स्वत:च्या शब्दांसाठी आग्रही असतात, उदा., नाना फडणवीस का नाना फडणीस).
- प्रमाणभाषेची नियमावली पुस्तिका.

ही साधनसामग्री वापरल्यामुळे मुद्रितशोधकाचे काम निर्दोष होण्यासाठी मदत होते व त्याच्याही ज्ञानात भर पडत जाते. संदर्भ, माहिती यांची अद्ययावतता हा चांगल्या मुद्रितशोधकाचा गुण आहे.

## मुद्रितशोधनाचे तंत्र

(१) कोणत्याही मुद्रिताची खालीलप्रमाणे किमान तीन वाचने होतात.

- **पहिले वाचन–** मूळ मजकुराचे व टंकलिखित मजकुराचे शक्यतो साहाय्यकाच्या मदतीने वाचन करणे. पहिल्या वाचनात खूप शंका व दुरुस्त्या येऊ शकतात, त्याचे निराकरण व दुरुस्ती होणे अपेक्षित असते.
- **दुसरे वाचन–** पहिल्या मुद्रितातील त्रुटी व शंकांची तपासणी करणे. राहिलेल्या वा नव्याने आढळलेल्या दुरुस्त्या करणे, पृष्ठमांडणी, पृष्ठक्रमांक, अनुक्रमणिका, चित्रे, आकृत्या इत्यादींची सुयोग्य मांडणी करून त्यांचे काळजीपूर्वक पुन्हा वाचन होणे आवश्यक असते.
- **तिसरे वाचन–** दुसऱ्या मुद्रितातील दुरुस्त्या तपासणे. मजकूर अंतिम छपाईला जाण्यापूर्वी लेखक व मुद्रितशोधक हे अतिशय जाणीवपूर्वक वाचन व दुरुस्ती करतात, कारण छपाई झाल्यानंतर दुरुस्तीला वाव नसतो.

(२) मुद्रितशोधकाने मजकूर तपासताना मुद्रितातील चुका मुद्रितशोधनाच्या खुणांचा वापर करून बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत मांडून प्रत्येक खुणेनंतर तिरकी रेषा करावी.

(३) मुद्रितात जे दिसेल ते मूळ प्रतीत न शोधता, मूळ प्रतीत जे आहे ते मुद्रितात शोधण्याची सवय असावी.

(४) मुद्रितशोधकाने मजकूर तपासताना येणाऱ्या शंकांची नोंद ठेवणे गरजेचे असते.

(५) शब्दकोश वा अन्य कोशवाङ्मय यांचा गरजेनुसार वापर करण्याची सवय असावी.

(६) मुद्रितशोधकाने प्रत्येक विरामचिन्हाचाही बारकाईने विचार व वाचन करणे गरजेचे असते.

(७) आजच्या संगणकीय युगात लेखक मुद्रकाकडे सॉफ्ट–कॉपी पाठवतो. मुद्रकाकडून ती अपेक्षित संस्कारासह मुद्रितशोधकाकडे येते. मुद्रितशोधक मुद्रित मजकुराची मांडणी करून ती कॉपी पुन्हा लेखकाकडे पाठवतो. अंतिम मुद्रित परिपूर्णतेसाठी व निर्दोषतेसाठी मुद्रितशोधकाकडे येत असते. त्यातील मुद्रितशोधनाचे काम पूर्ण झाल्यानंतर ती निर्दोष होते आणि मुद्रणासाठी पाठवली जाते.

## संगणकावर स्पेलचेक असताना मुद्रितशोधकाची गरज काय?

नवीन संगणकीय तंत्रज्ञानानुसार मुद्रितशोधनाचे काम सोपे व सहज झाले आहे यात शंका नाही; परंतु ते निर्दोष झाले आहे, असे मात्र खात्रीने सांगता येत नाही. स्पेलचेकर (संगणकीय शब्दलेखन तपासनीस) शब्द बरोबर आहे किंवा चूक आहे ते तपासतो, त्याला पर्यायी शब्दांची जोड देतो; परंतु तो शब्द तिथे योग्य आहे का नाही हे त्याला समजत नाही, ते मुद्रितशोधकाला ठरवावे लागते. उदा., सुप्रसिद्ध, माननीय, आदरणीय, विचारवंत, लोकप्रिय इत्यादी विशेषणांपैकी कोणते विशेषण योग्य ते मुद्रितशोधक निश्चित करत असतो. स्पेलचेकरच्या बेसावध वापरामुळे एका वृत्तपत्रात 'सुप्रसिद्ध संगीतकाराचा गौरव' या शीर्षकाऐवजी 'कुप्रसिद्ध संगीतकाराचा गौरव' असे प्रसिद्ध

झाले होते. परिच्छेद वगळला गेला, संदर्भ चुकीचा दिला गेला, वाक्यांची सरमिसळ झाली तर ते स्पेलचेकरला समजत नाही. तपासला जात असलेला मजकूर मूळ मजकुरानुसार आहे की नाही हे मुद्रितशोधक पाहू शकतो, स्पेलचेकर नाही. नाम-विशेषण-कर्ता-क्रियापद इत्यादी क्रम किंवा व्याकरणिक रचना मुद्रितशोधकालाच माहीत असते. स्पेलचेकर हा मुद्रितशोधकाला पर्याय नसून तो अल्पप्रमाणात त्याचा मदतनीस आहे, असेही आपण म्हणू शकतो. स्पेलचेकरवर पूर्णत: विसंबून राहता येणार नाही.

**⁕ वृत्तपत्रात आलेल्या बातमीतील खालील वाक्य पाहा.**

'प्रियांका मोहिते हिने जगातील चौथ्या क्रमांकाचे ल्होत्से (२७९४० मीटर) शिखर सर केले.' या वाक्यात शिखराची उंची मीटरमध्ये दाखवली आहे. वस्तुत: शिखराची उंची फुटात मोजतात. मीटरमध्ये नाही. मुद्रितशोधकाऐवजी स्पेलचेकरची व्यवस्था केल्याने ही चूक दुरुस्त झाली नाही.

मुद्रण व्यवसायाशी संबंधित काही संज्ञा, घटक आणि प्रक्रिया यांची माहिती खाली दिली आहे.

| मुद्रण व्यवसायाशी संबंधित विविध घटक आणि व्यक्ती | | |
|---|---|---|
| मुद्रक | Printer | मजकुराची छपाई करणारा |
| मुद्रण प्रत | Press Copy | छपाईसाठी मजकुराची तयार प्रत |
| मुद्रित | Proof | तपासणीसाठी काढलेली प्रत |
| मुद्रण | Printing | मजकुराची छपाई |
| मुद्रितशोधक | Proof Reader | मुद्रितातील त्रुटी सुधारणारा |
| मुद्रितशोधनाच्या खुणा | Proof Marks | मजकूर दुरुस्त करण्याची चिन्हे |
| मुद्रितशोधन | Proof Reading | मजकूर निर्दोष करण्याची प्रक्रिया |
| मुद्रित प्रत | Print Out | छपाईनंतरची प्रत |
| मुद्रणालय | Press | छापखाना |

## मुद्रितशोधनाच्या खुणांचा तक्ता

| खूण | खुणेचा अर्थ | खूण कशी करावी याचे उदाहरण | खुणेचा वापर |
|---|---|---|---|
| — | ओळ सरळ करा. | रंजक आणि बोधक | — / |
| ⁀ | अक्षरे जोडून घ्या./एक शब्द करा. | संवाद तून | ⁀/ |
| ≠ | शब्द तोडा. स्पेस/अंतर घाला. | पुस्तकात/असतात | ≠ / |
| ∂ | काढून टाका व शब्द जोडा. | विषयस/ही | ∂ |
| ∂ | डिलिट/काढून टाका. | सार्व/जनिक | ∂ |
| ा | काना द्या. | म/नसाची | ा/ |
| ां | काना व अनुस्वार द्या. | ग्राहक/शी | ां/ |
| ि | ऱ्हस्व वेलांटी करा. | महिला/दीन | ि/ |
| ी | दीर्घ वेलांटी करा. | आ/शीर्वाद | ी/ |
| ु | ऱ्हस्व उकार करा. | ख/णा करा. | ु / |
| ू | दीर्घ उकार करा. | स/ुचनापत्रक | ू / |
| े | मात्रा घाला. | पाहिज/ | े/ |
| ें | मात्रा व अनुस्वार घाला. | तो /धळा आहे. | ें/ |
| र्‍ | रफार घाला. | पुनज/न्म | र्‍/ |
| , | स्वल्पविराम घाला. | चित्त प्रसन्न/आनंदी | ,/ |
| ; | अर्धविराम घाला. | प्रयत्न केला/तरी होणारे कधीच | ; / |
| ⊙ | पूर्णविराम लिहा. | ती शाळेत गेली∠ | ⊙∠ |
| (...) | चुकून खोडलेला मजकूर तसाच ठेवणे. | नवीन आवृत्ती... | ठेवा/ |
| ? | प्रश्नचिन्ह घाला. | तो काय म्हणाला ∠ | ?∠ |
| ! | उद्गारचिन्ह घाला. | छे∠अशक्यच आहे. | !∠ |
| : | विसर्ग घाला. | पुन∠प्रक्षेपण होईल. | :∠ |
| — | संयोगचिन्ह घाला. | दुखले∠खुपले | —∠ |
| - | डॅश घाला. | त्या खुणा खालीलप्रमाणे-∠ | -∠ |
| .∂ | अनुस्वार काढून टाका. | संशय | ∂ |
| ∽ | शब्दाची जागा बदला. | मराठी/सुगम | ∽ |
| (/) | कंस घाला. | जगन्मान्य/अपवाद वगळता/ | (/)/ |
| wf | चुकीचा टाईप (रॉंग फॉंट) | व्याकरण | wf |
| Bold | ठळक टाईप करा. | वर्णविचार | Bold |
| ૭ | अक्षर सुलट करा. | मात्र | ૭ |

| | | | |
|---|---|---|---|
| 'सेंटर' | मधोमध घ्या. | प्रस्तावना | 'सेंटर' |
| Runon | पुढे चालू ठेवा. (वाक्य/परिच्छेद जोडून घ्या.) | हे पुस्तक विद्यार्थ्यांनी अभ्यासावे. | Runon |
| ⅃ | नवीन परिच्छेद करा. | जणू यशाची हमी! ⅃ भाषा आणि मुद्रणकला | ⅃ |
| ∠ | नवीन/राहिलेले अक्षर घाला. | पारं∠रिक | प∠ |
| | मूळ मजकूर सुटला. | मुद्रण आणि ∠ हे परस्पराश्रयी आहेत. | मूळ कॉपी पाहा. |

## कृती

* खालील कृती करा.

(१) मुद्रितशोधकाच्या भूमिकेचे आजच्या काळातील महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा.

(२) मुद्रितशोधनासाठी लागणारी कौशल्ये सविस्तर विशद करा.

(३) 'मुद्रितशोधनातील नजरचुकीने राहिलेली चूक अर्थाचा अनर्थ करते', या विधानाची सत्यता स्पष्ट करा.

(४) थोडक्यात वर्णन करा.

(१) मुद्रितशोधनाची गरज

(२) मुद्रितशोधन प्रक्रिया

(५) खालील खुणांचा अर्थ स्पष्ट करा.

| क्र. | खूण | खुणेचा अर्थ |
|---|---|---|
| (१) | = | |
| (२) | ∽ | |
| (३) | (/) | |
| (४) | ⅃ | |
| (५) | (...) | |

## (६) खालील तक्ता पूर्ण करा.

| क्र. | खूण | खुणेचा अर्थ | खूण कशी करावी याचे उदाहरण | खुणेचा वापर |
|---|---|---|---|---|
| (१) | ी | | | |
| (२) | | | पुनर्/जन्म | |
| (३) | | | | d |
| (४) | | स्वल्पविराम घाला | | |
| (५) | | | अंत∟करण | |

## (७) खालील गदय उताऱ्याचे मुद्रितशोधन करून उतारा पुन्हा लिहा.

रामण अतीषय उत्कृष्ट व्याख्याते होते त्याच व्याख्यान एकायला ५००० पेक्षा जास्त लोक जमतत त्यांच भाषण ज्ञान वर्धक असायचच पण अनेक विनोदी आणी किस्से यांनी ते व्याख्यान आपल रंगऊन टाकत ते बोलायला लागले की लोकाला वेळेचं भान च राहत नसे लोकांचे चेरे आनंदं आणि
हास्य यांनी फूलुन जा असत असे हे रामन

# ३. अनुवाद

## प्रास्ताविक

जगातील विविध देशांत राहणाऱ्या लोकांचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन वेगवेगळे आहे. त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. त्या-त्या ठिकाणच्या साहित्यात तेथील लोकजीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. माणसाला परस्परांचे जीवन, संस्कृती, परंपरा आणि ज्ञानसंपदा इत्यादी जाणून घेण्याची जिज्ञासा असते. या जिज्ञासापूर्तीचे एक साधन 'साहित्याचा अभ्यास' हे असते; परंतु भाषेच्या अडसरामुळे सर्वांना ते शक्य होत नाही. अशा परिस्थितीत मार्ग असतो तो अनुवादाचा. स्रोत भाषेतील साहित्याचा लक्ष्य भाषेत अनुवाद झाला, की माहितीची, ज्ञानाची देवाणघेवाण सुलभ होते आणि साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादी विषयांची माहिती एका भाषेतून दुसऱ्या भाषेत, जगातल्या एका भागातून दुसऱ्या भागात पोहोचते.

पूर्वी संपर्काची साधने मर्यादित होती, तसेच अनुवादाचे कामही मर्यादित स्वरूपात होत होते. आज विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग जवळ आले आहे. तसेच ज्ञानाच्या विस्फोटाने विज्ञान-तंत्रज्ञान आणि साहित्य तसेच अन्य क्षेत्रांतील माहितीच्या देवाण-घेवाणीची गरज फार मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे अनुवादाच्या कार्याला आता खूप महत्त्व प्राप्त झाले आहे आणि अनुवादकांना अनेक संधी उपलब्ध होत आहेत.

## अनुवाद

'अनुवाद' या शब्दाची फोड केली तर 'अनु' म्हणजे 'मागाहून'. 'वाद' हे 'वद' या धातूचे रूप आहे. अर्थात 'मागाहून सांगितलेले' असा अनुवाद या शब्दाचा अर्थ होतो. ज्येष्ठ भाषा अभ्यासक प्र. ना. परांजपे यांच्या मते, 'अनुवाद म्हणजे मौखिक किंवा लिखित भाषेच्या माध्यमातून एकदा व्यक्त झालेल्या आशयाची, त्याच भाषेच्या किंवा दुसऱ्या एखाद्या भाषेच्या माध्यमातून पुन्हा केलेली मौखिक किंवा लिखित अभिव्यक्ती होय.'

अनुवाद ही जशी दोन भाषांमधील आंतरक्रिया असते तशीच ती दोन संस्कृतींमधीलही आंतरक्रिया असते. त्या भाषांपैकी ज्या भाषेतल्या मजकुराचा अनुवाद करायचा त्या भाषेला मूळ भाषा अथवा स्रोत भाषा (Source Language) असे म्हणतात, तर ज्या भाषेत अनुवाद करायचा तिला लक्ष्य भाषा (Target Language) असे म्हणतात. प्रत्येक भाषेला एक परंपरा असते आणि त्या भाषेतील साहित्यात ज्ञानभांडाराचे संचित असते. त्यामुळे अनुवाद करणे म्हणजे एखाद्या साहित्यकृतीचे शब्दश: भाषांतर करणे नव्हे, तर मूळ साहित्यकृतीमधील सांस्कृतिक, सामाजिक वातावरण, विचार आणि भावभावना दुसऱ्या भाषेतील वाचकांपर्यंत संक्रमित करणे होय.

अनुवादाचे क्षेत्र पूर्वी प्रामुख्याने साहित्यापुरते मर्यादित होते. त्याच्या जोडीला विज्ञान-तंत्रज्ञान आणि उद्योगविषयक साहित्याचे गरजेनुसार अनुवाद होत होते. आता अनुवादाचे क्षेत्र विस्तारत आहे. रेडिओ, दूरचित्रवाणी, चित्रपट या माध्यमांत अनुवादाच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय दूरचित्रवाणी वाहिन्या विविध प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारण करू पाहात आहेत. त्यांना चांगले अनुवादक हवे असतात. बहुराष्ट्रीय कंपन्या व्यापाराच्या निमित्ताने जगभर पोहोचत आहेत. प्रसार आणि जाहिरात कार्यासाठी त्यांना स्थानिक भाषांमधील अनुवादाची गरज भासत आहे. शिक्षणक्षेत्राचा विस्तार होत आहे. जगभरात होत असलेला ज्ञानाचा विस्फोट शिक्षणाच्या माध्यम भाषांमधून पोहोचवण्यासाठी तज्ज्ञ अनुवादकांची गरज आहे. त्यामुळे अनुवादाच्या क्षेत्रांमध्ये व्यवसायाच्या अनेकानेक संधी उपलब्ध होत आहेत.

भाषा आणि समाज या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समाजात राहणे, एकमेकांशी संपर्क साधणे या मानवी गरजा आहेत. या गरजांची पूर्तता भाषा करते. कोणतीही भाषा आपल्यासमोर दोन स्वरूपात येते. (१) मौखिक भाषा (२) लिखित भाषा.

आपल्या मनातील विचार, भावना, कल्पना आपण भाषेच्या माध्यमातून व्यक्त करत असतो. समाजात चांगले विचार, मूल्ये साहित्याच्या माध्यमातून रुजवणे भाषेचे महत्त्वाचे कार्य ठरते. भारतातील आणि जगभरातील विविध भाषांमध्ये उत्तम दर्जाची साहित्यनिर्मिती होत आहे. साहित्यातील अनुभवविश्वाची विविधता, व्यापकता जाणून घ्यायची असेल तर अनुवादाच्या मार्गाने जावे लागेल. मनुष्याने विचार करायला सुरुवात केली तेव्हापासून तो अनुवाद करतो.

भाषांतर, अनुवाद, रूपांतर, स्वैर अनुवाद या प्रक्रिया भिन्न असून यात खालीलप्रमाणे सूक्ष्म भेद आहेत.

## भाषांतर

भाषांतर म्हणजे, 'एका भाषेतील आशय जसाच्या तसा दुसऱ्या भाषेत नेणे किंवा आशयाचे भाषिक स्थलांतरण करणे होय. भिन्न भाषा, भाषिक साहित्य व संस्कृती यांना जोडण्याचे, देवाणघेवाण करण्याचे भाषांतर हे साधन आहे. म्हणूनच 'Translation is a bridge to join two gulf streams', असे म्हटले आहे.

ज्येष्ठ भाषाभ्यासक डॉ. कल्याण काळे यांच्या मते– 'मूळ संहितेच्या वाचनाने मिळणारे ज्ञान आणि विचार, आनंद आणि अनुभव दुसरी भाषा बोलणाऱ्याला त्याच्या भाषेत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न म्हणजे भाषांतर होय.'

## अनुवाद

अनुवाद म्हणजे मूळ साहित्यकृतीच्या अंतरंगात प्रवेश करून नवनिर्मिती करणे होय. अनुवादकर्ता मूळ लेखकाचे 'स्व'त्व अबाधित राखून नवीन वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती करत असतो.

## रूपांतर

एखाद्या वाङ्मयप्रकारातील कलाकृती दुसऱ्या वेगळ्या वाङ्मयप्रकारात नेणे म्हणजे रूपांतरण होय. 'पुनराभिव्यक्ती' हे रूपांतराचे वैशिष्ट्य आहे. उदा., एखाद्या कादंबरीचे 'नाटक' या साहित्यप्रकारात रूपांतर होते. यामध्ये साहित्यप्रकाराच्या स्वरूपानुसार आशय, शैली आणि रूपात बदल होत असतो.

## स्वैर अनुवाद


स्वैर अनुवादात मूळ साहित्यकृतीमधील भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक वातावरण अनुवादित साहित्यकृतीत बदलले जाते. लक्ष्य भाषेतील भौगोलिक, सामाजिक वातारण विचारात घेऊन स्वैर अनुवादात आवश्यक ते बदल केले जातात.

## अनुवादाच्या भिन्न रूपांतील फरक

| स्वरूप | | | |
|---|---|---|---|
| **भाषांतर** | **अनुवाद** | **रूपांतर** | **स्वैर अनुवाद** |
| मूळ मजकुरातील शब्दन्-शब्द, वाक्यरचना, शैली भाषांतरात जशीच्या तशी टिकवण्याचा प्रयत्न केला जातो. | शब्द, संरचना, शैली यापेक्षा एकूण आशयावर भर देऊन केलेले भाषांतर म्हणजे अनुवाद. | मूळ कलाकृतीचे केवळ बीज घेऊन पूर्णत: नवीनच कलाकृती रचणे म्हणजे रूपांतर. | मूळ कथावस्तूला धक्का न लावता स्वातंत्र्य घेऊन स्वैर अनुवाद केला जातो. |
| **वैशिष्ट्ये** | | | |
| नेमकेपणा, काटेकोरपणा, तंतोतंतपणा, यथार्थता ही वैशिष्ट्ये असतात. | एकप्रकारे मुक्त भाषांतरच असते. आवश्यक तिथे संक्षेप किंवा विस्तारही केलेला असतो. | एकप्रकारे मुक्त अनुवाद म्हणावा लागेल. मुळातील सांस्कृतिक वातावरण, शैली यांत आमूलाग्र बदल केलेला असतो. | या प्रकारच्या अनुवादात प्रत्येक गोष्टीचा अनुवाद करण्याऐवजी मूळ संकल्पना विचारात घेऊन आणि अनुवादाचे स्वातंत्र्य घेऊन कलाकृती निर्माण करणे अपेक्षित असते. |
| **अनुवादकाची शैली** | | | |
| भाषांतरकार आपल्या लेखनशैलीत मूळ मजकुराशी जास्तीत जास्त प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करतो. | अनुवादात अनुवादकाच्या शैलीची छाप दिसून येते. कारण अनुवादकाने शैलीचे स्वातंत्र्य घेतलेले असते. | रूपांतर हे एकप्रकारे पुन:सर्जनच असते. रूपांतरकाराच्या शैलीला अनुवादकाच्या शैलीपेक्षा अधिक स्वातंत्र्य असते. | वाचकांच्या संवेदनशीलतेला रुचेल, पचेल असा बदल करण्याची शैली अनुवादक वापरतो. |
| **उदाहरणे** | | | |
| विविध सामाजिक शास्त्रे आणि विज्ञान, तंत्रज्ञान यासंबंधीची भाषांतरे. | डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या 'Wings of Fire' या आत्मचरित्राचा मराठीत 'अग्निपंख' या नावाने माधुरी शानभाग यांनी केलेला अनुवाद. | 'पु.लं. देशपांडे' यांचे 'ती फुलराणी' हे नाटक जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्या 'पिग्मेलियन' या इंग्रजी नाट्याचा भावानुवाद किंवा अनुसर्जन. | गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या मूळ बंगाली कवितेचा श्यामला कुलकर्णी यांनी केलेला 'जाता अस्ताला' हा स्वैरअनुवाद आहे. |

## अनुवादकाचा व्यासंग

अनुवादक, भाषांतरकार आणि रूपांतरकार यांना सर्वसाधारणपणे 'अनुवादक' याच नावाने संबोधले जाते. अनुवादकाच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू आणि अनुवादासाठी आवश्यक कौशल्ये खालील आकृतीवरून स्पष्ट होतात.




अनुवादक हा दोन संस्कृतींना जोडणाऱ्या सेतूचे काम करतो. अनुवादकाचा अनुवाद केवळ तांत्रिक रूपांतर नसून ती मूळ कलाकृतीशी समांतर अशी सर्जनशील कलाकृती असते. म्हणूनच अनुवाद करणे हे कौशल्याचे मानले जाते व हेच कौशल्य अनुवादकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनते. मूळ साहित्याचा समर्थ ताकदीने केलेला अनुवाद हा अधिकाधिक रसिक-वाचकांपर्यंत पोहोचून अपेक्षित परिणाम साधतो. या दृष्टिकोनातून अनुवादकाची भूमिका महत्त्वाची ठरते.

उत्कृष्टता आणि गरज हे निकष लावूनच अनुवादासाठी साहित्याची निवड करावी लागते. अनुवादासाठी निवडलेली कलाकृती जेवढी लोकप्रिय, उत्कृष्ट तेवढी अनुवादकाची जबाबदारी वाढते. अनेक संदर्भाधिष्ठित शब्दांचा अनुवाद करताना बरेचदा पर्यायी शब्दांचा वापर करावा लागतो. यासाठी अनुवादकाचे संदर्भविश्व समृद्ध असावे लागते. अनुवादकाला केवळ प्रमाणभाषेचे ज्ञान असून चालत नाही, तर त्याला बोलीभाषांचे ज्ञानही असावे लागते.

एकाच शब्दासाठी परभाषेत असलेले अनेक शब्द, त्यांचे विशिष्ट संदर्भातील विशिष्ट अर्थ व अर्थच्छटा यांची समज अनुवाद लेखनात महत्त्वाची ठरते. शब्दामागील भाव समजून केलेला अनुवाद रसिक-वाचकांच्या हृदयापर्यंत पोहोचतो. यासाठी विविध साहित्यप्रकारांची वैशिष्ट्ये समजून घ्यावी लागतात. अनुवादात भाषिक संदर्भ व सांस्कृतिक संदर्भ महत्त्वाचे ठरतात. मराठी भाषेतील 'पदर', 'उष्टा' इत्यादी शब्दांना इतर भाषांत चपखल पर्यायी शब्द मिळतातच असे नाही. अशावेळी अनुवादकाच्या लेखनकौशल्याचा कस लागतो.

ज्या साहित्यकृतीचा अनुवाद करायचा आहे त्याचे प्रथम बारकाईने वाचन करावे आणि योग्य संदर्भ शोधून अनुवादाची पूर्वतयारी करावी. अनुवादात सहजता, स्वाभाविकता असावी.

## अनुवाद करताना पाळायची पथ्ये

(१) कलाकृतीची निवड करताना कलाकृती उत्कृष्ट व उपयुक्त असावी.
(२) मूळ कलाकृतीशी प्रामाणिक राहून अनुवाद करावा.

(३) अनुवाद करताना वर्णन, विवेचन इत्यादींमध्ये स्पष्टता असणे आवश्यक आहे. तसेच अचूकताही महत्त्वाची आहे. अनुवाद विश्वासार्ह असावा.
(४) पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन न ठेवता कलाकृतीला न्याय देणे अपेक्षित आहे.
(५) स्वत:च्या विचारांचे, मूल्यव्यवस्थेचे रोपण कलाकृतीवर करू नये.
(६) अनुवाद करताना स्रोत भाषा व लक्ष्य भाषा यांच्या व्याकरणाची उत्तम समज असावी.
(७) अनुवाद वाचकांना समृद्ध करणारा असावा.
(८) मूळ कलाकृतीतील स्थळे, वृत्तपत्रे, मासिके, पुस्तके इत्यादींच्या मूळ नावांचा अनुवाद करू नये.
(९) कलाकृतीचे स्वरूप आणि अनुवादकाची गरज लक्षात घेऊन अनुवाद-स्वैर असावा की शब्दश: हे ठरवले जावे.

## अनुवादात भाषेचे महत्त्व

दैनंदिन जीवनव्यवहारात आपण प्रमाणभाषेपेक्षा बोलीचाच वापर अधिक प्रमाणात करतो. प्रमाणभाषेचा वापर शिक्षण, ग्रंथलेखन, शासनव्यवहार यांसाठी होत असतो. प्रमाणभाषा औपचारिक तर बोलीभाषा अनौपचारिक असते. प्रमाणभाषा तांत्रिकतेकडे झुकणारी असते, तर बोलीभाषेला त्या त्या प्रदेशाच्या मातीचा गंध असतो.

प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांच्या वापरातील अनुवादकाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. कलाकृतीचा बाज सांभाळून अनुवादकाने आपली भूमिका मांडावी. ग्रामीण कादंबरीचा अनुवाद करताना प्रमाणभाषेचा अट्टहास करू नये. अनुवादकाला कालखंडाचे, सांस्कृतिक संदर्भांचे ज्ञान असावे. भिन्न भिन्न बोलींचा तत्कालीन सांस्कृतिक संदर्भांचा अनुवादकाने अभ्यास करणे गरजचे ठरते. थोडक्यात अनुवादकाने कलाकृतीच्या प्रत्येक पैलूचा विचार करावा.

## मुद्रित साहित्याच्या अनुवादाची कार्यक्षेत्रे

वृत्तपत्रे, अन्य प्रसारमाध्यमे, न्यायालये, इतर सरकारी संस्था इत्यादी ठिकाणी अनुवादकाची गरज असते. भाषांतर-रूपांतर आणि अनुवादाच्या कामासंदर्भात आंतरजालाच्या माध्यमातून निविदा मागवल्या जातात. ऑनलाईन कामे व ऑनलाईन मानधन असे काहीसे स्वरूप या क्षेत्रातील कामासंदर्भात पुढे येत आहे. रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट इत्यादी प्रसारमाध्यमांत अनुवादाच्या संधी उपलब्ध होत आहेत. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या विस्तारासाठी आपले जाळे जगभरातील विविध देशांत पसरवत आहेत. विपणनासाठी, जाहिरातींसाठी अनुवादकाची गरज असते. अनेक दर्जेदार साहित्याचे अनुवाद विविध भाषांत करण्याची संधी उपलब्ध आहे.

**(१) शिक्षण क्षेत्र–** शिक्षण क्षेत्रामध्ये अनुवादाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. उदा., कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यक, अभियांत्रिकी, कायदा, गृहविज्ञान इत्यादी.

**(२) वैद्यकीय क्षेत्र–** औषधासोबत असणारे माहितीपत्रक रुग्णांच्या सोईसाठी त्यांच्या भाषेत उपलब्ध करून देणे.

**(३) कायद्याचे क्षेत्र–** सामान्य माणसांपर्यंत कायद्याचे ज्ञान पोहोचवून समाजाला विधायक दिशा देण्याचे काम करण्यासाठी अनुवादकाची भूमिका महत्त्वाची ठरते. उदा., सातबाराचा उतारा, स्त्रीविषयक कायदे, कायद्यात होणारे नवीन बदल इत्यादी.

(४) **पर्यटन सेवा–** देशी, विदेशी पर्यटकांना पर्यटनस्थळांची माहिती व महती समजण्यासाठी अनुवादकाची गरज भासते. तसेच अतिथिगृहे, स्वागतकक्षातील जनसंपर्कासाठी अनुवादक दुवा म्हणून काम करतो.

(५) **प्रसारमाध्यमे–** समाजसंपर्काची महत्त्वाची साधने म्हणून नियतकालिके, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट ह्यांच्याकडे बघितले जाते. प्रसारमाध्यमांचा सद्य:स्थितीतील वाढता प्रसार बघता यासंदर्भात अनुवादाच्या क्षेत्रात मोठी संधी उपलब्ध आहे.

(६) **अन्य क्षेत्रे–** त्याचबरोबर जाहिरात क्षेत्र, प्रशासन, उद्योग, व्यापार, सांस्कृतिक क्षेत्र, क्रीडा तसेच आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट, बँक आणि दैनंदिन व्यवहार इत्यादींमध्ये अनुवादाची नितांत गरज निर्माण झालेली दिसून येते.

## मौखिक अनुवादाची कार्यक्षेत्रे

'एका भाषेतील प्रतिपादनाचे दुसऱ्या भाषेत सलग व यथार्थ असे मौखिक रूपांतर', म्हणजे 'मौखिक अनुवाद' होय.

(अ) **दुभाषक–** व्यवसाय क्षेत्रात 'दुभाषक' म्हणून मोठ्या संधी आहेत. उदा., शासकीय स्तरावर परदेशी भेटीत चर्चेच्या वेळी दुभाषकांची गरज असते. एखादी आंतरदेशीय सामाईक योजना राबवताना दुभाषक महत्त्वाचा दुवा ठरतो. राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान, मंत्री यांची भाषणे सर्व दृष्टीने काळजीपूर्वक सादर होण्यासाठी अनुवादकाची गरज भासते.

(आ) **जनसंपर्क–** उदा., विमानतळ, विमाने, रेल्वे स्टेशन, हॉटेल्स, अतिथिगृहे, स्वागतकक्ष, दूरध्वनी, संदेशवहन, प्रवासी आवक-जावक, इत्यादी स्थाने.

(इ) **पर्यटन सेवा–** विशेषत: परदेशी पर्यटकांसाठी प्रवास, आगत-स्वागत, निवास, भोजन, प्रबोधन, मनोरंजन इत्यादी खास व वाढीव सेवा, सुविधा.

(ई) **समूह दूरभाष (Conference Call)–** दोन पद्धती (१) परदेशी व परभाषी सहकाऱ्यांशी होऊ घातलेला मौखिक व्यवहार अनुवादकाने समजून घेणे व त्याने दूरध्वनीद्वारे संपर्क साधणे. (२) यजमान (Host), परदेशी सहकारी (Guest) व अनुवादक यांच्यात समूह दूरभाष (Conference Call) योजणे.

(उ) **संगणकामार्फत भाषांतर व अनुवाद सेवा–** अतिशीघ्र गतीचे भाषिक व्यवहार संगणकामार्फत साधता येतात. आंतरजाल हे या दृष्टीने उपयुक्त ठरते.

(ऊ) **विशेष नैपुण्ययुक्त अनुवाद सेवा–** परदेशी भांडवल, तंत्रज्ञान, तंत्रज्ञ, सल्लागार यांच्या साहाय्याने व सहभागाने देशात खाजगी व सरकारी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात औद्योगिक, व्यापारी, सांस्कृतिक इत्यादी प्रकल्प राबवले जातात. त्यामधील चर्चांमध्ये दुभाषकांची गरज असते.

(ए) **समूह संबोधन अनुवाद (Conference Interpretation)–** या प्रकारच्या सेवेचे प्रयोजन/हेतू-चर्चासत्रे, अभ्याससत्रे, प्रशिक्षणसत्रे, व्यावसायिक विशेषज्ञांचे मेळावे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा इत्यादी प्रसंगी असते. बुद्धिजीवी, विशेषज्ञ, बहुश्रुत, राजकारणपटू यांसाठी जास्त प्रमाणात असते म्हणून हे कठीण काम विशेष आव्हानात्मक समजून तज्ज्ञ अनुवादकाने करावे.

(ऐ) **Google Translator–** या माध्यमातून अनुवाद क्रिया सोपी झाली आहे; परंतु त्यातील अचूकतेची खात्री देता येत नाही.

भावी काळात अनुवाद क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर या घटकाचे महत्त्व लक्षात घेऊन भाषिक विकासाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी हा घटक अभ्यासावा. भाषांच्या अभ्यासाची आवड आणि साहित्य निर्मितीकडे विशेषत: अनुवादाकडे कल असलेल्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रात खूप संधी आहेत.

**(१) फरक स्पष्ट करा. (प्रत्येक प्रकाराचे एक उदाहरण अपेक्षित)**

(अ) अनुवाद-भाषांतर

(आ) रूपांतर-स्वैर अनुवाद

**(२) अनुवादाची कार्यक्षेत्रे स्पष्ट करा.**

**(३) अनुवाद क्षेत्रातील व्यवसायाच्या संधी तुमच्या शब्दांत नमूद करा.**

**(४) 'अनुवाद करणे ही सर्जनशील कृती आहे', हे विधान स्पष्ट करा.**

**(५) अनुवाद करताना पाळायची पथ्ये तुमच्या शब्दांत लिहा.**

**(६) 'अनुवादामुळे सांस्कृतिक संचित विस्तारते', याबाबत तुमचे मत स्पष्ट करा.**

**(७) बोलीभाषा आणि प्रमाणभाषा याबाबतची अनुवादकाची भूमिका स्पष्ट करा.**

**(८) (अ) खालील परिच्छेदाचा हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये अनुवाद करा.**

मोहन आज सकाळी लवकर जागा झाला. त्याने दात घासले, तोंड, हात-पाय धुतले आणि तो अभ्यासाला बसला. आज तो खेळायला गेला नाही. मोहनने दहा वाजता भोजन केले. लेखनसाहित्य घेतले आणि तो परीक्षेसाठी शाळेत निघून गेला.

**(आ) खालील वाक्यांचा मराठी व इंग्रजीत अनुवाद करा.**

(१) किसी नदी में एक भेड़िया ऊपर की तरफ पानी पी रहा था ।

(२) मेरे मित्र की चिठ्ठी कई दिनों बाद आयी ।

(३) राम के पिता मोहन यहाँ आएँ है ।

**प्रकल्प.**

(१) मराठीमधून हिंदी भाषेत अथवा इंग्रजी भाषेत अनुवादित झालेल्या दहा साहित्यकृतींची माहिती मिळवा आणि त्याबाबत एक टिपण तयार करा.

(२) हिंदी आणि इंग्रजीतून मराठी भाषेत अनुवादित झालेल्या प्रत्येकी दहा साहित्यकृतींची माहिती मिळवा आणि त्याबाबत एक टिपण तयार करा.

# ४. अनुदिनी (ब्लॉग) लेखन

## प्रास्ताविक

एकविसाव्या शतकात विज्ञान व तंत्रज्ञानाचा झपाट्याने विकास झाला. प्रसारमाध्यमांचा विस्तार वेगाने झाला. सामाजिक संपर्क माध्यमे जनसामान्यांच्या हातात आली. ज्ञान, माहिती, मनोरंजन, जाहिरात आणि प्रबोधन हे घटक फक्त प्रसारमाध्यमांची मक्तेदारी न राहता ती सामान्यांचीही संपर्क स्थाने बनली. महाजालाने असे गारुड केले, की त्याचे अनन्यसाधारण महत्त्व माणसाला स्वीकारावेच लागले. या महाजालावर स्वतःची नाममुद्रा उमटवण्याची संधी प्रत्येकाला प्राप्त झाली आणि त्यातून वेगवेगळ्या संकेतस्थळांचा उदय झाला. WhatsApp, Facebook, Twitter, Instagram यांसारखेच 'ब्लॉग' किंवा 'अनुदिनी' हे एक सामाजिक माध्यम आहे. 'जालपत्रिका' किंवा 'जालनिशी' ही नावेही त्यासाठी वापरली जातात. 'ब्लॉग' हे नाव अधिक परिचित असल्याने आपण याचा वापर करूया.

## अनुदिनी (ब्लॉग) संकल्पना व स्वरूप

'ब्लॉग' हे 'वेबलॉग' या शब्दाचे लघुरूप आहे. वेब (Web) म्हणजे आंतरजाल आणि लॉग (Log) म्हणजे नोंद होय. वेबसाईट आणि लॉग बुक यांचे मिश्रण म्हणजे ब्लॉग असून ते अनुदिनी लेखनाचे इलेक्ट्रॉनिक रूप आहे. विविध विषयांवरील आपले व्यक्तिगत विचार समाजाला कळावे या उद्देशाने व्यक्तीने निर्माण केलेले 'संकेतस्थळ' म्हणजे ब्लॉग, अशी ब्लॉगची व्याख्या करता येईल. आपले मत, विचार, कल्पना अभिव्यक्त करण्यासाठी संवादाचे प्रभावी माध्यम म्हणून अनुदिनी लेखन करता येते. अनुदिनी लेखन हे सामाजिक संपर्कस्थळ असल्याने त्यावर प्रसिद्ध होणारी माहिती अनेक वाचकांना उपयुक्त ठरू शकते.

'अनुदिनी'चा उदय होण्यापूर्वी 'डायरी लेखन' केले जात होते. व्यक्ती त्याच्या आयुष्यातील दैनंदिन घडामोडींची नोंद त्या डायरीत करून ठेवत असे. ही डायरी त्याची त्याच्यापुरती खाजगी होती. एकप्रकारे ती अभिव्यक्ती किंवा भाष्य होते; परंतु ते अनेकांपर्यंत जात नव्हते. ते अनेकांपर्यंत जावे, माहितीची, विचारांची देवाणघेवाण व्हावी, संवादाचे पूल बांधले जावेत, क्रिया–प्रतिक्रियांमधून विचारांचे कंगोरे समोर यावेत, या व अशा अनेक कारणांमधून 'अनुदिनी'ची गरज वाटू लागली. ही गरज पूर्ण होण्यासाठी प्रभावी समाज माध्यमाची निकड निर्माण झाली आणि त्यातूनच 'अनुदिनी'ची निर्मिती झाली. मनात आलेले विचार व भावना यांना शिस्त व स्वातंत्र्याची जोड देऊन अभिव्यक्त होण्यासाठी 'अनुदिनी' हे उत्तम माध्यम आहे, असे म्हणावे लागेल. या माध्यमातून स्वतःचे विचार, एखाद्या कार्यक्रमाची माहिती, रेखाचित्र, छायाचित्र, चित्रफिती, एखाद्या पदार्थाची पाककृती यांसारख्या अनेक गोष्टी सगळ्यांपर्यंत पोहोचवता येतात. उदा., एखादी गिर्यारोहक एखाद्या पर्वतावर जाऊन आल्यानंतर त्यासंबंधीची माहिती, अनुभव, इतिहास, आख्यायिका, छायाचित्रे आणि चित्रफीत 'अनुदिनी'वर देते आणि त्याचा वैचारिक – ज्ञानात्मक लाभ 'अनुदिनी' वाचणाऱ्यांना होतो. 'अनुदिनी'वर प्रसिद्ध होणारी माहिती ही महाजालावर प्रकाशित होते. म्हणून वाचकांची संख्याही दिवसागणिक वाढत आहे.

## अनुदिनी (ब्लॉग) चा इतिहास

जस्टीन हॉल हा आद्य ब्लॉगर म्हणून ओळखला जातो. १९९४ मध्ये links.net ही वेबडायरी त्याने सुरू केली. सुरुवातीला मर्यादित प्रमाणात असलेला 'ब्लॉग'चा वापर हळूहळू वाढत गेला. दिवसेंदिवस ब्लॉगची लोकप्रियता वाढत असून ब्लॉग लिहिणाऱ्यांच्या संख्येतही लक्षणीय वाढ होत आहे.

## अनुदिनी (ब्लॉग) ची क्षेत्रे

वैयक्तिक अनुभवाच्या अभिव्यक्तीसाठी निर्माण झालेल्या 'अनुदिनी'ने आपले कार्यक्षेत्र हळूहळू विस्तारले. नैसर्गिकपणे व्यक्त होण्यापासून ते निवडणुकीत मत मागण्यापर्यंत किंवा व्यक्ती-व्यक्तीतील हितगुज सार्वत्रिक करण्यापासून ते वस्तूची जाहिरात व विक्री करण्यापर्यंत ब्लॉगला कोणतेही क्षेत्र वर्ज्य नाही. प्रातिनिधिक स्वरूपात काही क्षेत्रांचा विचार करता येईल.

'ब्लॉग'ची क्षेत्रे

(१) वैयक्तिक
(२) सामाजिक
(३) व्यावसायिक
(४) वाङ्मयीन
(५) सामूहिक
(६) पर्यटन
(७) शैक्षणिक
(८) राजकीय

या क्षेत्रांखेरीज अन्य क्षेत्रांतही 'अनुदिनी' चा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. भारतातही तंत्रस्नेही होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

## ब्लॉग (अनुदिनी) का लिहायचा?

माणसाच्या मनात अनेक विचार, कल्पना, आणि भावना यांची सतत घुसळण होत असते. त्या कधी मूर्त तर कधी अमूर्त स्वरूपात व्यक्त होत असतात. कधी चित्रांतून, कधी छायाचित्रांतून, कधी शब्दांतून तर कधी शब्द-चित्र-संगीत यांच्या एकजुटीतूनही प्रकट होताना दिसतात. सर्जनशीलता हा त्याचा मूलभूत गाभा आहे. मनात येणारे नवे, मुक्त पण चिंतनात्मक विचार मांडायचे असतील तर 'अनुदिनी' लिहायला हवी.

ब्लॉग लिहिणारांची संख्या मुबलक आहे; दिवसेंदिवस त्यात लक्षणीय भर पडत आहे. तेव्हा 'ब्लॉग का लिहायचा' तर –

- मनातील विचार, कल्पना, भावना इत्यादी व्यक्त करण्यासाठी.
- अनुभव सार्वत्रिक करण्यासाठी.
- एकाचवेळी अनेकांशी शब्दरूप संवाद साधण्यासाठी.
- स्थानिक ते जागतिक ही अवकाश पोकळी उपयोगात आणून संपर्क क्षेत्र विस्तारण्यासाठी.
- लेखन, विचार आणि संशोधन यांची सांगड घालण्याची सवय होण्यासाठी.
- लेखन कौशल्याला इतर अनेक कलांची जोड देऊन कला-कलांमधील आंतरसंबंध दर्शवण्यासाठी.
- 'स्व' तील सर्जनशीलता प्रवाहित ठेवण्यासाठी.
- शब्दसंपत्ती व भाषिक कौशल्ये यांच्यात वाढ आणि सुधारणा करण्यासाठी.
- आंतरजालावरील तंत्रज्ञानाचा वापर ब्लॉगलेखनासाठी करून घेण्याचा सराव होण्यासाठी.

## अनुदिनीसाठी (ब्लॉगसाठी) विषयाची निवड

ब्लॉग लेखनासाठी जरी व्यापक क्षेत्र उपलब्ध असले तरी प्रत्येकाचे आवडीचे आणि प्रावीण्याचे क्षेत्र वेगवेगळे असते. ब्लॉगसाठी विषय निवडताना किंवा ब्लॉगलेखन सुरू करताना प्रथमत: स्वत:ला जो विषय आकर्षित करतो आणि ज्यामध्ये स्वयंस्फूर्तीने लेखन करावेसे वाटते, तो विषय निवडला पाहिजे. विषयांची विविधताही अशावेळी समोर येऊ शकते, तेव्हा विशेष रुची असणाऱ्या विषयांना प्राधान्य द्यावे. अनुदिनी लेखन सुरू केल्यानंतर विषय मांडताना अडचणी येऊ शकतात. या अडचणींवर मात करण्याचा प्रयत्न करावा. अर्थात, हे सारे लगेच घडणार नाही.

ब्लॉगिंग करत असताना यात सुधारणा होत जाते, म्हणून सातत्याने ब्लॉग लेखन करणे गरजेचे असते. आवडीच्या विषयावर सातत्याने व तितक्याच गांभीर्याने ब्लॉग लेखन केले तर तुम्ही चांगले ब्लॉगर होऊ शकता. अनेक ब्लॉगर्सचा 'ब्लॉगिंग' हाच व्यवसाय झाला आहे.

## चांगल्या अनुदिनीची (ब्लॉगची) वैशिष्ट्ये

- आकर्षक शीर्षक
- आकर्षक विषय मांडणी
- छोटी, सुटसुटीत, सोपी आणि आकलनसुलभ अशी वाक्यरचना
- परिच्छेदांची समर्पक मांडणी
- एका परिच्छेदातून दुसऱ्या परिच्छेदात जाण्याची सहजशैली
- रिकाम्या जागेचा योग्य वापर (Use of White Space)
- वाचकांची उत्सुकता टिकवून ठेवणारी शैली
- संवादात्मक लेखन
- समूहाशी नाते बांधणारी शैली
- विविध श्राव्य, दृकश्राव्य फितींची लिंक
- शब्दमर्यादेचे पालन
- विषयातील अद्ययावतता

## 'अनुदिनी'चे (ब्लॉगचे) प्रकार

(१) वैयक्तिक ब्लॉग
(२) सहयोगी/गट ब्लॉग
(३) मायक्रोब्लॉगिंग
(४) कॉर्पोरेट आणि संस्थात्मक ब्लॉग
(५) एकत्रित ब्लॉग
(६) विषयानुसार ब्लॉग

**(१) वैयक्तिक ब्लॉग –** एखादी व्यक्ती स्वतःच्या ब्लॉगवर तिच्या आवडीनुसार जेव्हा मजकूर प्रसिद्ध करते, तेव्हा तो वैयक्तिक ब्लॉग असतो. हा ब्लॉग कसा असावा किंवा कसा आकर्षक (चित्रे, ध्वनिफीत, चित्रफीत इत्यादी टाकून) करावा ही पूर्णतः त्याची इच्छा असते. वैयक्तिक ब्लॉगवर सातत्याने किंवा गरजेनुसार लेखन प्रसिद्ध करता येते.

**(२) सहयोगी / गट ब्लॉग –** जेव्हा एकापेक्षा अधिक ब्लॉगर्स वेब ब्लॉगमध्ये पोस्ट लिहितात तेव्हा त्याला सहयोगी किंवा गट ब्लॉग म्हणतात. अनेक विषयांचे एकत्रीकरण यात वाचायला मिळते. उदा., आम्ही साहित्यिक.

**(३) मायक्रोब्लॉगिंग –** डिजिटल सामग्रीचे लहान लहान तुकडे पोस्ट करण्यासाठी मायक्रोब्लॉगिंगचा उपयोग होतो. लहान पोस्ट वाचणे किंवा टाकणे काही वेळा फार गरजेचे असते. उदा., मिटींग, निवडणूक प्रचार, पुस्तकाचा संदर्भ इत्यादी. त्यातून वेळ आणि श्रम यांची बचत होते.

**(४) कॉर्पोरेट आणि संस्थात्मक ब्लॉग –** खाजगी किंवा सरकारी संस्थात्मक कामासाठी याचा वापर केला जातो. आपल्या कर्मचाऱ्यांपर्यंत अद्ययावत माहिती पोहोचवण्यासाठी या ब्लॉगचे महत्त्व आहे .

**(५) एकत्रित ब्लॉग –** व्यक्ती किंवा संस्था विशिष्ट हेतू समोर ठेवून एकत्रित येतात. त्यांचा वाचकवर्ग निश्चित असतो आणि वाचकाला काय किंवा कसे द्यायचे याबाबत धोरण निश्चित केलेले असते.

**(६) विषयानुसार ब्लॉग –** पत्रकारिता, आरोग्य, प्रवास, बागकाम, फोटोग्राफी अशा एखाद्या विशिष्ट विषयाला धरून यावरील मजकूर प्रसिद्ध केला जातो.

## अनुदिनी (ब्लॉग) लेखनातील महत्त्वाचे घटक/व्यक्ती/कृती

| | |
|---|---|
| (१) ब्लॉग | महाजालावरील नोंदवही |
| (२) ब्लॉगर | मजकूर लिहिणारी व्यक्ती |
| (३) ब्लॉगिंग | मजकूर लिहिण्याची प्रक्रिया |
| (४) ब्लॉगोस्पिअर | ब्लॉग वाचणारा वाचकवर्ग |
| (५) ब्लॉग टूल्स | ब्लॉग तयार करण्याची साधने |
| (६) ब्लॉग पोस्ट | ब्लॉगवरील लिखित नोंद |

## अनुदिनी (ब्लॉग) निर्मिती प्रक्रिया

सर्वप्रथम Blog तयार करताना आपले स्वत:चे Google मध्ये Gmail अकाऊंट असणे आवश्यक आहे.

- Internet Explorer मध्ये www.blogger.com संकेतस्थळ उघडा.
- 'CREATE YOUR BLOG' वर क्लिक करा.
- आपल्या Gmail : google अकाऊंट पासवर्डने log in करा.
- नवीन पेजवर title (शीर्षक) द्यावे व आपला blogger address तयार करावा.
  उदा., vighnesh2017.blogspot.com
  योग्य ती थीम (theme) निवडा.
  शेवटी 'CREATE BLOG' वर क्लिक करा.
  अशाप्रकारे अनुदिनी (Blog) तयार होईल.

सदर ब्लॉगनिर्मितीची प्रक्रिया सतत अद्ययावत होत असते. विद्यार्थ्यांनी स्वत: या बदलांची माहिती घेणे आवश्यक आहे.

## ब्लॉगलेखनातील महत्त्वाचे घटक

- **Post –** विविध मजकूर, व्याख्याने, लेख, मते, इत्यादी प्रकाशित करण्यासाठी उपयोग होतो.
- **Stats–** संपूर्ण ब्लॉगचा आढावा (overview, posts, traffic source, audience) मिळतो. संपूर्ण जगातून आलेल्या visits ची संख्या कळते.
- **Comments–** प्रतिक्रिया कळतात, प्रकाशित करता येतात.
- **Earning–** ब्लॉगवर विविध व्यावसायिक आपल्या जाहिराती प्रकाशित करू शकतात. ब्लॉगच्या माध्यमातून झालेल्या व्यवहारांवर आपणांस उत्पन्न मिळते.

- **Pages –** नवीन pages जोडता येतात व प्रकाशित करता येतात.
- **Layout –** ब्लॉगची रचना कशी असावी हे लेआउट मध्ये ठरवले जाते.
- **Theme –** customize व html असे दोन प्रकार असतात. customize ह्या थीम आयत्या तयार केलेल्या असतात व html थीम बनवण्यासाठी संगणकाची भाषा माहीत असणे आवश्यक असते.
- **Setting–** स्वतःचा ब्लॉग publish किंवा hide करू शकतो. एकापेक्षा अधिक वापरकर्त्यास ब्लॉग संपादन करण्याचा हक्क देण्याची सुविधा असते.
- **Google drive व ब्लॉग चा सहसंबध –** ब्लॉगवर प्रतिमा, चलतचित्रे संचयन करण्यास मर्यादा येतात. आपली आवडती चित्रफीत, ध्वनी, ब्लॉगवर प्रसिद्ध करण्यासाठी आवश्यक साठवणूक सुविधा (storage) ब्लॉगवर उपलब्ध नाही.

  ही सुविधा आपणांस गुगल ड्राईव्ह पुरवते. आपली प्रतिमा, ध्वनी, चित्रे गुगल ड्राईव्हवर अपलोड करावीत व ड्राईव्ह वरील मजकुराची लिंक कॉपी करून त्यास आपल्याला हवे ते नाव देऊन gadgets मध्ये वापरावीत व ब्लॉगवर प्रसिद्ध करावीत.
- **महत्त्वाचे –** कधी कधी आपण आपल्या मित्राचे, सहकाऱ्याचे, एखाद्या समारंभाचे किंवा नेटवरून DOWNLOAD केलेले साहित्य ब्लॉगवर प्रसिद्ध करतो तेव्हा त्या मजकुराला मालकाची/लेखकाची परवानगी असणे आवश्यक असते किंवा त्याचे सौजन्य असे नमूद करावे लागते.

## अनुदिनी (ब्लॉग) लेखन करताना पाळायची पथ्ये

ब्लॉग लेखनात मर्यादित शब्दांत 'उत्तम, सकस आणि दर्जेदार लेखन' अपेक्षित आहे, या लेखनाला विचार आणि संशोधनाची जोड दिली, की हे लेखन उत्कृष्टतेकडे जाते. उत्तम ब्लॉग लिहिणाऱ्या 'ब्लॉगर्स' चे अनेक वाचक असतात. हे वाचक त्यांच्या संपर्कमाध्यमातून ब्लॉगर्सशी चर्चा करतात.

अनुदिनी लेखन करणाऱ्याला काही पथ्ये पाळावी लागतात. त्यामुळे लेखन कसदार होऊन सर्वमान्य ठरते. अनुदिनी लेखनाची काही पथ्ये–

- अनुदिनी लेखन करताना विषयाचे तारतम्य असणे आवश्यक आहे.
- अनुदिनी लेखन अविवेकी असता कामा नये. तसेच लेखनविषयक शिस्त व समाजभानाचे औचित्य पाळले जाईल असे असावे.
- अनुदिनी लेखन प्रसिद्ध झाल्यावर त्यावरील प्रतिक्रिया उलटसुलट असू शकतात. त्याला उत्तर देण्याची क्षमता असावी.
- अनुदिनी लेखनात समाजविघातक व विध्वंसक विचार मांडू नयेत.
- अनुदिनी लेखनात मिळालेले स्वातंत्र्य हे स्वैराचारापर्यंत जाणार नाही याचे भान ठेवावे.

## काही अनुदिनी (ब्लॉग्ज)

- ZPGURUJI(http://www.zpguruji.com/)
- https://blog.mygov.in/

## नमुना ब्लॉग होमपेज



## कृती

✲ खालील कृती करा.

(१) अनुदिनी लेखनाची गरज स्पष्ट करा.

(२) अनुदिनी लेखनाची क्षेत्रे स्पष्ट करा.

(३) चांगल्या अनुदिनीची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.

(४) तुम्हांला उपलब्ध असलेली अनुदिनी वाचून त्यासंबंधीच्या तुमच्या प्रतिक्रिया स्पष्ट करा.

(५) तुमची स्वत:ची अनुदिनी तयार करताना ती परिपूर्ण व आकर्षक होण्यासाठी पाळावयाची पथ्ये लिहा.

(६) खालील विषयांवर ब्लॉग लिहा.

(अ) महाविद्यालयातील पहिला दिवस

(आ) फेसबुक मैत्री आवश्यक की अनावश्यक



# ५. रेडिओजॉकी

## प्रास्ताविक

आधुनिक जीवनात संपर्क साधण्यासाठी मानव विविध जनसंपर्क माध्यमांचा वापर करतो. यामध्ये मुद्रित, श्राव्य आणि दृकश्राव्य या तीन प्रमुख माध्यमांद्वारे समाजाशी संपर्क साधणे शक्य झाले आहे. ही तिन्ही माध्यमे प्रभावी आहेत. यांतील प्रत्येक माध्यमाची स्वत:ची बलस्थाने आणि मर्यादा असतानाही दिवसेंदिवस त्यांचे महत्त्व वाढत आहे. लिखित माध्यमात वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके इत्यादी येतात. श्राव्य माध्यमात आकाशवाणी, दूरध्वनी, ध्वनिफिती इत्यादींचा आणि दृकश्राव्य माध्यमात दूरचित्रवाणी, चित्रपट, ध्वनिचित्रफिती, संगणक, इंटरनेट इत्यादींचा समावेश होतो. या सर्व माध्यमांची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे समाजसंपर्क साधनांद्वारे वैचारिक दळणवळण, लोकांचे मनोरंजन, उद्बोधन, मार्गदर्शन, विविध क्षेत्रांतील माहितीचे संकलन व वितरण इत्यादी होत. या समूहसंपर्क माध्यमांपैकी आकाशवाणी या माध्यमावरील 'रेडिओजॉकी' याविषयीची माहिती आता आपण घेऊया.

१९२७ मध्ये भारतात 'इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी' या खाजगी कंपनीने त्या वेळच्या सरकारशी करार करून मुंबई आणि कोलकाता या दोन ठिकाणी आकाशवाणी केंद्र सुरू केले. म्हैसूर संस्थानने १९३५ मध्ये स्थापन केलेल्या रेडिओ केंद्रास 'आकाशवाणी' हे नाव दिले. पुढे भारत सरकारने या माध्यमासाठी हेच नाव स्वीकारले.

'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे आकाशवाणीचे ब्रीदवाक्य आहे. आकाशवाणीवरून उद्घोषणा, बातम्या, भाषणे, मुलाखती, चर्चा, संवाद, नभोनाट्य, संगीतविषयक कार्यक्रम, श्रुतिका, रूपक, समालोचन असे विविध प्रकारचे कार्यक्रम विविध वयोगटांसाठी प्रक्षेपित केले जातात. आकाशवाणीमध्ये महत्त्वाचा असतो तो निवेदक. आकाशवाणीचे अद्ययावतता हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आत्मसात करत निवेदकाचा नवीन बाज, नव्या संकल्पनेत रेडिओजॉकीच्या रूपात आपल्यासमोर आला आहे.

## रेडिओजॉकीची पार्श्वभूमी

१९२०-३० च्या दशकात सुरू झालेला रेडिओ (आकाशवाणी) चा प्रवास १९८० च्या दशकात स्थिरावला. २३ जुलै, १९७७ रोजी चेन्नई येथे एफ. एम. प्रसारण सुरू झाले. १९९३ पर्यंत 'ऑल इंडिया रेडिओ' हा सरकारी उपक्रम भारतातील एकमेव रेडिओ प्रसारणकर्ता होता. त्यानंतर सरकारने रेडिओ प्रसारण क्षेत्राचे खाजगीकरण केले. ३ जुलै, २००१ पासून 'रेडिओ सिटी बेंगलोर' (बेंगळूरू) हे भारतातील पहिले खाजगी एफ. एम. रेडिओ स्टेशन ठरले. 'द टाईम्स ग्रुपने' 'रेडिओ मिर्ची' स्टेशन ४ ऑक्टोबर, २००१ रोजी इंदौर येथे सुरू केले.

महाराष्ट्रात खाजगी एफ. एम. रेडिओ केंद्र २००२ मध्ये सुरू झाले. आता 'रेडिओ मिर्ची', 'रेडिओ सिटी', 'रेड एफ. एम.', 'एफ. एम. गोल्ड' इत्यादी वाहिन्यांवर २४ तास मनोरंजनाचे कार्यक्रम, त्यातही तरुणांना आकर्षित करणारी गाणी सतत ऐकवली जातात. नवनवीन 'बॉलिवूड हिट' ह्यांचा मसाला असतो. सकाळपासून ते रात्रीपर्यंत तीच-तीच गाणी कितीतरी वेळा ऐकवली जातात. बदल असतो तो मध्ये-मध्ये सूत्रसंचालन करणाऱ्या निवेदकाचा म्हणजेच रेडिओजॉकीचा!


## रेडिओजॉकी संकल्पना

आकाशवाणीवरील कार्यक्रमाचे ओघवत्या व प्रभावी शैलीत निवेदन करणाऱ्या रेडिओ व्यक्तित्वाला 'रेडिओजॉकी' (आरजे) असे म्हणतात. अगोदरच रेकॉर्ड केलेल्या संगीताची ओळख करून देणाऱ्या रेडिओ व्यक्तित्वांना 'डिस्क जॉकी' म्हणून ओळखले जाते.

आरजे तो असू शकतो, जो संगीतशैलीचा परिचय करून देतो, टॉक रेडिओचे शो आयोजित करतो, ऐकणाऱ्यांकडून कॉल घेऊ शकतो, त्यांच्याशी हसत-खेळत संवाद साधू शकतो, तसेच अतिथींची मुलाखत घेतो. हवामान, खेळ, टिप्पणीरूपात बातम्या आणि रहदारीसंबंधीची माहिती इत्यादी देतो. आरजे म्हणजे रेडिओजॉकी स्वत:ची ओळख आरजे संग्राम, आरजे अपूर्वा, आरजे काव्या अशी करून देतात. फक्त नावाचाच उल्लेख हे त्यांचे वैशिष्ट्य असते. एका आरजेला साधारणत: सलग दोन ते तीन तास श्रोत्यांचे मनोरंजन करायचे असते. त्यामुळे त्यांना प्रसंगावधान, हजरजबाबीपणा व विविध विषयांबाबतची माहिती असणे जरुरीचे असते. ही माहिती देत असताना मौखिक भाषेवरचे प्रभुत्व अपेक्षित आहे. स्थानिक भाषा, हिंदी आणि इंग्लिश या भाषांची सरमिसळ करून तो आपले निवेदन करत असतो. यासाठी मिंग्लिश (मराठी-इंग्लिश), हिंग्लिश (हिंदी-इंग्लिश) हे शब्दप्रयोग वापरले जातात. आरजेचा आवाज आणि ऐकवली जाणारी गाणी हा त्या-त्या रेडिओचा चेहरा असतो.

सलग दोन-तीन तास मनोरंजन करण्यासाठी, त्यात विविधता आणण्यासाठी, एकसूरीपणा टाळण्यासाठी वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरल्या जातात. यामध्ये फोनवरून श्रोत्यांशी संभाषण वा चर्चा, विविध स्पर्धांचे आयोजन, काही कोड्यांची रचना व त्यांची उत्तरे, वाढदिवस साजरा करणे किंवा विशेष दिनाची चर्चा यांसारखे नियोजन असते. श्रोत्यांना अधिकाधिक सहभागी करून घेणे आणि गुंतवून ठेवणे महत्त्वाचे असते. बऱ्याचदा हे कार्यक्रम थेट प्रक्षेपणाचे (Live) असल्याने त्या क्षेत्रातील घडामोडींची चर्चाही घेतली जाते. उदा., बॉलिवुडशी संबंधित व्यक्तीला वा कलाकाराला स्टुडिओत निमंत्रित करून त्यांची मुलाखत घेत आणि गाणी ऐकवत राहणे हे कामही आरजे करत असतो. आरजे म्हणजे हेडफोनच्या माध्यमातून रसिकांच्या कानातून त्यांच्या मनापर्यंत पोहोचण्याची किमया साधणारी व्यक्ती होय.

## रेडिओजॉकीच्या कामाचे स्वरूप



रेडिओजॉकीचे कार्यक्षेत्र आज प्रचंड वाढत आहे आणि या क्षेत्राशी संबंधित नवनवीन पर्याय आज खुले होत आहेत. त्यामध्ये एफ. एम., ए. एम. वरील जॉकी, विविध सामाजिक, राजकीय विषयांवर श्रोत्यांशी सुसंवाद साधणारा, चर्चा करणारा रेडिओजॉकी, खेळांविषयी संवाद साधणारा स्पोर्टस जॉकी तसेच अंतराळ, उपग्रह रेडिओजॉकी देखील उपलब्ध आहेत. हा रेडिओजॉकी एखाद्या समस्येवर स्पष्टपणे आणि परखडपणे बोलू शकतो किंवा प्ले करू शकतो.

## रेडिओजॉकीच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू

- व्यक्तिमत्त्व प्रसन्न व हरहुन्नरी हवे.
- त्याच्याकडे कल्पकता, योजकता, सहजता आणि गुणग्राहकता इत्यादी गुण असावेत.
- तो सर्जनशील असावा. त्याच्याकडे उत्तम निरीक्षण कौशल्य असावे.
- त्याच्याकडे प्रसंगावधान आणि हजरजबाबीपणा असावा.
- त्याची वृत्ती आनंदी हवी आणि त्याला बोलण्याची, गप्पा मारण्याची आवड असावी.
- त्याच्याकडे उत्कृष्ट संवादकौशल्य हवे.
- त्याला विनोदाची उत्तम जाण असावी.

## रेडिओजॉकीसाठी आवश्यक अभ्यास आणि भाषिक कौशल्ये

- व्यासंगी हवा. त्याचे वाचन चौफेर हवे. त्याला भाषा, साहित्य, सांस्कृतिक घडामोडी यांची चांगली जाण हवी.
- चित्रपटसृष्टी, संगीतक्षेत्र आणि नाट्यक्षेत्रासंबंधीचे उत्तम ज्ञान हवे.
- सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक आणि भौगोलिक इत्यादींबाबतचे चांगले सामान्यज्ञान हवे.
- रेडिओजॉकीने समाजमाध्यमावरील (सोशल मिडिया) नवीन प्रवाह, त्यामधील अद्ययावतता यांबाबत सतर्क राहणे आवश्यक आहे.
- कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार आरजेला उत्तम संहितालेखन करता यायला हवे.
- वर्तमानकालीन घडामोडी, बातम्या इत्यादींबाबत आरजेने क्षणोक्षणी अद्ययावत राहायला हवे.
- नेहमीच्या बोलण्यात बऱ्याचदा संख्यात्मक माहिती द्यावी लागते. त्यामुळे त्याने आवश्यक सांख्यिकीय माहिती अद्ययावत ठेवावी.
- मातृभाषेबरोबरच हिंदी, इंग्रजी आणि विविध स्थानिक बोलींचे ज्ञान असावे.

उपरोक्त सर्व गुणांसह आपल्या कौशल्यांच्या विकासासाठी आणि यशस्वी आरजे होण्यासाठी अभ्यास करणे आवश्यक ठरते. ज्यांना भाषेचे उपयोजन आणि सादरीकरण कौशल्ये शिकण्याची इच्छा आहे; त्यांना हे क्षेत्र खुणावत आहे.

## रेडिओजॉकीच्या आवाजाची आणि निवेदनाची वैशिष्ट्ये

- आवाज सुस्पष्ट आणि उत्तम असावा.
- भाषा श्रोत्यांचे मन प्रसन्न करणारी, मिश्किल आणि ताण दूर करणारी असावी.
- आवाजाची पातळी योग्य असावी. विचार, भावना आणि संवेदनांच्या प्रकटीकरणासाठी आवाजातील आरोह-अवरोहांचे चांगले ज्ञान असावे आणि त्याने तसा सराव करावा.
- बोलणे संवादी, गतिमान, सहजस्फूर्त असावे.

- निवडलेली गाणी, किस्से सांगताना त्यात सुसंगती आणण्याचा प्रयत्न करायला हवा. तसेच अधूनमधून लोकांना आवश्यक असणाऱ्या माहितीची पेरणीही केली जावी.
- प्रसंग आणि परिस्थितीनुसार निवेदनात आणि आवाजात आवश्यक ते बदल करण्याची क्षमता हवी. एखाद्या सुप्रसिद्ध व्यक्तीच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त करताना उद्घोषणा आनंदी, उत्साही आवाजात हवी; परंतु आवाजातील तो आनंदी उत्साही स्वर श्रद्धांजलीच्या कार्यक्रमात विसंगत ठरेल याची जाण ठेवायला हवी.

फक्त मनोरंजन हे प्रमुख उद्दिष्ट ठेवून जो श्रोत्यांशी मनमोकळा संवाद साधू शकतो, तो चांगला आरजे होऊ शकतो; परंतु त्यासाठी मनोरंजनाबरोबरच कार्यक्रमास पूरक अशी माहिती देता येणे हेही महत्त्वाचे आहे. आकाशवाणीसाठी ज्यांना काम करायला आवडते, त्यांना आरजे ही चांगली संधी आहे.

## संवाद- एक आवश्यक कौशल्य

आरजे मंडळींना संहितेनुसार कार्यक्रम सादर करावे लागतात तसेच वेगवेगळ्या निमित्ताने विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच सर्वसामान्य श्रोते यांच्याशी संवाद साधावा लागतो. स्टुडिओत आलेल्या मान्यवरांच्या थेट मुलाखती किंवा ध्वनिमुद्रित मुलाखती ज्याप्रमाणे होतात त्याचप्रमाणे दूरध्वनी माध्यमातूनदेखील मुलाखती पार पडतात.

जेव्हा आरजे मंडळी स्टुडिओतून फोन करून संबंधित व्यक्तीची मुलाखत घेतात तेव्हा त्यास 'डायल आउट' म्हटले जाते. उदाहरणार्थ, एखाद्या कलाकाराच्या निधनानंतर त्यांच्याशी संबंधित अन्य कलाकार वा माहीतगारांना स्टुडिओतून फोनद्वारे बोलते करणे आणि श्रोत्यांना विशिष्ट विषय देऊन जेव्हा दूरध्वनी माध्यमातून श्रोत्यांची मते, अनुभव, किस्से मागवले जातात तेव्हा त्यास 'डायल इन' असे म्हटले जाते. उदाहरणार्थ, देशाचा अथवा राज्याचा अर्थसंकल्प जाहीर झाल्यावर त्यासंदर्भात लोकांचे मत जाणून घेणे. अशा कार्यक्रमांमध्ये–


✼ संबंधित व्यक्तीशी होणारा संवाद मनमोकळा असावा.
✼ संवादाचे स्वरूप अनौपचारिक चर्चेचे असावे.
✼ संबंधित व्यक्तीच्या कामाची पूर्ण माहिती करून घेऊन त्याप्रमाणे प्रश्नांची वा विषयांची आखणी असावी.
✼ 'डायल इन' कार्यक्रमाच्या थेट प्रसारणात संवाद आटोपशीर आणि अधिकाधिक श्रोत्यांना सामावून घेणारा हवा.
✼ श्रोता अथवा वक्ता यांच्याशी संवाद साधताना बोलण्यात मार्दव असावे, तसेच उचित हजरजबाबीपणा असावा.
✼ आपण नेमके बोलून समोरच्याला अधिकाधिक बोलण्याची संधी द्यावी.

## रेडिओजॉकीच्या कार्यक्रमांचे स्वरूप



## रेडिओजॉकीची क्षेत्रे

तुम्ही जर मनोरंजनातून इतरांशी मनमोकळा संवाद साधू शकत असाल, तर तुम्ही चांगला आरजे होऊ शकता. स्पष्ट उच्चार, भाषेची आणि संगीताची जाण, सर्जनशीलता, बहुश्रुतता, समयसूचकता आणि निरीक्षणशक्ती यांसारख्या गुणांच्या आधारे तुम्ही रेडिओजॉकीसंबंधित कोणत्याही क्षेत्रामध्ये नोकरी प्राप्त करू शकता. त्यासाठी व्यापक दृष्टीने पुढील क्षेत्रांचा विचार आपण भविष्यात नोकरी, व्यवसायासाठी करू शकतो.




## समारोप

विविध प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रेडिओ स्टेशन्सच्या स्थापनेबरोबरच, आजकाल रेडिओ चॅनल हा उद्‌योग वाढत आहे. त्यामध्ये आरजेसाठी अनेक संधी उपलब्ध होत आहेत. ज्याच्या अंगी उत्कृष्ट भाषण-संभाषण कौशल्य आहे; ज्यांचं व्यक्तिमत्व बहुआयामी आहे, अशा युवक-युवतींना 'आरजे' हा करिअर निवडीचा उत्तम पर्याय आहे. आपण त्या क्षमता आणि कौशल्यांचा विकास साधल्यास नक्कीच उत्तम आरजे बनू शकता.

## कृती

**(१) उत्तम रेडिओजॉकी होण्यासाठी तुम्हांला प्राप्त करावी लागणारी भाषिक कौशल्ये लिहा.**

**(२) 'आरजे-एक संवादी व्यक्तिमत्त्व' हे स्पष्ट करा.**

**(३) रेडिओजॉकी या क्षेत्रातील व्यवसायाच्या संधी वाढण्याची तुम्हांला जाणवणारी कारणे लिहा.**

**(४) रेडिओजॉकीच्या कामाचे स्वरूप स्पष्ट करा.**

**(५) 'उत्तम भाषिक कौशल्ये संपादन केलेली व्यक्ती उत्तम रेडिओजॉकी होऊ शकते.', हे विधान स्पष्ट करा.**

**(६) 'उत्कृष्ट संभाषण कौशल्य आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व हे यशस्वी रेडिओजॉकीचे महत्वाचे पैलू आहेत.' स्पष्ट करा.**

**प्रकल्प.**

रेडिओवरील आरजेचे काही कार्यक्रम ऐका. तुम्ही आरजे आहात, अशी कल्पना करून 'युवकांसाठी करिअरच्या संधी' या विषयावरील लाईव्ह कार्यक्रमासाठी संहिता तयार करा.

# व्याकरण

## १. शब्दशक्ती

माणसांचे परस्परांतील व्यवहार भाषेच्या माध्यमातून चालतात. भाषेच्या माध्यमातूनच साहित्याची निर्मिती होते. दोन्ही ठिकाणची भाषा परिणामकारक व वैशिष्ट्यपूर्ण असते. जसा चित्रकाराचा अनुभव रंगांमधून, गायकाचा अनुभव सुरांतून, तसा लेखकाचा अनुभव शब्दांमधून व्यक्त होतो. संदेश, भावना, विचार यांची देवाणघेवाण होण्यासाठी व त्याची प्रभावी अभिव्यक्ती होण्यासाठी योग्य, सूचक आणि पोषक शब्दांची योजना करावी लागते. अनेक शब्दांमधून योग्य शब्दांची निवड करण्याची क्षमता माणसात असायला हवी. तिचा अचूक वापर करण्याची कौशल्ये त्याला ज्ञात असायला हवीत. यासाठी शब्दशक्तींची ओळख करून घेणे उचित ठरते.

**खालील वाक्यांचे काळजीपूर्वक वाचन करून त्यांचे निरीक्षण करा.**

(१) मी आज मोठा दगड पाहिला.

(२) त्यांचे बोलणे म्हणजे काळ्या दगडावरची रेघ.

(३) माझ्या मना बन दगड.

प्रस्तुत वाक्यांच्या निरीक्षणानंतर असे लक्षात येईल, की प्रत्येक वाक्यात **'दगड'** हा शब्द आहे. प्रत्येक वाक्यातील **'दगड'** शब्दाचा अर्थ **'दगड'** हाच असला तरी, या शब्दात मूळ अर्थाव्यतिरिक्त वेगळा असा अर्थ संदर्भाने प्रकट करण्याचे विशिष्ट प्रकारचे सामर्थ्य आहे. शब्दाच्या या सामर्थ्यालाच **'शब्दशक्ती'** म्हणतात. शब्दाच्या अंगी एकूण तीन प्रकारच्या शब्दशक्ती असतात.

**शब्दशक्ती**

(१) अभिधा (२) लक्षणा (३) व्यंजना

**(१) अभिधा–** वरील तिन्ही उदाहरणांतून आपल्याला असे लक्षात येते, की पहिल्या वाक्यातील **'दगड'** शब्द उच्चारल्यानंतर त्याचा शब्दश: अर्थ कळतो. पहिल्या वाक्यात दगड म्हणजे ठरावीक आकाराची एक जड वस्तू. हा अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची ही जी शक्ती आहे तिला **'अभिधा'** शक्ती असे म्हणतात.

**अभिधा शक्तीची वैशिष्ट्ये**

- ही शब्दाची पहिली शक्ती आहे.
- वाचल्याबरोबर शब्दश: अर्थ कळतो.
- तो अर्थ शब्दकोशातही असतो.
- अभिधा शक्तीच्या साहाय्याने प्रकट होणाऱ्या या अर्थाला **'वाच्यार्थ'** म्हणतात.

**(२) लक्षणा–** दुसऱ्या वाक्यातील 'काळ्या दगडावरची रेघ' हा शब्दसमूह 'दगडावर काढलेली रेघ' या वाच्यार्थाबरोबरच त्याचे बोलणे 'कधीही नष्ट न होणारे' किंवा 'कायमस्वरूपी टिकणारे' असा दुसरा अर्थ सूचित करतो. म्हणजे शब्दश: अर्थ न घेता त्याच्याशी सुसंगत असलेला असा दुसरा अर्थ घ्यावा लागतो. दुसरा अर्थ सूचित करण्याच्या शब्दाच्या या शक्तीला **'लक्षणा'** असे म्हणतात.

**लक्षणा शक्तीची वैशिष्ट्ये**

- दुसरा अर्थ सूचित होतो.
- बहुतेक वेळी मूळ अर्थाला बाधा येते.
- मूळ अर्थ उपयोगी पडत नाही. संदर्भाने जुळलेला दुसरा अर्थ घ्यावा लागतो.
- लक्षणा शक्तीच्या साहाय्याने प्रकट होणाऱ्या या अर्थाला **'लक्ष्यार्थ'** म्हणतात.

**(३) व्यंजना–** तिसऱ्या उदाहरणातील 'माझ्या मना बन दगड.' या वाक्यातील **'बन दगड'** या शब्दसमूहाचा शब्दश: अर्थ घेतला तर भलताच अर्थ निघतो. **'मन घट्ट कर'** किंवा **'आघात सहन कर'** असा वेगळा सुसंगत अर्थ अधिक योग्य ठरतो. मूळ अर्थाला बाधा न आणता वेगळा अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची जी शक्ती असते तिला 'व्यंजना' असे म्हणतात.

**व्यंजना शक्तीची वैशिष्ट्ये**

- वेगळा अर्थ सूचित होतो.
- मूळ अर्थाला बाधा येत नाही.
- हा दुसरा सुसंगत अर्थ ही शक्ती वाचकांपर्यंत पोहोचवते.
- व्यंजना शक्तीच्या साहाय्याने प्रकट होणाऱ्या या अर्थाला **'व्यंग्यार्थ'** असे म्हणतात.

**व्यंग्यार्थाची गंमत–** 'सूर्य उगवला', असे वाक्य उच्चारल्यानंतर 'सूर्योदय झाला' हा वाच्यार्थ. सूर्योदय झाला, सकाळ झाली असे अर्थ जरी सकृतदर्शनी होत असले तरी व्यक्तिगणिक याचा अर्थ वेगवेगळा सूचित होऊ शकतो.

उदा.,

**सूर्योदय झाला.**

- काही व्यक्तींची झोपेतून उठण्याची वेळ झाली.
- झाडलोट करण्याची वेळ झाली.
- धार्मिक व्यक्तींची प्रार्थनेची वेळ झाली.
- मुलांची अंघोळीची वेळ झाली.

वाचन व लेखन करताना या तिन्ही शब्दशक्तींचे ज्ञान असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**शब्दशक्तींची गरज–**

(१) ललित वाङ्‌मयात अनुभवांचे दर्शन घडवण्यासाठी.

(२) शब्दांचा कोश प्रमाण मानला असला, तरी ललित लेखनात शब्द केवळ ज्ञान देण्यासाठी नसून कवींचा, लेखकांचा अनुभव सांगण्यासाठी असतात.

(३) लेखक/कवी यांना शब्दांच्या पलीकडचा भाव व्यक्त करण्यासाठी.

(४) मूळ भावार्थाशी संलग्न अर्थ व्यक्त करण्यासाठी.

(५) लेखकांच्या व कवींच्या भावच्छटा व्यक्त करण्यासाठी.

(६) काव्यात व्यंग्यार्थामुळे सूचकता व अधिक परिणामकारकता साधण्यासाठी.

**विविध उदाहरणे–**

| अभिधा | लक्षणा | व्यंजना |
|---|---|---|
| (१) राम एक राजा होता. | (२) यात काही राम नाही. | (२) त्याने राम म्हटले. |
| (२) तलावात भरपूर पाणी आहे. | (३) त्याच्या डोळ्यांतील पाणी आटले. | (३) लाथ मारेल तिथे पाणी काढेल. |
| (३) ही वाट डोंगरगावची आहे. | (४) त्या वेळी माझी वाट लागली. | (४) आपणच आपली वाट निर्माण करावी. |
| (४) बांगड्या रंगीत असतात. | (५) पानिपतावर सव्वा लाख बांगडी फुटली. | (५) अखेर येते निरोप घेऊन निवांत मार्गात ते कंकण |
| (५) मावळतीचा सूर्य सुंदर दिसतो. | (७) सूर्य अस्ताला गेला. | (७) त्याच्या जीवनाचा सूर्य अस्ताला गेला. |

## कृती

**(१) सूचनेनुसार सोडवा.**
**'मी वि. स. खांडेकर' वाचले. या वाक्यातील लक्ष्यार्थ लिहा.**
(अ) मी वि. स. खांडेकर यांना पाहिले.
(आ) मी वि. स. खांडेकर यांच्याशी बोललो.
(इ) मी वि. स. खांडेकर यांचे साहित्य वाचले.

**(२) मूळ शब्दशक्ती ........ आहेत.**
(अ) एक (आ) चार (इ) तीन

**(३) 'निवडणुका आल्या, की कावळ्यांची कावकाव सुरू होते.' या वाक्यातील शब्दशक्ती लिहा.**
(अ) अभिधा (आ) लक्षणा (इ) व्यंजना

**(४) 'आपल्याभोवती वावरणाऱ्या कोल्ह्यांपासून दूरच राहावे.' या वाक्यातील 'कोल्हा' या शब्दातून व्यक्त होणारा लक्ष्यार्थ....**
(अ) जंगलातील धूर्त प्राणी
(आ) मळ्यातील मका खाणारा
(इ) धूर्त माणसे

**(५) 'घरावरून मिरवणूक गेली.' या वाक्यातील शब्दशक्ती लिहा.**
(अ) अभिधा (आ) लक्षणा (इ) व्यंजना

**(६) 'मी एक लांडगा पाहिला.' या वाक्यातील शब्दशक्ती लिहा.**
(अ) व्यंजना (आ) अभिधा (इ) लक्षणा

(७) 'समाजातील असले साप ठेचलेच पाहिजेत.' या वाक्यातील शब्दशक्ती लिहा.

(अ) लक्षणा (आ) व्यंजना (इ) अभिधा

**(८) खालील तक्ते पूर्ण करा.**

**(अ) शब्दशक्ती ओळखा.**

| अ. क्र. | शब्द | वाक्य | शब्दशक्ती |
|---|---|---|---|
| (१) | -- | मी निबंध लिहिला. | |
| (२) | -- | त्याच्या मनात काहूर माजले. | |
| (३) | -- | ताजमहाल सुंदर आहे. | |
| (४) | -- | फारच शहाणी आहेस तू! | |
| (५) | -- | हा किल्ला बुलंद आहे. | |

**(आ) शब्दशक्तीनुसार शब्द व वाक्य लिहा.**

| अ. क्र. | शब्दशक्ती | शब्द | वाक्य |
|---|---|---|---|
| (१) | अभिधा | -- | -- |
| (२) | लक्षणा | -- | -- |
| (३) | व्यंजना | -- | -- |

**(इ) शब्दशक्तीनुसार तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | शब्दशक्ती | शब्द | वाक्य |
|---|---|---|---|
| (१) | -- | सिंह | -- |
| (२) | लक्षणा | -- | -- |
| (३) | -- | -- | पांढरे ते सारेच बगळे नसतात. |

## २. काव्यगुण

**खालील उदाहरणे वाचून त्यांतून व्यक्तीचा कोणता गुण दिसतो ते लिहा.**

(अ) पराक्रमी व्यक्ती रणांगणावर येणाऱ्या मृत्यूला घाबरत नाहीत. ☐

(आ) रामरावांनी आपली सर्व मालमत्ता वृद्धाश्रमाला दान केली. ☐

(इ) पूर्वीच्या काळी अनेक विद्यार्थी श्रीमंत मनाच्या लोकांकडे वार लावून जेवत असत. ☐

(ई) संतांनी परोपकार हीच जीवनाची इतिकर्तव्यता मानली. ☐

(उ) पक्ष्याचे पिलू झाडावरून पडून गतप्राण झाल्याचे पाहून तो कळवळला. ☐

वरील उदाहरणांमधून व्यक्तीमधील पराक्रम, उदारता किंवा औदार्य, परोपकार, संवेदनशीलता आणि करुणा यांसारखे गुण दिसून येतात. व्यक्तीप्रमाणे काव्यातही गुण असतात. अशा गुणांमुळे काव्य उठावदार व प्रभावी होण्यास मदत होते हे खालील तुलनेतून स्पष्ट होते.

| **व्यक्ती** | **काव्य** |
|---|---|
| (१) व्यक्तीच्या ठिकाणी अनेक गुण असतात. | (१) काव्याच्या ठिकाणी सुद्धा काही गुण असतात. |
| (२) विविध गुणांमुळे व्यक्तीचे चरित्र खुलते. | (२) विविध गुणांमुळे काव्य सुंदर व उठून दिसते. |
| (३) व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व त्याला बहुश्रुत बनवते. | (३) गुणांमुळे काव्याला सौंदर्याचा साज चढतो. |

काव्याच्या ठायी असणाऱ्या गुणांचा विचार आपण करूया.

काव्यरचनेतील अनेक काव्यगुणांपैकी **प्रसाद, माधुर्य व ओज** हे तीन गुण महत्त्वाचे होत.

### काव्यगुणातील शब्दांची वैशिष्ट्ये

(१) सोपे, सुटसुटीत, उच्चारण्यास सहजसुलभ असे शब्द
(२) शब्दांमध्ये नादमधुरता
(३) शब्दांमध्ये गेयता व त्या शब्दांच्या अर्थाचा आंतरिक गोडवा
(४) काव्यपंक्तीतून व्यक्त होणारा भाव

} अशा प्रकारच्या शब्दांमधून काव्याची शोभा वाढते. ती काव्ये श्रवणीय ठरतात. रसिकांना मुखोद्गत होतात.

**(१) प्रसाद–** प्रसाद याचा अर्थ सुलभता, सोपेपणा. काव्य ऐकल्यानंतर किंवा वाचल्यानंतर सहज अर्थबोध करून देणारा जो गुण असतो त्याला '**प्रसाद**' म्हणतात. या गुणाने युक्त असलेल्या काव्याला प्रासादिक काव्य असे म्हणतात.

**प्रसाद गुणाची लक्षणे (वैशिष्ट्ये)**

- हा काव्यगुण सर्व रसांना पुष्टी देतो.
- हा काव्यगुण उत्पन्न होण्यासाठी शब्द नित्य परिचयाचे व वाक्यरचना सरळ असावी लागते.
- साधी, सोपी, सरळ शब्दरचना असते.
- सोपी, सुबोध व चटकन अर्थ समजणारी रचना म्हणजे प्रासादिक रचना.

उदा., (१) हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणांच्या मखमालीचे
**– बालकवी**

(२) पडवळा-भोपळ्यांची
आळी ठेविलीं भाजून
**– इंदिरा संत**

(२) **माधुर्य–**माधुर्य म्हणजे गोडवा. काव्यात सोप्या शब्दांप्रमाणेच कोमल/मृदुवर्ण असलेले शब्द असतात, असे शब्द ऐकायला मधुर व सुखद वाटतात. अशा शब्दांचा वापर असलेल्या काव्यात माधुर्य गुण असतो.

**माधुर्य गुणाची लक्षणे (वैशिष्ट्ये)**

- मृदुवर्णांचा वापर केला जातो.
- अनुस्वार, ऱ्हस्व शब्द इत्यादींमुळे कर्णमधुरता येते.
- रचनेतील गोडव्यामुळे मानवी मनाला प्रसन्नता प्राप्त होऊन आनंद मिळतो.
- या काव्यगुणाने चित्तवृत्ती तल्लीन होतात.

उदा., घेई छंद मकरंद, प्रिय हा मिलिंद
मधुसेवनानंद स्वच्छंद, हा धुंद
मिटता कमलदल होई बंदी भृंग
तरि सोडिना ध्यास, गुंजनात दंग
**– पुरुषोत्तम दारव्हेकर**

(३) **ओज–** ओज म्हणजे भाषेतील आवेश, उत्साह व जोमदारपणा. काव्यातील या गुणाने अंगात वीरश्री संचारते, जोश उत्पन्न होतो आणि उत्साह संचारल्यासारखे वाटते.

**ओज गुणाची लक्षणे (वैशिष्ट्ये)**

- ह्या काव्यगुणात अंत:करणाला उद्दीपित करणारा गुणधर्म असतो.
- हा काव्यगुण वीर व रौद्र रसांना पुष्टिकारक आहे.
- हा काव्यगुण निर्माण होण्यास जोडाक्षरे, कठोर वर्ण, दीर्घ सामासिक शब्दांचा वापर होतो.
- या सर्व लक्षणांच्या वापराने भाषेत जोरकसपणा येतो व ओज गुण निर्माण होतो.

उदा., खडक काजळी घोटुनि तुमचे मनगट बाहू घडलेले
कडेकपारी मधील वणवे उरात तुमच्या दडलेले
काबुल-कंदहार पथावर डंके तुमचे झडलेले
**– कुसुमाग्रज**

## कृती

(१) खालील तक्ता पूर्ण करा.

| क्र. | काव्यगुण | अर्थ | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| (१) | प्रसाद | | |
| (२) | माधुर्य | | गोडवा, नादमाधुर्य, गेयता |
| (३) | ओज | ओज म्हणजे भाषेतील आवेश | |

(२) खालील उदाहरणांमधील काव्यगुण ओळखा.

खरा तो एकचि धर्म
जगाला प्रेम अर्पावे

आता उठवू सारे रान
आता पेटवू सारे रान
शेतकऱ्यांच्या राज्यासाठी
लावू पणाला प्राण

लालपोपटी कवळी पाने
लवलवणारी जिथे-तिथे
हिरवे पिवळे रंग त्यामध्ये
केशर सांडे कुठे-कुठे

(३) वाचा. चौकटींत काव्यगुण लिहा.

सुबोध काव्यरचना

रचनेत गोडवा असतो

स्फूर्तिदायी काव्यरचना

# ३. वाक्यसंश्लेषण

**(१) केवल वाक्य**

**खालील वाक्ये लक्षपूर्वक अभ्यासून त्यांतील उद्देश्य व विधेय शोधा.**

(१) मामा, घड्याळ आणले का?

(२) झाशीची राणी लक्ष्मीबाई अतिशय शूर होत्या.

(३) विद्यार्थ्यांनो, पाहुण्यांच्या सत्कारासाठी गुलाबाची फुले आणा.

वरील वाक्यांचे निरीक्षण केल्यानंतर तिसऱ्या वाक्यात **'विद्यार्थी'** उद्देश्य आणि **'आणा'** हे विधेय आहे हे लक्षात येते. इतर शब्द उद्देश्य विस्तार किंवा विधेय विस्तार आहेत; पण प्रत्येक वाक्यात एकच उद्देश्य आणि एकच विधेय असल्यामुळे अशा वाक्यांना **'केवल वाक्य'** म्हणतात.

**केवल वाक्याची वैशिष्ट्ये**

- एकच उद्देश्य व एकच विधेय असते.
- या वाक्यात कमीत कमी शब्द असतात.
- केवल वाक्ये विधानार्थी, आज्ञार्थी, प्रश्नार्थी, होकारार्थी वा नकारार्थी असू शकतात.
- केवल वाक्य तयार करताना कोणतेही उभयान्वयी अव्यय वापरले जात नाही.

**(२) मिश्र वाक्य**

**खालील वाक्ये वाचा व निरीक्षण करा.**

(१) गुरुजी म्हणाले, की प्रत्येकाने नियमित अभ्यास करावा.

(२) आकाशात जेव्हा काळे ढग जमतात, तेव्हा पाऊस पडतो.

(३) जे चकाकते, ते सोने नसते.

वरील तीन वाक्यांतील तिसऱ्या वाक्यात **'ते सोने नसते'** या स्वतंत्र वाक्यावर 'जे चकाकते' हे वाक्य अवलंबून आहे. म्हणजे जे वाक्य स्वतंत्र असते त्याला **'मुख्य'** किंवा **'प्रधान'** वाक्य असे म्हणतात व अवलंबून असणाऱ्या वाक्याला **'गौण वाक्य'** म्हणतात. दुसऱ्या वाक्यात **'पाऊस पडतो'** हे प्रधान वाक्य असून **'आकाशात काळे ढग जमतात'** हे गौण वाक्य आहे. ही वाक्ये जेव्हा-तेव्हा या गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययाने जोडलेली आहेत.

**मिश्र वाक्याची वैशिष्ट्ये**

- एक प्रधान वाक्य व एक किंवा अनेक गौण वाक्ये
- दोन्ही वाक्ये गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात.
- जोडलेली वाक्ये ही अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र नसतात.
- गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडल्यामुळे तयार होणारे नवीन वाक्य मिश्र वाक्य असते.

गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये-

| म्हणजे, की, म्हणून, जे, कारण, का, यास्तव, सबब, जर, जरी, जेव्हा-तेव्हा इत्यादी. |
|---|

**(३) संयुक्त वाक्य**

**पुढील वाक्ये अभ्यासा.**

(१) मी पहाटे लवकर उठते व एक तास अभ्यास करते.

(२) संध्याकाळी मी फिरायला जातो किंवा खेळायला जातो.

(३) आजी नोकरीतून निवृत्त झाली म्हणून तिला सवड मिळाली.

वरील वाक्यांत दोन किंवा अधिक वाक्ये आहेत आणि ती एकमेकांना अनुक्रमे 'व', 'किंवा', 'म्हणून' या प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली आहेत.

**संयुक्त वाक्याची वैशिष्ट्ये**

- दोन किंवा अधिक केवल वाक्ये असतात.
- ही वाक्ये प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी एकमेकांना जोडलेली असतात.
- जोडलेली वाक्ये ही अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र असतात.
- एकमेकांना प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडून तयार होणारे जोडवाक्य 'संयुक्त वाक्य' असते.

प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यये–

आणि, नि, व, शिवाय, अथवा, वा, की, किंवा, पण, परंतु, परी, बाकी, म्हणून, सबब, यास्तव याकरिता इत्यादी.

मिश्र वाक्य व संयुक्त वाक्यांतील फरक लक्षात घ्या.

| मिश्र वाक्य | संयुक्त वाक्य |
|---|---|
| (१) एकच प्रधान वाक्य असते. बाकीची गौण वाक्ये असतात. | (१) दोन किंवा त्यापेक्षा अधिक प्रधान वाक्ये असतात. |
| (२) गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात. | (२) प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात. |
| (३) जोडलेली वाक्ये ही अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र नसतात. | (३) जोडलेली वाक्ये ही अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र असतात. |

**लक्षात ठेवा–** मिश्र व संयुक्त वाक्यांत काही अव्यये समान असली तरी जोडली जाणारी वाक्ये आणि अव्ययांचे वाक्यांतील अर्थ लक्षात घेऊन वाक्य मिश्र की संयुक्त हे ठरवावे.

**(१) वाक्यसंश्लेषण किंवा वाक्यसंकलन**

एकमेकांशी संबंध असलेली दोन किंवा अधिक केवल वाक्ये दिली असता ती एकत्र करून त्यांचे एक वाक्य तयार करण्याच्या क्रियेला '**वाक्यसंश्लेषण**' म्हणतात.

**वाक्यसंश्लेषणाची आवश्यकता**

- वाक्यरचनेवर प्रभुत्व संपादन करण्यासाठी.
- आपल्या मनातील भाव नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी
- सुटी-सुटी, विस्कळीत वाक्ये लिहिण्यापेक्षा एकत्रित वाक्य मांडून विचारात सुसूत्रता आणण्यासाठी
- उत्तम लेखनकौशल्य विकसनासाठी, वाक्यसंश्लेषणाची कला अवगत करण्यासाठी

वाक्यसंश्लेषणात दोन किंवा अधिक वाक्ये एकत्र केल्यानंतर एक **'जोडवाक्य'** तयार होते. वाक्यसंश्लेषण तीन प्रकारचे असते.

**वाक्यसंश्लेषणाचे प्रकार**

(१) दोन किंवा अनेक केवल वाक्यांचे एक केवल वाक्य बनवणे.

(२) दोन किंवा अनेक केवल वाक्यांचे एक मिश्र वाक्य बनवणे.

(३) दोन किंवा अनेक केवल वाक्यांचे एक संयुक्त वाक्य बनवणे.

| |
|---|
| **लक्षात ठेवा–** केवल, मिश्र व संयुक्त वाक्यांचे परस्पर रूपांतर करता येते. |

**(१) केवल वाक्य तयार करणे.**

(१) आजी गुळगुळीत रस्त्यावरून चालत होती. तिचा पाय घसरला. ती पडली.
→ आजी गुळगुळीत रस्त्यावरून चालताना पाय घसरून पडली.

(२) माझ्या शाळेने मला बक्षीस म्हणून बंद डबा दिला. त्यात आकर्षक स्मृतिचिन्ह होते.
→ माझ्या शाळेने आकर्षक स्मृतिचिन्ह असलेला बंद डबा मला बक्षीस म्हणून दिला.

(३) राजू वारंवार कॉफी पितो. त्याच्या आईला ते आवडत नाही.
→ राजूचे वारंवार कॉफी पिणे त्याच्या आईला आवडत नाही.

(४) रवींद्रनाथ टागोर हे थोर कवी होते. रवींद्रनाथ टागोर यांनी 'गीतांजली' हे काव्य लिहिले.
→ थोर कवी रवींद्रनाथ टागोर यांनी 'गीतांजली' हे काव्य लिहिले.

वरील वाक्यांवरून असे लक्षात येते, की दोन किंवा अधिक वाक्यांचे वाक्यसंश्लेषण करताना धातुसाधित नामे, विशेषणे, समानाधिकरणात्मक शब्द (समान अर्थाची शब्दयोजना) किंवा शब्दसमूह वापरावेत. क्रियापद मात्र एकच वापरावे.

**(२) मिश्र वाक्ये तयार करणे.**

(१) आई म्हणाली. मोड आलेल्या धान्यात खूप प्रथिने असतात.
→ आई म्हणाली, की मोड आलेल्या धान्यात खूप प्रथिने असतात.

(२) शरयू वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आली. तिने खूप सराव केला.
→ शरयू वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आली, कारण तिने खूप सराव केला.

(३) आमचा उत्साह व आमचे स्मरण वाढावे. आम्ही शीर्षासन करतो.
→ आमचा उत्साह व आमचे स्मरण वाढावे म्हणून आम्ही शीर्षासन करतो.

(४) मला रेल्वेचे निश्चित आरक्षण मिळायला हवे. मी दिल्लीला जाईन.
→ मला रेल्वेचे निश्चित आरक्षण मिळाले, की मी दिल्लीला जाईन.

| |
|---|
| **लक्षात ठेवा–** केवळ गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये वापरून मिश्र वाक्ये तयार करावीत. |

**(३) संयुक्त वाक्ये तयार करणे.**

(१) नाटकाची तिसरी घंटा वाजली. नाटकाला सुरुवात झाली.
→ नाटकाची तिसरी घंटा वाजली आणि नाटकाला सुरुवात झाली.

(२) कृतिपत्रिका सोपी असते. कृतिपत्रिका अवघड असते. ती सोडवावी लागते.

→ कृतिपत्रिका सोपी असो किंवा अवघड ती सोडवावीच लागते.

(३) आपला मुद्दा पटवून द्यावा. वाद घालू नये.

→ आपला मुद्दा पटवून द्यावा; पण वाद घालू नये.

(४) वाटेत धो-धो पाऊस लागला. मला यायला उशीर झाला.

→ वाटेत धो-धो पाऊस लागला म्हणून मला यायला उशीर लागला.

**लक्षात ठेवा-** संयुक्त वाक्य तयार करताना प्रधानत्वसूचक व काही गौणत्वसूचक अशी दोन्ही प्रकारची उभयान्वयी अव्यये वापरली जातात.

## कृती

**(१) खालील वाक्यांचे संयुक्त, मिश्र व केवल वाक्य असे वर्गीकरण करा.**

(१) मी माणसे मोजून पाहिली; पण ती आठच भरली.

(२) सोनाली चहा किंवा कॉफी घेते.

(३) आम्ही मुंबईला पोहोचलो आणि खूप अडचणी निर्माण झाल्या.

(४) पाऊस पडला, तर शेतकरी वर्ग आनंदी होईल.

(५) मुले बागेत खेळली. ती खूप दमली.

(६) सर म्हणाले, की प्रामाणिक प्रयत्नांनी यश मिळते.

**(२) सूचनेनुसार वाक्यसंश्लेषण करा.**

(१) तो उत्तीर्ण झाला. सर्वांना आनंद झाला. (केवल वाक्य करा.)

(२) श्याम घरी आला. वादळाला सुरुवात झाली. (मिश्र वाक्य करा.)

(३) आम्हाला शिकवायला नवीन शिक्षक आले. आमच्या अडचणी दूर झाल्यात. (संयुक्त वाक्य करा.)

(४) माझे वडील म्हणाले. मला तुझे यश बघून तुझा अभिमान वाटला. (मिश्र वाक्य करा.)

(५) हे आधुनिक लोकशाहीचे युग आहे. जाहिरातीला महत्त्व आहे. समाजाने जाहिरातीचा योग्य अर्थ समजून घ्यावा. (केवल वाक्य करा.)

## ४. काळ

वाक्यात दिलेल्या क्रियापदावरून जसा क्रियेचा बोध होतो तसेच ती क्रिया कोणत्या वेळी घडत आहे याचा जो बोध होतो त्याला **'काळ'** असे म्हणतात.

**खालील कृती सोडवा व काळाचे नाव लिहा. (कंसांतील क्रियापदांचे योग्य रूप वापरा.)**

(१) मी या वर्षी काश्मीर सहलीला ......... (जाणे)
(२) काल झालेल्या निबंध स्पर्धेत मी उत्तम निबंध ......... (लिहिणे)
(३) हे बघ आनंद, उद्या तू सहलीला ......... असल्यामुळे लवकर ......... . (जाणे, उठणे)
(४) परवा सुरेशने सुरेल गीत ......... (गाणे)
(५) काल बाळूने बागेतील आंबे शेजाऱ्यांना ......... (देणे)
(६) वकिलाने आरोपीला आपली बाजू मांडू......... (देणे)
(७) भविष्यात मी कधीतरी विमानातून प्रवास ......... (करणे)
(८) हसणे हा मनुष्यस्वभाव ......... (असणे)
(९) काल रात्री सारखा विजांचा गडगडाट......... (होणे)
(१०) उद्या मी ही मालिका पुन्हा......... (बघणे)

**काळ**

- वर्तमानकाळ
  - सामान्य
  - अपूर्ण
  - पूर्ण
  - चालू पूर्ण (रीती काळ)
- भूतकाळ
  - सामान्य
  - अपूर्ण
  - पूर्ण
  - चालू पूर्ण (रीती काळ)
- भविष्यकाळ
  - सामान्य
  - अपूर्ण
  - पूर्ण
  - चालू पूर्ण (रीती काळ)

**खालील वाक्ये लक्षपूर्वक वाचा.**

(१) समीर पुस्तक वाचत असतो.
(२) समीर पुस्तक वाचत असे.
(३) समीर पुस्तक वाचत जाईल.
(४) विद्यार्थी सतत अभ्यास करत असतात.

**रीती काळाची वैशिष्ट्ये**

- (१) सामान्यपणे संयुक्त क्रियापदाचा वापर असतो.
- (२) संयुक्त क्रियापदावरून क्रियेचे सतत चालणारे रूप समजते. क्रियेची पुनरावृत्ती दिसते.
- (३) क्रियापदाच्या रूपावरून सतत चालणारी क्रिया कोणत्या काळात चालली आहे हे कळते.
- (४) कधी धातूला प्रत्यय लावून क्रियापद तयार होते. उदा., खात, बोलत, करत इत्यादी.

**रीती काळाचे प्रकार**

| (१) रीती वर्तमानकाळ | (२) रीती भूतकाळ | (३) रीती भविष्यकाळ |
| --- | --- | --- |
| उदा., स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी सतत अभ्यास करत असतात. | उदा., स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी सतत अभ्यास करत असत. | उदा., स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी सतत अभ्यास करत राहतील. |

(१) धावपटू धावण्याचा सतत सराव करत असतात.
(२) माझ्या एकत्र कुटुंबात आजी उत्तम संस्कार करत असे.
(३) हिरव्या पालेभाज्या आवश्यक असल्यामुळे सर्वच व्यक्ती रोजच्या आहारात त्या खात जातील.

## कृती

**(१) खालील वाक्यांतील रीती काळाचा प्रकार ओळखा.**

(१) नजमा उत्तम कविता लिहीत असे. .............
(२) मी लोकांना मदत करत राहीन. .............
(३) अभिजित सतार उत्तम वाजवत असतो. .............
(४) शिक्षक जे सांगतात, ते विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकत असतात. .............
(५) एका गावात एक उत्तम चित्रकार राहत होता. .............
(६) राहुल प्रार्थनेला नेहमीच उशिरा येत असतो. .............
(७) माधवराव नेहमीच सुगम संगीत ऐकत असत. .............
(८) दादासाहेब दररोज फिरायला जात असतात. .............
(९) तो सदोदित आजारी पडत असतो. .............

**(२) खालील वाक्यांतील काळ ओळखून त्यापुढे दिलेल्या कंसातील सूचनेनुसार वाक्यबदल करा.**

(१) मी तबला वाजवतो. (रीती भूतकाळ करा.)
(२) मुले खो-खो खेळत होती. (पूर्ण भूतकाळ करा.)
(३) रस्त्याच्या डाव्या बाजूने चालावे. (साधा वर्तमानकाळ करा.)
(४) तो विद्यार्थी अडखळत वाचत असतो. (साधा भूतकाळ करा.)
(५) वर्गातील विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकत होते. (साधा भविष्यकाळ करा.)

# ५. शब्दभेद

**खालील वाक्ये काळजीपूर्वक अभ्यासा.**

(१) मला पुस्तकाच्या पाच प्रती मिळाल्या.

(२) प्रत्येक मुलाला आई-वडिलांप्रति आदर असतो.

अधोरेखित शब्दांच्या अर्थांमध्ये फरक जाणवतो का? फरक जाणवतोच. शब्दाच्या लेखनात फरक असल्यामुळे अर्थात फरक पडतो.

दैनंदिन जीवनात आपण शब्दांचा वापर अगदी सहजतेने करत असतो. शब्दांचे संचित मागच्या पिढीकडून पुढच्या पिढीकडे जात असते. हे संचित पुढच्या पिढीकडे जाताना शब्दज्ञान, शब्दांचा अर्थ, शब्दांची व्युत्पत्ती, शब्दांचे लेखन, शब्द वापरण्याचे संदर्भ, शब्दांच्या विविध पण सूक्ष्म अर्थच्छटा इत्यादी घटकांचा गांभीर्याने विचार केला जात नाही. परिणामी शब्दांची व भाषेची हेळसांड होते; म्हणून शब्दभेद समजून घेणे गरजेचे आहे. भाषेत असंख्य शब्द असतात. त्या शब्दांना अर्थ असतो. शब्दांच्या उच्चारातून व लेखनातून जेव्हा सूक्ष्म बदल जाणवतात; पण अर्थाच्या दृष्टीने मात्र खूप फरक निदर्शनास येतो. तेव्हा तिथे **'शब्दभेद'** असतो. या शब्दभेदाचे आकलन जर नीट झाले नाही, तर अर्थभेद, अर्थहानी आणि अर्थविसंगती उद्‌भवू शकते.

**शब्दभेदाचे वर्गीकरण**

- (१) शब्दांच्या उच्चार साधर्म्यामुळे
- (२) शब्दलेखनातील होणाऱ्या सूक्ष्म बदलामुळे
- (३) शब्दांच्या संदर्भांची अचूक जाण नसल्यामुळे
- (४) शब्दांच्या लेखनात एखाद्या अक्षराचा फरक असल्यामुळे

**(१) शब्दांचे उच्चार साधर्म्य :** दोन शब्दांच्या उच्चारात काहीसे साधर्म्य असते; परंतु संदर्भात साधर्म्याला अजिबात स्थान नसते. हा संदर्भ पूर्ण जाणून न घेतल्यामुळे किंवा त्याबाबत असलेली उदासीनता यामुळे शब्दांचा अचूक वापर केला जात नाही.

| क्र. | शब्द | अर्थ | वाक्यांत उपयोग |
|---|---|---|---|
| (१) | गज (तालव्य उच्चार) | हत्ती | गणपतीच्या कानांना गजकर्ण म्हणतात. |
| | गज (दंतमूलीय उच्चार) | लोखंडी सळई | इमारत बांधताना गजांचा वापर करावा लागतो. |
| (२) | पार | बसण्याची सार्वजनिक जागा | गावातील पार ग्रामसभेसाठी उत्तम आहे. |
| | पार | पलीकडे | नदीपार घनदाट जंगल आहे.<br>आमचा गाव नदीपार आहे. |
| | पार | पूर्णपणे | सुधीरचा स्वभाव पार बदलला. |

| | | | |
|---|---|---|---|
| (३) | कर<br><br>कर | हात<br><br>करणे | सामाजिक कार्य अनेक करांनी एकत्र येऊन केल्यास यशस्वी होते.<br>तू तुझा अभ्यास पटकन कर. |
| (४) | वाच<br><br>वाच | वाचणे<br><br>तरणे | ललित वाङ्मय वाचनीय असते.<br><br>वाचाल तर वाचाल. |

**(२) शब्दलेखनातील सूक्ष्म बदल :** शब्दलेखन करताना ऱ्हस्व-दीर्घ याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यात चूक झाली तर केवळ लेखनातच फरक पडतो असे नाही तर चुकीचा अर्थही प्राप्त होऊ शकतो.

| क्र. | शब्द | अर्थ | वाक्यांत उपयोग |
|---|---|---|---|
| (१) | प्रती<br><br>प्रति | प्रत- पुस्तकाची प्रत, एकापेक्षा अधिक प्रती<br><br>एखाद्याला उद्देशून | पुस्तक विक्रेत्याने पुस्तकाच्या ५०० प्रती मागवल्या.<br><br>विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रति आदरभाव राखावा. |
| (२) | शीर<br>शिर | नस, रक्तवाहिनी<br>डोके, मस्तक | डॉक्टर रुग्णाला शीरेतून सलाईन देतात.<br>तळहातावर शिर घेऊन सैनिक देशासाठी अहोरात्र लढत असतात. |
| (३) | सूत<br><br>सुत | धागा<br>मित्रत्वाचे संबंध<br>पुत्र/मुलगा | स्वातंत्र्यपूर्व काळात सूतकताई करून खादीची निर्मिती करत असत.<br>त्या दोघींचे चांगलेच सूत जुळते.<br>कवी केशवसुत हे 'आधुनिक कवितेचे जनक' होत. |
| (४) | दीन<br><br>दिन | गरीब, दुबळा<br><br>दिवस | महात्मा फुले यांना दीन-दुबळ्यांचा कळवळा होता.<br>प्रजासत्ताक दिन उत्साहात पार पडला. |
| (५) | आदी<br><br>आदि | इतर, वगैरे<br><br>आरंभ, सुरुवात | बाजारातून केळी, संत्री, मोसंबी आदी फळे आणली.<br>सृष्टीच्या आदि-अंताविषयी नेमकेपणाने सांगता येत नाही. |

**(३) शब्दांच्या संदर्भाची अचूक जाण (संदर्भानुसार शब्दप्रयोजन) :** कोणता शब्द कोठे वापरावा याबद्दल काही संकेत असतात. या संकेतांना संदर्भाची पार्श्वभूमी असते. संदर्भ आणि संकेत यांत अंतर निर्माण झाले, तर अर्थातही फरक पडतो. अर्थविसंगती दिसून येते.

| क्र. | शब्द | अर्थ | वाक्यांत उपयोग |
|---|---|---|---|
| (१) | आयोजन | कार्यक्रमाची सुसूत्र आखणी | अंधश्रद्धा निर्मूलन समितीने युवकांसाठी एकदिवसीय शिबिराचे आयोजन केले. |
| | संयोजन | सांधा, मिलाफ, जोड | अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आयोजित केलेल्या शिबिराचे संयोजन आमच्या महाविद्यालयाने केले. |
| (२) | उद्‌देश | हेतू | चांगल्या उद्‌देशाने केलेले काम चांगलेच होते. |
| | उद्‌दिष्ट | ध्येय, साध्य | प्रामाणिक कष्ट हे साधन असते; तर यशप्राप्ती हे उद्‌दिष्ट असते. |
| (३) | उद्‌घाटन | कार्यक्रमाची सुरुवात | प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. |
| | प्रकाशन | प्रकाशित करणे | डॉ. नरेंद्र जाधव यांच्या 'आमचा बाप आन् आम्ही' या पुस्तकाच्या सर्व प्रती प्रकाशनाच्या दिवशीच संपल्या. |
| (४) | स्वागत | आदराने सामोरे जाणे | प्राचार्यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. |
| | सत्कार | कार्याबद्‌दल उचित सन्मान | स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेल्यांचा खास सत्कार करण्यात आला. |
| (५) | पुरस्कार | सन्मानाने दिले जाणारे, भरीव कार्याची दखल घेऊन दिले जाणारे बक्षीस | डॉ. भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्कार देऊन गौरवले. |
| | पारितोषक | कौतुक करण्यासाठी दिलेले बक्षीस | आज आमच्या महाविद्यालयात वार्षिक पारितोषक वितरणाचा कार्यक्रम आहे. |

**(४) शब्दांच्या (अक्षर फरकाने अर्थबदल) लेखनात एखाद्या अक्षराचा फरक :** दोन शब्दांत एखाद्या अक्षराचा जरी फरक असला तरी अर्थात खूप फरक पडतो. हा फरक समजण्यासाठी शब्दांची चांगली जाण असायला हवी.

| क्र. | शब्द | अर्थ | वाक्यांत उपयोग |
|---|---|---|---|
| (१) | परायण | तत्पर | कर्तव्यपरायण व्यक्ती समाजप्रिय असतात. |
| | पारायण | साद्यंत वाचन | धार्मिक पुस्तकांची भक्तिभावाने पारायणे केली जातात. |

| | | | |
|---|---|---|---|
| (२) | विदुर<br>विधुर | माहीतगार, अनुभवी<br>पत्नीचे निधन झालेला | विदुर व्यक्तींचा सन्मान करावा.<br>विधुरावस्थेतही तात्यांनी मुलांना आईची उणीव भासू दिली नाही. |
| (३) | खळ<br>खळे | चिकट पदार्थ<br>कृषिसंस्कृतीत मळणी करण्याची जागा | खळ लावून पाकीट बंद करतात.<br>शेतकरी खळ्यात कणसांची मळणी करतात. |
| (४) | उपहार<br>उपाहार | नजराणा, भेटवस्तू<br>फराळ, अल्पोपहार | मामींनी दिलेल्या पुस्तकांचा उपहार वैशिष्ट्यपूर्ण ठरला.<br>आमच्या गावातील 'रुचिरा' उपाहारगृह लोकप्रिय आहे. |
| (५) | नामांकित<br>मानांकित | प्रख्यात, प्रसिद्ध असणे.<br>मानाचे स्थान प्राप्त करणे. | डॉ. रघुनाथ माशेलकर हे नामांकित शास्त्रज्ञ आहेत.<br>भारताची बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिला जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाने मानांकित केले. |
| (६) | आवाहन<br>आव्हान | एखाद्या गोष्टीच्या प्रारंभासाठी प्रतिसादाला प्रवृत्त करणे.<br>एखाद्या गोष्टीच्या सिद्धतेची जबाबदारी स्वीकारणे. | 'प्लास्टिक हटाव' या मोहिमेच्या आवाहनाला नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला.<br>उत्सवाच्या काळात नागरिकांच्या सुरक्षिततेचे पोलिसांपुढे आव्हान असते. |
| (७) | अंतर<br>आंतर | भेद, तफावत<br>अंतर्गत | आधुनिक यंत्रयुगात जग जवळ आले; पण माणसांच्या मना-मनांतले अंतर मात्र वाढले.<br>आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धेत आमच्या महाविद्यालयाला प्रथम क्रमांक मिळाला. |
| (८) | प्रहर<br>प्रहार | विशिष्ट वेळ<br>आघात | कृष्णा सकाळच्या प्रहरी फिरायला जातो.<br>घणाच्या प्रहाराने मोठ्या दगडाचे तुकडे तुकडे होतात. |

'शब्द हे शस्त्र आहे', ही विद्यार्थिदशेत मिळालेली शिकवण स्वत:मध्ये रुजवायची असेल तर शब्दांमधील भेद चांगले समजून घ्यायला हवेत.

***

## कृती

**(१) शब्दांतील उच्चार साधर्म्यावरून कृती करा.**

| क्र. | शब्द | अर्थ | वाक्यांत उपयोग |
|---|---|---|---|
| (१) | चार<br>चार | | |
| (२) | खोड<br>खोड | | |

**(२) शब्दलेखनातील सूक्ष्म बदल**

| क्र. | शब्द | अर्थ | वाक्यांत उपयोग |
|---|---|---|---|
| (१) | किंतु<br>किंतू | | |
| (२) | पाणी<br>पाणि | | |

**(३) संदर्भानुसार शब्दप्रयोजन**

| क्र. | शब्द | अर्थ | वाक्यांत उपयोग |
|---|---|---|---|
| (१) | परोक्ष<br>अपरोक्ष | | |
| (२) | जिवंत<br>ज्वलंत | | |

**(४) अक्षर फरकाने अर्थबदल**

| क्र. | शब्द | अर्थ | वाक्यांत उपयोग |
|---|---|---|---|
| (१) | पत<br>पथ | | |
| (२) | सन<br>सण | | |

परिशिष्टे

## पारिभाषिक शब्द

विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योग, कृषी, शिक्षण, प्रशासन, विधी, वाणिज्य, कला आणि संस्कृती इत्यादी क्षेत्रांशी संबंधित संकल्पनांच्या प्रकटीकरणासाठी पारिभाषिक शब्दांचा वापर केला जातो. त्यांच्या वापरामुळे त्या-त्या क्षेत्रांमधील ज्ञानव्यवहार अधिक नेमका आणि सुस्पष्ट होतो. त्यादृष्टीने पारिभाषिक शब्दांना अनन्यसाधारण महत्त्व असते. याठिकाणी तुमच्या माहितीसाठी काही महत्त्वाचे पारिभाषिक शब्द दिले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| Academics | विद्याविषयक | Gazette | राजपत्र |
| Administration | प्रशासन | Geology | भूशास्त्र |
| Agenda | विषयपत्रिका | Guest House | अतिथीगृह |
| Auditor | लेखापरीक्षक | Guard of Honour | मानवंदना |
| Backlog | अनुशेष | Herald | अग्रदूत |
| Barometer | वायुभारमापक | Habitat | प्राकृतिक वसतिस्थान |
| Barcode | दंडसंकेत | Honorary | मानद, मानसेवी |
| Broadband | विस्तारित वहन | Hygiene | आरोग्यशास्त्र |
| Circular | परिपत्रक | Iceberg | हिमनग |
| Commissioner | आयुक्त | Incentive | प्रोत्साहनपर |
| Criticism | समीक्षा | Increment | वाढ |
| Dean | अधिष्ठाता | Industrialization | औद्योगिकीकरण |
| Director | संचालक | Journal | नियतकालिक |
| Domain | अधिक्षेत्र | Jubilee | महोत्सव |
| Domicile | अधिवास | Junction | महास्थानक |
| Draft | मसुदा, धनाकर्ष | Keep pending | प्रलंबित ठेवणे |
| Elected | निर्वाचित | Keyboard | कळफलक |
| Encyclopedia | विश्वकोश | Kindergarten | बालकमंदिर |
| Enrolment | नावनोंदणी | Labour welfare | कामगार कल्याण |
| File | संचिका | Land-holder | भूधारक |
| Felicitation | गौरव | Lawyer | विधिज्ञ/वकील |
| Foundation | प्रतिष्ठान | Layout | आखणी, मांडणी |

| | | | |
|---|---|---|---|
| Meteorology | हवामानशास्त्र | Superintendent | अधीक्षक |
| Migration Certificate | स्थलांतर प्रमाणपत्र | Symposium | परिसंवाद |
| Minute book | कार्यवृत्त पुस्तक | Technician | तंत्रज्ञ |
| Motto | ब्रीदवाक्य | Telecommunication | दूरसंपर्क |
| Nationalism | राष्ट्रवाद | Terminology | परिभाषा |
| Nervous System | चेतासंस्था | Thesis | प्रबंध |
| Notification | अधिसूचना | Unbiased opinion | पूर्वग्रहविरहीत मत |
| Noteworthy | उल्लेखनीय | Upgradation | उन्नयन |
| Official | कार्यालयीन | Up-to-date | अद्ययावत |
| Organisation | संघटना | Utility | उपयुक्तता |
| Organic Farming | सेंद्रिय शेती | Vacancy | रिक्त पद |
| Paediatrician | बालरोगतज्ज्ञ | Validity | वैधता |
| Pedestrian | पादचारी | Verification` | पडताळणी |
| Personal Assistant | स्वीय सहायक | Vocational School | व्यवसाय शिक्षण शाळा |
| Procession | मिरवणूक | | |
| Qualified | अर्हतापात्र | Waiting list | प्रतीक्षासूची |
| Quality Control | गुणवत्ता नियंत्रण | World Record | विश्वविक्रम |
| Quick Disposal | त्वरित निकाली काढणे | Working Capital | खेळते भांडवल |
| Quorum | गणसंख्या | Writ | न्यायलेख |
| Reader | प्रपाठक, वाचक | X-ray | क्ष-किरण |
| Recommendation | शिफारस | Xerox | नक्कलप्रत |
| Rest House | विश्रामगृह | Yard | आवार |
| Runway | धावपट्टी | Yearbook | संवत्सरिका |
| Self defence | स्वसंरक्षण | Zero Hour | शून्यकाळ |
| Senate | अधिसभा | Zoologist | प्राणिशास्त्रज्ञ |
| Share Certificate | समभागपत्र | Zone | परिमंडळ, विभाग |

## इंग्रजी आणि मराठी म्हणी

नेमक्या आणि मोजक्या शब्दांत मोठा अर्थ सौंदर्यपूर्ण रीतीने व्यक्त करणाऱ्या म्हणी हा भाषेचा अनमोल ठेवा असतो. या ठिकाणी इंग्रजी म्हणींचा अर्थ मराठी म्हणींच्या स्वरूपात दिलेला आहे. जगात कुठेही राहणाऱ्या आणि वेगळी भाषा बोलणाऱ्या माणसांच्या विचारात किती कमालीचे साम्य असते हे या निमित्ताने स्पष्ट होते.

खालील म्हणींचा वापर केल्याने तुमचे लेखनसौंदर्य नक्की वाढेल.

- A bad workman always blames his tools.
  नाचता येईना अंगण वाकडे.
- No pains, no gains.
  कष्टाविण फळ नाही.
- A fig for the doctor when cured.
  गरज सरो नि वैद्य मरो.
- An empty vessel makes much noise.
  उथळ पाण्याला खळखळाट फार.
- As you sow, so you reap.
  पेराल तसे उगवेल.
- A drowning man will clutch at a straw.
  बुडत्याला काडीचा आधार.
- Between two stools we come to the ground.
  दोन्ही घरचा पाहुणा उपाशी.
- Barking dogs seldom bite.
  गर्जेल तो पडेल काय?
- Doctor after death
  वरातीमागून घोडे
- Every dog has his day.
  चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे.
- Every house has its skeleton.
  घरोघरी मातीच्या चुली.
- First come first served.
  हाजीर तो वजीर.
- It takes two to make a quarrel.
  एका हाताने टाळी वाजत नाही.
- Jack of all trades and master of none.
  एक ना धड भाराभर चिंध्या.
- Listen to people, but obey your conscious.
  ऐकावे जनाचे पण करावे मनाचे.
- Many a little makes a mickle.
  थेंबे थेंबे तळे साचे.
- Might is right.
  बळी तो कान पिळी.
- Money makes the mare go.
  दाम करी काम.
- Necessity is the mother of invention.
  गरज ही शोधाची जननी आहे.
- New lords, new laws.
  नवी विटी नवे राज्य.
- No rose without a thorn.
  काट्यावाचून गुलाब नाही.
- Old is gold.
  जुने ते सोने.
- Out of sight, out of mind.
  दृष्टीआड सृष्टी.
- Too many cooks spoil the broth.
  बारा सुगरणी तरी आमटी आळणी.
- Union is strength.
  एकी हेच बळ.
- Where there is a will, there is a way.
  इच्छा तेथे मार्ग.

## काही साहित्यिकांची टोपण नावे व पूर्ण नावे

| टोपणनाव | लेखक |
|---|---|
| मोरोपंत | मोरेश्वर रायाजी पराडकर |
| लोकहितवादी | गोपाळ हरी देशमुख |
| रे. टिळक | नारायण वामन टिळक |
| केशवसुत | कृष्णाजी केशव दामले |
| माधवानुज | काशीनाथ हरी मोडक |
| बी | नारायण मुरलीधर गुप्ते |
| नाथमाधव | द्वारकानाथ माधवराव पितळे |
| बाळकराम (नाटक) गोविंदाग्रज (कविता) | राम गणेश गडकरी |
| बालकवी | त्र्यंबक बापूजी ठोमरे |
| गिरीश | शंकर केशव कानेटकर |
| माधव ज्युलियन | माधव त्रिंबक पटवर्धन |
| विनोबा | विनायक नरहर भावे |
| कुंजविहारी | हरिहर गुरुनाथ कुळकर्णी |
| अज्ञातवासी | दिनकर गंगाधर केळकर |

| टोपणनाव | लेखक |
|---|---|
| काव्यविहारी | धोंडो वामन गद्रे |
| यशवंत | यशवंत दिनकर पेंढरकर |
| अनिल | आत्माराम रावजी देशपांडे |
| विभावरी शिरुरकर | मालतीबाई विश्राम बेडेकर |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | माणिक बंडोजी ठाकूर |
| मनमोहन | गोपाळ नरहर नातू |
| बी. रघुनाथ | भगवान रघुनाथ कुळकर्णी |
| अमरशेख | शेख महबूब हसन |
| आरती प्रभु | चिंतामण त्र्यंबक खानोलकर |
| चारुता सागर | दिनकर दत्तात्रय भोसले |
| दया पवार | दगडू मारुती पवार |
| ग्रेस | माणिक सितारामपंत गोडघाटे |
| प्रेमानंद गज्वी | आनंद शंकर गजभिये |
| पठ्ठे बापूराव | श्रीधर कृष्णाजी कुळकर्णी |
| ठणठणपाळ | जयवंत द्वारकानाथ दळवी |

## काही साहित्यिक व त्यांच्या प्रसिद्ध रचना

| साहित्यिकाचे नाव | पुस्तक |
|---|---|
| लक्ष्मीबाई टिळक | स्मृतिचित्रे |
| श्री. म. माटे | उपेक्षितांचे अंतरंग |
| श्री. ज. जोशी | आनंदीगोपाळ |
| वि. वा. शिरवाडकर | नटसम्राट |
| विश्राम बेडेकर | रणांगण |
| गोदावरी परुळेकर | जेव्हा माणूस जागा होतो |

| साहित्यिकाचे नाव | पुस्तक |
|---|---|
| श्री. ना. पेंडसे | रथचक्र |
| गो. नी. दांडेकर | पडघवली |
| विंदा करंदीकर | अष्टदर्शने |
| अण्णाभाऊ साठे | फकिरा |
| शंकरराव खरात | तराळ अंतराळ |
| शांता शेळके | चौघीजणी |

| साहित्यिकाचे नाव | पुस्तक |
|---|---|
| वसंत कानेटकर | रायगडाला जेव्हा जाग येते |
| जी. ए. कुलकर्णी | काजळमाया |
| गंगाधर गाडगीळ | एका मुंगीचे महाभारत |
| ना. सं. इनामदार | राऊ |
| नारायण सुर्वे | माझे विद्यापीठ |
| सुनीता देशपांडे | आहे मनोहर तरी |
| व्यंकटेश माडगूळकर | बनगरवाडी |
| द. मा. मिरासदार | मिरासदारी |
| रणजित देसाई | स्वामी |
| मंगेश पाडगांवकर | सलाम |
| मारुती चितमपल्ली | पक्षी जाय दिगंतरा |
| नरहर कुरुंदकर | धार आणि काठ |
| मधु मंगेश कर्णिक | माहिमची खाडी |
| आनंद यादव | झोंबी |
| दया पवार | बलुतं |
| भालचंद्र नेमाडे | कोसला |

| साहित्यिकाचे नाव | पुस्तक |
|---|---|
| महेश एलकुंचवार | वाडा चिरेबंदी |
| किरण नगरकर | सात सक्कं त्रेचाळीस |
| प्र. ई. सोनकांबळे | आठवणींचे पक्षी |
| अनिल अवचट | माणसं |
| लक्ष्मण माने | उपरा |
| रंगनाथ पठारे | ताम्रपट |
| नरेंद्र जाधव | आमचा बाप आन् आम्ही |
| लक्ष्मण गायकवाड | उचल्या |
| उत्तम कांबळे | आई समजून घेताना |
| अरुणा ढेरे | कृष्णकिनारा |
| विश्वास पाटील | पानिपत |
| राजन गवस | तणकट |
| सदानंद देशमुख | बारोमास |
| किशोर शांताबाई काळे | कोल्हाट्याचं पोर |

## ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त मराठी साहित्यिक

| साहित्यिकाचे नाव |
|---|
| विष्णु सखाराम खांडेकर |
| विष्णु वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) |
| गोविंद विनायक करंदीकर (विंदा करंदीकर) |
| भालचंद्र वनाजी नेमाडे |

# शब्दार्थ व वाक्प्रचार

पाठ्यपुस्तकातील पाठ, कविता यांमध्ये आलेले अपरिचित शब्द, वाक्प्रचार व त्यांचे अर्थ खाली दिलेले आहेत. दिलेले शब्द व वाक्प्रचार यांची मांडणी विद्यार्थ्यांनी वहीत शब्दकोशाप्रमाणे (अकारविल्हे) करावी.

◆ **मामू**

**अनघड** – न घडलेले.
**ढब** – शैली.
**इशारत मिळणे–** इशारा मिळणे.
**चौवाटा पांगणे–** चार दिशांना विखुरणे.

◆ **प्राणसई (कविता)**

**घनावळ** – मेघमाला.
**सांगावा** – निरोप.
**हुडा** – गोवऱ्यांचा ढीग.
**शेणी** – गोवरी.
**ठाणबंदी** – पशूंना गोठ्यात बांधून ठेवणे.
**कोमेली** – कोमेजली.
**भिंग** – आरसा.

◆ **अशी पुस्तकं**

**खिळवून ठेवणे–** मन गुंतवून ठेवणे.
**आरोळी ठोकणे–** मोठ्याने हाक मारणे.

◆ **झाडांच्या मनात जाऊ (कविता)**

**फाया**–अत्तर लावलेला कापसाचा बोळा.
**करणी**–कृती, क्रिया.

◆ **परिमळ**

**तोंडात मूग धरून बसणे**– गप्प बसून राहणे.
**अपढिक** – न शिकलेला/न शिकलेली.
**धरित्री**–जमीन.

◆ **दवांत आलिस भल्या पहाटीं (कविता)**

**पिपासा**–तहान
**तरल**– चंचल.
**गोंदणे**– सुईने किंवा काट्याने त्वचेवर काढलेली नक्षी/काढलेले चिन्ह.

◆ **माणूस बांधूया**

**मन कातर होणे–** भयभीत होणे.
**काळजात क्रंदन होणे–** दु:ख होणे.
**साद**– हाक.
**क्रंदन** – आक्रोश, आक्रंदन.

◆ **ऐसीं अक्षरें रसिकें (संतकाव्य)**

**बीक**– बळ.
**कळंभा**– कलह, भांडण.
**धणी**– तृप्ती.
**आविष्करें**– तयार होतात, सरसावतात.
**बुझावी**– समाधान व्हावे.
**सहस्रकरु**– सूर्य.
**भावज्ञां**– (भाव) जाणणाऱ्यांना.
**फावती**– आढळतात.
**वोगरिलीं** – वाढलेली.
**नीच नवी**– नित्यनूतन.
**प्रतिपत्ति**– मेजवानी.
**आत्मप्रभा**– आत्मप्रकाश.
**ठाणदिवी**– लाकडी समई. प्रकाशाचे साधन.

◆ **वहिनींचा 'सुसाट' सल्ला**

**असहकाराचे अंजन घालणे** – सहकार्य न करण्याचा उपाय योजणे.

◆ **शब्द (कविता)**

**आकांत**– अनर्थ/कोलाहल.
**उतराई होणे**– उपकारातून मुक्त होणे.

◆ **वाङ्मयीन लेण्याचा शिल्पकार**

**न्यून असणे** – कमतरता असणे.
**विचारांची पिंजण चालणे** – विचारप्रक्रिया सतत चालू राहणे.
**साक्षित्वाने** – एकाग्रतेने, दक्षतापूर्वक.
**मातीशी मसलत करणे** – मातीशी संवाद साधणे.
**बांडगुळ** – परोपजीवी वनस्पती .
**अवाक् होणे**– आश्चर्यचकित होणे.
**अभ्यासाचे डोंगर पेलणे**– खूप अभ्यास करणे.

◆ **पैंजण (कविता)**

**तोरा**– ऐट.

# इयत्ता ९ वी ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ वी ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.











**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

मराठी युवकभारती इयत्ता अकरावी

**₹ 98.00**